१८०८-

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. क्र. १६०६
१५४४

# वाङ्मय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. | विभाग | क्रमांक

पुस्तकाचें नांव

लेखक

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006495

कि. ३॥ रुपये

THE IDEAL BOOK CO.
CHHABILDAS ROAD.
BOMBAY 14.

# ललित वाङ्मय

लेखक

प्र. के. अत्रे

REFBK-0006495

प्रकाशक व व्यवस्थापक
**रा० ज० देशमुख**
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार, पुणें २

संचालक
**भ० व्यं० देशमुख**
बी.ए., एलएल.बी.

(१) सर्व हक्क सौ. सुधाबाई अत्रे यांच्या स्वाधीन आहेत.

(२) मुखपृष्ठावरील चित्र दीनानाथ दलाल यांचें आहे.
(३) मुखपृष्ठावरील चित्राचा ब्लॉक बॉम्बे प्रोसेस स्टोडिओंत केला आहे.

क्रमांक ६२
२५ जून १९४४

मुद्रक
**वि. गं. केतकर**
व्यवस्थापक
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें २

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड | १।।। |
| २ | घरट्याबाहेर | १।।। |
| ३ | स्त्री आणि पुरुष | २ |
| ४ | कलिका | २। |
| ५ | सायंकाल (आ. २ री.) | २।। |
| ६ | अविनाश | १।।। |
| ७ | मंदाकिनी | १।।। |
| ८ | सहा भाषणें | २ |
| ९ | फुलें आणि कांटे | २। |
| १० | पहिलें प्रेम (आ. २ री.) | ३ |
| ११ | जळलेला मोहर | ३ |
| १२ | क्रौंचवध | ४ |
| १३ | पांढरे ढग | ४। |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | | |
|---|---|---|
| १ | अवशेष | २ |
| २ | नागकन्या | २ |
| ३ | माझी नभोवाणी | २ |
| ४ | नवे संसार (जप्त) | ४ |
| ५ | चंदनवाडी | ६।। |
| ६ | व्यक्तिरेखा | २। |

## ना. घों. ताम्हनकर

| | | |
|---|---|---|
| १ | तात्या भा. १ ला. | २।। |
| २ | तात्या भा. २ रा. | ३ |
| ६ | निवाडे भा. १ ला. | २।। |
| ४ | चकमकी | १।। |
| ५ | बच्चा नवरा | १।। |
| ६ | अनेक आशीर्वाद | ३।। |
| ७ | दाजी भा. १ ला. | ३।। |

## चिं. वि. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | आणखी चिमणराव (आ.२री) | ४ |
| २ | नवें भारूड | २ |
| ३ | स्टेशनमास्तर | २ |

## साने गुरुजी

| | | |
|---|---|---|
| १ | पुनर्जन्म (आ. २ री.) | ३ |
| २ | आस्तिक | २।। |
| ३ | सोन्या मारुति? (आ. २ री.) | २ |

## दत्तू बांदेकर

| | | |
|---|---|---|
| १ | सख्याहरी | १।।। |
| २ | नवी आघाडी | १।। |
| ३ | तूं आणि मी | २। |

## प्र. के. अत्रे

| | | |
|---|---|---|
| १ | साखरपुडा | १।। |
| २ | ललित वाङ्मय | ३।। |

## द. र. कवठेकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपुरा डाव | ३ |
| २ | रेशमाच्या गांठी | ३ |

## वा. म. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | स्मृति–लहरी | २ |
| २ | विचार–लहरी | २। |

## पु. य. देशपांडे

| | | |
|---|---|---|
| १ | नवें जग? | २।। |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनं

### भाई बेके
१ रॉयचरित्र १॥

### प. ले. वि. स. खांडेकर
१ काव्यज्योति १

### आनंदीबाई जयवंत
१ पारंब्या २

### लक्ष्मण० सरदेसाई
१ ढासळलेले बुरूज २

### प्रो. वि. ह. कुलकर्णी
१ व्यक्तिचित्रें २॥

### ना. ह. आपटे
१ फसगत. १॥

### शकुंतला परांजपे
१ भिल्लिणीचीं बोरें ३

### कृष्णाबाई मोटे
१ मीनाक्षीचें जीवन २।

### र. गो. सरदेसाई
१ चलतीं नाणीं २

### रा. श्री. जोग
१ सौंदर्यशोध आणि आनंद ८

### ना. म. पटवर्धन
१ हितपत्रें १

### वि. वि. बोकील
१ बेबीची बहीण ३

### सत्यग्राही
१ ग्रह आणि तारे ४।

### अनंत काणेकर
१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३
२ पिकलीं पानें (दु. आ.) १॥

### काकासाहेब कालेलकर
१ ब्रह्मदेशचा प्रवास १॥

### य. दि. पेण्ढरकर
१ प्रापंचिक पत्रें ३
२ घायाळ

### वि. म. भुस्कुटे
१ स्टॅलिन ३॥

### कमलाबाई टिळक
१ आकाशगंगा २॥

### रामतनय
१ साखर गोटी ५

# आगामी प्रकाशनं

## वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ तिसरी भूक
४ वर्षाकाल
५ छायाभाग १-२
६ चार भिंती
७ हिरवा चाफा (दु. आ.)
८ दोन ध्रुव ,,
९ कालचीं स्वप्नें
१० विसावें शतक
११ पहिली लाट
१२ कल्पकता
१३ वालुका
१४ मंजिऱ्या
१५ मराठीचा नाट्यसंसार
१६ वा. म. जोशी (व्यक्ति आणि वाङ्मय)
१७ चल ये राणी
१८ सुवर्ण कण

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ती उदयन
५ उर्वशी
६ उमर खय्याम
७ विलपिका

## द. र कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

## ना. ह. आपटे

१ साजणी

## ना. धों ताम्हनकर

१ निवाडे भा. २ रा
२ गुजाताई
३ शेजारी

## प्र. के. अत्रे

१ शब्दचित्रें
२ 'मी' कसा झालो

## कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली

## काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ नटवर्य

## दत्तू बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब

# ललित वाङ्मय

प्र. के. अत्रे

नि. १६०६
३०.३.६६

# पुरोगामी वाङ्मय

# आणि वास्तववाद

वाङ्मय परिषद, बडोदें

स. नि.
८५८

मान्यवर स्वागताध्यक्ष, वाङ्मयपरिषदेचे सन्माननीय सभासद, साहित्यप्रेमी बंधु भगिनींनो—किंवा बहिणींनो आणि भावांनो—तसेंच सामान्य व विशेष जनहो,

आपल्या या महान् नगरींतील वाङमय परिषदेच्या चौथ्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं आपण मला आज आज्ञा केली आहे—किंबहुना आपल्या प्रेमाचें पकड वॉरंट पाठवून आपण मला या स्थानीं अखेर पकडूनच आणलेंत—याबद्दल आपल्याला काय म्हणावें हेंच मला कळत नाहीं. विद्वज्जनांकडे आपण लिहून धाडलेल्या आपल्या छापील पत्रकांत माझा 'सुप्रसिद्ध' साहित्यसेवक असा आपण उल्लेख केलेला आहे. मी एक साहित्यसेवक आहें आणि 'सुप्रसिद्ध' ही आहे यांत शंका नाहीं. पण माझी साहित्यसेवा कितपत 'सुप्रसिद्ध' आहे याविषयीं कांहीं वतनदार पंडित मंडळींना संशय पडल्याविना राहणार नाहीं. तथापि, असल्या विशेषणांच्या साभिप्रायतेबद्दल शंका उत्पन्न होण्यासारख्या असल्या तरी मी महाराष्ट्रांतला एक अत्यंत 'जाडा व वजनदार' साहित्यसेवक आहें याबद्दल आपणां सर्वांचें एकमत होईल याबद्दल माझी खात्री आहे. किंबहुना, हल्लींच्या रेकॉर्ड मोडण्याच्या भाषेंतच सांगावयाचें झाल्यास मला असेंहि अभिमानानें सांगतां येईल—अर्थात् चुकभूल होत असल्यास ती मी मागाहून कबूल करीनच—कीं, निव्वळ

'वजनदार'पणांत आजपर्यंत महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या साहित्यपरिषदेच्या अध्यक्षांमध्यें मी खात्रीनें 'रेकॉर्ड-ब्रेकर'च अध्यक्ष ठरेन.

आपल्या या परिषदेच्या थाटाला व समारंभाला शोभेल असा एकादा भरभक्कम व उंचापुरा अध्यक्ष आपणाला असावा अशी जर आपल्यापैकीं कोणाची मनीषा असली तर ती कदाचित् माझ्या या नेमणुकीमुळें तृप्त होईल. पण ज्यानें महाराष्ट्र वाङ्मयांत कांहीं तरी 'भरीव' कामगिरी केली आहे, किंवा ज्यानें साहित्यांत सामान्य जनांना न कळणारे असे भारदस्त ग्रंथ लिहिले आहेत असा जर अध्यक्ष तुमच्यापैकीं कोणाला हवा असला तर त्यांची मात्र या स्थळीं झालेल्या माझ्या उपस्थितीमुळें खचित निराशा होईल. आजपर्यंत माझ्या हातून गंभीर, नीरस व क्लिष्ट विषयावर ग्रंथरचना झाली नाहीं हा माझ्या साहित्यसेवेमध्यें एक मोठा उणेपणा राहून गेला आहे हें मला सर्वस्वीं मान्य आहे. माझी 'ग्रंथा'ची व्याख्या अशी आहे कीं, जो पांचशें पानांचा असून जो कोणीहि फारसा वाचीत नाहीं, तरी देखील ज्याला कुठल्या ना कुठल्या तरी ग्रंथोत्तेजक मंडळाकडून मधून मधून बक्षिसें मिळत असतात तो ग्रंथ !) देवाच्या दयेनें मी असल्या ग्रांथिक सन्निपातानें अद्यापि पछाडलेलों नाहीं. तसें असतें तर माझ्या साहित्यसेवेचा ग्रंथ कधींच आटोपला असता. लोकांना जें सहज कळेल, पटेल किंवा ज्यामुळें त्यांची पुष्कळशी करमणूक होऊन मौज वाटेल असें लिखाण लिहिणारा मी एक प्राकृत लेखक आहें. तथापि आपण जें करीत नाहीं किंवा जें करण्याचा आपला हेतु नाहीं अथवा जें करण्याचें आपल्यांत कदाचित् सामर्थ्यहि नसेल, तेंच नेमकें आपण कां करीत नाहीं असें विचारणाऱ्या टीकाकारांचा एक पक्ष महाराष्ट्रांत उपस्थित झालेला आहे. व्युत्पत्तिशास्त्रज्ञ वैय्याकरणी लेखकानें नाटचछटा लिहाव्यात, लघुकथाकारानें स्थापत्यशास्त्रावर लेख लिहावेत किंवा मल्लविद्येवर पुस्तकें लिहिणाऱ्यानें लावण्या, छकडी लिहाव्यात किंवा पाकशास्त्रावर पुस्तकें लिहिणाऱ्यानें कामशास्त्रावर पुस्तकें लिहावींत अशी अपेक्षा या टीकाकारांची असते. चार लोक हौसेनें माझें लिखाण वाचतात किंवा माझीं नाटकें पाहण्यास बरीच मंडळी येतात असें बघून हे लोक मला विचारतात कीं तुम्ही 'ग्रंथनिष्पत्ति' कां करीत नाहीं? साहित्यामधून पुढें केव्हां तरी मी 'पेन्शनीं'त निघेन त्या वेळीं हा उद्योग साधला तर करून बघेन असें मी

त्यांना सांगतों. रवीन्द्रनाथ टागोरांना जर ही मंडळी भेटली तर त्यांना तुम्ही आपल्या दाढीमिशा काढून टाकून नुसता 'फरेंच कट' कां ठेवीत नाहीं असें ही मंडळी विचारल्याशिवाय राहणार नाहींत किंवा सौ. सरोजिनी नायडू भेटल्या तर त्यांना इलकली लुकडें नेसून हातांत गोठपाटल्या व पायांत जोडवी घालण्याचा उपदेश करावयालाहि ही मंडळी चुकणार नाहींत असा माझा कयास आहे. कसेंहि असो, माझ्या साहित्यसेवेमधील ठळक उणेपणाकडे डोळेझांक करून आपण मला या संमेलनाचे अध्यक्ष 'वनवलेत' या आपल्या थोरपणाबद्दल मी आपला कृतज्ञ आहें. इंदूर यथें नुकत्याच भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान 'साष्टांग नमस्कारा'च्या एका श्रीमंत प्रणेत्याला प्राप्त झालें म्हणून या संमेलनाचें अध्यक्षस्थान 'साष्टांग नमस्कारा'च्या दुसऱ्या एका अकिंचन कर्त्याला प्राप्त होणें हें ओघानेंच आलें असें सहज परवां कोणी मला म्हणालें; माझा त्यांवर अर्थातच विश्वास नाहीं.

आपल्या संस्थानच्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, विद्याप्रेमी व प्रगमनशील महाराजांच्या कारकीर्दीचा हीरक महोत्सव आपण मोठ्या थाटानें नुकताच साजरा केलेला आहे. ह्याच सुमारास भरत असलेल्या वाङ्मय परिषदेच्या या अधिवेशनाच्या चालकत्वाचे कामीं माझी योजना व्हावी हें माझें सुदैवच म्हटलें पाहिजे. तथापि, मला मिळालेल्या या मानाबद्दल मला आनंद वाटण्याऐवजीं आपण मजकडे सोपविलेल्या या अवघड कामगिरीच्या जवाबदारींतून मला सहीसलामत कसें सुटतां येईल याबद्दल मला स्वतःला सारखी काळजी वाटत आहे. ज्या या नगरांत राजकवि चंद्रशेखर, श्री. दाजी नागेश आपटे, जनरल नानासाहेब शिंदे, श्री. वि. स. वाकसकर, श्री. चिंतामणराव जोशी, श्री. वासुदेवराव जोशी, प्रो. दांडेकर, श्रीमती मुक्ताबाई लेले, यांच्यासारखे प्रतिभाशाली, बुद्धिमान् व पराक्रमी साहित्यसेवक अधिवास करीत आहेत, त्या स्थळीं माझ्यासारख्या सामान्य लेखकानें येऊन साहित्य विषयावर अधिकारवाणीनें चर्चा करणें किंवा निर्णायक मतप्रदर्शन करणें, हें जितकें माझ्या दृष्टीनें धाष्टर्याचें, तितकेंच आपल्या दृष्टीनेंहि अनवश्यकच होय ! काश्मीरसारख्या गुलाबाच्या गेंदांनीं लडगलेल्या प्रदेशांत एखाद्या घाटमाथ्यावरच्या अडाणी माणसानें गुलबाशीचीं फुलें—किंवा 'झेंडूचीं फुलें' म्हणा हवीं तर—खपविण्यासाठीं जाण्याइतकेंच हें हास्यास्पदहि आहे.

तथापि, धाष्टर्याचीं व हास्यास्पदहि कामें करण्यांत मीं आजपर्यंत पुष्कळच नांवलौकिक मिळवला असल्यानें आज मी करीत असलेलें हें नवीन धाडसाचें कृत्य माझ्या परंपरेला एकंदरींत साजेल असेंच आहे.

मी अत्यंत चिवट जातीचा असा एक आशावादी माणूस आहें. मला हिंदुस्थानांतील इतर प्रांतांविषयीं नक्की सांगतां यावयाचें नाहीं, पण महाराष्ट्राविषयीं मात्र मला असें खात्रीनें सांगतां येईल कीं, आपल्या मराठी मुलुखांतील शूर मंडळींचा राजकीय, सामाजिक व वाङ्मयात्मक दृष्टीनें जगण्याचा आजकाल प्रचंड खटाटोप चाललेला आहे. जीवनाच्या प्रत्येक प्रांतांत पुढें जाण्याची हिरीरी आजकाल महाराष्ट्राला लागून राहिलेली आहे. जगाची प्रगति ज्या दिशेनें चाललेली आहे त्या दिशेकडे तोंड करून जागरूकपणें महाराष्ट्र आज खडा आहे. पाश्चात्य देशांत जें जें नवीन ज्ञान निर्माण होत आहे, ज्या ज्या अभूतपूर्व कल्पना उचंवळत आहेत, जीं जीं विचारांचीं आंदोलनें दिसत आहेत त्यांचे पडसाद हिंदुस्थानांतील इतर प्रांतांपेक्षां महाराष्ट्रांत आधीं उमटतात असें मला वाटतें. किंबहुना जगांतल्या प्रगमनशील राष्ट्रांमधील नवविचारांचें महाराष्ट्र हें एक प्रचंड 'रिसीव्हिंग स्टेशन'च आहे असें मी म्हणतों. 'महाराष्ट्र बुद्धीनें मागासलेला आहे काय?' अशी रिकामटेकडी चर्चा कांहीं नियतकालिकांतून चाललेली आढळून येते. 'इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस' मधील चार जागा महाराष्ट्रीय तरुणांना एकाद्या वर्षी मिळाल्या नाहींत म्हणून महाराष्ट्र बुद्धीच्या पराक्रमांत मागासलेला आहे असा निष्कर्ष काढणें वेडगळपणाचें आहे. जीवनाचे नवीन नवीन मार्ग शोधून काढण्यासाठीं आज महाराष्ट्रीय बुद्धिमत्ता झगडत आहे. नुकत्याच भरलेल्या अखिल भारतीय हिंदु महिला परिषदेच्या अध्यक्ष सौ. गिरिजाबाई केळकर यांच्या मतें "गेल्या शंभर वर्षांत आपली पीछेहाट होत आहे." महाराष्ट्राच्या सुदैवानें व सौ. गिरिजाबाईंच्या दुर्दैवानें त्यांचे हे अशुभ उद्गार असत्य आहेत. महाराष्ट्राची गेल्या शंभर वर्षांत पीछेहाट झाली नसून प्रत्येक बाबतींत 'आगे-जाव'च होत चाललेली आहे. किंबहुना आगरकरांच्या मृत्यूनंतर गेल्या पस्तीस वर्षांत महाराष्ट्रांत जी प्रगति झाली नसेल तेवढी मोठी प्रगति केवळ गेल्या पांचसहा वर्षांत झाली आहे—या वर्षींहि होत आहे. 'पाश्चात्यांकडून आलेलें समतेचें हें खूळ आहे—आमच्या जुन्या ग्रंथांत आम्हांला समतेनें

वागविलें जात होतें—हिंदुधर्मानें स्त्रियांना कोठेंहि बेडी घातली नाहीं!' असली गुलामगिरीची मिंधी भाषा बोलणाऱ्या सौ. गिरिजाबाईसारख्या मागासलेल्या व बुरसलेल्या विदुषी दिवसेंदिवस विरल होत चालल्या असून 'बदलत्या समाजानें काळास अनुसरून आपलीं नीतीबंधनेंहि बदललीं पाहिजेत' असें प्रतिपादणाऱ्या सौ. यमुनाबाई हिर्लेकरांसारख्या नवविचारसंपन्न विदुषी धैर्यानें पुढें येत आहेत. 'विधवांना कुंकवाची उठाठेव कशाला' ही म्हण निर्माण करणाऱ्या मराठी भाषेंतील नियतकालिकांत आतां विधवांच्या सार्वजनिक हळदीकुंकवाच्या समारंभाचे अहवालहि छापून येऊं लागले आहेत. स्पृश्य अब्राह्मणाशींहि जेवतांना काटकोण करून बसण्याचा कावेबाज सल्ला देणाऱ्या भालाकार भोपटकरांच्या डोळ्यांसमोर हजारों स्पृश्यास्पृश्यांना एकत्र 'झुणकाभाकर' खाऊं घालण्याचा सावरकर-प्रेषित श्री. अनंतराव गद्रे यांनीं 'टिच्चून' उद्योग चालविलेला आहे. इतकेंच काय पण साहित्यिकांच्या संमेलनांतील सार्वजनिक भोजन प्रसंगींहि हरिजन मुली राजरोसपणें स्वयंसेविकेचें काम करीत आहेत. (परवां इंदूर येथें भोजनांवर ताव मारून आलेल्या कांहीं सोंवळेकऱ्यांनी परत घरीं गेल्यानंतर प्रायश्चित्त घेऊन यापुढें साहित्यसेवा न करण्याची घोर प्रतिज्ञा केल्याचें आनंददायक वृत्त माझ्या कानावर आलें आहे. तें खरें असेल काय ?)

'अस्पृश्य लोक चांडाळ असून ते श्वानसूकरापेक्षांहि अधम आहेत—गतजन्मीं केलेल्या पापाबद्दल भोगावी लागणारी अस्पृश्यता ही जन्मठेपेची शिक्षा आहे. अस्पृश्यता ही मरणानेंच नाहींशी होणारी आहे!' असा शास्त्राचा अर्थ सांगणाऱ्या अमानुष व राक्षसी सनातनी हिंदूच्या अधम मनोवृत्तीला मरणाचा शेवटचा घरडा लागलेला असून हिंदु समाजामध्यें जन्म व जात यावर आधारलेल्या सर्व भेदांचें सार्वजनिक, सामाजिक अगर राजकीय जीवनांच्या कार्यक्षेत्रांतून उच्चाटन झालें पाहिजे अशा हिंदुसभेनें एकमतानें केलेल्या घोषणेचा निनाद अधिकाधिक वाढत चाललेला आहे. नॉर्वे देशांतील भाकरीप्रमाणें ज्यांच्या आचाराविचारावर जुनाट जळमटांचा बुऱ्हा चढला आहे असे एक, अंगाला काव फासून बनलेले शंकराचार्य "मठ अस्पृश्य वस्तींत जाऊं शकत नाहीं!" अशी मगरूरीची भाषा बोलत आहेत! तसेंच, वास्तविक सालंमिस्री व सफेतमिस्री विकण्यास लायक असे कांहीं सनातनी

वैदू आपले फुंकण्याचे स्टेथाँस्कोप परजीत " दूर करा ! दूर करा ! या महारांना आमच्या दरवाजापासून दूर करा—नाहींतर आमच्या दवाखान्यांत शिरून, आमची नाडी तपासा–आम्हांला औषध पाजून जगवा–असें ते सांगतील ! " अशा अमानुष उद्‌गारांनीं अनाथ, अपंग अस्पृश्यांना आपल्या उंबरठ्यापासून हांकून देत आहेत तर, " धर्मासाठीं मनुष्य नाहीं—मनुष्यासाठीं धर्म आहे ! " अशी प्रचंड घोषणा करीत महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्यूथर' श्री शंकराचार्य मातंगवस्तीत जाऊन मातंग बालिकांच्या हातून आपल्या कपाळावर कुंकुम-तिलक लावून घेत आहेत ! हजारों वर्षें न शाकारलेलें हिंदुधर्माचें कोसळणारें छप्पर आपल्या डोक्यावर सांवरून धरण्याची महाराष्ट्रांतील चार दोन बुद्रुक टाळक्यांनीं धरलेली वेडी हाव अत्यंत हास्यास्पद आहे. 'जातिभेदपूर्ण हिंदुधर्माच्या पोलादी चौकटींत राहून स्पृश्यास्पृश्य भेद मोडतां येणार नाहींत. हा भेदाभेदाचा धर्मच सोडला पाहिजे !' अशी वीर गर्जना करीत आघाडीला चाललेले डॉ. आंबेडकर व " आमचे संतमहंत, सम्राट, शंकराचार्य आंबेडकरच होत ! " असें म्हणून त्यांच्या मागून जाणाऱ्या त्यांच्या हजारों भाविक व एकनिष्ठ अनुयायांचा जयघोष ऐकून आजपर्यंत शतकानुशतकें घोरत पडलेल्या मानवी भावना खडबडून जाग्या झाल्याशिवाय राहणार नाहींत ! अशा तऱ्हेनें—नवीन सामाजिक विचाराचा पूर महाराष्ट्राच्या कडेपठारावरून वाहणाऱ्या प्रत्येक ओहळांना, ओढ्यांना, नाल्यांना, कालव्यांना व नद्यांना आलेला आहे ! हा पूर पावसाळी मोसमापुरताच टिकणारा 'टेंपरवारी' पूर नसून तो यापुढें वाढत्या जोरानें एकसारखा फोफावत जाणारा आहे ! महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून निर्भयपणें उड्या मारीत चाललेले हे प्रगतीच्या पुराचे पाणलोट परवां नायगाराचा धबधबा ज्याप्रमाणें शीताशयानें थिजून अगतिक झाला, त्याप्रमाणें कोणत्याहि थंडीनें गारठून जाण्याची आतां भीति नाहीं ! उलट, निरनिराळ्या दिशेकडून धापा टाकीत येणारे हे सामर्थ्यवान प्रवाह एकत्रित होऊन तो प्रचंड लोंढा जागतिक प्रगतीच्या महासागराशीं एकरूप झाल्याशिवाय राहणार नाहीं !

या प्रगतीच्या दिशेनें धावणाऱ्या महाराष्ट्रीय जीवनाशीं जें एकजीव होईल तेंच जिवंत मराठी वाङ्मय ! हा प्रगतीचा प्रवाह अधिक जोमानें वहावा म्हणून जे लेखक आपल्या हृदयांतलें जीवन त्याच्यांत ओततील तेच

खरे मराठी साहित्यिक ! या प्रगतीच्या ओघांशीं ज्यांच्या वाङ्मयाचा ओघ एकजीव होईल तेच खरे वाङ्मयकार ! मानवी जीवनाला पिढ्यान् पिढ्या मुकलेल्या दलितांचा उद्धार करणारे, राखीव हक्कांचा मलिदा हजारों वर्षे खाऊन माजलेल्या वर्णगुरूंच्या मगरूरीचा विध्वंस करणारे, स्त्रियांच्या नैसर्गिक असहायतेवर उभारलेल्या अन्यायमूलक सामाजिक रूढींना व कायद्यांना जमीनदोस्त करणारे, बहुजनसमाजाला नवयुगाच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे सामर्थ्यवान् संदेश पोहोंचवून त्यांना हलवून जागे करणारे, समाजाच्या सुखासाठीं अहोरात्र रक्ताचा घाम करून खपणाऱ्या श्रमजीवि वर्गाच्या न्याय्य हक्कासाठीं झगडणारे लेखक हेच खरे महाराष्ट्रीय लेखक ! या प्रगतीच्या प्रवाहाशीं विसंगत असणारें वाङ्मय निर्माण करणारे लेखक, त्याला विरोध करण्याचा प्रयत्न करणारे किंवा या प्रवाहाचे पाट भलत्याच मार्गानें फोडून त्यास दुर्बल करूं पाहणारे लेखक हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे, समाजाचे व वाङ्मयाचे शत्रू म्हणून समजावयाला हरकत नाहीं ! कुबट झालेल्या गाद्यागिरद्या, दुलया अंगणांत आणून जशा झोडपून काढतात, त्याप्रमाणें कुबट विचारांच्या प्रगतिविरोधी व हटवादी सनातन्यांना झोडपून काढणारें, त्यांचीं कंबरडीं मोडून त्यांचीं हाडें खिळखिळीं करणारें वाङ्मयच आज निर्माण व्हावयाला पाहिजे. बेहेत्तर आहे, शेंकडों सनातनी पुंड संन्यास घ्यावयाला किंवा धर्मांतर करावयाला उद्युक्त झाले तरी, पण कोटयवधि दलितांना व दुर्बलांना हृदयाशीं कवटाळून धरणारें, बहुजनसमाजाला आपुलकीच्या लाग्याबांध्यांनीं एकजीव करणारें वाङ्मयच आज आवश्यक आहे.

प्रगतिविरोधी वाङ्मय कितीहि मनोरंजक असलें तरी तें आज टिकूं शकणार नाहीं. भालाकार भोपटकर यांच्या भाषेची बरणी बाहेरून कितीहि आकर्षक असली, तिच्यावर विनोदपूर्ण कल्पनांची व नवशब्दांची कितीहि सुंदर वेलपत्ती काढली असली तरी वरचें झांकण काढतांच आंतून हजारों वर्षांच्या घालून ठेवलेल्या मतांच्या लोणच्याचा भपकारा बाहेर येऊन डोकें फिरवून टाकल्याशिवाय रहात नाहीं. सद्यःकाळाची किंवा भविष्यकाळाची उपेक्षा करणाऱ्या पौराणिक व ऐतिहासिक वाङ्मयाची हीच दुर्दशा आज झालेली आहे. श्रुतिस्मृतिपुराणोक्त वीरांनीं व पतिव्रतांनीं केलेल्या अद्भुत चमत्कारांच्या वा पराक्रमांच्या रोमांचकारी गोष्टी व कादंबऱ्या आज 'दोन रुपयाला दहा

पुस्तकां 'च्या लाटांतहि खरेदी करावयाला कोणी तयार नाहीं किंवा म्यानांत तलवार घालून व हातांत तंबोरा घेऊन तबल्याच्या तालावर व पेटीच्या सुरावर ताना मारून गाणाऱ्या ऐतिहासिक रणमर्दांचीं नाटकें आज निम्म्या दरानें पाहण्यासहि कोणी तयार नाहीं. 'उद्धवा शांतवन कर जा' या बेवारशी वृत्ताला वेठीला धरून मराठी इतिहासाच्या वृत्तबद्ध बखरी निर्माण करण्याचे कारखाने कांहीं वर्षांपूर्वी गांवगन्ना निघाले होते. त्यांच्याहि स्फूर्तीला आज टाळीं लागलेलीं आहेत. इतिहास पुराणांच्या विस्तीर्ण प्रदेशांत आजकाल बोलपट कंपन्यांमधील अनेक छट्टू पेंढारी शिरून जाळपोळ करीत आहेत, छापे घालीत आहेत. तथापि यापुढें त्या भागांत फारशी लूट मिळण्याचा संभव नाहीं असें आढळून आल्यामुळें त्यांनीं देखील सामाजिक विषयाकडेच आपला मोर्चा वळविला आहे. भूतकालीन कथाभाग असला तरी सद्यःकालीन समाजाच्या आकांक्षांशीं तो सुसंगत असेल तर तसल्या कृतीचा सत्कार करण्यास समाज आज किती उत्सुक आहे हें 'धर्मात्मा' या बोलपटाचा जनतेनें जो गौरव केला त्यावरूनहि कळून येण्यासारखें आहे. पुनरावृत्तीमुळें किंवा चर्वितचर्वणामुळें पौराणिक आणि ऐतिहासिक वाङ्मयाचा लोकांना कंटाळा आला आहे ही गोष्ट खरी नसून त्या वाङ्मयाचा दृष्टिकोण समाजाच्या सद्यःकालीन दृष्टिकोणाशीं बहुधा विसंगत असतो हेंच त्याबद्दल लोकांना वाटणाऱ्या तिरस्काराचें खरें कारण आहे. सद्यःकालाशीं कर्तव्यानें गुंतलेल्या किंवा भविष्यकालाकडे आसावलेल्या डोळ्यांनीं बघणाऱ्या समाजाची दृष्टि भूतकालांतील निर्जीव गोष्टीकडे मागें खेचून नेल्यानें समाजाच्या प्रगतीचा पुरोगामी प्रवाह अगतिक होण्याचें भय आहे हें विसरून चालतां यावयाचें नाहीं.

मानवी प्रगतीच्या अनुषंगानें समाजाच्या जीवनाला चालना देणाऱ्या, समाजाचें ज्ञान व सामर्थ्य वाढविणाऱ्या, समाजाच्या हृदयास आल्हाद व उत्साह देणाऱ्या अशाच वाङ्मयाची आज महाराष्ट्राला आवश्यकता आहे. सामाजिक वातावरणाची उपेक्षा करून कोणत्याहि वाङ्मयाला जगतां येणें शक्य नाहीं. सभोंवतालच्या वातावरणाची मानवी जीवनाला जितकी आवश्यकता आहे तितकीच त्याची वाङ्मयाच्या जीवनालाहि आवश्यकता आहे. 'अक्षर' वाङ्मय (अभिजात वाङ्मय किंवा अमर वाङ्मय) कसें

निर्माण करावें याची चिंता अलीकडे प्रो. फडके यांना लागून राहिलेली आहे मानवी जीवनाचीं निव्वळ चित्रें रंगविल्यानें वाङ्मय अमर होऊं शकतें असें त्यांचें म्हणणें आहे. तथापि, समाजनिरपेक्ष असें मानवी जीवन सत्यसृष्टींत असूंच शकत नाहीं, हें त्यांना माहीत नसेल असें नाहीं. समाजजीवनाशीं ज्यांचा संबंध नाहीं, असल्या काल्पनिक मानवी भावनांचीं चित्रें वाङ्मयांत रंगवून वाङ्मय अक्षर होईल ही कल्पना एकाद्या अक्षरशत्रूलाहि पटणें शक्य नाहीं. कलावंत वाङ्मयकार हा 'आयुष्याचा भाष्यकार' असतो. दररोज आपल्याभोंवतीं ज्या हजारों गोष्टी घडत असतात, त्या वरकरणी पाहणारास निरर्थक भासतात. त्या जशा घडतात तसें त्यांचें वर्णन करून जीवनाचा अर्थ लागणें शक्य नसतें, म्हणून त्यांतील अर्थपूर्ण गोष्टी वेंचून तो त्यांची अशा अनुक्रमानें संगति लावतो की, त्यामुळें आपणाला जीविताचा अर्थ स्पष्टपणें उमगून यावा. भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीच्या विवेचनानेंच कलावंत आयुष्याचा अर्थ समजावून सांगतो व आयुष्याकडे गोंधळलेल्या नजरेनें पाहणाऱ्या सामान्य माणसाच्या दृष्टिकोणांत इष्ट तो बदल घडवून आणतो. अशा तऱ्हेची 'लोकजागृति' कलावंताच्या कृतीमुळें होणें अगदीं अपरिहार्य आहे. मानवी भावनांचीं चित्रें रंगविण्यासाठीं सुप्रसिद्ध नॉर्वेजियन नाटककार इप्सेन यांनीं आपलीं नाटकें लिहिलीं आहेत असें प्रो. फडके समजतात तीं चूक आहे. रूढीची मूर्तिपूजा करणाऱ्या पाखंडी पुजाऱ्याच्या पाठीवर फटके मारून सत्याचें निर्भयपणें आणि निर्दयपणें आविष्करण करणें हेंच इप्सेनच्या वाङ्मयाचें ध्येय होतें. संसार हा एक भातुकलीचा खेळ आहे व स्त्री ही त्यांतील एक निर्जीव बाहुली आहे असें समजणाऱ्या तत्कालीन समाजांतील नवऱ्यांना कानपिचक्या देण्यासाठीं इप्सेननें 'डॉल्स हाऊस' हें नाटक लिहिलें आहे हें विसरून चालणार नाहीं. हें नाटक ज्या परिस्थितीला अनुलक्षून लिहिलें ती परिस्थिति आज पाश्चात्य राष्ट्रांत राहिलेली नाहीं. वास्तविक, 'अमर वाङ्मय किंवा अक्षर वाङ्मय' ही कल्पना देखील जुन्या जमान्यांतून चालत आलेली एक पारंपरिक व दुधखुळी समजूतच आहे. जगांतील बहुतेक 'अक्षर वाङ्मय' ग्रंथालयांच्या कपाटांतच बंदिवान होऊन राहिलेलें आहे. विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांना अधूनमधून त्याचें दर्शन होतें किंवा वाङ्मयाच्या इतिहासांतच फक्त त्यांचा उल्लेख होतो इतकेंच काय तें ! समाजाच्या

प्रत्यक्ष जीवनाशीं त्याचा क्वचितच संबंध येऊं शकतो. समाजाच्या चार दोन पिढ्या टिकणारें वाङ्मय जरी निर्माण झालें तरी मी म्हणतों त्यांत दोषास्पद असें काय आहे?

वाङ्मयानें प्रत्यक्ष समाजसुधारणा होते असा कोणीच आग्रह धरीत नाहीं. आणि कायद्यानें देखील समाजसुधारणा होते असेंच कांहीं नाहीं. ब्रिटिश मुलुखांतील शारदा कायद्यानें बालविवाहाचें उच्चाटन झालें असें समजणारी बावळट मंडळी फारच थोडी असतील. लोकजागृति करणें म्हणजे सहकारी पतपेढ्यांप्रमाणें किंवा गोरक्षणाप्रमाणें गांवोगांव मतप्रसाराचे दौरे काढून, उपदेशपर कविता करून, किंवा हस्तपत्रकें छापून मतप्रचार करणें असा जर त्याचा अर्थ असेल तर तशा प्रकारची लोकजागृति करणें हें वाङ्मयाचें मुख्यच काय पण अत्यंत दूरचें देखील कर्तव्य आहे असें कोणताहि समंजस माणूस समजेल असें मला वाटत नाहीं. पण लोकजागृति करणें म्हणजे समाजांतील परिस्थितीची लोकांना जाणीव करून देऊन, आपल्या आयुष्याकडे अधिक समजूतदारपणें व व्यापक दृष्टीनें त्यांना पाहावयास लावणें असा जर त्याचा अर्थ असेल तर तशी लोकजागृति करणें हें वाङ्मयाचें मुख्य कर्तव्य आहे, असेंच कोणीहि म्हणेल. वाङ्मयामुळें लोकजागृति होत नाहीं असें मानेलें तरी लोकजागृति हीदेखील वाङ्मयासाठीं खोळंबून बसलेली असते असेंहि कांहीं नाहीं. तथापि, विशिष्ट दिशेनें लोकजागृति होत असतांना तिच्याशीं समांतर रेषेनें न जातां जर वाङ्मय वारा प्यालेल्या वासराप्रमाणें भलतीकडेच भरकटूं लागलें तर '—आगबंब' न्यायाप्रमाणें—म्हणजे एकीकडे आग लागली असतां दुसरीकडेच म्युनिसिपालिटीचा बंब चौखुर उधळत जातो तद्वतच्—तें हास्यास्पद झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून समाजप्रगतीशीं विसंवादी असलेलें वाङ्मय निरर्थक होय. वाङ्मयाचा आत्मा सामाजिक व देह कलात्मकच असावयाला पाहिजे. अर्थात् वाङ्मयाचा आविष्कार कलात्मक नसावा असे मतप्रचारी वृत्तीचे लोकहि म्हणणार नाहींत. जाहिरातीच्या लिखाणाला देखील जेथें कलेचे पाय धरल्याशिवाय भागत नाहीं, तेथें वाङ्मयाला कलेशीं कलागती करून संसार थाटतां येणें शक्यच नाहीं. केस लांब वाढविण्याचें सुवासिक तेल असो अगर गजकर्ण दुरुस्त करण्याचें दुर्गंधी मलम

असो, त्यांना देखील गिऱ्हाइकें आकर्षण करण्यासाठीं चित्रांची व काव्याची आवश्यकता लागते. ' सिद्धधूपा 'च्या वड्यांना देखील

*' बलभीमा प्रिय वडेघारगे तैसा मी लोकीं ! '*

अशा कलात्मक किंकाळ्या माराव्या लागतात ! सहकारी पतपेढ्यांना देखील

*' उत्तम हा सहकार गड्यांनो पतपेढ्यांना फार ! '*

असल्या पद्यांचा आधार घ्यावाच लागतो. वाङ्मयाचें स्वरूप जर कलात्मक नसेल तर त्यापासून मनाला हर्ष, उल्हास, आल्हाद व चेतना यांची केव्हांहि प्राप्ति होऊंच शकणार नाहीं. 'कलेचा हेतु केवळ मतप्रचार करणें किंवा चळवळ करणें हा नसून मनाला विश्रांति देणें, ' असें लेनिननें म्हटलें आहे तें याच दृष्टीनें ! मात्र कलेच्या योगानें मनाला जी विश्रांति मिळते ती निव्वळ विसांव्याच्या अगतिक स्वरूपाची नसून, त्या विश्रांतीमुळें मनोवृत्तींना आंदोलनें बसतात, व मनुष्याचा आत्मानुभव अधिक उल्हसित, वृद्धिगत व प्रज्वलित होतो.

मतप्रचाराचें जोखड कलेच्या मानगुटीवर दिल्यानें तिची काय दुर्दशा होते याचा पडताळा प्रस्तुत कालच्या रशियांतील वाङ्मयाकडे नजर टाकली म्हणजे सहज पटण्यासारखा आहे. लेनिनच्या मृत्यूनंतर कला हें वर्गयुद्धाचें प्रभावी शस्त्र आहे अशी घोषणा करण्यांत आली. कला हें लेखकाच्या आत्मप्रकटीकरणाचें माध्यम किंवा वाचकाच्या विनोदनाचें साधन अशा दृष्टीनें तिच्याकडे त्या देशांत पाहण्यांत येत नसून सर्वसूत्रधारी सत्तेच्या हातांतील एक खड्ग, किंवा साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार, अज्ञानांधकारांतून नुकत्याच जागृत झालेल्या बहुजनसमाजांत करण्याचें एक साधन अशा दृष्टीनें तिचा उपयोग करण्यांत येतो. साम्यवादी विचारांचा लाल डगला अंगांत चढवून प्रचारकांच्या पलटणींत दाखल झाल्याविना रशियांत जिवंत राहूं इच्छिणाऱ्या कोणत्याहि लेखकाला लेखणी हातांत घेतांच येत नाहीं. एवढेंच नव्हे तर कलात्मक निर्मितीला एकाद्या कारखान्याप्रमाणें सुसंघटित, व्यापक व सांघिक स्वरूप यावें म्हणून सर्व कलावंतांच्या शेंड्या किंवा दाढ्या ' रॅप ' (*Rapp*) नांवाच्या एका मध्यवर्ती नियंत्रक संस्थेच्या हातांत देण्यांत आल्या. या ' रॅप ' (*Rapp*) संस्थेनें रशियन वाङ्मयांत गेलीं कांहीं वर्षे एवढी

हुडेलहप्पी व सोटेशाही गाजवली आहे कीं त्यांच्या अमानुष जुलुमाला व छळणुकीला कंटाळून अनेक उत्कृष्ट लेखकांनीं लेखनसंन्यास घेतले. येनेसिन किंवा मायकोव्हस्की यांच्यासारख्या प्रतिभाशाली कवींनीं वैतागानें आत्महत्या करून घेतल्या, बोरीस पिलनॅकासारख्या कादंबरीकारांनीं असहाय होऊन केवळ जगण्याच्या मोबदल्यासाठीं आपली प्रतिभा सरकारकडे गहाण टाकली व आपल्या लेखनशक्तीचा विध्वंस करून घेतला! कांहीं थोडेसे अपवाद सोडून दिले तर गेल्या कांहीं वर्षांत निर्माण झालेलें रशियन वाङ्मय अत्यंत सामान्य दर्जाचें झालेलें आहे. ही गोष्ट कळून आल्यामुळेंच कीं काय अलीकडे रशियांतील लेखकांची राजकीय दंडुकेशाहीपासून बरीचशी सोडवणूक होऊं लागली असून तरुण साम्यवादी लेखकांना पुष्कीन, टॉलस्टॉय किंवा बालझॅक यांच्यासारख्या अभिजात कलावंतांच्या कृतींचा अभ्यास करण्याची आवश्यकता आजकाल भासूं लागलेली आहे.

मतप्रचार कलात्मक पद्धतीनें करणाऱ्या वाङ्मयालाहि उच्च दर्जा मिळू शकतो हें सुप्रसिद्ध फ्रेंच नाटककार ब्रियो यांनीं 'डॅमेज्ड गुड्स' नांवाचें सिफिलिस या भयंकर रोगाच्या स्वरूपाचें आविष्करण करण्यासाठीं लिहि-लेल्या नाटकावरून जरी सिद्ध होतें तरी हें उदाहरण अपवादात्मकच समजा-वयाला हरकत नाहीं. स्वतःच्या कल्पनांचा किंवा भावनांचा आविष्कार करण्यास लागणारें स्वातंत्र्य कलावंताला लाभल्याशिवाय त्याच्या कला-कृतींत चैतन्य व सौंदर्य येऊंच शकणार नाहीं; कलाकृतीचा हेतु व तिच्या रचनेचे नियम हे तिच्या निर्मितीक्रियेंतूनच परिस्फुट व्हावे लागतात. तिच्या-वर ते बाहेरून लादल्यानें ती निर्जीव व निःसत्त्व होते. मतप्रचारासाठीं अवतीर्ण झालेली कला हृदयांतील भावनांना भिडूं शकत नाहीं. कामीनिया तेलाच्या जाहिरातीवर विराजमान झालेल्या तरुणीचे केशकलापांत कितीहि केशाकर्षक शक्ति असली किंवा डोंगऱ्यांच्या बालामृताच्या जाहिरातींतील बालक कितीहि गोंडस व गुटगुटीत असलें तरी हीं चित्रें जाहिरातीसकट चौकटींत बसवून दिवाणखान्यांत टांगण्याचें कोणाच्याहि मनांत येत नाहीं. वस्त्रांत खंजीर लपवून नाचणाऱ्या 'अलीबाबा आणि चाळीस चोर' या गोष्टींतील मार्जिनेप्रमाणेंच मतप्रचाराचीं वाघनखें दडवून रसिकांशीं लगट करूं पाहणाऱ्या कलासुंदरीची भीतिच वाटल्याशिवाय राहात नाहीं.

मतप्रचार करणें हें कार्य ज्याप्रमाणें कलात्मक वाङ्मयाच्या ध्येयाशीं विसंगत आहे; तद्वतच जीवितांतील कूट प्रश्नांचा निर्णयात्मक निवाडा करून देणें हेंदेखील कलेचें कर्तव्य नाहीं. गणिताच्या पुस्तकांप्रमाणें वाङ्मयांतहि उदाहरणाचीं उत्तरें अखेर शेवटीं दिलेलीं असावींत असें समजणारा एक वर्ग महाराष्ट्रांत आहे. कलावंत हा जर 'जीविताचा भाष्यकार' आहे असें समजलें, तर समाजांतील जीवनाचे कूटप्रश्न निवडून समाजापुढें स्पष्टपणें व निर्भयपणें मांडणें हेंच कलावंताचें कर्तव्य आहे. या प्रश्नांना उत्तरें शोधून काढण्याचें कार्य हें समाजाचें आहे! डिकन्सच्या कोणत्या कादंबऱ्यांत, शेक्सपियरच्या किंवा इब्सेनच्या कोणत्या नाटकांत किंवा शेले, कीट्सच्या कोणत्या काव्यांत असा निराळा निष्कर्ष काढून दाखविलेला आहे? कलावंत हा कांहीं निबंधकार नव्हे कीं त्यानें साधकबाधक मुद्दे तर्काच्या सुपांत पाखडून अखेर शेवटीं उरलेलें चिमूटभर तात्पर्य रसिकांच्या पदरांत टाकावें. ताजमहालाच्या संगमरवरी भिंतीवर 'हरएक अदमीनें अल्लाघरीं गेलेल्या आपल्या औरतेवर अशा प्रकारची टोलेजंग कबर बांधावी' असें तात्पर्य मोटमोठ्या अक्षरांनीं रेखाटलें किंवा हाताचा 'आबच्यूस अँगल' करून शकुंतलेकडे स्मशान वैराग्यानें बघणाऱ्या विश्वामित्राच्या राजा रविवर्म्यानें रंगविलेल्या चित्राखालीं 'तस्मात् बाप हो, तुम्ही उपरिचित्रित भानगडींत कधींहि पडूं नये!' असा जर निष्कर्ष लिहिला तर त्यामुळें, त्या कलाकृतीची विटंबना होण्याचाच संभव जास्त!

'वाङ्मय व कला ही बहुजनसमाजाची आहे—जनतेचा त्यांजवर हक्क आहे' ही वाङ्मयाकडे पाहण्याची लेनिनची व्यापक दृष्टि लेखकांना यावयास पाहिजे. जीवनाच्या प्रतिकूल परिस्थितीशीं झगडणाऱ्या बहुजनसमाजाची व्यथित अंतःकरणें समुल्लसित करून, त्यांची भावना, विचार व इच्छाशक्ति उदात्त करणारें वाङ्मय अधिक विस्तृत प्रमाणावर निर्माण व्हावयाला पाहिजे. बहुजनसमाजाला उल्हसित करणारें वाङ्मय निर्माण करणें याचा अर्थ बहुजनसमाज हल्लीं ज्या अज्ञानावस्थेंत आहे त्या स्थितींत त्याला आवडणाऱ्या वझुलविणाऱ्या गोष्टींचा पुरवठा करणें हा नव्हे. तसें असतें तर 'गुलबकावली,' 'जादूचा सोटा,' 'ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी' या पुस्तकांचे कर्ते किंवा 'नका टाकून जाऊं डावा डोळा' या लावणीचा लेखक हे उत्तम दर्जाचे

वाङ्मयकारच ठरावयाचे. वाङ्मयाचा आनंद सेवन करण्याची पात्रता अंगांत यावी म्हणून बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा व संस्कृतीचा एकंदर दर्जा आहे त्यापेक्षां किती तरी पटीनें वाढवावयाला पाहिजे यांत शंका नाहीं. या दृष्टीनें बहुजनसमाजाच्या शिक्षणाच्या कार्याची जबाबदारीहि वाङ्मयावर येऊन पडतेच.

अलीकडे बहुजनाच्या जीविताचें प्रतिबिंब वाङ्मयांत पडलें पाहिजे अशी एक हाकाटी ऐकूं येऊं लागलेली आहे. सदाशिवपेठी वाङ्मय फार झालें, आतां सोमवारपेठी वाङ्मय निर्माण व्हावयाला पाहिजे, गिरगांवीं साहित्यापेक्षां गिरणगांवीं साहित्य आतां जास्त निर्माण व्हावयाला पाहिजे म्हणून समाजाच्या तळाकडे चला, तिथें खरें जीवन आहे अशी आरडाओरड अलीकडे फार होऊं लागलेली आहे.

अर्थात् ही ओरड बहुजनाकडून होत नसून त्यांच्यापेक्षां शिक्षणानें व संस्कृतीनें भिन्न अशा पांढरपेशा लेखकांकडून होत आहे ही विशेष आश्चर्याची गोष्ट आहे. या मागणीच्या मुळाशीं बहुजन समाजासंबंधीं वाटणाऱ्या प्रेमापेक्षां वाङ्मयात्मक रुचिवैचित्र्याची किंवा थारेपालटाची इच्छा पांढरपेशा वर्गांत प्रबळ दिसते. माधवराव किंवा यशोदाबाई यांच्या आयुष्यासंबंधीं गोष्टी किंवा कादंबऱ्या लिहिण्याऐवजीं महादबा किंवा येशी यांच्या संसाराच्या कहाण्या लिहिण्याची सुरुवात झाली, किंवा एकादा श्रीधरपंत वकील एकाद्या सरस्वती नामक शिक्षकिणीच्या प्रेमपाशांत पडल्याचें दृश्य दाखविण्याऐवजीं एकादे शिदबा सलूनवाले एकाद्या विडचा वळणाऱ्या सरूच्या प्रेमपाशांत सांपडले असें दाखवलें म्हणजे वाङ्मयांत जिकडे तिकडे 'अलबेल' झालें असें समजणाऱ्यांपैकीं मी नाहीं. बहुजन समाजाच्या जीविताकडे दहा मैलांवरून कल्पनेच्या दुर्बिणींतून बघणाऱ्या पांढरपेशा लेखकांना त्या समाजांतील जीविताचीं चित्रें सहानुभूतीनें रंगवितां येणें शक्य नाहीं. एकाद्या आय्.सी.एस्. अधिकाऱ्याच्या विलासी पत्नीनें फावल्या वेळांत अस्पृश्य वस्तींत जाऊन थोडेसे कपडे व खाऊचे पुडे वांटून अस्पृश्योद्धाराचें महत्कार्य केल्याची धन्यता अनुभवीत घरीं परत येणें यांत तिची समाजसुधारणेची जितकी कळकळ दिसून येते तितकीच समाजोद्धाराची तळमळ, चार दोन मजुरांच्या, शेतकऱ्यांच्या किंवा व्यापाऱ्यांच्या गोष्टी लिहून बहुजनसमाजाच्या उद्धाराचें

कार्य आपण केलें असें प्रौढीनें समजणाऱ्या लेखकांत असते. सरळ वाक्यें कुणबाऊ भाषेंत व लावणीच्या चालीवर वेडीवांकडी गाइल्यानें जशीं ग्रामगीतें होऊं शकत नाहींत—झालीं तर ग्राम्यगीतेंच होतात—तद्वत् कुणब्यांची व शेतकऱ्यांचीं नांवें गोष्टींतून दडपल्यानें किंवा दिवाणखान्याच्या वर्णनाऐवजीं बाजारपेठेची किंवा शेतांतल्या पेरणीचीं वर्णनें केल्यानेंच केवळ तें वाङ्मय बहुजन समाजाचें होऊं शकत नाहीं. बहुजन समाजाच्या आयुष्याचीं खात्रीलायक व खरीखुरीं चित्रें रंगविणारे त्यांच्यांतलेच सुशिक्षित प्रतिभाशाली लेखक पुढें यावयाला पाहिजेत. त्याशिवाय बहुजनांचें वाङ्मय निर्माण होणार नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे.

प्रस्तुत काळच्या मराठी वाङ्मयावर ब्राह्मणी सोंवळेपणाची जी एक गडद छाया पडलेली आहे त्यामुळें मात्र त्या वाङ्मयाबद्दल बहुजनांना आपुलकी व सहानुभूति वाटणें शक्य नाहीं ही गोष्ट प्रामुख्यानें दर्शविणें जरूर आहे. सरकारी नोकऱ्यांतून ब्राह्मणांचें किंवा इतर पांढरपेशांचें जें प्रमाण आहे तेंच प्रमाण गोष्टी, नाटकें, कादंबऱ्यांमधील पात्रांची जातवारी काढली तर त्यामध्येंहि असल्याचें आढळून येईल. अस्पृश्याला तर देवाच्या मंदिरांत प्रवेश करण्याला जी बंदी तीच वाङ्मयाच्या मंदिरांत पाऊल टाकण्याच्या बाबतींतही लागू आहे. उदाहरणार्थ, बहुतेक सर्व समाज मांसाहारी असतांना त्या समाजाच्या वाङ्मयाच्या सृष्टींत वावरणारीं यच्चयावत् पात्रें मात्र वऱ्याच्या तांदुळाची भगर खातांना किंवा धान्यफराळ करतांना दृष्टीस पडतात हें आश्चर्य नव्हे काय? 'रामभाऊ मंडईत भाजी आणावयास गेले होते व अंगणांत सीताबाई तुळशीला पाणी घालीत होत्या अशी जर' एकाद्या गोष्टीची सुरुवात झाली तर ती प्रत्येकाला निर्दोष, पवित्र व मनपसंत वाटते, पण 'रामराव बाजारांत मासे आणण्यासाठीं गेले होते व सगुणाबाई अंगणांत कोंबड्यांची व्यवस्था पाहात होत्या' असा जर एकानें आपल्या गोष्टीचा आरंभ केला तर मात्र वाचकांच्या अंतःकरणांत क्वेट्याच्या धरणीकंपापेक्षांहि जास्त जोराचा धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. शाकाहारी ब्राह्मण वाचकालाच असा धक्का बसतो असेंच केवळ नसून मांसाहारी अब्राह्मण वाचकांच्या दृष्टीलाहि ही गोष्ट चमत्कारिकच वाटते, इतकी ठराविक परंपरेची जबरदस्त पकड बहुजन वाचकांच्या मनावर बसलेली आहे. मग

'काडीमोड', 'पाट', 'मोहतूर' यांची वर्णनें मराठी वाङ्मयांत जर येऊं लागलीं तर केवढा हलकल्लोळ उडेल याची कल्पनाच करणें बरें. या दृष्टीनें पाहतां शारदेच्या मंदिरांतली ब्राह्मणी सोंवळेपणाची वतनदारी कमी होऊन, इतर हिंदूंच्या अस्तित्वाची दखलगिरी बाळगणारें सर्वसंग्राहक व प्रातिनिधिक स्वरूपाचें वाङ्मय अधिक व्यापक प्रमाणावर निर्माण व्हावयाला पाहिजे. शारदेच्या मंदिरांत ब्राह्मण, अब्राह्मण, हरिजन, पुरुष, स्त्रिया, डॉक्टर, वकील, कारखानदार, पानवाले, सलूनवाले या सर्वांच्या जीवनांचा निःपक्षपातानें समावेश व्हावयाला पाहिजे. शारदेच्या मंदिरांत ब्राह्मण आला तर तो मात्र सोंवळें नेसून तिची मंत्रयुक्त पूजा करूं शकेल आणि तांबोळी शिरला तर तो मात्र आपल्या ओल्या कातानें भरलेल्या हाताचे डाग तिच्या शालूवर पाडील किंवा एकादा सलूनवाला आला तर तो सरस्वतीनें पाळलेल्या मोराच्या पिसाऱ्याचें 'हेअर कटिंग' आरंभील ही भीति अगदीं व्यर्थ होय !

(पुरोगामी समाजाच्या जीवनप्रवाहाशीं संमीलित असणारें साहित्य निर्माण करणें हाच वाङ्मयांतला खरा वास्तववाद आहे.) या वास्तववादाचा पुरस्कार आज मराठी वाङ्मयाच्या प्रत्येक शाखेंत जोरानें चाललेला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पिसाटलेल्या कल्पनेच्या अद्भुतरम्य सृष्टींतील 'कालिकामूर्ति', 'राक्षसी महात्त्वाकांक्षा' किंवा 'अमृतमंथन' छापाच्या उत्तान व भीषण कथानकांची वाङ्मयांतून केव्हांच हकालपट्टी झालेली आहे. कथा, कादंबऱ्या, नाटकें यांतील स्त्री–पुरुष पात्रांचा उल्लूपणा आतां पुष्कळच हटलेला असून तीं एकमेकाला 'नाथ, लाडके, हृदयेश्वर' असल्या संबोधनांनीं आतां संबोधित नाहींत किंवा चारचौघांसमोर कांहीं जरूर नसतांना आलिंगनचुंबनाचा अतिप्रसंग करीतहि नाहींत ! पूर्वीच्या काळच्या कादंबऱ्या-नाटकांतील पात्रांना खाजगी वेळ फारसा नसावा अशी कल्पना होते. कांहीं काळापूर्वी इंग्रज वाङ्मयांत नाताळच्या सुमारास एकाद्या कुटुंबाच्या घरावर आलेली जप्ती अमेरिकेस जाऊन खूप पैसा मिळवून आलेला एक अज्ञात काका येऊन सोडवितो व त्या कुटुंबांत आनंदीआनंद करून टाकतो असल्या **गोष्टींची** सांथ आलेली होती. त्याचप्रमाणें मराठी वाङ्मयांतहि, दरिद्री मास्तर मासिकाकडे गोष्ट लिहून पाठवितो व त्या गोष्टीचा मोबदला

दिवाळीच्या दिवशीं मास्तराकडे मनीऑर्डरीनें येऊन घरांत आनंदीआनंद होतो, असल्या गोष्टींची लाट उसळली होती तीहि आतां पार ओसरून गेलेली आहे. नाटकांत फार दिवस राहून घरीं परत आलेल्या एका उडाणटप्पू पुत्राचें आपल्या वडिलाशीं भांडण झालें असतांना रागानें त्याच्या तोंडून असे उद्‌गार बाहेर पडले, " तात आहांत म्हणून ठीक, नाहींतर मुस्कटांतच भडकावली असती ! " अशा तऱ्हेचे वास्तववादाचे नाटकी आविष्कार हल्लीं क्वचितच वाङ्मयांत पाहावयास मिळतात. परवां एका वृत्तपत्रांत एक कविता वाचनांत आली. तिचा असा आशय कीं, पाऊस पडत असतांना डोक्यावर एकच छत्री घेऊन जाणारी रमण-रमणी पुढें आलेल्या एका चिखलाच्या डबक्यांत ठेचाळल्यामुळें एकमेकांच्या अंगावर कोलमडतात व त्यांचीं तोंडें एकमेकांच्या जवळ आल्यानें मग पुढें जो काय क्रमप्राप्त प्रकार व्हावयाचा तो तीं रस्त्यावर करतात ! हा प्रकार उघड्या डोळ्यांनीं पाहिल्यानंतर कविराजाच्या काळजाची व तोंडाची काय अवस्था झाली असेल त्याची कल्पनाच करणें बरें ! तथापि अशा तऱ्हेचीं वास्तववादाचीं विडंबनें आतां वाङ्मयांतून बहुधा कटाप झालेलींच आढळतील !

तसेंच वास्तववादाच्या नांवाखालीं समाजाच्या वस्तुस्थितीशीं असत्य वर्णनें दडपून देणाऱ्या लेखकांचाहि एक मोठा वर्ग निर्माण झालेला आहे ही चेतवणी या ठिकाणीं देणें जरूर आहे. गर्भश्रीमंत कुटुंबांच्या ऐषआरामाची, त्यांच्या शृंगारलेल्या दिवाणखान्यांची व त्यांत बहुतेक सारा वेळ हुंगेपणा करीत बसलेल्या रुंद कपाळाच्या, सडपातळ व गौरकाय तरुणांचीं व काळ्याभोर डोळ्यांच्या हरिणाक्षी तरुणींचीं विलासी वर्णनें कांहीं कथालेखक व कादंबरीकार आपल्या कादंबऱ्यांतून देतांना आढळतात. (आर्थिक विवंचनेनें व सामाजिक विघटनेमुळें गोंधळून अगतिक झालेला समाजांतील मध्यमवर्ग सुखवस्तु व विलासलोलुप आहे असा आभास उत्पन्न करणें हा वास्तववादाचा खून आहे.) त्याचप्रमाणें ओढून ताणून गिरण्यांशीं किंवा मजुरांशीं संबंध आणून, नायकाच्या हातांत विळा किंवा हातोडा देऊन, निदान पुस्तकाच्या जाकिटावर तरी गिरणीच्या धुराड्याचें किंवा लोहाराच्या भात्याचें चित्र दाखवून समाजांतील श्रमजीवि वर्गांत ऐतिहासिक स्वरूपाच्या भांडवलशाही-

विरुद्ध भयंकर असंतोष माजलेला आहे असा आभास उत्पन्न करणारें वाङ्मयहि खरें वास्तववादी वाङ्मय नव्हे.

वास्तववादी वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकानें समोर दिसणाऱ्या सामाजिक परिस्थितीचें सूक्ष्मावलोकनानें पृथक्करण करावयाचें याचा अर्थ त्यानें कल्पनाशक्ति गुंडाळून ठेवावयाची असा नाहीं. समाजांतील गतिमान अंतःप्रवाहाचें भविष्यकाळांत स्वरूप काय होईल याचीं कल्पनाचित्रें रंगविणारा लेखकहि वास्तववादी लेखक होऊं शकेल. "वास्तव साधतांना अद्भुताचा हटकून त्यागच केला पाहिजे असें मात्र ठरत नाहीं. अद्भुताचाहि उपयोग करून समाजाच्या वास्तव सृष्टींत उपयोगी पडणारा किंवा समाजाचें भावी ध्येय पटविणारा कलाप्रबंध रचणें शक्य आहे" हें श्री. तात्यासाहेब केळकरांचें विधान याच विचाराचें समर्थन करणारें आहे. आल्डस हक्स्ले यांचे '*Brave New World*' किंवा रशियन लेखक झॅमिॲटिन याचें '*We*' ही कादंबरी हे या तऱ्हेच्या वास्तववादी लिखाणाचे उत्तम नमुने समजावयास हरकत नाहीं.

मात्र हिंदी समाजांतील प्रस्तुतकालीन परिस्थितीचा प्रवाह हा रशियांतील हल्लीं प्रस्थापित झालेल्या ध्येयाच्या दिशेनें वाहतो आहे असें समजणारे कांहीं माथेफिरू 'भाई' बंद ज्या साम्यवादी वास्तववादाचा वाङ्मयांत हल्लीं पुरस्कार करूं पाहात आहेत त्या वास्तवादापासून सावध राहाण्याचा इषारा मी मराठी लेखकांना देतों. ज्या हिंदी समाजांत बलिष्ठ मध्यमवर्ग आहे तेथें हल्लींच्या परिस्थितींत भांडवलवाले व कामकरी वर्गाचें भयंकर अंतर्युद्ध चाललेलें असून अखेर शेवटीं त्याचा परिणाम कामकरी वर्गाची मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित होण्यांत होणार आहे असा मार्क्सवादाच्या निव्वळ वासानें पिसाळलेल्या कांहीं भाईलोकांचा आशावाद त्यांचा त्यांनाच लखलाभ असो. "*Of all the intellectual plagues, cheap Marxism is perhaps the worst!*" हे मिडल्टन मरी यांचे उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. हिंदी समाजाच्या वाङ्मयांत हिंदी समाजाच्या गतिमान आयुष्याचेंच प्रतिबिंब न पडतां रशियांतील विशिष्ट परिस्थितीचें प्रतिबिंब पडावें असा हट्ट धरणें हा निव्वळ माथेफिरूपणा आहे. श्रीमजीवि वर्गाचा शैक्षणिक व सांस्कृतिक उद्धार होऊन त्याची आर्थिक स्थिति अधिक समाधानकारक

व्हावयाला पाहिजे अशा भावनेनें समाजपरिस्थितीचें विश्लेषण वाङ्मयांत करणाऱ्या लेखकांच्या प्रयत्नांचा कोणीहि पुरस्कारच करील.

समाजाच्या प्रगतीला पोषक अशा सर्व नव विचारांचा व कल्पनांचा सत्कार वाङ्मयांत व्हावयाला पाहिजे. जुन्या मंडळींना थंडीवाऱ्याचें व नवविचाराचें नेहमींच भय वाटत असतें. म्हणून दारें खिडक्या बंद करून, जाळ्यांना जुनीं वर्तमानपत्रें चिकटवून, बाहेरून वाऱ्याची लहानशी झुळूक देखील आंत न येईल अशी व्यवस्था केली म्हणजे आंतल्या बंदिस्त अंधारांत आपल्याला सुरक्षितपणें बसतां येईल अशी जुन्या लोकांची समजूत असे. पण हल्लीं आरोग्यशास्त्राप्रमाणें समाजशास्त्राच्या कल्पनाहि आमूलाग्र बदललेल्या आहेत. एकादें नग्न चित्र दिसलें, एकादें शृंगारिक वर्णन आढळलें, कुटुंबसंस्थेविषयीं किंवा विवाहाविषयीं एकादा क्रांतिकारक लेख वाचण्यांत आला कीं डोक्यावरच्या कानटोप्या खालीं ओढून 'हुं–हुं–हुं' असें हींव भरल्यासारखें करण्याचें कांहींच कारण नाहीं. जरा बाहेरचा वारा लागला कीं आपली प्रकृति हमखास बिघडून दोन्ही फुप्फुसांचा न्यूमोनियानें निकाल लागणार असल्या दुबळ्या मरतुकड्या प्रकृतीचे फाजील लाड पुरविण्यांत कांहींच हंशील नाहीं. संस्कृतीचा आत्मा अमर असतो. सत्य व नीति हीं जगाच्या बारशापासून तों जगाच्या बाराव्यापर्यंत वज्रलेप असतात, असें मानणाऱ्या जरीपुराण्या मंडळींना वरण्यांत घालून एकाद्या वस्तुसंग्रहालयांत ठेवावयाला पाहिजे. समाजाच्या उत्क्रांतीबरोबरच सत्य व नीति यांबद्दलच्या कल्पनांचीहि उत्क्रांति होत असते व बाहेरील विचारांची देवाणघेवाण झाल्याशिवाय उत्क्रांतीचा मार्ग सुकर होऊं शकत नाहीं.

मानवी जीवनाला आवश्यक असणाऱ्या प्रवृत्तींची व उपकारक असणाऱ्या विकारांची मुस्कटदाबी करून आजपर्यंत समाजानें आपल्या ढोंगी नीतीचा बडेजाव माजविला त्याचा आतां पुरता बोजवारा उडालेला आहे. जर एकादी गोष्ट समाजाच्या दृष्टीनें अनिष्ट आहे असें वाटत असेल तर ती कपाटांत दडवून ठेवल्यानें तिच्यापासून आपलें संरक्षण होईल असें म्हणणें चुकीचें आहे. अज्ञान हा समाजाचा अत्यंत घातक शत्रू आहे, म्हणून कोणत्याहि अनिष्ट गोष्टीची दडपादडपी न करतां तिच्याशीं निर्भयपणें, समंजसपणें व उघड्या डोळ्यांनीं टक्कर देण्याची समाजानें संवय केल्याशिवाय कोणत्याहि प्रकारची प्रगति

होणार नाहीं. किल्ल्याच्या तटावर मुकटे व धावळ्या वाळत टाकल्यानें त्याचें शत्रूपासून संरक्षण होईल असें मानणें जितकें समंजसपणाचें आहे तितकेंच अनिष्ट गोष्टींच्या बाबतींत अज्ञानाचा व भीतीचा बागुलबुवा उभा करून समाजाचें संरक्षण होईल असें म्हणणें हें शहाणपणाचें होईल.

स्वैर–संभोगाचा पुरस्कार एकाद्यानें केला तर त्याबद्दलहि बावचळून जाण्याचें देखील कांहींच कारण नाहीं. असल्या अर्थाचा 'नवमतवाद' समाजांत किंवा वाङ्मयांत केव्हांहि समाविष्ट होऊं शकणार नाहीं याविषयी प्रत्येकानें खात्री असू द्यावी. स्त्री-पुरुषांना ज्या देशांत संपूर्ण लैंगिक स्वातंत्र्य मिळालेलें आहे त्या रशियासारख्या देशांतहि स्वैर संभोगाला किंवा अतिरिक्त कामपूर्तीला कोठेंहि स्थान नाहीं. उलट तेथील लैंगिक नीतिमत्ता इतर देशांतील ढोंगी नीतिमत्तेपेक्षां श्रेष्ठ दर्जाची आहे. स्वातंत्र्याच्या वातावरणांतच सद्‌गुणांचा विकास होतो यांत संशय नाहीं.

ज्या लैंगिक विचारांत गतिमानता नाहीं किंवा ज्या नग्न चित्रांत कोण-नेहि कलासौंदर्य नाहीं, त्यांचा वाङ्मयाशीं कांहींहि संबंध नाहीं. सुप्रसिद्ध ऑस्ट्रेलियन लेखक स्टीफन झ्वाइग यांच्या '*A Letter from an unknown Woman*' या दीर्घकथेंत, रोमनॉफच्या '*Without Cherry Blossom*' या लघुकथा सग्रहांत किंवा या लेखकांच्या पावलावर पाऊल ठेवून जाणाऱ्या विभावरी शिरूरकर यांच्या गोष्टींत लैंगिक गोष्टींचे अनेकवार उल्लेख आले आहेत तरी त्यांत समाजाच्या पारंपारिक समजुतींमधील अनिष्टपणा उकलून दाखविण्याची तळमळ आहे—ओघ आहे म्हणून हें लिखाण उत्तम वाङ्मयांत समाविष्ट होऊं शकतें. ठाकूरसिंहाची 'ओलेती' कलासौंदर्यानें ओथंबलेली असल्यानें तिच्या सूचित नग्नतेपेक्षां तिच्या सौष्ठवानें मन अधिक भारून जातें. 'समाजस्वास्थ्य' मासिकावर छापल्या जाणाऱ्या वेंगरूळ नग्न चित्रांत कला नाहीं व सौंदर्यहि नाहीं. कामविकारांना उत्तेजन देऊन लोकांची कामातुरता प्रज्वलित करणारें गद्यपद्य लिखाण आजकाल मधून मधून निर्माण होत असतें. तथापि 'जवानमर्द मोदक', 'वज्रांगभैरव पाक', 'आतंकनिग्रह गोळ्या' किंवा, 'गुपचुप झालें तें झालें' अशा आश्वासनासकट मिळणारीं औषधें यांना जितपत शक्तिवर्धक 'टॉनिकें' असें म्हणतां येईल, तितपतच या कामोत्तेजक लिखाणाला, जिवंत वाङ्मय म्हणून संबोधतां

येईल. याशिवाय कांहीं कांहीं लेखकांना मुळीं लैंगिक विचारांनींच जबरदस्त पछाडलेलें असतें. इंग्रजी वाङ्मयांत सुप्रसिद्ध कवि व कादंबरीकार डी. एच्. लॉरेन्स याला ज्याप्रमाणें लैंगिक विचारांची बाधा झाली होती, तशीच कांहींशी अवस्था मराठी वाङ्मयांतील सुप्रसिद्ध कादंबरीकार प्रो. फडके यांची होत आहे असें भय वाटतें. यांच्या कल्पनासृष्टींतील मानसपुत्रांना किंवा कन्यकांना एकाच विचाराचा चाळा लागलेला आढळून येतो. नवमतवाद म्हणजे निर्भेळ लिंगवाद नव्हेच नव्हे. प्रगतीच्या दिशेनें धांवणाऱ्या वाङ्मयाच्या ओघाचें सामर्थ्य अशा उत्तान लिंगवादी लिखाणानें फारसें वाढणार नाहीं. उलट अधेमधेंच कामोत्तेजक विचाराचे कालवे निष्कारण फोडल्यानें त्या प्रवाहाची द्रुतगति मंदावल्याखेरीज राहणार नाहीं. परवां पुणें येथें व्याख्यान देतांना 'कपोल कल्पित' या अनेकोच्छिष्ट शब्दावर कोटी करतांना 'इतक्या लोकांनीं वापरलेल्या कपोलाकडे आपण कशाला लक्ष द्या' असें प्रो. फडके यांनीं उद्गार काढले, त्यावरून आतां त्यांचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोण पुष्कळच निवळल्यासारखा दिसतो. नाहीं तर वापरलेल्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचा त्यांच्या प्रतिभेचा आजपर्यंतचा शिरस्ता नव्हता.

प्रगतिप्रिय समाजाच्या आकांक्षा तृप्त करणाऱ्या वाङ्मयाविरुद्ध ओरड करणारी आणखी कांहीं नवीन मंडळी निर्माण झाली आहेत. या मंडळींच्या भावना अहोरात्र ठणकत असतात आणि यांनीं उराशीं जतन करून ठेवलेल्या पावित्र्याच्या कल्पना विटाळल्या जाण्याचें यांना एकसारखें भय वाटत असतें. 'अग आई ग, आमच्या भावना दुखल्या–पावित्र्यविडंबन झालें!' असें एकसारखें हे दुखणेकरी विव्हळत असतात, मग तुम्ही कांहींहि लिहा किंवा कांहींहि बोला! भावना म्हणजे बेंडे अशी या लोकांनीं आपली समजूत करून घेतलेली दिसते. तसें पाहतां हिंदुसमाजाची स्थिति सर्वांगाला बेंडें झालेल्या एकाद्या रोग्याप्रमाणेंच झालेली आहे. हा रोगी कोणत्याच बेंडाला हात लावूं देत नाहीं. जातिभेदाच्या बेंडाला धक्का बसला कीं हा ओरडलाच "अयाई!" मिश्रविवाहाची भाषा काढली कीं हा किंकाळलाच "बाप रे बाप!" घटस्फोटाची चर्चा केली कीं, यानें हंबरडा फोडलाच "मेलों रे मेलों!" हिंदुसमाजाला झालेलीं हीं सारीं बेंडें फोडलीं पाहिजेत,

तळापासून कापून काढलीं पाहिजेत ! मग त्यानें कितीहि प्राण पाखडले तरी त्याची परवा करतां कामा नये. सगळ्या लोकांच्या भावना मऊ मऊ पोटिसांनीं शेकत बसावयाला लेखकांना नर्सचाच धंदा पत्करावयाला पाहिजे प्रत्येकाच्या वैयक्तिक पावित्र्याच्या वेडगळ कल्पनांची मनधरणी करूं म्हटलें तर लेखकाचा जीव मट्टयाला आल्याशिवाय राहणार नाहीं. परवां एका हरिजन सभेंत एका भंगी जातीच्या वक्त्यानें ' हिंदुधर्मांत बावीस कोटी माणसें आणि तेहतीस कोटी देव आहेत ! ' अशी अत्यंत मार्मिक टीका केली ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तशांत, हल्लींच्या धार्मिक संरक्षणाच्या नांवाखालीं व जातवारीनें स्वार्थ साधण्याच्या काळांत कोणत्या व्यक्तीच्या किंवा कोणत्या गटाच्या भावना कोणत्या गोष्टीमुळें दुखावतील याचा कांहींच धरबंद राहिलेला नाहीं. गणपतीला आतां मुद्दाम जर ' लंबोदर ' आणि ' वक्रतुंड ' म्हटलें तर गाणपत्यांच्या भावना बिघडल्याशिवाय राहणार नाहींत. महादेवाला ' भंगड ' म्हटलें तर त्याच्यासमोर बसलेला नंदी देखील नाकपुड्या फेंदारून व शिगें खालीं करून अंगावर धांवत यावयाचा ! ' भटाला दिली ओसरी ' म्हटलें तर भट पिंडें पाडण्याची धमकी घालायचा, ' चांभारचौकशी करूं नका ' म्हटलें तर चांभार हातांतला जिन्नस वर उगारावयाचा आणि एकाद्याला ' हजाम आहांत कां कोण आहांत ! ' असें म्हटल्यानंतर शेजारी न्हावी उभा असला तर तो पाणी घेऊन येण्याची देखील वाट पाहावयाचा नाहीं. तसें पाहिलें तर सुंदर तरुणी दृष्टीस पडली तर तरुणांच्या देखील भावना दुखवतात—कित्येकांच्या अंतःकरणांत तर जखमा देखील होतात. आणि तरुण गुलहौशी जोडपें एकत्र हिंडावयाला जातांना पाहून वृद्धांच्या पोटांत दुखायला लागतें ! पण त्याला कांहीं इलाज नाहीं ! भावनेचें चोज पुरवण्यांतहि फार हंशील नाही ! प्रत्येकानें आपली विनोदवृत्ति व खेळाडूवृत्ति जागृत ठेवणें आज आवश्यक आहे. गणपतीची थट्टा झाली किंवा गोरक्षणावर टीका झाली की झालें पावित्र्यविडंबन, हनुमान् ब्रह्मचारी नाहीं अशी शास्त्रीय चर्चा केली कीं झाली देवतांची चेष्टा, जनतेच्या मूर्खपणावर मोकाटपणें चरणाऱ्या ढोंगी बुवांचीं बिंगें बाहेर फोडलीं कीं झाला पूज्य विभूतींचा अनादर, ऑम्लेट खाल्लें कीं बुडालें ब्राह्मण्य, अहिंदूबरोबर सहभोजन केलें कीं डुबलें हिंदुत्व, असल्या धर्माच्या व पावित्र्याच्या पातळ

व तकलापी कल्पना उराशीं बाळगण्याचा आजचा काळ नाहीं! काळाच्या ओघाबरोबर पावित्र्याच्या कल्पनाहि बदलत जातात! तसें म्हटलें तर अखिल हिंदी समाजाच्या एकीकरणाच्या पवित्र ध्येयाविरुद्ध कल्पनांचा प्रसार करणारें वाङ्मय हेंच आजच्या युगांतलें पावित्र्यविडंबक वाङ्मय म्हणावयास पाहिजे!

कला व वाङ्मय यांचें संगोपन आणि अभिवर्धन बहुजनसमाजाकरितां करावयाला पाहिजे हें तत्त्व जर मान्य केलें, तर बहुजनांना कळेल व पटेल अशाच साधनानें व अशाच स्वरूपांत वाङ्मयांतील आनंदाचें लोण थेट त्यांच्यापर्यंत पोहोंचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शास्त्रीय किंवा तात्त्विक वाङ्मयापेक्षां ललित वाङ्मयाची गोडीच बहुजनसमाजाला जास्त लागणार. या दृष्टीनें ललितवाङ्मयाची पैदास वाजवीपेक्षां फार होत चाललेली आहे अशी निष्कारण ओरड जी आज कांहीं ठिकाणाहून ऐकूं येते तिच्यांत कांहींच हंशील नाहीं. ललितवाङ्मयनिर्मितीच्या बाबतींत संततिनियमन करून बहुजनसमाजाची वाचनाची वाढती भूक अतृप्त ठेवणें निष्ठुरपणाचें आहे. तथापि, पोटांत आंतडीं तुटत असतांना एकाद्या भुकेल्या माणसाच्या हातांत फणस ठेवल्यानें त्याची जी निराशा होते तशीच मोठ्या आशेनें हातीं घेतलेली गोष्ट, कादंबरी, काव्य किंवा नाटक क्लिष्ट, कृत्रिम व संदिग्ध शब्दांत व भाषेंत गुंफलेलें आढळून आलें म्हणजे सामान्य वाचकांची किती निराशा होत असेल याची बऱ्याचशा लेखकांना कल्पनाहि होत नाहीं. आशियाच्या उत्तरेला वाहणाऱ्या नद्या अतिशय थंडीमुळें ज्याप्रमाणें वाहतां वाहतांच समुद्राला मिळण्यापूर्वीं थिजून जातात, त्याप्रमाणें पुष्कळशा ललितवाङ्मय-लेखकांच्या कृति क्लिष्ट व कृत्रिम लेखनपद्धतीमुळें बहुजनसमाजापर्यंत पोहोंचण्याच्या आधींच वाटेंत खतम् होतात. मराठी कवितेचा अर्थ कळत नाहीं ही थट्टेची गोष्ट नसून वस्तुस्थिति आहे.

*‘सुवर्ण, विविधालंकृतियुत वपु अचिरमृताचें जसें दिसें,*
*भूषित—भीषण, अनार्य तैसें कवनहि सुजनां रडवितसें!’*

ही काय भानगड आहे?

हा आर्यकवनाचा अजब नमुनाच सुजनांना हंबरडा फोडायला लावल्या-शिवाय राहणार नाहीं! शब्दकोष घेऊन त्याचीं पानें चाळायला आणि

अन्वयअर्थाचीं आदळआपट करावयाला आहे कुणाला वेळ ! आणि त्याची जरूरी तरी काय ? नुकताच ' हिंदुधर्म–विश्वधर्म ' नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाला माझे मित्र न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद, एम्.ए. यांनीं आपल्या आडनांवांशीं विसंगत अशी एक भयंकर गंभीर प्रस्तावना लिहिली आहे. त्यांतील एकच वाक्य वाणगीदाखल पहा.

' परिवर्तनशील समष्टिचक्राला मूल सत्यांच्या स्थायिकेंद्राचा विरोध ' संभवत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो सनातन तत्त्वबिंदु प्रगतिपर परि- ' वर्तनाचेंस्थिर अधिष्ठान होय ! '

हिंदुधर्माचे अभिमानी व अभ्यासु विद्वान् असल्या जड-जंबाली भाषेत जर धार्मिक कल्पनांचें स्पष्टीकरण करूं लागले, तर मराठी भाषा बोलणारे बहुतेक हिंदु धर्मांतर केल्याशिवाय राहणार नाहींत.

सर्वसामान्य वाचकांना सहज कळेल अशा सरळ, स्पष्ट, डौलदार व ठसकेबाज लोकभाषेंतच व लेखनपद्धतींतच वाङ्मय निर्माण व्हावयाला पाहिजे. भाषेचें स्वरूप आमूलाग्र बदलून गेलें तरी सरकारी मराठी क्रमिक पुस्तकें, ' व्हिक्तुरिया ' राणीच्या वेळच्याच भाषेत बोलत आहेत. मराठी लिखाणांतहि संस्कृत भाषेच्या निष्कारण अवडंबराचें बंड कमी व्हावयाला पाहिजे, तरच त्याविषयीं बहुजनांना आपुलकी वाटेल. श्री. भास्करराव जाधव यांनीं एका व्याख्यानांत ' बहीणींनो ' व भावांनो अशी अस्सल मराठी सुरुवात करून एक उत्तम उपक्रम आरंभला होता, पण त्यांच्या बाकीच्या भाषणाला त्यांचा ' योगवासिष्ठाचा अभ्यास बाधल्यामुळें त्यांचा सुरुवातीचा निश्चय फार वेळ टिकून राहिला नाही. या दृष्टीनें पाहतां मराठी वाङ्मयांत श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. वरेरकर, प्रो. माटे, प्रो. फडके यांचें गद्य आणि चंद्रशेखर, तांबे, यशवंत, गिरीश यांचें पद्य सामान्य जनसमाजाच्या हृदयांशीं जाऊन भिडण्यासारखे सुगम व सुरस आहे. प्रो. पोतदार हे जुन्या मराठी भाषेचे विशेष अभिमानी असले व रा. माडखोलकर यांना आर्ष शब्दांचा जादा नाद असला तरी एकाचें अस्सल मराठी वळण व दुसऱ्याची ठसकेबाज सौंदर्यपूर्ण लेखनशैली वाचकांच्या वृत्तींना भारून टाकणारी आहे. श्री. खांडेकर यांची सामर्थ्यवान् प्रतिभा व कल्पनाशक्ति कृत्रिम व अलं- कारिक भाषेच्या जबरदस्त हव्यासामुळें व प्रत्येक वाक्याच्या डोक्यावर

पौराणिक उपमांचीं व रूपकांचीं गांठोडीं लादण्याच्या त्यांच्या नादामुळें वाचकांच्या आहारीं अनायासानें पडण्यासारखी नाहीं. टीकात्मक समालोचन असो किंवा साम्यवादाच्या पुस्तकावरील प्रस्तावना असो, त्या ठिकाणीं 'मराठी वाङ्मयाची गंगा प्राकृताच्या पर्वतांतून निघाली' किंवा 'कला ही शकुंतला असली तरी तिचा जन्म पृथ्वीवरचा विश्वामित्र व स्वर्गांतली मेनका यांच्या आकर्षणांतच होतो.' असले पुराणोक्त संकेतांचे दाखले देण्याचा मोह ते आवरूं शकत नाहींत. त्यांनीं आपल्या भाषासुंदरीवर आधुनिक कालमानाप्रमाणें दागिन्यांचें ओझें जर कमी लादलें तर तिच्या विचारसौंदर्याची मोहिनी बहुजनसमाजावर भुरळ घातल्याशिवाय केव्हांहि राहणार नाही. आधुनिक तरुण लेखकांमध्यें विभावरी शिरूरकर, श्री. अनंत काणेकर, श्री. वि. ह. कुळकर्णी, श्री. गोपीनाथ तळवळकर, श्री. दांडेकर या गद्य लेखकांची लेखनपद्धति व रा. पाटील, श्री. ना. घ. देशपांडे, रा. ठोकळ या कवींची रचनाशैली बहुजनसमाजाच्या अंतःकरणांत मराठी वाङ्मयाबद्दलचा जिव्हाळा व आपुलकी वाढविणारी आहे.

या ठिकाणीं मराठी भाषेचें व लिपीचें शुद्धीकरण करण्यासाठीं बॅ. सावरकर व प्रो. पटवर्धन यांनीं जो अलीकडे चंग बांधलेला आहे त्यासंबंधीं विवेचन करणें जरूर आहे. बॅ. सावरकरांच्या हरिजन उद्धाराच्या व हिंदु-संघटनेच्या कार्याबद्दल मनांत कितीहि आदर वाटत असला, तरी त्यांची मराठी भाषेच्या शुद्धीकरणाची चळवळ भाषाशास्त्राच्या अज्ञानावर व वाङ्मया-बद्दलच्या आकुंचित अभिमानावर आधारलेली आहे. शेंकडों वर्षें मराठी घरादारांत नांदून मराठी भाषेशीं एकजीव झालेल्या उर्दू शब्दांची हकालपट्टी करून त्यांच्या जागीं क्लिष्ट, दुर्बोध व वेंगरूळ संस्कृत सामासिक शब्द आण-वून बसवीत सुटणें यांत प्रचारकाच्या माथेफिरूपणापेक्षां दुसरी कोणतीहि भावना नाही. जिथें मुसलमानाला हिंदुधर्माची दीक्षा देऊन त्याला हिंदुसमाजांत समाविष्ट करण्यापर्यंत यांच्या शुद्धीकरणाची मजल जाते, तिथें मराठ्यांच्या घरचें शेंकडों वर्षें अन्नपाणी सेवीत बसलेल्या म्लेंच्छ शब्दांचें अहिंदुत्व अद्यापि कायमच उरलें आहे असें समजणें व त्यांना बाहेर हांकून दिल्याशिवाय स्वभाषेचें शुद्धीकरण व बलवर्धन होणार नाहीं असें मानणें यांत तर्कशुद्धतेचा जबरदस्त अभाव दिसून येतो.

समाजाच्या उत्क्रांतीच्या ओघांत भाषेची व लिपीची आपोआप घटना व वाढ होत गेलेली आहे. म्हणूनच भाषेंतील प्रत्येक शब्दाशब्दाशीं, सांप्रदायाशीं, सुभाषिताशीं समाजाचा इतिहास निगडित झालेला आहे. एका व्यक्तीला किंवा एका संस्थेला भाषेच्या स्वरूपांत वदल करून तिच्या परंपरागत इतिहासाला हरताळ फासण्याचा अधिकार नाहीं. कोणालाहि हुक्की आली कीं त्यांनीं उठावें व स्वतंत्र शब्दांची निराळी टांकसाळ उघडून बाजारांत आपलीं शिराळशेटी नाणीं नेऊन ओतावींत म्हणजे भाषेची निव्वळ चेष्टा आहे. खिलापतीच्या नोटा घटकाभर गंमत म्हणून कोणी हातांत धरल्या तरीं त्या कोणी वापरूं म्हटलें तर त्याच्या योगानें मूर्खपणाशिवाय दुसरें कांहींच खरेदी करतां यावयाचें नाहीं! सावरकर–पटवर्धनांनीं मराठी भाषेची 'द्रौपदी' बनविण्याचा आरंभिलेला उद्योग आततायीपणाचा व हास्यास्पद आहे. यांच्या अंगणांत जर सब्रजाचीं झाडें उगवलीं असलीं तर त्या सबजाचे तुरे कापून त्याऐवजीं तुळशीच्या मंजिऱ्या चिटकविण्याला हे कमी करावयाचे नाहींत.

मराठी भाषेचा पीळ व अभिमान प्रत्येक महाराष्ट्रीयाला असला पाहिजे, मराठी भाषेचें मराठमोळी वळण प्रत्येक मराठी लेखकानें गिरविलें पाहिजे, ही गोष्ट कोणालाहि निःसंशय मान्य होईल. पण 'महिना, व, साहेब, हजारों, सुरू, देखील, हरकत, हौस' इत्यादि लोकभाषेच्या हाडींमासीं खिळलेले शब्द, जैन साधू चिमटयानें आपले केंस ज्याप्रमाणें उपटून काढतात, त्याप्रमाणें सांडशीनें उखडून बाहेर काढल्यानें स्वत्व संरक्षण होणार आहे, आणि ते शब्द यापुढें वापरल्यानें मात्र स्वाभिमानशून्यता व मनोदास्य व्यक्त होणार आहे असा व्यक्तिवाद कोणाहि समंजस मराठी माणसास पटणार नाहीं.

'रावमहाशय तात्याराव यांनीं खिस्ती शके १९३५ च्या मार्च मासांत एका संपादकावर मानहानीचा अभियोग केला,' 'सैनिकांनीं भांडीं आणून युद्धाचा कडेकोट सिद्धांत चालविला,' 'आम्ही दोघे गुजरींत संगें गेलो नि शिरीष नि पांढरी घेऊन आलों' असल्या विद्रूप मराठीच्या जोडीला, 'अ आ' ची बनवलेली बाराखडी व अधून मधून अनुस्वारांऐवजीं पेरलेले परसवर्ण दिले म्हणजे आपल्या मायभाषेंतलें लिखाण किती भयंकर दिसतें

स. नि. ५५



याची प्रचीति 'सावरकर नि पटवर्धन' यांचे कोणतेहि अलीकडचे लेख वाचले म्हणजे आल्याशिवाय राहावयाची नाहीं. सावरकरांच्या चिवट ध्येयनिष्ठेबद्दल एकवेळ सहानुभूति वाटेल, पण अद्यापहि अर्धवट म्लेंच्छ नांव धारण करणाऱ्या 'माधव जूलिअन्' कवींनीं,

*भङ्गुनी मूर्ति काबा कशाला ? सर्वत्र अल्ला सीमा कशाला ?*

*स्रष्टा जगाचा जो एक अक्षर, वन्दे तमेकम् ! अल्लाहु अक्बर !*

असलीं 'धाबळी नेसून विर्याणी खावयाला बसणारीं' काव्यें एक वेळ लिहिणाऱ्या प्रो. पटवर्धनांनीं आपल्या डोक्यावरचा पठाणी कुल्ला फेंकून देऊन आतां एकाद्या पुराणिकाचें पांढरें चक्राकार पागोटें डोक्यावर चढवावें हें अद्भुत नवलच नव्हे तर काय ? मतें बदलूं शकतील हें खरें. पण एका टोंकापासून दुसऱ्या विरुद्ध टोंकापर्यंत ज्यांच्या मतांचा लंबक जाऊं शकतो, तो तेथें तरी यापुढें टिकूनच राहील असा विश्वास इतरांनीं तरी कसा बाळगावा ? कांहीं असलें तरी सावरकर व पटवर्धन यांच्या भाषाशुद्धीच्या एककल्लीपणाच्या कल्पना बहुजनसमाजाच्या अंतःकरणांचा ठाव घेऊं पाहाण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या आधुनिक मराठी वाङमयाच्या अभिवृद्धीला पोषक नाहींत. पुण्याचे एक विद्वान् लेखक श्री. श्रीकृष्ण के. क्षीरसागर यांनी 'खरी भाषाशुद्धि व तिचे वैरी' या आपल्या निबंधांत सावरकर–पटवर्धनांच्या भाषाशुद्धीचा जो खरपूस समाचार घेतला आहे तो प्रत्येकानें नजरेखालीं घालण्यासारखा आहे.

पांढरपेशा वर्गाचे प्रतिनिधी असलेल्या कांहीं लेखकांच्या बाबतींतच भाषेच्या काठिण्याचा व क्लिष्टतेचा आक्षेप घेतां येतो व मजूरवर्गाचा कैवार घेणाऱ्या लेखकांच्या लेखनपद्धतीवर घेतां येणार नाहीं असें नाहीं. कामगार वर्गाचे एक कैवारी श्री. लालजी पेंडसे यांनीं आपल्या 'साहित्य व समाजजीवन' या मराठी वाङमयांत साम्यवादाचा पुरस्कार करणाऱ्या पुस्तकांत 'व्यक्तीच्या आत्मीय भावना व ऊर्मि पुष्कळदां तात्कालिक व जैव म्हणजे प्रकृतिप्रणीत असल्यानें त्यांचें सामाजिक स्वरूप ठरविणें अशक्यप्रायच असतें !' या साच्याची जी भयंकर भाषा वापरली आहे ती कोणत्याहि कारखान्यांतल्या कणखर कामगाराला चारदोन तास बेशुद्ध करील. 'लेखक हे जनतेच्या आत्म्याचे एंजिनिअर होत' या स्टॅलिनच्या वाक्याच्या कसोटीवर जर रा.

पेंडसे यांचें लिखाण घासलें तर त्यांना 'वाङ्मयांतले मिस्त्री' ही पदवी देण्यास फारशी अडचण पडूं नये. कदाचित्, ते स्वत: भांडवलशाहीच्या विरुद्ध असल्यानें मराठी भाषेचें फारसें भांडवल त्यांनीं आपल्या जवळ ठेवलें नसावें.

एकंदर समाजप्रगतीच्या दिशेनें मराठी वाङ्मयाचा प्रवाह वहावा व मराठी भाषेची अभिवृद्धि व्हावी या दृष्टीनें मी आतांपर्यंत मराठी वाङ्मयांतील सद्य:कालीन प्रवृत्तींचें आपल्यापुढें विवेचन केलें आहे. काळाचीं चिन्हें ओळखून नवयुगाची घोषणा करणारें, मानवी प्रगतीचा पुरस्कार करणारें, बहुजनांना हर्ष, उल्हास व चेतना देणारें वाङ्मय मराठी साहित्यकांनीं निर्माण करावें अशी माझी त्यांना अखेरची कळकळीची विनंति आहे.

मराठी वाङ्मयाबद्दल मला वाटणाऱ्या प्रेमानें वाहवत जाऊन कांहीं सन्मान्य साहित्यसेवकांच्या वाङ्मय-कृतीबद्दल व कल्पनांवर मतभेद व्यक्त करतांना मीं जर माझ्या भाषणांत कठोर भाषा वापरली असेल तर त्यांनी त्याबद्दल मला क्षमा करावी. मित्रांच्या बाबतींत तर टीका करतांना कांहींहि बोललें तरी पंचाईतीची परिस्थिति उत्पन्न होते, त्याबद्दल एक गोष्ट मला या ठिकाणीं आठवते. एकदां एक गृहस्थ आपल्या मित्राबरोबर रस्त्यानें जातांना समोरून दोन स्त्रिया येत असतांना त्याला दिसल्या. त्याबरोबर तो गृहस्थ मित्राला म्हणाला 'काय भयंकर दिसते आहे ती बाई!' त्यावर मित्र शांतपणें म्हणाला, 'ती माझी बहीण आहे!' तेव्हां गृहस्थ चटकन् मोर्चा बदलून म्हणाला, "मी ती बाई म्हणत नाहीं, तिच्या बरोबरच्या दुसऱ्या बाईबद्दल मी बोललों!" तेव्हां, गंभीर चेहरा करून मित्र पुन्हां म्हणाला, "ती माझी बायको आहे!"

या परिषदेच्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान आपण मला देऊन माझ्याकडून साहित्याची जी आज चाकरी करवून घेतलीत, त्याबद्दल फिरून एकवार मी आपणां सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानतों. यदाकदाचित् या चाकरीमुळें आपलें समाधान नच झालें तर 'कठिण बडोद्याची चाकरी!' असा एका लावणीकारानें रचून ठेवलेला चरण गुणगुणत मी परत पुण्यास जाईन दुसरें काय?

# सामाजिक पुनर्घटनेचें
# प्रभावी शस्त्र : वाङ्मय

सोलापूर साहित्य संमेलन

२ ऑक्टोबर १९३७

*मराठी भाषाप्रेमी बंधुभगिनींनो,*

मराठी साहित्याच्या संगोपनासाठीं आणि संवर्धनासाठीं सोलापूर भागांतील वाङमय भक्तांनीं दरवर्षी साहित्य-संमेलन भरविण्याचा जो अभिनंदनीय उपक्रम सुप्रसिद्ध कादंबरीकार आणि साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांच्या कर्तृत्ववान् नेतृत्वाखालीं गेल्या वर्षापासून मोठ्या उत्साहानें सुरू केला आहे, त्या उपक्रमाच्या ओघांत मी इतक्या लवकर अडकलों जाईन अशी मला अपेक्षा नव्हती.

श्री. खांडेकरांना व मला चावणारीं फुरशीं

श्री. खांडेकरांची साहित्यसेवा आणि अधिकार माझ्यापेक्षां किती तरी मोठा आहे. त्यांच्या यष्टीच्या क्षेत्रफळापेक्षां माझ्या देहाचा विस्तार जेवढा मोठा तेवढाच त्यांचा वाङमयाचा संसार माझ्या साहित्यसेवेपेक्षां विस्तीर्ण व भरीव आहे. त्यांच्याच कादंबरीचें नांव घेऊन सांगायचें तर कांहीं दृष्टीनें आम्हां दोघांत 'दोन ध्रुवांचें' अंतर आहे. साम्य असलेंच तर तें अल्प आहे

आम्ही दोघेहि मास्तर आहोंत, या गोष्टीची आठवण टीकाकार नेहमीं देत असले तरी आम्हांला तिचा विसर कधींच पडला नाहीं. त्यांना प्रत्यक्ष एक कोंकणी फुरसें एकदांच चावलें असलें तरी आम्हा दोघांनाहि कोंकणांतील आणि घाटावरचीं अनेक लहानमोठीं फुरशीं नेहमीं—पायाला नसलीं तरी पाठीला चावत असतात. श्री. खांडेकरांच्या लायकीमुळें त्यांना त्या विषाची बाधा होत नसली तर मला माझ्य निर्लज्जपणामुळें कोणतेंहि विष कधींच चढूं शकत नाहीं.

आजचा सन्मान मला प्राप्त होण्याचें कारण श्री. खांडेकरांच्या व माझ्या-मधील साम्य हें नसून दोनचार उपद्व्यापांमुळें त्यांचें व माझें नांव बरेंचसें निगडित झालें असल्यामुळें त्यांच्या नांवानंतर स्मरणशक्तीच्या सामान्य नियमानुसार माझें नांव सहज आठवतें म्हणून, या गोष्टीची मला जाणीव आहे. म्हणून खांडेकरांचें गतवर्षीचें अध्यक्षीय भाषण मराठी वाङ्मय सृष्टीवर झालेल्या तेजस्वी ‘ उल्कापाता ’प्रमाणें ज्या कोणाला वाटत असेल, त्यांना आजचें माझें वाङ्मयात्मक विवेचन कदाचित् भ्रमाचा भोपळा फुटल्या-सारखें वाटल्यास त्याला माझा नाइलाज आहे. जबाबदारी अंगावर पडल्या-वर मनुष्याची पात्रता सिद्ध करण्याला ज्याप्रमाणें संधी मिळते त्याप्रमाणें त्यांच्या अपात्रतेचीहि जाणीव त्याला पुष्कळ वेळां होते. या सत्याच्य उत्तरार्धाचा अनुभव या वेळीं मला विशेष होत आहे. लायकी नसल्याबद्दल साहित्यसेवेच्या भानगडींत पडल्याबद्दल मला याच्यापेक्षां जास्त काय शिक्षा होणार ? लौकिक लिखाण करून स्वतःची कशीबशी गुजराण करणाऱ्या साहित्यिकांची वार्षिक परीक्षा घेऊन त्याचा ‘ निकाल ’ लावण्याची संमेलन ही एक युक्ति आहे. म्हणून परीक्षेच्या मंडपांत शिरणाऱ्या वारकरी विद्या-र्थ्यांच्या वृत्तीनें मी आपणांपुढें उभा आहे आणि त्याच्याच केविलवाण्या अपेक्षेनें मी आपणाकडे पाहात आहें.

### माझ्या साहित्यसेवेला सुरुवात कशी झाली ?

माझ्या साहित्यसेवेची सुरुवातच अशा मुहूर्तावर झाली आहे कीं प्रत्येक लिखाणाबद्दल मला नडकाफडकी मोबदला मिळत गेलेला आहे.

"सीताबाई, वर्णूं किती तव गुण ।
डोळा काणा, नाक वांकडें,
बधिर असति तव कर्ण ॥

या त्या कवितेच्या आतां मला आठवत असलेल्या ओळी. ही कविता लिहिल्यापासून माझ्या वडिलांनीं जो मोबदला माझ्या श्रीमुखांत सुपूर्द केला तो अजूनहि मी विसरलों नाहीं. मी साहित्यिक कसा बनलों याबद्दल जेव्हां मी अचंबा करतों, तेव्हां एक भटजी मारूनमुटकून ज्योतिषी कसा बनला, याबद्दल एक संस्कृतमध्यें गोष्ट आहे तिची मला आठवण होते. त्या भटजीचें नांव होतें मंडूक. जिव्हा नांवाच्या दासीनें चोरलेला एक हार भविष्याच्या साहाय्यानें जेव्हां त्याला शोधून देतां आला नाहीं तेव्हां राजानें त्याला कारागृहांत टाकलें व सांगितलें कीं, 'उद्यां सकाळच्या आंत या हाराबद्दल जर, तूं तपास लावला नाहींस तर तुझी जीभ छाटली जाईल.' तेव्हां दुःखाकुल होऊन तो भटजी स्वतःशींच म्हणाला, 'जिव्हे, उद्यां तूं छाटली जाणार.' हें बाहेरून त्या जिव्हा नांवाच्या दासीनें चोरून ऐकलें व आपलें नांव या भटजीनें ज्योतिषाच्या साहाय्यानें ओळखलें असावें असें समजून तिनें त्याच्याजवळ आपला गुन्हा कबूल केला व हार त्याला आणून दिला. दुसऱ्या दिवशीं भटजीनें हार राजापुढें हजर केल्यावर भटजीच्या भविष्यकथन-कौशल्याबद्दल त्याचा केवढा गौरव झाला हें सांगावयास नकोच. पुढें एक परराज्यांतील नामांकित ज्योतिषी एका मडक्यांत बेडूक घालून व त्या मडक्याचें तोंड फडक्यानें बांधून राजाच्या दरबारांत आला व 'तुमच्या ज्योतिषानें जर या मडक्यांत काय आहे हें ओळखलें तर मी त्यास अजिंक्यपत्र लिहून देईन' असें सांगितलें. पुन्हां भटजीबुवावर आली परीक्षेची पाळी ! राजानें सांगितलें, 'हें ओळखलें तर बरें नाहीं तर गर्दन छाटीन !' तेव्हां आपली आतां गच्छंतीच आली अशा निर्वाणीच्या निराशेनें भटजीबुवा आपल्या टाळक्यावर हात आपटून उद्गारले, "हा मंडूक !" मंडूक हें त्याचें स्वतःचें नांव होतें. प्रतिस्पर्धी ज्योतिषाला वाटलें कीं, यानें या मडक्यांतला मंडूक ओळखून काढला व म्हणून त्यानें आपला पराभव तत्काळ मान्य केला व अशा रीतीनें तो भटजी एक

नामांकित ज्योतिषी झाला. अशाच घुणाक्षरन्यायानें मी साहित्यिक झालों आहे हें आपण लक्षांत ठेवावें.

## हुतात्मे निर्माण करणारें सोलापूर

पुण्या-मुंबईप्रमाणें सोलापूर हें कांहीं मराठी भाषेचें किंवा साहित्यनिर्मितीचें तीर्थस्थान नसलें किंवा आपला हा विभाग अवर्षणामुळें दुष्काळी समजला जात असला तरी आपल्या अंतःकरणांत मराठी साहित्याच्या प्रेमाचा व अभिमानाचा ओलावा तिकडच्यापेक्षां सुतरां कमी नाहीं. उलट, व्यापक सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीनें पाहिलें तर आपण सोलापूरचे लोक आमच्या-पेक्षां अधिक जिवंत आहांत असें म्हणतां येईल. सोलापूर हें राष्ट्रसेवेचें अत्यंत कडक व जागृत असें उपास्यस्थान आहे. स्वातंत्र्याच्या यज्ञांत स्वतःच्या प्राणाची आहुती देणारे हुतात्मे वीर सोलापूरनेंच निर्माण केले आहेत, यापेक्षां सोलापूरच्या जिवंतपणाचा कोणता जळजळीत दाखला देतां येईल ? सोलापूर हें पुण्याप्रमाणें पोराबाळांनीं शांतपणें विद्याभ्यास करण्याचें किंवा पेन्शनरांनीं आरामांत आयुष्य काढण्याचें विश्रान्तिस्थान नव्हे ! सोलापूर हें निढळाचा घाम गाळून काबाडकष्ट करणाऱ्या उद्योगी मजुरांचें गांव आहे. पुण्याप्रमाणें परीटघडीचे कपडे घालून चट्टीपट्टीनें रस्त्यांतून जाणाऱ्या पगडीधर विद्वा-नांचें हें गांव नसून, मळक्या व फाटक्या कपड्यांच्या बाह्या वर करून पोटा-साठीं राबणाऱ्या गरिबांचें हें गांव आहे. बाहेरच्या महाराष्ट्रांत कादंबऱ्यांचे शेंकडों कारखाने, लघुकथांचे हजारों हातमाग व भावगीतांच्या पुष्कळ गिरण्या असल्या तरी त्यामुळें समाजाच्या रोजच्या जीवनांतल्या गरजा भागण्याचा वा समाजाची आर्थिक स्थिति सुधारण्याचा फारसा संभव नाहीं. पण धुराचे भपकारे टाकीत धांवणारीं येथल्या गिरणींतील यंत्रें हजारों गरीब लोकांच्या सुखसमृद्धीसाठीं झगडत आहेत म्हणून वाङ्मयांतील शिळोप्याच्या गप्पा करीत बसण्याचें किंवा वाङ्मयांतील गूढ प्रश्नांची शास्त्रीय चिकित्सा करण्याचें हें स्थान नव्हे. वाङ्मयांतील आनंद हा सविकल्प आहे का निर्वि-कल्प आहे, वाङ्मयांत आत्मानुभूति असावी कीं परोक्षानुभूति असावी, वाङ्मयांत पंचकोष आहेत का सप्तकोष आहेत असल्या तात्त्विक कूट प्रश्नांची शाब्दिक कसरत करून दाखविण्याची ही जागा नव्हे. सामान्य लोकांना

आपल्या आटोक्याच्या बाहेर वाटावें याच हेतूनें अत्यंत दुर्बोध व क्लिष्ट अशा भाषेंत केलेलें वाङ्मय-शास्त्राचें विद्वत्तापूर्ण निरूपण करण्याची साहित्य संमेलनाध्यक्षांची विद्वन्मान्य परंपरा येथेंच नव्हे तर इतरत्रहि बदलावयाला पाहिजे असें मला वाटतें. पुस्तकी ज्ञानांतच गढलेल्या पुढील व अभ्यासु विद्वानांच्या कांटेतोल बुद्धीला थक्क करून दाखविण्यापेक्षां पोटापाण्याच्या प्रश्नांत रात्रंदिवस गढलेल्या सामान्य माणसाला ज्या योगानें समाधान होईल अशाच दृष्टीनें वाङ्मयाची चर्चा करण्याचा आतां काळ आलेला आहे.

## गेल्या शंभर वर्षांतील विचारक्रांति

गेल्या शंभर वर्षांत सामाजिक, धार्मिक व राजकीय विचारक्रांतीचा जो एक प्रचंड प्रवाह राष्ट्रांत सुरू झाला आहे, त्यामुळें आपल्या ध्येयांत, जीवनांत, आचारांत एकसारखा बदल होत चाललेला आहे. इतका कीं परवां जें होतें तें काल नाहीं आणि काल जें होतें तें आज उरलें नाहीं. सामान्य जनतेची स्थिति ही प्रवाहपतिताप्रमाणें असल्यानें आयुष्यांत निर्माण झालेलें हें गतिमत्व त्यांना भासमान होणारें नसलें तरी समाजांतील बुद्धिमान् व विचारवंत पुरुषांनीं या जीवनांतील वेगाची—या झपाट्यानें होत चाललेल्या बदलाची—त्यांना जाणीव करून देणें आवश्यक आहे. समाजाच्या स्थैर्यासाठीं किंवा धारणेसाठीं समाजांत एकदम बदल होऊं नये आणि समाजाची घडी बिघडूं नये म्हणून समाजांत निरोधनशक्ति निर्माण होणें हें अपरिहार्य आहे; तथापि आपल्या इच्छेविरुद्ध काळ आपल्याला फरपटीत नेत असतांना आपण विरुद्ध दिशेनें धांवण्यांत स्वतःचें सामर्थ्य खर्च करणें हें हास्यास्पद आहे.

## जीर्णमतवाद्यांचा विरोध

बदल हा समाजाच्या जीवनाचा नियम आहे. तथापि जीवनशास्त्रांतील हा महत्त्वाचा सिद्धांत या देशांतील पुष्कळशा बुद्धिमंतांना अद्यापि पटत नाही. पांच हजार वर्षांपूर्वीं समाज जसा होता तसाच ऐन-जिनसी राहावा. समाजाची संस्कृति, नीतिनिर्बंध, वाङ्मय हें आहे तसेंच राहावें म्हणून जीर्णमतवादी समाजधुरीणांचे अहर्निश प्रयत्न चालू आहेत. पुढें कुठें जायचें किंवा कुठें

चाललों आहोंत, याचें सम्यग्ज्ञान करून घेण्याची पात्रता व दूरदृष्टि नसणाऱ्यांना मागें होतें तेंच उत्तम असें वाटावें आणि भूतकाळाच्याच वैभवावर त्यांची नजर खिळून राहावी हें अपरिहार्य आहे. सामाजिक जीवनाचें स्थैर्य टिकून राहावें म्हणून परंपरेच्या पुजाऱ्यांच्या प्रचंड खटपटी नेहमीं चालू असतात. सांसारिक किंवा व्यावहारिक गोष्टींमधून जनतेचें लक्ष खेंचून तें आध्यात्मिक किंवा पारलौकिक कल्याणाच्या चिंतनांत गुंतविण्याच्या जीर्ण नीतिवाद्यांच्या कारस्थानाला सारे संतकवि बळी पडलेले आहेत. इंग्रजांनीं आपल्या हातांतल्या तरवारी काढून घेऊन आपणांला जितकें असहाय केलें आहे त्यापेक्षां सहस्रपटीनें दुबळेपणा हातांत पंढरीच्या पताका आल्यामुळें आपल्यांत आहे.

## पराक्रमी प्रयत्नांची आवश्यकता

जुन्या कल्पनांचीं व विचारांचीं डबकीं संरक्षण करण्याचें काम अद्यापहि जोरांत चालू आहे. 'संस्कृति-संरक्षक-मंडळ' हें कशाचें निदर्शक आहे ? नवीन असें कांहीं येऊं नये, जुन्यांत कोणताहि बदल होऊं नये, म्हणून जागोजाग पहारेकऱ्यांचीं पथकें निर्माण झालीं आहेत. कांहीं नवीन आलें कीं 'अरे आले, आले, सावध व्हा !' अशा आरोळ्या देऊन गस्त घालणाऱ्या संरक्षकांच्या हातून समाजाचा फारच थोडा फायदा होतो. दुसऱ्यावर हल्ला करणें हाच आत्मसंरक्षणाचा उत्तम मार्ग आहे. परावर आक्रमण करणाऱ्या पराक्रमी प्रयत्नाची समाजाच्या प्रगतीला अधिक आवश्यकता आहे.

संस्कृतीच्या ट्रंकेंत हजारों वर्षें दडपून ठेवलेल्या भरजरी कपड्यांना आतां वाळवी लागून त्यांचीं लक्तरें लोंबूं लागलीं आहेत. शालू पैठण्यांच्या मच्छरदाण्या झाल्या आहेत. करवतीकांठी उपरण्यांचे कांठ फाटून ते साक्षात् करवतीच्या दातासारखे दिसत आहेत.

या फाटक्या तुटक्या कपड्यांना रफू करून किंवा ठिगळें शिवून किती दिवस वेषभूषा साजरी करतां येणार ? पिकलेल्या केसांना किती दिवस कलप लावून केशभूषा सजवितां येणार ? दंतहीन थोबाडांत दांताची बचाळी अडकून किती दिवस दंतभूषा दाखवितां येणार ?

जुन्या जगांतल्या आणि नव्या जगांतल्या कोणत्याहि गोष्टी आतां उपयोगी पडणार नाहींत ! नव्या जगांतल्या नौबती साऱ्या जगभर झडत आहेत !

नव्या युगाचा गुढीपाडवा बासनांतले विटलेले कद नि पितांबर घरादारावर फडकवून आतां साजरा करतां येणार नाहीं.

## वाङ्मय हें सामाजिक घटनेचें प्रभावी शस्त्र

सामाजिक जीवनाची पुनर्घटना करण्याचें प्रचंड कार्य आज पुढारलेल्या देशांत चाललेलें आहे; या पुनर्घटनेंत ज्या अनेक साधनांचा उपयोग केला जात आहे त्यांत वाङ्मयाला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. वाङ्मय हें निव्वळ मनोरंजनाचें किंवा विश्रांतीच्या वेळीं मनोविनोदनाचें एक साधन नसून वाङ्मय हें सामाजिक पुनर्घटनेचें एक प्रभावी शस्त्र आहे. वाङ्मयानें समाजाचें जीवन घडवितां येतें. समाजाचीं ध्येयें, आकांक्षा व भावना बदलतां येतात, इतकेंच काय पण वाङ्मयानें समजाचा आत्मा बदलतां येतो. म्हणूनच स्टॅलिननें 'लेखक हे आत्म्याचे शिल्पकार' आहेत असें म्हटलेलें आहे. फावल्या वेळीं स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या करमणुकीसाठीं वाङ्मय–निर्मिति करणाऱ्या निर्भेळ वाङ्मयसेवकांचा काळ आतां नाहींसा झाला आहे. वाङ्मय-सेवक हा समाज सेवकच असला पाहिजे. मुत्सद्दी, योद्धे, कायदेपंडित, वैद्य, स्थापत्यशास्त्रज्ञ, शेतकरी, मजूर यांच्याइतकीच समाजसंवर्धनाची जबाबदारी साहित्यिकांवरहि आहे.

मराठी साहित्यिकांची रिपव्हॅन विंकलप्रमाणें स्थिति ! या दृष्टीनें मराठी साहित्याकडे पाहिलें तर राष्ट्रीय किंवा सामाजिक पुनर्घटनेच्या प्रचंड उद्योगांत मराठी वाङ्मय अत्यंत अंगचुकारपणा करीत आहे असें आढळून येईल. किंबहुना बाह्य जगांत होत असलेल्या आमूलाग्र क्रांतीची किंवा बदलाची जाणीवहि मराठी साहित्यिकांना आहे किंवा काय याची पुष्कळ वेळां शंका येते. जीवनाच्या प्रत्येक प्रांतांत नावीन्य व आधुनिकता आणण्याचा आटोकाट प्रयत्न चाललेला दिसून येतो तर मराठी साहित्यिक रिपव्हॅन विंकलप्रमाणें पाय तणावून खुशाल घोरत पडले आहेत असे वाटतें. मोटारीचें १९३७ सालचें मॉडेल खपतें नाहीं तोंच १९३८ च्या मॉडेलच्या जाहिराती बाजारांत फडकूं लागतात. पण मराठी काव्यांत अद्यापि ज्ञानेश्वर महाराजांचे 'शके बाराशें बहात्तरी मॉडेल' चालूच आहे. मनगटावर बांधावयाचीं घड्याळें निघालीं तरी लग्नाची वेळ घंगाळांत घटिकापात्रें

बुडवूनच काढावी लागते त्यांतलाच प्रकार. उलट पांगारकर म्हणतात सातशें वर्षे जें वाङ्मय टिकलें तेंच खरें जिवंत पुरोगामी वाङ्मय ! नाट्य-प्रांतांत नजर टाकली तरी भरतमुनींची 'डिक्टेटरशिप' अद्यापि अनियंत्रित-पणें चालू आहे ! अगदीं अलीकडच्या काळाकडे दृष्टि टाकली तरी तोच प्रकार ! गेल्या पन्नास वर्षांत मराठी नाटकें, काव्यें, कादंबऱ्या, इतक्या निर्माण झाल्या कीं त्यांच्यातहि 'युगें' पडलीं, आणि 'खंडें' निर्माण झालीं. तथापि आजच्या खंडाचा विचार करायला कोणीच तयार नाहीं. नाटक म्हटलें कीं, अद्यापि अण्णासाहेब किर्लोस्कर डोळ्यांसमोर उभे राहतात ! पन्नास वर्षे लोक अव्याहतपणें 'सौभद्र' नाटक पाहात आहेत. आज अण्णा असते तर नाटक कंपनींत त्यांना कोणतें काम मिळालें असतें हें कल्पनेवरच सोंपविलेलें बरें. आज एकापेक्षां एक गोड गळ्याचे गायक ऐकावयाला मिळत असले तरी लोकांच्या कानांतील 'भावड्याचे' सूर अद्यापिहि नाहींसे होऊं शकत नाहींत. कादंबरी म्हटली म्हणजे हरिभाऊ आपटे ! त्यांची सोज्ज्वल भाषा, सदभिरुचि, निर्भेळ नीतिमत्ता यांचेच जो तो पोवाडे गात बसला आहे. खांडेकर, माडखोलकर, शिरूरकर यांच्यासारखे प्रतिभाशाली कादंबरीकार दारावर धक्के मारून समाजाला जागे करण्याचा प्रयत्न करीत आहेत तरी सारे आपले 'मधल्या स्थितींत' गुंग झालेले ! आजच्या जगाकडे पाहण्याची संवय वाचकांना लावणें हें साहित्यिकांचें कर्तव्य आहे. तथापि चालू घटकेच्या आयुष्याकडे जागरूकपणें बघण्याची साहित्यिकांची तयारीच नाहीं. कादंबरी-साठीं किंवा बोलपटासाठीं विषय निवडावयाचा झाल्यास पांच हजार वर्षां-पूर्वींच्या महाभारतांतल्या वीरांना किंवा तीनशें वर्षांपूर्वींच्या एकाद्या साधूला पकडून आणावें लागतें. आजच्या घटकेस राष्ट्रांत चाललेल्या हजारों धडामोडींचा वाङ्मयांत मागमूसहि लागूं शकत नाहीं. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीच्या एवढी प्रचंड लाट राष्ट्रावर येऊन गेली, पण तिचे किती पडसाद मराठी वाङ्मयावर उमटले ? वर्तमानकाळाच्या प्रवाहा-कडे पाठ फिरवून भूतकाळाच्या अंधारांतल्या ग्रहगोलाकडे दुर्बिणी लावून सारे साहित्यिक बसले आहेत असें वाटतें. त्यामुळें आमच्या वाङ्मयांत ताजेपणा किंवा जिवंतपणा दिसून येत नाहीं. मासिकांत किंवा नियतकालिकांत प्रसिद्ध होणाऱ्या शेंकडों कविता आकाशाच्या पोकळींत बसून लिहिल्यासारख्या

वाटतात. या कवीचे पाय जमिनीला लागल्यासारखे दिसतच नाहींत. त्यापेक्षां गणपतीच्या उत्सवांत मेळ्यांतून म्हटल्या जाणाऱ्या काव्यांत सामाजिक दृष्ट्या अधिक जिवंतपणा आहे असें म्हणावें लागतें. त्यांची रचना अत्यंत बेंगरूळ व अस्ताव्यस्त असेल; छंदशास्त्राच्या दृष्टीनें त्यांच्यांत शेंकडों चुका असतील; पण समाजाच्या राजकीय, धार्मिक किंवा सांस्कृतिक जीवनाचें पडसाद त्यांच्यांतून जोरदारपणें उमटलेले आढळतील.

*'आई बघ हा माझा बाळ! पाही तुझा गोपाळ।'*

या गाण्यानें समाजांत जेवढी खळबळ उडाली असेल तेवढी कोठल्याही भावगीतानें उडालेली नाहीं.

*'चालरीत सारी गेली। नित्य नवीं सोंगें आलीं!'*

या गाण्यांत सुधारणेवर जरी प्रखर हल्ला होता तरी नवीन संस्कृतीला प्रतिकार करणाऱ्या समाजाची खरीखुरी धडपड त्यांत व्यक्त झालेली होती. श्री. तात्यासाहेब केळकरांच्या 'वाज, वाज घंटिके' या दोनच ओळींच्या काव्यांत जेवढा जिवंतपणा आहे तेवढा 'घंटा' या विषयावर शेंकडों कवींनीं कितीहि छंदोबद्ध 'शंख' केला तरी येऊं शकणार नाहीं! (समाजाच्या धडपडीचे, समाजाच्या झगड्याचे, समाजाच्या जीवनाचे प्रतिध्वनि वाङ्मयांत उमटल्याशिवाय वाङ्मयांत जिवंतपणा येऊं शकणार नाहीं किंवा सामाजिक पुनर्घटनेचें प्रत्यक्ष साधन म्हणून त्याला महत्त्व प्राप्त होणार नाहीं.)

तात्कालिक महत्त्वाच्या गोष्टींचें प्रतिबिंब वाङ्मयांत उमटल्यास तें वाङ्मय तात्कालिक महत्त्वाचें म्हणजे अल्पजीवि होईल असें भय बाळगण्याचें कारण नाहीं. शेंकडों वर्षें टिकणारें अभिजात वाङ्मय निर्माण करण्याच्या इरेला चढून टिकाऊ वाङ्मय निर्माण होऊं शकत नाहीं. सामाजिक जीवनांतील अत्यंत क्षुद्र किंवा उपेक्षणीय गोष्ट समाजावर दीर्घकाल परिणाम करणारी ठरते. टिकाऊ वाङ्मयासंबंधीं पारंपारिक कल्पनाहि आपणांला बदलावयाला पाहिजेत. समाज घटनेच्या त्या त्या वेळेच्या सामाजिक घटनेच्या

कार्यांत वाङमयानें यशस्वी रीतीनें भाग घेतल्यानंतर तें मागाहून जगूं शकलें किंवा नाहीं या गोष्टीला महत्त्व नाहीं !

### रोजच्या जीवनक्रमांत उपयोगी पडणारें वाङ्मय

जीवनांत रोज झगडणाऱ्या माणसाच्या अंतःकरणांत चैतन्य निर्माण करून त्याला समाधान देणें हें वाङमयाचें कार्य आहे. आगगाडींत प्रवास करणाऱ्या निरुद्योगी प्रवाशाला वेळ दवडावयाचें साधन किंवा इस्पितळांत रुग्णशय्येवर पडलेल्या रोग्याला स्वतःच्या व्याधीचा विसर पडावयास लावण्याचा एक उपाय एवढाच केवळ वाङमयाचा उपयोग नाहीं. रोजच्या जीवनक्रमांत वाङमयाचा जर सामान्य माणसाला उपयोग झाला किंवा त्याच्या जीवनकलहांत जर त्याला साह्य व प्रोत्साहन मिळालेंच तर त्याचें महत्त्व व सार्थक !

# महाराष्ट्र साहित्य संमेलन

## सव्वीसावें अधिवेशन

IDEAL BOOK CO.
CHABILDAS ROAD
BOMBAY 14.

**नाशिक**

३० ऑक्टोबर १९४२

THE IDEAL BOOK CO.
CHABILDAS ROAD.
BOMBAY 14.

*माझ्या भाषाबंधूंनो नि भगिनींनो,*

श्रीरामाच्या पवित्र अधिवासानें पुनीत झालेल्या पुण्यभूमिसमीप आणि गोदावरीच्या तीर्थानें पवित्र झालेल्या या क्षेत्रभूमीवर मायभाषेचा सव्वीसावा वार्षिक सोहळा साजरा करण्यासाठीं आज आपण एकत्र आलेलों आहोंत. ह्या सोहळ्याचीं सूत्रें आपण माझ्या हातीं सोंपवून आजपर्यंत मराठी भाषेची मीं जी सेवाचाकरी केली, ती आपल्या चरणीं रुजू झाली असल्याची आपण जी मला आज पावती दिली, तिजबद्दल मी आपणां सर्वांचा ऋणी आहें. माझ्यापेक्षां वयानें, शहाणपणानें आणि अधिकारानें वडील असलेले अनेक भाषाप्रभू महाराष्ट्रांत असतांना, आपण मला येथें येण्यासाठीं इतक्या लवकर का बोलावणें धाडलेंत हें कळत नाहीं. आजपर्यंत मी इतरांची थट्टा करीत आलों म्हणून माझी कायमची खोड मोडण्यासाठीं आपण ही माझी मस्करी तर करीत नसाल ना असाहि संशय माझ्या मनांत डोकावून गेला. म्हणून यज्ञाच्या प्रसंगीं बळी देण्यासाठीं जसा बकरा शोधून आणणारे ऋत्विज् केवळ

त्याच्या धष्टपुष्टपणाकडेच जसें बघतात, तशाच दृष्टीनें बळी देण्यासाठीं म्हणूनच आपण बहुधा ह्या ठिकाणीं माझी निवड केलेली असावी असेंहि मला वाटल्याविना राहिलें नाहीं. पंचवीस श्रेष्ठ साहित्यिकांनीं पवित्र केलेल्या ह्या थोर आसनावर बसतांना आनंदापेक्षां भयाचीच भावना माझ्या मनांत अधिक आहे. अशा भयकातर स्थितींत आपण ऐकण्याजोगें असें मी आपल्या पुढें काय बोलूं शकणार ! तथापि, ज्ञानेश्वर महाराजांचा कृपाहस्त डोक्यावर पडतांच रेड्याच्या तोंडून देखील वेदवाणी निघाली, या न्यायानें आपले अनंत कृपाहस्त माझ्या मस्तकावर असतांना ह्या प्रसंगीं जर चार-दोन चांगलीं अक्षरें बोलतां आलीं तर आधुनिक काळांत चमत्कार घडत नाहींत ह्या लौकिक समजुतीला एकादा तरी अपवाद निर्माण झाल्यासारखें होईल.

मराठी भाषेची उपासना मी लहानपणापासून करीत आहें. १९१२ सालीं वयाच्या चौदाव्या वर्षीं माझी पहिली कविता 'शालापत्रकां'त छापून आली. त्याच वर्षीं 'महाराष्ट्र-मोहरा' ही कादंबरी लिहून मीं पांच रुपये मोबदला मिळविला. तेव्हांपासून गेलीं तीस वर्षें मी हें लिहिण्याचें व्रत नेमानें चालविलें आहे. 'दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें' ह्या समर्थांच्या आज्ञेप्रमाणें रोज मी कांहींना कांहीं तरी लिहीत आलों आहे. ह्यापैकीं बरेंचसें लिखाण प्रकाशकांनीं छापावयाचें नाकारलें. पुष्कळसें लिखाण न छापण्याचा मींच स्वतः शहाणपणा दाखविला. जें थोडेंसें लिखाण छापून प्रकाशांत आलें त्याचें वाजवीपेक्षां जास्तच कौतुक झालें. 'आपलें नांव छापून आलें पाहिजे' ह्या एकाच ध्येयानें प्रेरित होऊन मी माझ्या लेखनाला सुरुवात केली. आज तीस वर्षांनंतरहि माझ्या लेखनाच्या मागें ह्यापेक्षां अधिक उदात्त हेतु नसेल, असा जर कोणी आरोप केला तर तो सर्वस्वीं च मला नाकारतां येणार नाहीं. तथापि, आत्मप्रसिद्धीची अनिवार हाव ही लेखनाला उत्तेजक असली तरी ती फार काळ लेखकाची प्रेरकशक्ति होऊं शकणार नाही. लेखनाचा छंद, लेखनाचा नाद, लेखनाची हौस, हीच केवळ लेखनाची प्रेरणा होय. माझ्या लेखनांत इतर साहित्यगुण आढळून येवोत न येवोत, पण ह्या हौसेचें भांडवल मात्र माझ्याजवळ वरदहस्त आहे. हें भांडवल आरंभीं मजजवळ जेवढें होतें, तेवढेंच आतांहि शिल्लक आहे. थोडेंसें वाढलेंच

असेल; पण कमी झालें नाहीं. ह्याच भांडवलाच्या जोरावर मी साहित्य-क्षेत्रांत इतकीं वर्षे व्यापार करीत आलों आहे. पुष्कळ वेळीं हा माझा व्यापार अंगलट आला, इतकेंच काय पण तो एकदां जिवावरहि येऊन बेतला. अनेकदां तर कुठून आपण ह्या फंदांत पडलों असेंहि मला वाटलें. पण आज आपण ह्या माझ्या वाङमयीन उपद्व्यापाचें जाहीरपणें जें हें कोडकौतुक करीत आहांत, त्यावरून मी आजपर्यंत 'मराठीचीये नगरीं' जो व्यापार केला, तो अगदींच कांहीं 'अव्यापारेषु व्यापार' ठरला नाहीं एवढा तरी मनाला पडताळा पडला.

मराठी भाषेच्या उपासनेचा गुरुमंत्र ज्यांनीं मला प्रथम दिला त्यांच्या कृपेचें आणि पुण्याईचें हें फळ आहे हें मी जाणतों. म्हणून ह्या प्रसंगीं त्यांची आठवण साहजिकच मनांत होत आहे. ज्यांच्या 'आनंदी आनंदा'नें अखिल महाराष्ट्राला एक वेळ हर्षकंपित केलें त्या बालकवि ठोमरे ह्यांच्या काव्यनिर्झरानें मला कवितेच्या क्षेत्रांत वाहून नेलें. आणि नाट्यलेखनाचा आणि विनोदाचा अवघड मार्ग मला राम गणेश गडकरी ह्यांनीं दाखवला. ठोमरे आणि गडकरी ह्यांच्या तेजस्वी वाङमयाचें मार्गदर्शन योग्य वेळीं जर मला लाभलें नसतें तर आपल्या सेवेला सादर होण्याची ही बहुमोल संधि मला आयुष्यांत कदापिहि लाभली नसती ह्याची मला जाणीव आहे. म्हणून ह्या माझ्या दोन वाङमयीन गुरूंबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक कृतज्ञताबुद्धीनें साहजिकच माझें अंतःकरण ह्या क्षणीं भारावून गेलें आहे.

आनंदाच्या ह्या सोहळ्यामध्यें मनाला हर्षाबरोबरच दुःखानेंहि व्याकुळ करणारी अशी एक घटना सहजच लक्षांत येण्यासारखी आहे. नाशिक येथे भरणाऱ्या महाराष्ट्राच्या ह्या पहिल्या साहित्यिक मेळाव्यामधलें तें एक शोकदायक वैगुण्यच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. तें वैगुण्य हें कीं तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या ह्या नगराला साहित्यक्षेत्र अशी कीर्ति ज्यांच्या अधिवासामुळें लाभली त्या 'साहित्य-लक्ष्मी' टिळक आणि 'साहित्य-लक्ष्मण' पांगारकर ह्यांच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाला आज आपण मुकलेलों आहोंत. ह्या दोन विभूति देहस्वरूपानें ह्या मेळाव्यांत आज दिसत नसल्या तरी साहित्यलक्ष्मीची ती जराजर्जर आनंदी मूर्ति आणि साहित्य-लक्ष्मणाची ती दणकट उत्साहमूर्ति या संमेलनाला आशीर्वाद देण्यासाठीं

आपले बाहू उभारून अदृश्य रूपानें येथेंच कोठें तरी वावरत असली पाहिजे असा माझा विश्वास आहे.

मागल्या संमेलनानंतर जवळ जवळ दीड वर्षानें आपण पुन्हां एकत्र जमत आहोंत. ह्या गेल्या दीड वर्षांत जगाची आणि देशाची परिस्थिति किती भीषण झालेली आहे हें कोणास सांगावयाला पाहिजे काय ? तीन वर्षांपूर्वीं सुरू झालेल्या राक्षसी महायुद्धाचा वणवा आतां सबंध जगभर पसरला आहे, एवढेंच नव्हे तर त्याच्या दाहक आणि विध्वंसक शक्तीला आतां सीमाच उरलेली नाहीं. ह्या वणव्याच्या ज्वाला हिंदुस्थानच्या सीमेवर येऊन थडकलेल्या असून त्या आगीचा डोंब कधीं आणि कोणत्या वेळीं तुमच्या आमच्या घरादारांत उठेल ह्याचा आतां कांहीं नेम राहिलेला नाहीं. अखिल मानव जातीवर आपलें पाशवी प्रभुत्व प्रस्थापित करणाऱ्या चंगीझखानाचा आधुनिक अवतार आज जगांत अवतीर्ण झालेला आहे. त्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या खाईंत लाखों निरपराधी जीवांच्या आहुति प्रत्यहीं पडून भस्मसात् होत आहेत. अखिल जग आज संकटांत सांपडलेलें आहे. मानवजातीच्या स्वातंत्र्यावर, शांततेवर आणि भवितव्यावर आज भीषण गंडांतर आलेलें आहे. जीविताचीं जीं अत्युच्च मूल्यें आम्ही आजपर्यंत पूजित आलों, तीं धुळीला मिळून हजारों वर्षांची मानवजातीची बौद्धिक प्रगति आणि संस्कृति रसातळाला पोहोंचते कीं काय, आणि अश्मयुगीन अवस्थेमधील पशुकोटीपर्यंत फिरून मानवजात मागें रेटली जाते कीं काय, अशी चिंता जगांतील प्रत्येक जाणत्याला आज पडलेली आहे. मरणापेक्षांहि भीषण अशा पारतंत्र्याच्या आणि दास्याच्या धूसर ढगांत भविष्यकाळाचीं क्षितिजें झांकळून गेल्यामुळें समोर कांहीं दिसेनासें झालें आहे. मानवी मतीवर मालिन्याची आणि औदासीन्याची काजळी आलेली आहे. या काळरात्रीच्या अंधारांतून जर भाग्यशाली भवितव्याचा अरुणोदय होणार असेल, तर तो डॉन आणि व्होल्गा नदीच्या प्रवाहाशीं स्पर्धा करणाऱ्या पराक्रमी रशियन वीरांच्या रक्तामधूनच होणार आहे एवढ्याच धुगधुगत्या आशेवर जगांतील लोकशाही अजून जिवंत राहिलेली आहे.

शतकानुशतकें स्वतंत्र असलेलीं राष्ट्रें निमिषांत जिथें परतंत्र झालीं, तिथें अनेक वर्षें आधींपासूनच पारतंत्र्यांत पिचत पडलेल्या आपल्या देशाची स्थिति ह्या प्रसंगीं किती असहाय आणि केविलवाणी झालेली आहे ह्याची इतरांना

कशी कल्पना येणार ? गेलीं दीडशें वर्षें आम्ही परकी सत्तेचे दास आहोंत. आज अखिल मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं म्हणे जगांत भीषण संहार चाललेला आहे. ह्या 'स्वातंत्र्या'च्या संग्रामांत पारतंत्र्याच्या बेड्या हातांत अडकल्या असतांनाहि आमचे कांहीं वीर तसेंच लढत आहेत. या युद्धांत शेवटीं लोकशाही राष्ट्रांचा विजय झाला तरी देखील आपल्याला स्वातंत्र्य मिळेल किंवा काय याची खात्री नसतांनाहि दुसऱ्याच्या स्वातंत्र्यासाठीं गुलाम हिंदुस्थानला आज लढावें लागत आहे हें करुण दृश्य बघून कोणत्या सहृदय माणसाच्या भावनांची कालवाकालव झाल्यावांचून राहील ? हिंदुस्थानसारखें प्रचंड राष्ट्र जोंपर्यंत परतंत्र आहे तोंपर्यंत जगाला स्वातंत्र्य मिळणार नाहीं—असें संयुक्त राष्ट्रांना निक्षून सांगणारे जनतेचे पूज्य पुढारी आज कारागृहांत अडकून पडलेले आहेत. स्वातंत्र्यासाठीं तळमळणारी देशांतील बहुसंख्य जनता राज्यकर्त्यांच्या हट्टी आणि अडेल धोरणामुळें अधिक असंतुष्ट आणि अस्वस्थ झालेली आहे. देशांत चोहोंकडे विचारांची बेदिली माजलेली आहे. कोणाचा लगाम कोणाच्या हातांत राहिलेला नाहीं. कुणालाहि आपल्या भवितव्याबद्दल सुरक्षितता वाटेनाशी झालेली आहे; एका बाजूला महागाईचा दैत्य व दुसऱ्या बाजूला उपासमारीचा राक्षस आपलें जबडें वासून गरीब जनतेला भेडसावीत आहेत. पोट जाळायला अन्न मिळेनासें झालें आहे आणि दिवे जाळायला तेल मिळेनासें झालें आहे. देशाच्या जर अशा दारुण दैन्यावस्थेंत जर अचानकपणें परचक्र आलें तर आपली काय दाणादाण उडेल ह्या चिंतेंत सारी जनता आज चूर असतांना, आपण आपलें हें साहित्यसंमेलन भरवीत आहोंत ही गोष्ट कदाचित् कोणाला हास्यास्पद वाटण्याचा संभव आहे. तीनशें वर्षांपूर्वी ह्या महाराष्ट्रांत स्वराज्याचा लढा चालू असतां चंद्रभागेच्या वाळवंटीं 'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल' ह्या नामाचा गजर करण्यांत गुंग झालेल्या हरिभक्तपरायण वारकऱ्यांचे वंशज तर आज गोदावरीच्या कांठावर जमले नाहींत ना असाहि संशय एकाद्याला येण्यासारखा आहे.

साहित्य हा केवळ शिळोप्याचा व्यवसाय आहे—तो रिकामपणचा एक करमणुकीचा उद्योग आहे अशी ज्यांची समजूत आहे त्यांच्या दृष्टीला आजचा ह्या मेळावा खचितच हास्यास्पद दिसल्यावांचून राहणार नाहीं. फावल्या वेळीं

काळ्यावर पांढरें करून वाचकांची करमणूक करणारे कुणी तरी चार अलबते गलबते लेखक आणि सुट्टीमुळें निरुद्योगी झालेली कांहीं रिकामटेकडी मंडळी एके ठिकाणीं येऊन वेळ घालविण्यासाठीं ज्या ऐसपैस गप्पागोष्टी करतात त्याचें नांव साहित्य-संमेलन अशी ज्यांची या संमेलनाच्या स्वरूपाविषयीं कल्पना असेल, त्यांना देशाच्या आजच्याच काय पण कोणत्याहि परिस्थितींत संमेलन भरणें हें अनावश्यक वाटेल. तथापि, आजच्या युगांत तरी साहित्य-संमेलन हा सणासुदीचा सोहळा किंवा वाङ्मय वृषभांचा पोळा आहे असें कोणाला वाटण्याचें कारण नाहीं. ऐदी श्रीमंतांच्या आणि लहरी राजे लोकांच्या आश्रयाखालीं जगणाऱ्या विद्वानांनीं आपल्या अन्नदात्यांच्या उपकारांची फेड करण्यासाठीं, त्यांच्या गौरवासाठीं आणि मनोविनोदनासाठीं साहित्य निर्माण करण्याचें तें त्रेतायुग अस्तंगत होऊन किती तरी वर्षें लोटलीं आहेत. आजच्या सुधारलेल्या जगांत राजसत्तेप्रमाणेंच साहित्यहि आज बहुश: लोकाधीन झालेलें आहे. भाषा आणि वाङ्मय ह्यांना राष्ट्राच्या जीवनांत अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. देशाच्या घटनेचें आणि प्रगतीचें वाङ्मय एक प्रभावशाली शस्त्र आहे हें आतां सर्वांना कळून चुकलें आहे. जीवनाचीं जीं चिरंतन मूल्यें आज मानवजातीच्या प्रगतिपथावर ध्रुवताऱ्याप्रमाणें अढळ तेजानें तळपत आहेत, तीं मूल्यें आणि सत्यें हीं मानवजातीला साहित्यांनीं दिलेलीं लेणीं आहेत. आजच्या युगांत मानवी जीवनाला अवश्य असणारें साहित्य हें सहावें महाभूत आहे. कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्राला सैन्यापेक्षां आणि आरमारापेक्षां साहित्याची आज जास्त जरुरी आहे. कारण सैन्य आणि आरमार फार झालें तर जिवंत राष्ट्राचें रक्षण करूं शकेल, पण राष्ट्राला जिवंत ठेवण्याचें काम केवळ साहित्यच करूं शकतें. राष्ट्राच्या पौरुषाच्या आणि पराक्रमाच्या परंपरा जिवंत राखून त्याग, धैर्य आणि शौर्य हे गुण जनतेच्या अंगीं येण्यास बंदुका आणि तोफांपेक्षां साहित्याचाच उपयोग जास्त होतो. ब्रिटिश बेटांचें संरक्षण पंचवीस मैल रुंदीच्या ब्रिटिश खाडीमुळें आणि त्या खाडींत खड्या असलेल्या लढाऊ जहाजांमुळें होतें असें समजण्यांत येतें; पण तें खरें नव्हे. ब्रिटिश राष्ट्राचें आजपर्यंत जें संरक्षण झालेलें आहे तें नेल्सनच्या आणि वेलिंग्टनच्या लढाऊ परंपरेमुळें झालेलें नसून, तें बेकन, शेक्सपिअर, शेले, गिबन, बर्क, डिकन्स आणि शॉ ह्या साहित्य-

प्रभूंच्या अजस्त्र सामर्थ्यामुळें झालेलें आहे ही गोष्ट निःसंशय आहे. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार जगभर पसरविण्याचें श्रेय जरी इंग्रज शिपायांना असलें तरी हा साम्राज्याचा डोलारा इतकीं वर्षें टिकविण्याचें श्रेय सर्वस्वीं इंग्रजी भाषेला आणि साहित्याला आहे. समुद्रावरच्या प्रभुत्वापेक्षां साहित्यावरचें प्रभुत्व इंग्रजांना जास्त हितकारक झालेलें आहे.

" हिंदुस्थान आम्ही गमावला तरी हरकत नाहीं, पण आमचा शेक्सपिअर गमावण्याला आम्ही केव्हांहि तयार होणार नाहीं !" हे कार्लाईलसाहेबाचे सुप्रसिद्ध उद्‌गार आजच्या घटकेस एकाद्या अँमेरीसाहेबाला पसंत पडणार नसले तरी त्या उद्‌गारांतील सत्य साहित्याचें श्रेष्ठत्वच मान्य करतें. सबंध जगाची सावकारी पत्करण्याइतकें कुबेराचें वैभव अमेरिकेसारख्या तरुण राष्ट्राला तीन शतकांत जें प्राप्त झालें, त्याच्या मुळाशीं इंग्रजी भाषेची आणि साहित्याच्या सामर्थ्याची उसनवारी आहे हें कोणाला नाकबूल करतां येईल ? जर्मनांच्या राक्षसी टोळधाडीच्या चिंधड्या उडवण्याएवढी अभूतपूर्व वीरश्री रशियन जनतेच्या अंगीं जर आज कोणीं निर्माण केली असेल तर ती टॉलस्टाय, डॉस्टायव्हस्की, मार्क्स आणि लेनिन ह्यांच्याच स्फूर्तिदायक साहित्याच्या शिकवणुकीनेंच होय हें कोणीही सांगूं शकेल. शेंकडों वर्षांच्या गुलामगिरीच्या नरकयातना सहन करूनहि आज हिंदी राष्ट्राचा संपूर्ण नाश होऊं शकला नाहीं; जनतेचा पीळ आणि स्वाभिमान अद्यापिहि शाबूद राहिला आहे; स्वातंत्र्याची ज्योत अजूनहि आमच्या हृदयांत तेवत राहिलेली आहे; भविष्यकालाकडे आशेच्या दृष्टीनें पाहात अद्यापिहि आम्ही आमचें यातनामय जीवन कंठीत आहोंत—तें काय इंग्रज आमच्या देशांत राज्य करावयाला आले म्हणून ? इंग्रजांनीं आम्हांला आपली भाषा, विद्या आणि संस्कृति पढविली म्हणून ? कां इंग्रजांनीं आपल्या संगिनीचा पहारा आमच्या देशाभोंवतीं जागता ठेवला म्हणून ? नाहीं—नाहीं—नाहीं ! हिंदी राष्ट्राचा स्वाभिमान आणि स्वातंत्र्य-प्रेम जर आज कशामुळें जिवंत राहिलें असेल तर तें व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूति, ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर आणि गांधी ह्यांच्या अमर साहित्या-मुळें आणि सामर्थ्यवान् शिकवणुकीमुळें होय ही गोष्ट त्रिकालाबाधित सत्य आहे. ह्या थोर महात्म्यांचें तेजस्वी वाङ्मय पिढयान् पिढया आमच्या ओंठावर खेळत आलें आहे—आमच्या रक्तामधून रांगत आलेलें आहे. आमच्या

पराक्रमाची आणि कर्तृत्वाची ग्वाही देण्यासाठीं रामायण आणि महाभारत हे ग्रंथ जोंपर्यंत डोंगरासारखे आमच्या पाठीमागें उभे आहेत तोंपर्यंत भविष्य-काळाबद्दल निराश होण्याचें आम्हांला किमपिहि कारण नाहीं! ज्या राष्ट्राची भाषा आणि वाङ्मय प्रभावशाली आहे तें राष्ट्र दैन्यांत आणि दास्यांत फार वेळ राहणें शक्य नाहीं. ज्या समाजाजवळ साहित्याचें सामर्थ्य नाहीं तो समाज पारतंत्र्यांतून बाहेर येणें अशक्य आहे. नीग्रो लोकांच्या गुलामगिरीचें हेंच एक कारण आहे. त्यांची वैयक्तिक गुलामगिरी जरी बाह्यात्कारी नाहींशी झाल्यासारखी दिसली, तरी त्यांची राजकीय आणि सामाजिक गुलामगिरी अजूनहि पूर्वीच्याच स्वरूपांत नांदत आहे.

कोणत्याहि देशाच्या विजयाच्या वा स्वातंत्र्याच्या झगडयांत शस्त्रापेक्षां साहित्याचा उपयोग अधिक झालेला आढळून येईल. एलिझाबेथ राणीच्या काळीं स्पॅनिश आरमाराचा पराभव करून ब्रिटिशांनीं समुद्रावरील स्वामि-त्वाचा जो पाया घालून ठेवला त्या वेळीं इंग्रजी साहित्याचें वैभव पराकाष्ठेला पोहोंचलें होतें, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. शिवरायांनीं महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन करण्याची जी मोहीम काढली त्या वेळीं मराठी संतांची अभंगवाणी अलम् मराठी जनतेला एकाच समान विचारसरणीच्या भूमिकेवर आणण्याचा प्रयत्न करीतच होती. संतांच्या साहित्यानें साधलेल्या सह-कार्याच्या सामर्थ्यावरच मराठी स्वराज्याची संस्थापना झाली.

१८५७ सालाच्या बंडानंतर देशांतील गुलामगिरी नष्ट करण्याच्या कल्प-नांची जी प्रचंड लाट पसरली तिचीं आंदोलनें जनसमाजापर्यंत पोहोंचवि-ण्याचें कार्य पुढें साहित्यिकांनींच केलें. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याची साहित्यिक मोहीम विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, न्यायमूर्ति रानडे, ज्योतिराव फुले आणि आगरकर यांनींच प्रथम काढली. आजच्या महाराष्ट्रामधील राष्ट्रीय विचाराची आघाडी ह्याच क्रांतिकारक साहित्यि-कांच्या लिखाणांतून निर्माण झाली. तीन तपांपूर्वीं महाराष्ट्रांत राजकीय चळवळ प्रथम सुरू करण्याचें श्रेय लो. टिळक आणि कै. शिवरामपंत परांजपे ह्यांच्या उर्जस्वल गद्य लेखांना आणि बॅ. सावरकर नि कै. गोविंद कवि ह्यांच्या स्वातंत्र्यप्रेमानें रसरसलेल्या पोवाड्यांनाच निःसंशय दिलें पाहिजे. जगाच्या

शाश्वत वाङमयांत अमर होऊन राहण्याची योग्यता ज्यांना आहे त्या महात्मा गांधींच्या 'नवजीवन' मध्यें प्रकाशित झालेल्या उपनिषद्‌तुल्य वाङमयानेंच आजच्या हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला स्फूर्ति दिलेली आहे. आज अलम् हिंदी जनतेचीं अंतःकरणें एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेनें पुलकित करण्याचें सामर्थ्य बंकिमचंद्रांच्या 'वंदे मातरम्' ह्या एकाच राष्ट्रगीता-मध्यें सामावलेलें आहे. एवंच, आमच्या राष्ट्राचें अस्तंगत झालेलें वैभव आणि स्वातंत्र्य पुनः परत मिळवून देण्याचें सामर्थ्य आमच्या साहित्यामध्यें आहे, ह्यावर आपला सर्वांचा पूर्ण विश्वास आहे. राजकारणी मुत्सद्दी, शासनतज्ज्ञ, कायदेपंडित, समाजशास्त्रज्ञ, विज्ञानविशारद ह्यांच्याइतकीच —किंबहुना थोडीशी अधिकच समाजाला साहित्यिकांची आवश्यकता आहे असा निदान आमचा तरी भरंवसा आहे. दीडशें वर्षांत परकी भाषेच्या आणि विद्येच्या शिक्षणानें जनतेंत जी जागृति घडून आणली नाहीं किंवा जी मनोवृत्ति निर्माण केली नाहीं, ती स्वदेशांत आणि स्वभाषेंत तयार होणारें आमचें साहित्य एका पिढीच्या आंत निःसंशय घडवून आणील अशी आमची खात्री आहे.

आपल्या मराठी भाषेचें वय अदमासें सोळाशें वर्षांचें असून मराठी वाङमयाची उमर आजमितीस सुमारें सातशें वर्षांची आहे. ज्ञानेश्वर काल हा सामान्यतः मराठी वाङमयाचा प्रारंभकाल समजला जातो. मराठी वाङमयाच्या ह्या सातशें वर्षांच्या काळांत जवळ जवळ पांचशें सहाशें वर्षेंपर्यंत केवळ छंदोबद्धच वाङमय निर्माण होत होतें. ज्ञानेश्वरांनीं आपलें आध्यात्मिक तत्त्वज्ञान ओंवीमध्येंच सांगितलें. नामदेव, एकनाथ आणि तुकाराम ह्यांनीं भागवत धर्माचा प्रसार आपल्या अभंगवाणीमधूनच केला. रामायण आणि महा-भारतामधील पराक्रमाचीं स्तोत्रें मोरोपंतांनीं आपल्या मधुर आर्येमध्यें आणि वामन पंडितांनीं आपल्या यमकप्रचुर सुश्लोकांमध्यें गायिलीं. राम-जोशी, परशुरामादि शाहिरांनीं कटाव, पोवाडे, फटके आणि लावण्या रचून बहुतेक समाजाचें मनोरंजन केलें. एवंच पांचसहा शतकें महाराष्ट्रामध्यें काव्यनिर्मितीशिवाय दुसरें कांहींच होत नव्हतें हें आपल्या लक्ष्यांत येईल. यावरून आमच्या पूर्वजांना काव्याबद्दल भयंकर आदर वाटत होता अशी जर आपण कल्पना केली तर ती मात्र चुकीची ठरेल. मुद्रणकलेच्या अभावीं

बहुजनसमाजाला शिक्षण, उपदेश, ज्ञान, स्फूर्ति देण्याचें दुसरें कोणतेंहि परिणामकारक साधन उपलब्ध नव्हतें. पद्यांत केलेली शिकवण पाठांतरसुलभ असल्यानें लोकांच्या सहजच लक्षांत राही; आणि पिढ्यान् पिढ्या हें लोण पोहोंचलें जात असे. महानुभाव लेखकांनीं, एकनाथ महाराजांनीं किंवा मराठे रियासतीमधील कांहीं बखरकारांनीं गद्य मराठींत कांहीं लेखन केलें असलें तरी इंग्रजाची राजवट सुरू झाल्यानंतरच खरेंखुरें मराठी गद्य वाङ्मय जन्माला आलें. म्हणूनच आधुनिक गद्य साहित्याचें वय उणें पुरें शेंसवाशें वर्षांचें आहे. मराठी भाषेंत गद्य वाङ्मयाची निर्मिति शक्य करण्याचें श्रेय मुद्रणालयालाच देणें अवश्य असलें तरी महाराष्ट्रांत 'आधुनिक वाङ्मयाचें जिवंत युग' विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या 'निबंधमालेनें'च सुरू केलें असें मी समजतों. ह्या गोष्टीला आज अडुसष्ट वर्षें झालीं आहेत. ह्या अडुसष्ट वर्षांच्या थोड्याशा काळांत मराठी भाषेला आणि साहित्याला जी संपन्नता आणि जें सामर्थ्य प्राप्त झालेलें आहे, त्याबद्दल आम्हां दोन कोटी मराठ्यांना निःसंशय अभिमानच वाटला पाहिजे. चिपळूणकर, आगरकर, लोकहितवादी ह्यांच्यासारखे प्रतिभाशाली निबंधकार; टिळक, परांजपे, कोल्हटकर, ह्यांच्यासारखे क्रांतिकारक पत्रपंडित; केरूनाना छत्रे, दीक्षित, मोडक ह्यांच्यासारखे बुद्धिमान् विज्ञानशास्त्रज्ञ, दादोबा पांडुरंग, गुंजीकर ह्यांच्यासारखे गाढे वैय्याकरणी; चिंतामणराव वैद्य, राजवाडे, केतकर, पांगारकर ह्यांच्यासारखे प्रचंड संशोधक आणि विद्वान्; हरिभाऊ आपटे ह्यांच्यासारखे अद्वितीय कादंबरीकार; किर्लोस्कर आणि देवलांसारखे प्रासादिक नाटककार; कोल्हटकरांसारखे प्रतिभाशाली विनोदपंडित, केशवसुत, रे. टिळक, गोविंदाग्रज, ठोमरे, तांबे, माधव जूलियन् ह्यांच्यासारखे युगप्रवर्तक कवि ह्याच अडुसष्ट वर्षांत आपलें अमर कर्तृत्व करून गेलेले आहेत. तात्यासाहेब केळकरांसारख्या साहित्य-भीष्मानीं याच काळांत आपली तीन तपांची वाङ्मय-तपश्चर्या पुरी केली आणि अद्यापहि ते आपल्या तेजानें महाराष्ट्रास थक्क करून टाकीत आहेत. खाडिलकरांच्या नाट्यप्रतिभेचे दैदीप्यमान उन्मेष याच काळांत आम्हांला पाहावयाला मिळाले. मामा वरेरकर, वामनराव जोशी, फडके, खांडेकर, पु. य. देशपांडे, माडखोलकर, ना. वि. कुलकर्णी, कृष्णाबाई, य. गो. जोशी यानीं कादंबरीच्या आणि लघु-

कथांच्या सृष्टींत उधळलेल्या विविधरंगी प्रतिभाविलासांनीं या कालांतील ललित वाङ्मय अत्यंत शोभायमान झालेलें आहे. काव्याच्या वाटिकेंत गिरीश, यशवंत, अनिल, देशपांडे, आठवले, ह्या काव्यकोकिळांची प्रतिभाशाली कूजनें याच कालखंडांत जनमनाला मोहिनी घालीत होतीं. काकासाहेब लिमये, आचार्य जावडेकर, बाबूराव फाटक, रामभाऊ तटणीस, डॉ. चिटणीस, पांडुरंगराव गाडगीळ ह्यांच्यासारखे बुद्धिमान्, मार्मिक आणि व्यासंगी पत्र-पंडित या काळांतच महाराष्ट्राच्या राजकीय विचाराचें कौशल्यानें मार्गदर्शन करण्यास सरसावून पुढें आले. न्या. नानासाहेब चाफेकर, प्रा. पोतदार, प्रा. माटे, प्रा. अळतेकर, श्री. पु. म. लाड, प्रा. नाना कुलकर्णी, प्रा. शेजवलकर, प्रा. र. धों. कर्वे, प्रा. केळकर, प्रा. काणेकर, प्रा. दांडेकर, प्रभाकर पाध्ये, श्रीकृष्ण क्षीरसागर ह्यांच्यासारख्या रथी महारथी लेखकांनीं समाजांतल्या संशोधक आणि चिकित्सक बुद्धीला चालना देऊन महाराष्ट्रीय विद्वत्तेचा लौकिक याच काळांत प्रस्थापित केलेला आहे. मराठी भाषेची शब्दसंपदा एकत्रित करण्याचें प्रचंड कार्य दाते आणि कर्वे ह्या डॉ. केतकरांच्या कल्याण-द्वयानें उत्कृष्टपणें केलेलें आहे.

एवंच, निबंध, इतिहास, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, नाट्य, कादंबरी, काव्य, विनोद, लघुकथा आणि वृत्तपत्रें ह्या साहित्याच्या प्रत्येक शाखेंत मराठी वाङ्मयाचीं गेलीं साठसत्तर वर्षें एकसारखी प्रगतीच होत गेलेली असून हिंदुस्थानांतील इतर प्रांतिक भाषेंतील वाङ्मयापेक्षां तें अधिक समृद्ध झालेलें आहे असा आमचा अभिमान आहे. मराठी वाङ्मय हें आज केवळ सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची मिरास राहिलेली नाहीं, हेंहि तिच्या प्रगतीचें एक अभिनंदनीय वैशिष्ट्य आहे. पूर्वीची संस्कृतप्रचुर भाषा आणि क्लिष्ट लेखनपद्धति जाऊन आज मराठी लेखन अधिक सोपें आणि बालबोध झालेलें आहे. या सर्व काळांत दर दहावीस वर्षांनीं मराठी भाषा कशी झपाट्यानें बदलत गेलेली आहे हा एक संशोधनाचा उत्कृष्ट विषय होईल. लेखनाचे विषय आणि मांडणीहि आतां जीवनांतील वस्तुस्थितीला अधिक धरून होऊं लागल्यानें ती बहुजनसमाजाच्या जास्त जिव्हाळ्याची वाटूं लागलेली आहे. मराठी वाङ्मयाचा वाचकवर्ग आज हजारोंनीं वाढलेला आहे, एवढेंच नव्हे तर तो जास्त रसिक आणि चोखंदळ झालेला आहे. लेखनाची शैली

दिवसेंदिवस अधिक कलात्मक आणि अर्थसूचक झालेली असून भावगीतें, नाटयगीतें, मुक्तछंद, नाटयछटा, नाटिका, दीर्घ लघुकथा, लघूत्तम लघुकथा, लघुनिबंध, विडंबन असे किती तरी नवनवे वाङ्मय प्रकार आज मराठी साहित्यांत रूढ होऊन बसलेले आहेत. म्हणून गेल्या सत्तर वर्षांतील मराठी भाषेची आणि वाङ्मयाची झालेली प्रगति आणि प्रसार बघून त्याच्या भविष्य-कालाबद्दल यत्किंचितहि निराश होण्याचें कोणाला कांहीं कारण आहे असें मला वाटत नाहीं.

मराठी साहित्याबद्दल अत्यंत निराशेचा सूर गेलीं दोन वर्षे ह्याच व्यास-पीठावरून पूर्वाध्यक्षांनीं काढलेला आहे; तो मला बिलकूल अभिमत नाहीं. मराठी वृत्तपत्र वाङ्मय अधोगतीला गेलेलें आहे असें फडके यांनीं सांगितलें आणि मराठी ललित वाङ्मयाला ओहोटी लागलेली आहे असें खांडेकरांनीं सांगितलें. दोषदृष्टीनें जीवनाकडे पाहणाऱ्या माणसाला अमृतांत देखील दोन चमचे साखर कमी आहे असेंच वाटेल. सत्तर वर्षांत मराठी वाङ्मयाची सर्वांगीण प्रगति झाली असें मी जेव्हां म्हणतों, तेव्हां मराठी वाङ्मय पूर्णा-वस्थेला पोहोंचलेलें आहे असें समजण्याइतका दुधखुळा मी खास नाही. मराठी वाङ्मय दोषरहित आहे असें त्या वाङ्मयाच्या आंधळया भक्तालाहि म्हणतां येणार नाहीं. तथापि, गुणांकडे दुर्लक्ष करून दोषांचा निष्कारण बडिवार करण्याची वृत्ति ही कांहीं हितकारक नाहीं. एकाद्या तरुणीच्या सौंदर्याकडे दुर्लक्ष करून तिच्या तोंडावरील दोन देवीच्या वणांचा गवगवा करण्यांत हंशील काय? ज्या वृत्तपत्र वाङ्मयानें महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय विचारांत एवढी क्रांति घडवून आणली, ज्या ललित वाङ्मयानें बहुसंख्य जनसमाजाचें लक्ष मराठी साहित्याकडे ओढून आणलें, त्या वाङ्म-याच्या दणदणीत, दणकट प्रकृतीकडे आणि पराक्रमाकडे दुर्लक्ष करून त्याच्या कांहीं नैमित्तिक दोषांबद्दल हंबरडा फोडून रडत बसण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

विनोदी वाङ्मयाच्या सद्यःकालीन स्वरूपाची तर पूर्वींच्या दोघांहि अध्य-क्षांनीं खरमरीत शब्दांत निर्भर्त्सना केलेली आहे. अर्थात् ह्या बाबतींतलीं त्यांचीं मतें आपल्यासारख्या सूज्ञास मान्य नसावींत असा माझा तर्क आहे

नाहीं तर आपण ह्या वर्षी एका विनोदी लेखकाची संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं खचित निवड केली नसती; असो.

मराठी साहित्याकडे अत्यंत उत्साहाच्या आशावादी दृष्टीनें पाहणारा मी एक माणूस आहें. हा कदाचित् माझ्या प्रकृतीचा परिणाम असेल. मला साहित्याची केवळ प्रगतीच दिसते आणि ही प्रगति अधिक झपाट्यानें कशी होईल इकडेच माझे विचार धांवतात. मराठी साहित्याचें सामर्थ्य गेल्या सत्तर वर्षांत एकसारखें वाढलें ह्यामुळें मला हर्ष तर वाटतोच पण त्यापेक्षांहि स्वभाषेची आणि वाङमयाची ही सेवा ज्या निःस्वार्थी साहित्यिकांनीं केली, त्यांच्या कष्टांचा, हालअपेष्टांचा आणि त्यागाचा तेजस्वी इतिहास डोळ्यां-समोर उभा राहिला म्हणजे अन्तःकरण कृतज्ञतेनें आणि अभिमानानें भरून येतें. नोकरीवाचून किंवा कांहीं तरी धंदा केल्यावाचून स्वतंत्र उपजीविका करण्याचें ज्यांना दुसरें कोणतेंहि साधन नाहीं, पोटापाण्याच्या व्यवसायामध्यें वाचावयाला, विचार करावयाला, विश्रांति घ्यावयाला किंवा लिहा-वयाला ज्यांना वर्षानुवर्षे कधीं क्षणाची देखील फुरसद मिळाली नाहीं, पोटाला चिमटा घेऊन, उपासमार करून, रक्ताची शाई करून लिहिलेलें लिखाण छापावयाला देखील ज्यांच्या जवळ पैसा नाहीं किंवा ज्यांना हा पैसा द्यावयाला कोणी तयार नाहीं, स्वतःच्या प्रामाणिक मतासाठीं आणि अढळ तत्त्वासाठीं ज्यांना आपल्या नोकरीवरहि पाणी सोडावें लागलें, कदाचित् जनतेची हेटाळणी आणि सरकारचा रोष देखील पत्करावा लागला, अशा दरिद्री शिक्षकांनीं, भुकेकंगाल वृत्तपत्रकारांनीं, कंगाल कारकुनांनीं, बेकार वकिलांनीं आणि विक्षिप्त विद्वानांनीं या महाराष्ट्र-शारदेच्या कीर्तिमंदिरावर आपल्या अमर कर्तृत्वाचे कळस चढविलेले आहेत. मराठी साहित्याचा हा सारा विस्तार निःस्वार्थी लेखकांच्या दारिद्र्यावर, निष्ठेवर आणि त्यागा-वर उभारलेला आहे. अद्यापिहि साहित्य हा महाराष्ट्रांत साहित्यिकांचा उपजीविकेचा धंदा झालेला नसून तो त्यांच्या हौसेचाच व्यवसाय आहे. लेखन हा मराठी लेखकांचा जोडधंदा आहे. आजपर्यंत निर्माण झालेलें सारें मराठी वाङमय हें केवळ ह्या जोडधंदेवाल्यांच्या उद्योगाचें फळ आहे हें लक्ष्यांत आणलें, म्हणजे आश्चर्यानें मन थक्क होतें. अर्थातच ही परि-स्थिति कांहीं चांगली नाहीं. साहित्य लेखन हा महाराष्ट्रांतल्या बुद्धिमान्

माणसांचा एकमेव व्यवसाय झाला तरच मराठी भाषेचें आणि साहित्याचें त्यांत कल्याण आहे. ह्याचा अर्थ असा कीं लेखनावर साहित्यिकांची योग्य तऱ्हेनें उपजीविका व्हावयाला पाहिजे. वाचनासाठीं वाचकांनीं पैसे खर्च करावयाला उत्सुक असलें पाहिजे. 'फुकट लिहावें आणि फुकट वाचावें' ही परिस्थिति वाङ्मयाच्या सरधोपट प्रसाराला उपकारक असली तरी जोमदार वाढीला मुळींच पोषक नाहीं. दोन कोटी लोकांच्या ह्या राष्ट्रांत लोकप्रिय पुस्तकाच्या दोन हजार प्रति देखील एका वर्षांत खपूं शकत नाहींत ही दुःखाची गोष्ट आहे. लोक शिक्षणासाठीं जसा पैसा खर्च करतात, तसा त्यांनीं साहित्यासाठीं पैसा खर्च केला पाहिजे. गृहाच्या शोभेसाठीं गृहिणीइतकीच ग्रंथाचीहि आवश्यकता आहे हें तत्त्व जनतेच्या मनावर बिंबलें पाहिजे. महाराष्ट्रांत आज दहा तरी असे प्रतिभाशाली विद्वान् दाखवितां येतील कीं शें-दीडशें रुपयांच्या मासिक उत्पन्नासाठीं ज्यांनीं आपली प्रतिभा आणि विद्वत्ता दुसऱ्याकडे गहाण टाकलेली आहे. हे गहाण पडलेले विद्वान् सोडवून आणून शारदेच्या मंदिरांत त्यांना स्वतंत्र बिऱ्हाड थाटवून देणें हें साहित्यप्रेमी महाराष्ट्राला अवघड आहे काय ?

मराठी वाङ्मयाबद्दल बहुजन समाजाला आज जास्त जिव्हाळा वाटूं लागलेला आहे, यांतच मराठी भाषेच्या परंपरेचा विजय आहे. कारण संस्कृताच्या आणि पांडित्याच्या दंभाविरुद्ध बंड पुकारण्यासाठींच मराठी भाषेची स्वतंत्र प्राण-प्रतिष्ठा झाली. 'मराठीचा पक्ष हा सामान्यांचा, बायाबापड्यांचा, स्त्रीशूद्रादिकांचा, अतएव सकल जनतेचा पक्ष' म्हणूनच स्थापन झालेला आहे हें प्रा. पोतदारांनीं आपल्याला मागें सांगितलेलेंच आहे. तेव्हां समाजाच्या खालच्या थरापर्यंत भाषेचें आणि साहित्याचें लोण पोहोंचवून बहुजन समाजाची वैचारिक क्रांति घडवून आणणें हेंच आजच्या साहित्यिकांचें कर्तव्य आहे. मराठी भाषेच्या जन्मकालीं प्राकृत जनांची भाषा म्हणून तिचा उपहास करणारा जसा अहंमन्य पंडितांचा एक पक्ष होता तशा मनोवृत्तीचे आजहि दोन पक्ष आहेत, नाहीं असें नाहीं.

पहिला पक्ष इंग्रजी विद्या आणि पदवी घेतलेल्या पढीक विद्वानांचा. ह्या लोकांच्या डोक्यांत इंग्रजी भाषेची एवढी धुंदी चढलेली आहे कीं, त्यांना मराठी भाषेंत ग्रंथलेखनच काय पण पत्रलेखनहि करणें गांवढळपणाचें वाटतें.

इंग्रजी भाषेवर आणि वाङ्मयावर एकाद्या इंग्रज प्राध्यापकापेक्षांहि अधिक प्रभुत्व असणारे किती तरी मराठी प्राध्यापक विश्वविद्यालयांत आणि महाविद्यालयांत आहेत; पण साहित्य-शास्त्रावर किंवा टीकाशास्त्रावर मराठींत ग्रंथलेखन करण्याचें ह्यांच्या डोक्यांतहि कधींयेत नाहीं ! विज्ञान, इतिहास, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षण इत्यादि विषयांवर परभाषेंत पांडित्य-प्रचुर ग्रंथ रचून आणि त्यावर 'डॉक्टरेट' पदव्या मिळवून किती तरी मराठी विद्वान् येथें परत येतात ! पण आपल्या ज्ञानाचें आणि संशोधनाचें भांडार देशी भाषेंत खुलें करण्याचा विचारहि कधीं त्यांच्या मनाला शिवत नाहीं. केंब्रिज विश्वविद्यालयामध्यें आपल्या बुद्धीचे विक्रम गाजवून परत आलेले कित्येक गणित पारंगत ह्या महाराष्ट्रांत आहेत, पण गणितशास्त्रावर देशी भाषेंत ग्रंथरचना करण्याऐवजीं दुसऱ्याच कोठल्या तरी उपद्व्यापांत गुंग झालेले ते आढळून येतात. मराठी भाषेंत आपली विद्वत्ता व्यक्त करणें हें ह्या मंडळींना मानहानीचें वाटतें. उत्तम इंग्रजी भाषा बोलणाराला आणि लिहिणाराला परप्रांतीं, परदेशीं आणि राजदरबारीं मान आणि कीर्ति मिळते. त्याच्या यशाचे दुंदुभि कदाचित् जगांतहि वाजतात, तथापि, ज्या ज्ञानाचा स्वजनाला आणि स्वभाषेला कांहीं उपयोग नाहीं त्याच्या दुंदुभि दिगंत वाजल्या तरी त्याची काय किंमत ! आईवर प्रेम न करणाऱ्याची माणुसकी जितकी कवडीमोलाची असते, तितकीच मायभाषेंत लेखन न करणारी विद्वत्ताहि कुचकामी असते हें अगदीं खरें. निरनिराळ्या विश्वविद्यालयीन परीक्षा उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण झालेले शेंकडों महाराष्ट्रीय पदवीधर दरवर्षी तयार झालेले दिसतात. परभाषेंत मिळविलेलें ज्ञान ह्या लोकांनीं स्वतःच्या भाषेंत आणि साहित्यांत आणून ओतलें पाहिजे. महाराष्ट्रांत विद्वत्ता भरपूर आहे—पण त्या विद्वत्तेला स्वाभिमानाची बैठक नाहीं एवढेंच कमी आहे. म्हणून—

*आपणास जें जें ठावें । तें तें मराठींत लिहावें*
*शहाणें करून सोडावें । महाराष्ट्र !*

असें माझें ह्या आंग्लाळलेल्या मराठी विद्वानांना सांगणें आहे.

मराठी भाषा आणि साहित्य हें जनतेसाठीं आहे ह्या त्याच्या मूळ स्वरू-

याचा उपहास करणारा किंवा त्याजबद्दल अविश्वास बाळगणारा असा दुसरा एक पक्ष आहे. या पक्षांतील मंडळींना ज्ञानाबद्दल विलक्षण आदर वाटतो. ‘जें आपल्याला किंवा कोणालाहि कळत नाहीं तें ज्ञान’ अशी ह्यांची ज्ञानाची व्याख्या आहे. कळावयाला गोष्ट जितकी कठिण किंवा बिकट तितकें तें ज्ञान उच्च दर्जाचें अशी ह्या मंडळींची समजूत असते. अशा तऱ्हेनें उच्च दर्जाचें ज्ञान त्यांना दिसलें कीं, त्या ज्ञानाला डोळे झांकून पण लांबून ते नमस्कार करतात. त्या ज्ञानाच्या जवळ जाण्याची त्यांची इच्छा नसते आणि पात्रताहि नसते. लोकमान्यांचा ‘गीतारहस्य’ ग्रंथ प्रसिद्ध झाला तेव्हां तो ग्रंथ न वाचतां देवघरांत ठेवून त्याची पूजा करणारी मंडळी ह्याच पक्षांतली होत.

ह्या मंडळींना ‘ज्ञानाचे गुरव’ किंवा ‘पुजारी’ म्हणावयाला हरकत नाहीं. ह्यांचें म्हणणें असें कीं, अशा तऱ्हेनें उच्च ज्ञान ज्यांत आहे तेंच खरें साहित्य किंवा उच्च दर्जाचें साहित्य. ह्या उच्च साहित्याला सामान्य जनतेचे हात पोहोंचले नाहींत तरी हरकत नाहीं, पण अशा तऱ्हेनें उच्च साहित्य अधिकाधिक निर्माण होण्यांतच साहित्याची खरी प्रगति आहे असें ह्यांना वाटतें. ज्योतिषशास्त्र, गणितशास्त्र, विज्ञान, नीतिशास्त्र, स्थापत्य-शास्त्र, कामशास्त्र इत्यादि गहन शास्त्रांवर दरवर्षी मराठींत ग्रंथनिर्मिति होत नाहीं म्हणून ह्यांना वाईट वाटतें; उलट काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी ह्यांचें पीक दिवसेंदिवस वाढत चाललेलें आहे हें पाहून ह्यांना अगदीं भडभडून येतें. जें उच्च दर्जाचें शास्त्रीय साहित्य ग्रंथालयाच्या कपाटांत वर्षानुवर्षे धूळ खात पडतें तें त्यांना वंदनीय वाटतें आणि ज्या वाङ्मयावर सामान्य वाचकांच्या उड्यांवर उड्या पडतात तें ललित वाङ्मय ह्यांना उपेक्षणीय वाटतें. किंबहुना ललित वाङ्मय हें साहित्याचें अधमांग आहे असेंच ह्यांचें मत आहे.

केवळ ‘ज्ञानासाठीं ज्ञान’ हा दृष्टिकोण आतां ‘पुराणवस्तु संग्रहालयां’त जमा झालेला आहे. ‘जीवनासाठीं ज्ञान’ हाच खरा आधुनिक दृष्टिकोण आहे. जुन्या जगांतल्या पुष्कळ विद्या आणि शास्त्रें आजच्या युगामध्यें कुचकामी ठरलीं आहेत. हल्लींच्या जगांतील जीवनाच्या झगड्यामध्यें जें ज्ञान उपयुक्त ठरतें त्याच ज्ञानाची मनुष्याला जरूरी आहे. हें ज्ञान चार दोन विद्वानांना मिळण्यापेक्षां सर्वंच जनतेला मिळालें पाहिजे. पैशाकडे जसा

पैसा जातो तसें ज्ञानी माणसांकडेच अधिक ज्ञान जातें. भिकारी लोक अधिक भिकारी होतात. अडाणी लोक जास्त अडाणी होत जातात. विद्वानांना अधिक विद्वान् करीत बसण्याची सध्यां आवश्यकता नाहीं. तें कार्य थोडेंसें तहकूब केलें तरी हरकत नाहीं. बहुसंख्य अज्ञानी समाजांतच सर्व ज्ञानाचा, विद्येचा आणि शास्त्राचा सर्रास प्रसार व्हावयाला पाहिजे. ज्ञान कितीहि श्रेष्ठ असलें तरी त्याचा उपयोग जर जनतेला झाला नाहीं तर त्याची काय किमत ? ज्ञान हें गंगेसारखें असावें. त्याचा उगम बुद्धीच्या उंच हिमालया-मधून झाला तरी आयुष्याच्या सामान्य सपाटीवर राहणाऱ्या लक्षावधि जनतेला त्यानें जीवन द्यावें.

ज्ञान देणाऱ्या शास्त्रीय साहित्याविरुद्ध मी नाहीं. तथापि बहुजनांना कळेल अशा सुगम भाषेंत आणि सुलभ पद्धतीनें हें साहित्य निर्माण व्हावयाला पाहिजे, लोकांना तें वाचतां आलें पाहिजे आणि समजलें पाहिजे एवढेंच माझें म्हणणें आहे. इंग्रजी भाषेंत सामान्य सुशिक्षितासाठीं 'पेनग्वीन सेरीज्' सारख्या मालांतून जशा सर्व आधुनिक विविध विषयांवर पुस्तिका प्रसिद्ध होतात, तशा तऱ्हेचीं पुस्तकें मराठी भाषेंत प्रसिद्ध व्हावयाला पाहिजेत. तथापि, अशा तऱ्हेचें लोकांसाठीं तयार झालेलें साहित्य वाचण्याची आवड जनतेमध्यें निर्माण होण्यासाठीं जर कोणत्या वाङ्मयाची आधीं जरूरी असेल तर ती ललित वाङ्मयाची. ललित वाङ्मय हें असें वाङ्मय आहे कीं, जनतेपर्यंत तें विनासायासानें पोहोंचूं शकतें. लोक तें आवडीनें आणि आनंदानें वाचूं शकतात, गाऊं शकतात, रंगभूमीवर आणि रुपेरी पडद्यावर पाहूं आणि ऐकूं शकतात. ' समाजांत साक्षरतेचा आणि वाचनाचा झपाट्यानें प्रसार करून समाजाची वाचनाभिरुचि वाढविण्याचें आणि समाजाला शिक्षण देण्याचें कार्य ललित वाङ्मयच करूं शकतें. समाजाच्या भावना प्रक्षुब्ध करून त्याच्या विचाराला आणि आचाराला वेगानें कलाटणी देण्याचें कार्य हें केवळ ललित वाङ्मयाचेंच सामर्थ्य आहे. म्हणून ललित वाङ्मय हें लोकवाङ्मय आहे. तेंच खरें राष्ट्रीय वाङ्मय आहे असें मी म्हणतों. गेल्या सत्तर वर्षांत ललित वाङ्मयाची वाढ अधिकाधिक होत गेली ह्यांत दुःख वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. उलट ही वाढ ह्याहिपेक्षां अधिक झपाट्यानें होत गेली पाहिजे. अधिक गोष्टी, अधिक कादंबऱ्या, अधिक काव्यें, अधिक नाटकें

आणि चित्रकथा मराठी भाषेंत निर्माण होऊन सर्वंध मराठी जनसमाजाची वाचनाची वाढती भूक भागविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. इतर वाङ्मयापेक्षां ललित वाङ्मय हें कनिष्ठ दर्जाचें आहे हें म्हणणें खोटें आहे. ललित वाङ्मय हें सोपें आणि मनोरंजक असतें हा कांहीं त्याच्या निकृष्टपणाचा पुरावा नाहीं. उलट दुर्बोध गोष्टी सोप्या शब्दांत सांगतां येणें हीच उत्कृष्ट साहित्याची कसोटी आहे, याची जिवंत साक्ष वर्षानुवर्षे चालत आलेल्या आणि हरघडी समाजाच्या तोंडीं खेळणाऱ्या हजारों म्हणी आणि सुभाषितेंच देतील ! महाभारताचें तत्त्वज्ञान व्यासांनीं गोष्टीरूपानेंच श्रोत्यांना सांगितलें आहे. येशू ख्रिस्तानें आपल्या धर्माचीं तत्त्वें 'रूपकात्मक कथे' मधूनच विशद केलेली आहेत. पंचतंत्र, हितोपदेश किंवा इसापनीति ह्यांची किंमत कोणत्याहि नीतिशास्त्राच्या ग्रंथापेक्षां कमी नाहीं. ललित वाङ्मय निर्माण करणें हें कांहीं सामान्य बुद्धिमत्तेच्या लेखकाचें काम नाहीं. युक्लीडच्या बुद्धिमत्तेपेक्षां इसापाची बुद्धिमत्ता काय कमी होती ? पाणिनीच्या विद्वत्तेशीं काय कालिदासाच्या विद्वत्तेची तुलना करतां येणार नाहीं ! इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या प्रखर प्रतिभेपुढें हरिभाऊ आपटे ह्यांची प्रतिभा काय निस्तेज दिसेल ? किंबहुना उत्कृष्ट ललित वाङ्मय निर्माण करणें हें केवळ प्रतिभाशाली बुद्धिमंताचेंच कार्य आहे. नाझी तत्त्वज्ञानाचा प्रचारक डॉ. गोबेल्स ह्यांनी युरोपियन ग्रंथकारांपुढें भाषण करतांना परवां हेंच सांगितलें कीं, 'सामान्य श्रमजीवि जनतेला आज गोष्टीवाङ्मयाची फार जरूरी आहे. मात्र हें वाङ्मय नवख्या लेखकांनीं न लिहितां बुद्धिमान् तज्ज्ञांनींच लिहिलें पाहिजे.' तथापि ललित वाङ्मयाला आणि त्या वाङ्मयाच्या लेखकांना हीन दृष्टीनें लेखण्याची परंपरा फार जुनी आहे. तथाकथित विद्वानांचा आणि पंडितांचा हा दंभ आहे. आज विश्वविद्यालयांत ललित लेखकांना मान नाहीं त्याचेंहि हेंच कारण आहे. 'प्राचीन भारतांतील ऋषींच्या दुभत्या गाई' पासून 'मुंबई इलाख्यांतील यंदाच्या भाकड म्हशी' पर्यंत कोणत्याहि विषयावर संशोधनात्मक ग्रंथ लिहिला तर त्याला विश्वविद्यालयाकडून 'डॉक्टरेट' पदवी मिळूं शकते. पण उत्कृष्ट काव्य, नाटक, किंवा कादंबरी लिहिणारे लेखक हे अशा तऱ्हेच्या मदतिदानाला लायक आहेत असें विश्वविद्यालयाला वाटत नाही. शेंकडों ओजस्वी काव्यें लिहूनहि

'डॉक्टरेट' पदवी मिळविण्यासाठीं माधवराव पटवर्धन ह्यांच्यासारख्या प्रतिभाशाली कवीला 'छन्दोशास्त्र' हा निराळा ग्रंथ लिहावा लागला. हा ललित लेखकांवर मोठा जुलूम आहे.

विश्वविद्यालयांनीं पंडिती विद्येचा जो हा निष्कारण बडिवार माजविला आहे त्यामुळें बहुजनसमाजाला शिक्षण देण्याचें कार्य ललित लेखकांनाच करावें लागतें. किंबहुना ललित वाङ्मय हेंच जनतेचें विश्वविद्यालय आहे असें म्हटलें पाहिजे. समाजांतील कामकरी, श्रमजीवि, शेतकरी, अर्धशिक्षित लोक, मुलें, वायाबापड्या ह्यांना आज भरपूर वाचन साहित्य मिळूं शकत नाही. हें साहित्य मिळविण्यासाठीं त्यांची एकसारखी धडपड चालू असते. गुलबकावली, जादूचा सोटा, ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी, कळसूत्री बाहुली, छेलबटाऊ, मोहनेच्या किंवा निळावंतीच्या लावण्या, छकडी, कहाण्या, भारुडें, पोथ्या, येथपासून तों 'भयंकर खून' 'इस्पिकचा एक्का' वगैरे एक आणा दोन आणे मालाच्या रोमांचकारी गोष्टीपर्यंत हातीं जें पुस्तक पडेल, तें वाचण्याची ह्या लोकांची तयारी असते. या वर्गापर्यंत पोहोंचेल अशा तऱ्हेचें उत्तम, चटकदार आणि स्वस्त वाङ्मय निर्माण करण्याचें काम व्यापक प्रमाणावर ललित लेखकांनीं आपल्या अंगावर घेतलें तर समाजाचें आणि साहित्याचें फारच मोठें कार्य होण्यासारखें आहे.

बहुजनसमाजासाठीं निर्माण होणाऱ्या ललित वाङ्मयावर फडके ह्यांनीं गेल्या वर्षी आक्षेप घेतले आहेत त्याचाहि ह्या ठिकाणीं विचार करण्यासारखा आहे. ते म्हणतात, 'ज्या वेळीं एकादी कला राजाश्रयापासून लोकाश्रयाकडे येते त्याच वेळीं मोठा धोका उत्पन्न होतो.' लोकांच्या आश्रयाखालीं कला आली म्हणजे त्यावर लोकांची हुकमत चालू लागते, ती कला लोकांच्या पायथ्याशीं जाऊं लागते आणि त्यामुळें त्या कलेची आणि वाङ्मयाची अधोगति होते असें त्यांचें म्हणणें आहे. राजे लोकांची परंपरा जगामध्यें जवळजवळ 'कटाप' होऊन आतां राजसत्ता लोकसत्तेमध्यें सर्वस्वीं विलीन होण्याची पाळी आली, तरी मध्ययुगांतल्या भाटाप्रमाणें राजाश्रयाचे पोवाडे गात बसणें हें खरोखरच धाष्ट्यांचें आहे. राजाश्रयाखालील खानदानी संगीत फडके ह्यांना आवडतें, पण तेंच संगीत एकाद्या फडतूस हॉटेलवाल्याला आतां आपल्याला दुकानांत ऐकतां येतें ह्याबद्दल त्यांना चीड वाटते. सयाजी

महाराजांच्या प्रासादांतील भिंतीवर रविवर्म्यानें काढलेलीं चित्रें त्यांना आवडतात, पण त्याच राजा रविवर्म्याच्या चित्रांचा आज महाराष्ट्रांत घरोघर प्रसार झाल्यामुळें चित्रकलेची हानि झालेली आहे असें त्यांचें मत आहे. डाक्याची तलम मलमल एकाद्या श्रीमंताच्या नाजुक बायकोच्या अंगावर त्यांना शोभून दिसते, उलट तीच मलमल एकाद्या टांगेवाल्याच्या गांवरान बायकोच्या अंगावर घातली तर ती त्यांना साजून दिसत नाहीं, उलट त्यापासून 'मळमळ'च उत्पन्न होते असें त्यांचें मत आहे.

वाङ्मयाला किंवा कलेला लोकांचा आश्रय मिळाल्यानें तें वाङ्मय किंवा ती कला बिघडत तर नाहींच पण त्यामुळें लोकांचा आनंद संवर्धित होऊन समाजाचें हित साधतें असा आजपर्यंतचा इतिहास आहे. सातशें वर्षांपूर्वी संस्कृताच्या विरुद्ध जनतेचा कैवार घेऊन मराठी भाषा खडी राहिली त्यामुळें मराठीचें वाटोळें न होतां जनतेचेंच कल्याण झालें. उलट राजाश्रयाखालीं कलेची किती अधोगति होते ह्याची शेंकडों उदाहरणें सांपडतील. 'रेस्टोरेशन कारकीर्दी'त इंग्लंडमध्यें राजसत्ता जेव्हां प्रस्थापित झाली तेव्हां राजाश्रयाखालीं रंगभूमीला जें छिनाल, बाष्कळपणाचें स्वरूप आलें तें जगजाहीर आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या उत्तेजनामुळें मराठी कवितेमध्यें इष्कबाजी लावण्यांचा जो महापूर आलेला होता तो कोणाला माहीत नाहीं ? ज्ञानेश्वरापासून तों पुढें चारशें वर्षें मराठी साहित्याची जी एकसारखी प्रगति होत गेली तिला कोणत्या राजाचा आश्रय होता ? केवळ जनतेच्याच आश्रयाखालीं मराठी भाषेचा संसार थाटला ना ? गेल्या सत्तर वर्षांत आधुनिक मराठी साहित्याचा जो विकास झाला त्यासाठीं कोणाच्या पदराला खार लागला ? राजांच्या कीं लोकांच्या ?

राजाश्रय हा किती झाला तरी व्यक्तीचा आश्रय ! व्यक्तीच्या आश्रयाची लोकाश्रयापुढें काय मातब्बरी ! प्रत्येक धर्म, विद्या, शास्त्र, वाङ्मय, कला ह्या लोकांसाठींच असतात आणि लोकाश्रयावरच त्यांचें अस्तित्व अवलंबून असतें. आजचें मराठी ललित वाङ्मय बहुजनसमाजांत प्रचंड प्रमाणांत प्रसृत होत चाललेलें आहे म्हणून त्याला 'तेली-तांबोळ्याचें घासलेटी वाङ्मय' म्हणून हिणविण्याचें फडके ह्यांना बिलकूल कारण नाहीं. लोकमान्य टिळकांची असामान्य लोकप्रियता सहन न झाल्यामुळें पूर्वीचे मवाळ लोक देखील

त्यांना 'तेल्या-तांबोळ्यांचे' पुढारी म्हणून संबोधीत असत. बहुजनसमाज हा मजुरांचा, शेतकऱ्यांचा, कामकऱ्यांचा, तेली-तांबोळ्यांचा, हॉटेलवाल्यांचा, टांगेवाल्यांचा, शिप्यांचाच असावयाचा. वाङ्मयाचा आणि कलेचा आनंद उपभोगण्याचा इतर पांढरपेशा समाजाप्रमाणें ह्या तेल्या-तांबोळ्यांना देखील हक्क आहे. हींच आजच्या काळाचीं चिन्हें आहेत. तीं फडके ह्यांनीं ओळखावयाला हवींत. हॉटेलवाले आपल्या धुरकट भिंतीवर राजा रवि-वर्म्याचीं चित्रें खुशाल डकवतील किंवा रेडिओ लावून भज्यांवर ताव मारणाऱ्या मोटारड्रायव्हरांना आणि मजुरांना काननबालेचें गाणें सुनवतील. तेली-तांबोळी आपल्या तेलानें आणि चुन्यानें बरबटलेल्या हातांनीं वरेरकरांच्या किंवा खांडेकरांच्या कादंबऱ्या वाचीत आरामशीर बसतील, किंवा एकादा टांगेवाला आपल्या बायकोला तलम मलमलीचें पातळ नेसवून आणि तिला टांग्यांत शेजारी बसवून 'चतुरशिंगी'ला किंवाची मुंबई करावयाला नेईल! मग त्यामुळें पाहणाराच्या पोटांत तळमळ उठो नाहीं तर छातींत मळमळ वाटो!

ललित वाङ्मय हें खरें लोकवाङ्मय आहे ही भूमिका एकदां कायम केल्यानंतर हें ललित वाङ्मय अधिक तेजस्वी आणि सामर्थ्यवान् कसें होईल, लोकरंजनाचें, लोकशिक्षणाचें आणि लोकजागृतीचें त्याचें कार्य अधिक प्रभावशाली कसें होईल याचा विचार करणें अवश्य आहे. कलात्मक मनो-रंजन हें तर ललितवाङ्मयाचें स्वरूपच आहे. तथापि, केवळ मनोरंजन करणें एवढेंच ललित वाङ्मयाचें उद्दिष्ट नव्हे. समाजाच्या विविध जीवनावर प्रकाश पाडून, त्या जीवनांतील प्रागतिक प्रवृत्तींचा पुरस्कार करावयाचा हा ललित वाङ्मयाचा प्रधान हेतु आहे. हरिभाऊ आपटे, देवल, कोल्हटकर, गडकरी, वरेरकर, खाडेकर इत्यादि प्रमुख ललित लेखकांनीं असा सामाजिक हेतु मनांत धरून वाङ्मय निर्माण केलेलें आहे. इतर ललित लेखकांनींहि हीच परंपरा पुढें चालविलेली आहे. तथापि, सुशिक्षित आणि सुखासीन मध्यम वर्गाच्या त्याच त्या ठराविक जीवनाव्यतिरिक्त समाजाच्या इतर विविध आयुष्याकडे आमच्या ललित लेखकांचें अद्यापि लक्ष गेलेलें दिसत नाहीं. तोच तो पहिल्या वर्गांत एम्. ए. पास झालेला, उरफाट्या केसाचा, काचा मारलेला, उंच, सडपातळ नायक, तीच ती हातांत टेनिसची रॅकेट

घेतलेली, दोन शेपट्यांची, पिंगट टपोऱ्या डोळ्याची, गोल पातळवाली नायिका, तेच ते लठ्ठ पोटाचे, टक्कल पडलेले आणि जाकीट घातलेले भाऊसाहेब किंवा दाजीसाहेब, तोच तो दिवाणखाना आणि तेंच तें प्रियाराधन, ह्या ठराविक गोष्टींचा आतां वाचकांना वीट आलेला आहे. या दिवाणखान्यांतून आमचें ललित वाङ्मय आतां बाहेर पडलें पाहिजे. कांहीं कांही धूर्त लेखक कालमानाप्रमाणें दिवाणखाना सोडून एकाद्या कारखान्यापर्यंत जाण्याचें धैर्य दाखवितात. पण तें फार थोडा वेळ. अखेर शेवटीं दिवाणखान्यांत येऊन कोचावर लोळल्याशिवाय त्यांना हायसें वाटत नाहीं हेंच खरें. आज समाजांत इतके उद्योग, इतके व्यवसाय, इतके धंदे आहेत; त्यांचे पडसाद आमच्या ललित वाङ्मयांत कां पडूं नयेत? पण ठराविक चाकोरी सोडून नवीन वाटेनें जाण्याचें आमच्या लेखकांना धैर्यच होत नाहीं. एक शिक्षण हाच विषय घ्या. ह्या विषयाच्या किती तरी बाजू चितारण्यासारख्या आहेत. जीवनापासून शिक्षणाची फारकत झाल्यामुळें सुशिक्षितांची बेकारी कशी वाढत चाललेली आहे, नोकरी हें शिक्षणाचें एकच ध्येय झाल्यामुळें लोक परावलंबी आणि स्वाभिमानशून्य कसे झाले आहेत ह्या गोष्टीकडे लेखकांचें कां लक्ष जाऊं नये? देशांत निरनिराळ्या तऱ्हेच्या शिक्षणसंस्था आहेत, 'शांतिनिकेतना'सारखे निरनिराळे शिक्षणप्रयोग चाललेले आहेत, देशी भाषेंतून शिकविणारें स्त्रियांचें विश्वविद्यालय आहे, अनाथ स्त्रियांना स्वावलंबी करणाऱ्या सेवासदन, मुक्तिसदनसारख्या संस्था आहेत, समाजाच्या दृष्टीनें पतित ठरलेल्या स्त्रियांच्या साहाय्यासाठीं 'श्रद्धानंद आश्रम' आहेत, सर्व जातींच्या आणि धर्मांच्या विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे आणि ऐक्याचे धडे देणारीं भाऊराव पाटलांचीं वसतिगृहें आहेत; आंधळ्यांच्या किंवा गुन्हेगार तरुणांच्या शाळा आहेत ह्या सर्व वातावरणाचा उपयोग ललित लेखकांनीं करून घेतला पाहिजे.

शेतकऱ्यांच्या आयुष्यांतले, खेडेगांवांतील लोकांच्या जीवनाचे, किती तरी प्रश्न अजून ललित वाङ्मयांत यावयाचे राहिले आहेत. हिंदुस्थानांतील किंवा महाराष्ट्रांतील निरनिराळ्या प्रांतामध्यें राहणाऱ्या निरनिराळ्या लोकांचें, किंवा जमातीचें जीवन किती तरी चटकदारपणानें रंगवितां येण्यासारखें आहे! मुंबईच्या कापसाच्या गिरण्यांचीं धुराडीं अधून मधून वाङ्मयांत

रा. नि. ८५८



डोकावलेली दिसतात. तथापि, कागदाच्या गिरण्या, साखरेचे कारखाने, चहाचे मळे, लोखंडाचे कारखाने, कोळशाच्या किंवा तेलाच्या खाणी, संरक्षित जंगलें ह्यांच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कथा फारशा वाचनांत येत नाहींत. आगगाड्या, जहाजें, मोटर, बसेस, विमानें इत्यादि वाहतुकीच्या व्यवसायांत आतां आमचे किती तरी लोक आहेत. त्यांची दखलगिरी वाङ्मयानें घ्यावयाला पाहिजे. हिंदुस्थानबाहेर पूर्व आणि दक्षिण आफ्रिका, मॉरिशस, ब्रह्मदेश, सीलोन, मलाया, वेस्ट इंडीज् येथें किती तरी हिंदी लोक वसाहती करून राहिले आहेत. त्यांचा बिचाऱ्यांचा तर वाङ्मयांत पत्ता नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत महात्माजींनीं जो पहिला शांततेचा लढा केला त्याच्या पार्श्वभूमीवर किती तरी स्फूर्तिदायक कथा लिहितां येतील ?

विराट् समाजपुरुषाच्या या विविध स्वरूपावर वाङ्मय रचण्यास विविध प्रतिभेचे कुशल लेखक हवे आहेत. ह्या लेखकांना त्या त्या गोष्टींचें ज्ञान पाहिजे, अवलोकन पाहिजे, अनुभव पाहिजे—आणि कल्पनाहि पाहिजे. ललित वाङ्मयाचा समाजजीवनाच्या प्रत्येक विभागाशीं संबंध येत असल्यामुळें वैद्यक, कायदा, राजकारण, मानसशास्त्र, समाजशास्त्र अशा किती तरी विषयांची लेखकांना माहिती असावी लागते. ही माहिती नसल्यानें त्यांच्या हातून पुष्कळ वेळीं हास्यास्पद चुका घडतात. पांच वर्षांच्या मुलाला कॅन्सर होणें, जन्मत: अधू असलेला हात बर्फाच्या वादळांत सांपडून बरा होणें, स्वप्नांत संभोग झाल्यानें स्त्रीला गर्भधारणा होणें, वेड लागलेली स्त्री मारानें रडवून बरी करणें अशी लेखकाच्या 'वैद्यकीय अकले'चीं पुष्कळशीं उदाहरणें वाङ्मयांत विखुरलीं आहेत. कायद्याच्या अज्ञानाबद्दल तर मोठमोठे लेखक गुन्हेगार ठरतील ! 'प्रेमसंन्यास'मध्यें जयंताला फांशीची शिक्षा देणारा न्यायाधीश त्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यास तुरुंगांत जातो आणि जयंताचा मित्र ऐन वेळीं त्या ठिकाणीं धांवत येऊन त्या न्यायाधिशाला एक पत्र दाखवितो व जयंताला वांचवितो. 'नया संसार'मध्यें आरोपी असलेल्या नायकाच्या निर्दोषत्वाचा पुरावा अखेरच्या क्षणीं नायिका कोर्टांत शिरून न्यायाधिशाच्या पुढें मांडते आणि मग नायक-नायिकेला आपल्या 'चेंबर'मध्यें नेऊन न्यायाधीश त्यांचें लग्न लावतो. साम्यवादाची विशेष माहिती नसतां खांडेकरांनीं 'अमृत'मध्यें एका 'भाई'चें जें चित्र रंगविलें आहे तें फारच

मौजेचें आहे. सदर भाई मोटारींत बसून एका श्रीमंताच्या घरांत त्याची मुलगी पळवून नेण्यासाठीं जातो. मुलीचा बाप जेव्हां त्याला अडवतो तेव्हां " तुम्ही भांडवलवाले लोक, गरीबांच्या भावनांची तुम्हांला कल्पना तरी आहे काय ? " असें जेव्हां घसा खरडून तो सांगतो, तेव्हां प्रेक्षकांच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळतात. जणुं कांहीं प्रत्येक भाईला श्रीमंताच्या घरांत शिरून त्याचा पैसा आणि पोरी पळवून नेण्याचा परवानाच मिळालेला आहे. ' सोन्याच्या कळसा 'मध्यें गिरणी मालकाचा मुलगा आणि कामकरी वर्गांतली मुलगी ह्यांचा विवाह घडवून आणून मालक-मजुरांचें ऐक्य साधण्याची मामा वरेरकरांनीं जो युक्ति शोधून काढली आहे ती केवळ कवीच्याच सृष्टींत संभवनीय आहे. तिला साम्यवादाचा शास्त्रीय आधार नाहीं. फडके यांच्या ' निरंजन ' ह्या कादंबरींतला नायक खादीचे कपडे घालणारा आणि सत्याग्रही असा दाखविलेला आहे. तथापि, सबंध कादंबरींत खादीचे कपडे घालून प्रणयाराधनापलीकडे त्यानें दुसरें कांहींच केलें नाहीं; हें राजकारणाचें अज्ञान समजावयाचें कीं ही राजकारणाची बदनामी समजावयाची !

सामाजिक जीवनांतील पुरःसर प्रवृत्तींचें निदान करण्यासाठीं लेखकाला त्या त्या विषयाचें अचूक ज्ञान असावें लागतें. तरच तो वस्तुस्थितीचें यथायोग्य चित्रण करूं शकेल. वस्तुस्थितीचें चित्रण करणें ह्याचा अर्थ समाजांत जशा गोष्टी असतात, दिसतात, घडतात तशा त्या रंगविणें असा नाहीं. अशा वाङ्मयाला वास्तववादी वाङ्मय म्हणतां येणार नाहीं. जसें घडतें तसें वर्णन करावयाला चातुर्याची किंवा बुद्धिमत्तेची फारशी जरूरी नाहीं. आणि वाङ्मय ही कांहीं वस्तूंच्या वर्णनाची जंत्री नव्हे. समाजपरिस्थितीचें निदान करणारें वाङ्मय हेंच खरें वास्तववादी वाङ्मय म्हणतां येईल. वस्तुस्थितीचें निदान करावयाला इत्थंभूत वर्णनाची आवश्यकता नसते. रोग्याची नाडी, जीभ आणि छाती बघूनच वैद्याला त्याच्या रोगाची पूर्ण कल्पना होऊं शकते. त्याच्या शरीराचा भाग न् भाग तपासण्याची तज्ज्ञाला आवश्यकता वाटत नाहीं. झाडावरून पडणाऱ्या एकाच फळामध्यें गुरुत्वाकर्षणाच्या विश्वव्यापी काय-द्याचें प्रतिबिंब न्यूटनला दिसून आलें. बागेंतील साऱ्या फळांचीं झाडें गदगदा हलवून बघण्याचा उपद्व्याप त्याला करावा लागला नाहीं. वर्णनाचा निष्कारण

फापटपसारा न माजवितां, समाजाच्या प्रातिनिधिक प्रवृत्तीवर एकदम बोट ठेवतां येणें यांतच खरी वास्तववादी कला आहे.

हल्लींच्या ललित लेखकांना प्रत्येक गोष्टीचें साग्रसंगीत वर्णन करीत बसण्याचें विलक्षण व्यसन लागलें आहे. काव्यांत, गोष्टींत आणि कादंबरींत हें वेड पराकाष्ठेला पोहोंचलेलें आहे. 'विंग' कडे पाहून आंत घडणाऱ्या गोष्टींचीं चटकदार वर्णनें करणारीं पात्रें आतां रंगभूमीवर येत नसल्यानें ह्या वर्णनाच्या सांथीपासून नाट्यवाङ्मय तेवढें अलिप्त राहिलें आहे. नायिका दिसली कीं तिचे डोळे, धनुष्याकृति भुंवया, स्फुरणारीं नासिकाग्रें, छोटीशी जिवणी, कुंदकळ्यासारखे दांत, उडणारे केसांचे कुरळ, खांद्यावरून सहज ओघळलेला पदर—येथपासून तों तिच्या 'टचटचीत कुचाग्रा 'पर्यंत लेखकाची वर्णनाची मजल गेल्याशिवाय कधींहि राहावयाची नाहीं. जणुं काय एकाद्या कारोनरच्या कोर्टांत नायिकेचा जिवंतपणीं पंचनामाच चाललेला आहे. तसेंच, लेखक एकाद्या घरांत शिरला कीं तेथील प्रत्येक वस्तूचें आणि जिनसांचें टिपण, जणुं काय त्या घरावर जप्तीच आली आहे, अशा दृष्टीनें करण्याचा आविर्भाव आणतो. अशा तऱ्हेनें प्रतिभेचें सारें सामर्थ्य वर्णनावारीच खर्च झालें म्हणजे शेवटीं कशासाठीं हा एवढा सारा खटाटोप चाललेला आहे हें सांगण्याची स्मृति आणि शक्ति लेखकाजवळ शिल्लकच उरत नाही. वर्णनाचे मोठमोठे टप्पे आले कीं, वाचकांना तर 'दे माय धरणी ठाय' असें होऊन जातें. आणि त्या भागावरून उडी मारून पुढें पळत जाण्याशिवाय त्यांना दुसरा मार्ग राहात नाहीं. दोन चार रेघांत चित्र उभें करतां येणें किंवा एक दोन आलापांतच श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतां येणें हें जसें आधुनिक चित्रकलेचें आणि गायनकलेचें वैशिष्ट्य आहे, तसें दोन चार वाक्यांतच वर्ण्यविषय डोळ्यांपुढें उभा करणें ह्यांतच वास्तववादी कलेचा विजय आहे. रंगाची, सुरांची, आणि शब्दांची फाजील उधळपट्टी करीत बसणें हें कलात्मकतेचें लक्षण हल्लीं समजलें जात नाहीं.

परिस्थितीचें निदान आणि शक्य तर उपाययोजनेचें दिग्दर्शन एवढाच वास्तववादी ललित वाङ्मयाचा हेतु असल्यानें, आवश्यक तेवढाच समाज-जीवनाचा भाग वाचकांना दाखवावा लागतो आणि पुष्कळसा भाग वगळून टाकावा लागतो. म्हणून वाङ्मयांतील समाजजीवन हें सत्यसृष्टींतील समाज-

जीवनांमधून निवडून निराळें केलेलें जीवन आहे, ही गोष्ट वाचकांनीं आणि टीकाकारांनीं विसरूं नये. जीवनांतला वास्तववाद आणि वाङ्मयांतला वास्तववाद ह्या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. पुष्कळांना हें कळत नाहीं. नकाशा वाचावयाला जसें शिकावें लागतें तसें वाङ्मयांतलें वास्तवजीवन ओळखण्याचाहि वाचकांना सराव करावा लागतो. नकाशा जसें जमिनीचें चित्र नव्हे, तशाच अर्थीं वाङ्मयांतील जीवन हें समाजाच्या दैनंदिन जीवनाचें चित्र नव्हे. नकाशींत जसा प्रमाणाचा आणि सांकेतिक खुणांचा उपयोग केला जातो, तसें वाङ्मयीन चित्रणांतहि प्रमाण आणि संकेत गृहीत धरावे लागतात. नाहीं तर दहा वर्षांत घडणारी गोष्ट दीडशें पानांत किंवा दोन तासांत घडते असें कसें दाखवितां येणें शक्य आहे बरें? नाटकांत अमुक एक पात्राचें बोलणें संपलें म्हणजे नेमकें दुसरें पात्र त्या वेळीं कसें येतें? खऱ्याखुऱ्या व्यवहारांत दुसरें पात्र यावयाला कदाचित् दोन दिवसहि लागले असते. तोंपर्यंत प्रेक्षकांनीं नाटकगृहांत काय करीत बसावयाचें? नाटकांतील किंवा कादंबऱ्यांतील पात्रें गोष्टीचा ओघ चालू असतां अधूनमधून 'जरा आंत जाऊन येतो' असें सांगून कधीं अदृश्य होत नाहींत याचा असा अर्थ नव्हे कीं सामान्य माणसाचे शरीरधर्म त्यांना बंधनकारक नाहींत! एवंच, वाङ्मयांतील वास्तवतेला प्रमाणाचें आणि संकेताचें बंधन आहे हें विसरतां कामा नये.

वाङ्मयांतील पुष्कळशा घटना ह्या वाच्यार्थानें घ्यावयाच्या नसून लक्षणार्थानें घ्यावयाच्या असतात हें कांहीं वाचकांना माहीत नसतें. त्यामुळें अमुक अमुक गोष्ट अशक्य आहे, असें घडणें कधीं शक्य नाहीं अशा तऱ्हेचे टीकोद्गार त्यांच्या तोंडून निघतात. सुधाकराच्या संसारांत इतक्या हालअपेष्टा सहन करून मुकाट राहणारी सिंधूसारखी स्त्री जगांत असणें शक्य नाहीं. गळ्यांतलें मंगळसूत्र तोडून 'घराबाहेर' पडणारी विवाहित स्त्री हिंदु समाजांत कोठें असते काय, नवऱ्याला वांचविण्यासाठीं बायकोनें खोटी सही करून पैसे काढले तर तेवढ्या गोष्टीवरून संसार उधळून टाकण्यापर्यंत आलेले 'डॉल्स हॉऊस'मधील नवरा बायको जगाच्या पाठीवर कोठें सांपडतील कीं काय, अशा तऱ्हेचे प्रश्न विचारणारे प्रेक्षक कांहीं कमी नसतात. सिंधू, निर्मला किंवा नीरा ह्यांच्याकडे केवळ वैयक्तिक दृष्टीनें न बघतां त्या त्या विशिष्ट

समाजांत निर्माण झालेल्या स्त्रीस्वभावाचा तो प्रातिनिधिक नमुना आहे अशाच भावनेनें बघितलें पाहिजे.

अर्थात् अद्भुतरम्य, चमत्कृतिजन्य आणि असंभाव्य गोष्टींचा वाङ्मयीन वास्तववादांत अंतर्भाव होत नाहीं इकडे मात्र कांहीं लेखकांचें लक्ष अवश्य ओढलें पाहिजे. पुष्कळ लेखक एकामागून एक घडणाऱ्या अद्भुत घटनांची लांबलचक जंत्री करून वाचकांच्या मनोवृत्ति स्तिमित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामध्यें व्यावहारिक आणि वाङ्मयीन अशा दोन्हीहि वास्तवतेचा पत्ता नसतो. बोलपटामध्यें ही सांथ सध्यां फार आलेली आहे. 'संगम' ह्या खांडेकरांच्या बोलपटांत नायक आगगाडीच्या डब्यांत बसला असतांना विनातिकीट प्रवास करणाऱ्या एका अनोळखी स्त्रीला वांचविण्यासाठीं ती आपली बायको आहे असें तो तिकीट कलेक्टराला बेधडक सांगून टाकतो. त्यामुळें दोघांची ओळख होते. दोघे वर्तमानपत्राच्या फाटक्या कागदावर चिवडा खात असतांना त्या वर्तमानपत्रांत 'सहकुटुंब संपादक पाहिजे अशी जाहिरात वाचतात. त्या जाहिरातीप्रमाणें दोघेहि अर्ज करावयासाठीं मुख्य संपादकाकडे जातात. मुख्य संपादक त्यांना म्हणतो कीं 'ज्या अर्थी पुष्कळ वर्षे लग्न होऊनहि तुम्हांला मूल झालेलें नाहीं त्याअर्थी एक मुलगी दत्तक घेण्याचें तुम्ही कबूल करीत असाल तर मी तुम्हांला नोकरीवर नेमतों.' दोघे कबूल होतात.. मुख्य संपादक एक मुलगी त्यांच्या मांडीवर आणून बसवितो. आणि त्यांना सहसंपादक नेमतो. हा प्रसंग पाहात असतांना कोणत्या जगांत आपण आहोंत हें न कळल्यामुळें प्रेक्षकांचे प्राण अगदीं कासावीस होऊन त्यांना दरवाजाकडे धांव ठोकावीशी वाटल्यास नवल नाहीं. 'शादी' बोलपटांतील पंगू आणि भिकारी नायकाला लॉटरींत अतोनात पैसा मिळतो. हा पैसा घेऊन तो हिमालयात हॉटेल काढावयाला जातो. तेथें बर्फाच्या वादळांत सांपडून त्याचा जन्मजात पंगूपणा नाहींसा होतो. नंतर तो व्यसनाधीन होऊन आपल्या मेहुणीशी लग्न ठरवतो. पण लग्नाच्या ऐन प्रसंगीं जमलेले पाहुणे त्याला आपल्या जोड्यांनीं मारतात आणि मग त्याचा हृदयपालट घडून येतो. 'कंचन' बोलपटांतली नायिका लग्नाचे वेळीं विष खाऊन मरते; पण तितक्यांत एक डॉक्टर येतो आणि तिला इंजेक्शन देऊन पुन्हां

जिवंत करतो. अशा तऱ्हेच्या अद्‌भुतरम्य घटना ही ललित वाङ्मयाची निव्वळ बदनामी आहे.

वास्तववादी वाङ्मय समाजाच्या गतिमान् जीवनाचें निदान करतें म्हणूनच त्याला पुरोगामी वाङ्मय असेंहि म्हटलें जातें. मानवतेच्या अंतिम ध्येयाच्या दिशेनें मानवसमाजाची प्रगति घडवून आणणें हेंच वास्तववादी किंवा पुरोगामी वाङ्मयाचें प्रमुख लक्षण आहे. पुरोगामी म्हणजे स्वैर, स्वेच्छाचारी किंवा अनीतिप्रसारक वाङ्मय असा त्याचा प्रतिगामी टीकाकार विपर्यास करतात. समाजाच्या प्रगतीचे शत्रू प्रत्येक युगांत सुधारणेची यथेच्छ निंदा करून तिला विरोध करतात. तथापि सुधारणेच्या पुरःसर ओघांत त्यामुळें कधींहि अडथळा उत्पन्न झालेला नाहीं असा आतांपर्यंतचा इतिहास आहे. पुरोगामी वाङ्मयाचें अकल्याण केवळ निंदेनें होणें शक्य नाहीं. मानवजातीच्या आणि समाजाच्या प्रगतीच्या मार्गांत प्राचीन काळापासून फार मोठे अडथळे उत्पन्न झालेले आहेत. 'युद्ध, दारिद्र्य आणि रोग ही पृथ्वीवर परमेश्वराच्या विरुद्ध माणसानें केलेली अघोर पापें आहेत' असें शॉ म्हणतो. मानवी प्रगतीचे हेच ते अडथळे होत. हे अडथळे प्रगतीच्या वाटेंतून काढून नेस्तनाबूद करणें हें पुरोगामी लेखकांचें कर्तव्य आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करून त्याला जिंकावें, त्याचें स्वातंत्र्य हिरावून घ्यावें आणि त्याला शेंकडों वर्षें गुलामगिरींत ठेवावें हें मानवतेच्या विरुद्ध भयंकर पाप आहे. स्वातंत्र्य हा प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि कोणत्याहि राष्ट्राला दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिसकावून घेण्याचा अधिकार नाहीं. ही विचारसरणी पुरोगामी लेखकांनीं निर्भीडपणें प्रसृत केली पाहिजे. युद्ध हा मानवी संस्कृतीवरचा एक भीषण कलंक आहे. युद्धाच्या नांवाखालीं, क्षात्रबळाचें आणि पराक्रमाचें खोटें स्तोम माजवून राक्षसी अत्याचार केले जातात. हजारों जीवांची आणि कुटुंबांची धुळधाण होते आणि समाज पशुकोटीला जाऊन पोहोंचतो. अशा युद्धांच्या विरुद्ध लिहिणें हें पुरोगामी लेखकांचे कर्तव्य आहे. संपत्तीच्या विषम वांटणीमुळें जगांत प्रचंड वर्गकलह निर्माण झालेला आहे. धर्म, न्याय, कायदा, शिक्षण ह्या संस्था पैसेवाल्या आणि सत्तावाल्या वर्गाच्या आधीन झाल्यामुळें त्याचा फायदा पददलित वर्गाला मिळत नाहीं. त्यामुळें त्यांच्या गुलामगिरीच्या यातना अधिकाधिकच वाढत

जातात. धर्माला ढोंगाचें स्वरूप मिळतें; न्याय पैशानें खरेदी करतो; कायद्याचा जुलूम असह्य होतो; शिक्षण हा केवळ विलास होऊन बसतो. समाजांतील दंभाचा आणि ढोंगाचा नायनाट करणें हें कार्य पुरोगामी वाङ्मयाच्या कक्षेंत येऊं शकतें. अर्न्स्ट टोलर ह्या लेखकानें लिहिलेलीं नाटकें पुरोगामी वाङ्मयाचे अत्यंत तेजस्वी नमुने म्हणून दाखवितां येतील. पुरोगामी होऊं इच्छिणाऱ्या लेखकांनीं ह्या नाटकांचा अवश्य अभ्यास करावा.

अखिल मानव जातीवरील अन्यायाविरुद्ध आरोळी ठोकणारें वाङ्मय हें श्रेष्ठ दर्जाचें पुरोगामी वाङ्मय समजावयाला हरकत नाहीं. तथापि, विशिष्ट समाजांतच आढळून येणाऱ्या अन्यायमूलक रूढीवर प्रहार करणाऱ्या वाङ्मयालाहि पुरोगामी वाङ्मय म्हणावयाला हरकत नाहीं. अर्थात् ह्या रूढी कालांतरानें नाहींशा होण्यासारख्या असल्यानें त्या वाङ्मयाचें महत्त्व तत्कालीनच असतें. बालावृद्ध विवाहाचा अन्याय समाजाच्या वेशीवर टांगणाऱ्या 'शारदा' नाटकाचें महत्त्व आज नसलें तरी त्याचें पुरोगामित्व कांहीं कमी झालेलें नाहीं. प्रीतिविवाह, विधवाविवाह, हुंडाबंदी, आंतरजातिविवाह, घटस्फोट, अस्पृश्योद्धार, वेश्याविवाह इत्यादि सुधारणांचा महाराष्ट्रीय हिंदुसमाजांत पुरस्कार करणारें वाङ्मय सामान्यतः पुरोगामी ह्या सदराखालींच येणारें आहे. पुरोगामी लेखकांना पुष्कळ वेळां मूर्तिभंजकाचें काम महंमूद गझनवीच्या निर्दयतेनें करावें लागतें. देवपणा निघून गेलेल्या फत्तरांचीहि अंधश्रद्धेनें समाज पूजा करीत असतो. समाजाच्या या अंधश्रद्धेवर जगणारे पुजारी त्या दगडाच्या देवपणाचे नगारे बडवीत असतात. ह्या खोट्या देवांचे आणि दांभिक पुजाऱ्यांचें उच्चाटन करून समाजाला सत्याचा मार्ग दाखविणें हें पुरोगामी लेखकांचें काम आहे. इब्सेन आणि शॉ ह्यांनीं आपापल्या वाङ्मयांत हें काम मोठ्या अभिनिवेशानें केलेलें आहे. समाजाच्या श्रद्धेवर प्रहार करणाऱ्यांनीं समाजाच्या रोषाची आणि निंदेची आग स्वतःच्या शिरावर झेलण्याची तयारी केली पाहिजे. पावित्र्याच्या आणि नीतीच्या खोट्या कल्पना अंधश्रद्धाळू समाजानें आपल्या उराशीं जपून ठेवलेल्या असतात. किंबहुना रोगी समाजाच्या शरीरांतलीं तीं निरनिराळीं बेंडेंच आहेत असें म्हटलें तरी चालेल. समाजाच्या हितासाठीं ह्या

पिकलेल्या बेंडांवर शस्त्रकर्म करून पुरोगामी लेखकांनीं तीं समाजाच्या शरीरांतून नाहींशी करावयाला पाहिजेत.

हें शस्त्रकर्म चालू असतां भावना दुखल्या, पावित्र्यविडंवन झालें, नीतीचा निकाल लागला, अशा तऱ्हेच्या किंकाळ्या रोगी मारण्याचा संभव असतो; पण त्यामुळें भिऊन जाण्याचें कारण नाहीं. हिंदुसमाजांत 'पवित्र' गोष्टींचा इतका बाजार माजलेला आहे कीं, त्यांना धक्का न लावतां त्या गर्दीतून सहीसलामत वाट काढणें ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. तेत्तीस कोटी देवांपैकीं तर कोणत्याहि देवाच्या वाटेला जातां येत नाहीं. कारण बोलून चालून ते देवच पडले ! गणपतीला 'लंबोदर,' 'मूषकवाहन', 'वक्रतुंड,' 'एकदंत,' असें भक्तानें म्हटल्यानें पावित्र्यविडंबन होत नाहीं; पण 'गणपतीच्या तोंडांतला एकदंत ओंठांत धरलेल्या चिरूटासारखा दिसतो' असें कोल्हटकरांनीं म्हटल्याबरोबर पावित्र्यभंगाचा अक्षम्य गुन्हा त्यांच्या हातून घडला ! तुकारामांनीं हा गुन्हा मागेंच करून ठेवलेला आहे म्हणून बरें. त्यांनीं म्हटलें आहे—

*जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई*
*गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ*
*मुंजा म्हैषासुरें । हीं तो कोण लेखी पोरें*
*ह्या देवांचा जो देव । तोच माझा पंढरिराव ॥*

ह्याबद्दल तुकारामबुवांचा देखील त्यांच्या काळीं छळ झालेलाच आहे !

विठोबासारख्या पुरुष देवाला 'विठाबाई माऊली' म्हटलें तर हृदयांत भक्तीच्या गुदगुल्या फुटतात आणि श्रीकृष्णाला पेंद्यासारख्या दोस्तांच्या प्रेमानें कोणी 'कृष्णराव' म्हटलें तर 'संस्कृति संरक्षकां'च्या भावना ठणकूं लागतात. पूर्वीच्या काळीं भक्ताचें संरक्षण करावयाला देव धांवून येत असे; पण आज ह्या कलियुगांत देवाचें पावित्र्य रक्षण करण्यासाठीं भक्तांना धांवपळ करावी लागत आहे हें आश्चर्य नव्हे काय ? देवांच्या आणि धर्माच्या नांवावर अखिल हिंदुस्थानांत पुजाऱ्यांनीं, भटजींनीं आणि बुवांनी जें भयंकर पावित्र्य विडंवन चालविलें आहे, तिकडे सनातनी समाज खुशाल पाठ फिरवून बसलेला आहे आणि एखाद्या आधुनिक दृष्टीच्या लेखकानें 'गाय हा उपयुक्त पशु आहे' किंवा 'द्रौपदीवर पातिव्रत्याची पांचपट जबाबदारी

होती ' असें म्हटलें तर मात्र तो त्याच्यावर डोळे वटारतो. हा पक्षपात आहे. समाजाच्या पावित्र्याच्या आणि नीतीच्या कल्पना सनातन आहेत असें मानणें अशास्त्रीय आहे. समाजाच्या प्रगतीवर ज्यांचा विश्वास नाहीं तेच असें म्हणूं शकतील. आजच्या आणि उद्यांच्या समाजाच्या दृष्टीनें जुन्या समाजाच्या पावित्र्याच्या आणि नीतीच्या जरीपुराण्या कल्पना आपण झटकून आणि पारखून घ्यावयाला पाहिजेत. ज्या गोष्टीत आज कोणतीहि नीति किंवा पावित्र्य उरलेलें नाहीं त्या गोष्टी खुशाल दूर भिरकावून देण्याची निर्भयता आणि मनोधैर्य आपण दाखविलें पाहिजे तरच प्रगतीच्या वाटेंतील अडगळ नाहींशी होईल ! महात्मा ज्योतिराव फुले ह्यांनीं सनातनी ब्राह्मण समाजाच्या पावित्र्याच्या आणि श्रेष्ठत्वाच्या दंभावर एवढे जबरदस्त प्रहार केले म्हणूनच त्यांच्या अडाणी ब्राह्मणेतर जनतेला आपल्या उद्धाराची वाट दिसूं शकली. आजच्या पुरोगामी लेखकांनीं ज्योतिरावांची निर्भय वृत्ति आणि बेडरपणा आपल्या अंगीं आणावयाला पाहिजे.

पुरोगामी ललित लेखकांना विनोद हें आतां एक अत्यंत सामर्थ्यवान् शस्त्र उपलब्ध झालेलें आहे. फ्रेंच, इंग्रजी आणि अमेरिकन वाङमयांत हास्यविनोदाला फारच श्रेष्ठ स्थान मिळालेलें आहे; किंबहुना एकादें साहित्य विकसित झाल्यावाचून त्यावर विनोदाचा फुलोरा फुलून येत नाहीं. इंग्रजी आणि फ्रेंच ह्या दोन संपन्न भाषेंतच उत्कृष्ट विनोदी वाङमय आढळून येतें. समाजाच्या बुद्धीचा आणि जीवनाचा दर्जा वाढल्याशिवाय त्या समाजांत उत्तम विनोद निर्माण होऊं शकत नाहीं. त्यामुळेंच कीं काय (उत्कृष्ट विनोद हें समाजाच्या सुसंस्कृत जीवनाचें गमक म्हणून समजलें जातें.) वाङमयाच्या इतर प्रकाराशी विनोदाची तुलना केली तर काव्य, कादंबरी, नाट्य हे प्रकार विनोदापुढें कृत्रिमच भासतात. कारण काव्य, कादंबरी, नाट्य ह्या गोष्टी कुणी तरी घडवून दाखविल्याशिवाय त्या समाजाच्या ध्यानीं येत नाहींत. विनोद हा जीवनांत पावलोंपावलीं सहजपणें घडत असतो आणि तो कोणालाहि आपोआप दिसून येण्यासारखा असतो. म्हणून इतर रसांपेक्षां हास्यरस लोकांना अधिक ओळखीचा आणि आवडीचा वाटतो. विनोद हा जीवनाच्या रोजच्या व्यवहारांत घडून येत असला, तरी समाजाच्या स्वभावांत आशावादित्व, आनंदीपणा, सहनशीलता, उमदेपणा आणि खेळाडूपणा

इत्यादि गुण वाढत गेल्याशिवाय त्याला समाजाच्या तोंडीं किंवा लेखी साहित्यांत मानाचें स्थान मिळूं शकत नाहीं. इंग्रज, अमेरिकन, स्कॉचमन, आयरिशमन ही मंडळी एकमेकांना खर्चीं टाकून खूप विनोद पिकवितात आणि पोटभर हंसत बसतात ही गोष्ट त्यांच्या उमद्या आणि खेळाडू स्वभावाचीच द्योतक आहे.

हिंदी लोकांच्या स्वभावांत हे गुण अद्यापि आले नाहींत म्हणून या देशांत विनोदाचा प्रसार अद्यापि झालेला नाहीं. विनोद कळणें आणि तो सहन होणें ह्या गोष्टीला बुद्धीचा विस्तार पुष्कळच असावयाला लागतो. गांवढळ माणसाची थट्टा केल्यास प्रकरण मारामारीवर आल्याविना राहात नाहीं. मद्रासी माणसाला त्याच्या इंग्रजी उच्चाराची आणि भात खाण्याची नक्कल केलेली आवडत नाहीं. कानडी माणसाला 'रुंडु–गुंडु' म्हटलें तर तो अंगावर काठी घेऊन धांवल्याशिवाय राहणार नाहीं. कोल्हटकर आणि गडकरी ह्यांच्यावर कानडी लोक भयंकर संतापलेले आहेत हें आपल्याला ठाऊकच आहे. मुसलमानाशीं तर थट्टाविनोद करणें हें फारसें सुरक्षित आहे असा निर्वाळा देतां येत नाहीं. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांशीं तुलना केली तर महाराष्ट्राची विनोदबुद्धि अधिक तल्लख आहे असें मोठ्या अभिमानानें म्हणतां येईल. गुजराथी, ऊर्दू, बंगाली, कानडी इत्यादि भाषांपेक्षां मराठी भाषेंतील विनोद किती तरी पटीनें प्रगल्भ आहे हें जाणतेच सांगूं शकतील.

विनोदाची ही नवीन दृष्टि, हें नवें सामर्थ्य पन्नास वर्षांपूर्वीं कोल्हटकरांनीं महाराष्ट्राला मिळवून दिलें. ह्या दृष्टीचा प्रसार जनतेमध्यें गेल्या पंचवीस वर्षांत विलक्षण वेगानें झालेला आहे. विनोदाच्या ह्या देणगीनें मराठी जीवनाचें आणि साहित्याचें तेज अतिशयच वाढलेलें आहे. विनोदाचें हें लोण बहुतेक सर्व ललित लेखकांपर्यंत, वक्त्यांपर्यंत आणि वृत्तपत्रांपर्यंत आतां पोहोंचलेलें आहे. विनोदबुद्धि असल्यावाचून एकाद्या वक्त्याला श्रोत्यापुढे तग धरणें आज कठिण होऊन बसलें आहे. कादंबरी–नाटकांमध्यें वाचकाचें किंवा प्रेक्षकाचें अवधान सांभाळावयाला विनोदाचें साहाय्य घ्यावेंच लागतें. पूर्वीचीं गंभीर वृत्तपत्रें वाचतांना मृत्युपत्र वाचल्यासारखा चेहेरा करावा लागत असे, तसें आजचीं चुरचुरीत वृत्तपत्रें वाचतांना करावें लागत नाहीं.

महाराष्ट्रांतील तरुण तर ह्या शक्तीचे भाविक उपासक बनलेले आहेत. त्यामुळें समाजांत पूर्वीपेक्षां अधिक उत्साह, तारुण्य आणि खेळकरपणा उत्पन्न झालेला आहे.

विनोदाचें महत्त्व आणि सामर्थ्य ओळखणारा माणूस मराठी वाङमयांतील ह्या हितकारक प्रकाराचें सहर्ष स्वागतच करील. असें असतां त्या समाजोपकारक विनोदी साहित्याविरुद्ध कांहीं विघ्नसंतुष्ट मंडळींनीं 'दुसरी आघाडी' उघडण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. अर्थात् विनोदाच्या पुरस्कर्त्यांचें सैन्य महाराष्ट्रांत एवढें खडें आहे कीं, ही 'दुसरी आघाडी' उघडली गेली तरी ती यशस्वी होण्याचा फारसा संभव नाहीं. विनोद म्हणजे अश्लीलता, फाजीलपणा, पांचटपणा, बीभत्सपणा, ग्राम्यता असे या आघाडीवाल्यांचें म्हणणें आहे. विनोदाचा हा भेसूर भस्मासूर महाराष्ट्र देशांत फारच मातला आहे, तेव्हां त्याचा विध्वंस करण्यास परमेश्वरानें पुन्हां एकदां अवतार घ्यावा अशी ह्यांची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. समाजाच्या प्रगतीचे शत्रू ह्या आघाडींत सामील आहेत ह्याचें कारण प्रतिगामी, अगतिक आणि जीर्ण समाजाचीं बिंगें हांसत हांसत बाहेर काढण्यास विनोदासारखें दुसरें प्रभावीं साधन नाहीं ही गोष्ट कोल्हटकरांनींच दाखवून दिली.

विनोदाचें मूळ स्वरूप मुळीं असेंच आहे. मानवी जीवनांत रोग, जरा, मरण, अपघात, हानि, पराभव, निराशा, अपमान, अज्ञान, मूर्खपणा इत्यादि अनंत दुःखें भरलेलीं आहेत. ह्या दुःखांकडे गांभीर्यानें पाहिल्यास तीं दुणावल्याखेरीज राहणार नाहींत, म्हणून त्यांच्याकडे खेळकर दृष्टीनें बघून जीवन सुखावह करण्यासाठीं मनुष्याला विनोदाची देणगी मिळालेली आहे. विविध प्रकारचें दुःख हा विनोदाचा एकमेव विषय आहे. समाजांतील अनिष्ट रूढी आणि संवयी नाहींशा करावयाच्या असतील तर त्यांच्यामधील अनिष्टपणा आणि निरर्थकपणा हा विनोदाच्या साहाय्यानेंच समाजापुढें उघडा करून दाखविला पाहिजे. श्रावणी, शिमगा, सोंवळें-ओवळें, निर्जळी एकादशी, धर्मांतर, मृताचे अंत्यसंस्कार इत्यादि विषयांवर विनोदी निबंध लिहून कोल्हटकरांनीं हिंदुसमाजांतील अनिष्ट आचार, विचार, समजुती ह्यांच्यावर फारच मार्मिक टीका केली आहे. कोल्हटकरांचें हें लिखाण पुरोगामी वाङमयाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यावेळचा सनातनी समाज हा कोल्हट-

करांवर ज्या कारणासाठीं चिडला त्याच कारणासाठीं प्रगतीचे शत्रू आज विनोदावर उखडले आहेत. गंभीर तऱ्हेचा हल्ला एक वेळ सहन करतां येतो. पण विनोदाच्या माऱ्याला तोंड देतां येत नाहीं. प्राण अगदीं गुदमरल्या-सारखे होतात आणि कांहीं उपाय चालत नाहीं. माणसाचा मूर्खपणा विनोदानें जितका उघडा होतो तितका दुसरा कशानें होत नाहीं म्हणून मूर्ख लोक विनो-दाचे नेहमींच वैरी असतात. विनोद हा ग्राम्य, अश्लील किंवा बीभत्स कधींच असूं शकत नाहीं. तो करणारा माणूस किंवा ऐकणारा माणूस हा ग्राम्य, अश्लील किंवा बीभत्स असतो. ज्यांना निषेध करावयाचा असेल त्यांनीं पाहिजे तर ग्राम्यतेचा, अश्लीलतेचा किंवा बीभत्सपणाचा निषेध करावा, पण 'वड्याचें तेल वांग्यावर' या न्यायानें विनोदाची तरी वदनामी करूं नये. विनोदी लेखन हें महाराष्ट्रांत नवीनच असल्यानें अद्यापि लेखक-वर्ग त्या कलेंत कुशल झालेला नाही आणि विनोदाची गंमत अशी आहे की, लेखक पट्टीचा कुशल नसेल तर त्याच्या हातून नेमका विनोद निर्माण व्हावयाच्या ऐवजीं पाणचटपणा किंवा अश्लीलताच निर्माण होते. अलीकडच्या बाजूला पाणचटपणा आणि पलीकडच्या बाजूला अश्लीलता अशा अडचणीच्या जागेंत विनोदानें आपलें बिऱ्हाड थाटलेलें आहे. 'टांगेवाल्याच्या बायकोच्या अंगावरची मलमल पाहून मळमळ वाटते हा विनोद नव्हे, हा पाणचटपणा आहे. म्युनिसिपालिटींत पाय वर करून मतप्रदर्शन करणाऱ्या माणसाला, 'पाय खालीं करा, मत दिसेल !' असें म्हणणें ही अश्लीलता झाली. पण 'मूकनायकां'तील सुंदर पण मुक्याचें सोंग घेतलेल्या विक्रांताबद्दल 'सुंदर चेहऱ्याचा मुका कोणाला आवडत नाहीं !' असें म्हणणें हें विनोदाचें उदाहरण झालें.

करुण, वीर, वत्सल रसाच्या सिद्धतेमध्यें कमी अधिक परिपाक झाला तर लेखकाच्या पदरीं एवढा दोष येत नाहीं. पण विनोदसाधनाच्या बाब-तींत अकुशलतेचें समर्थन करणें शक्य नाहीं. विनोदाची सिद्धता करतां येत नाहीं हा विनोदाचा दोष नव्हे—लेखकांचा आहे. वैयक्तिक टीकेमधें विनोदाचा उपयोग करण्यांत आला तर तो विनोदाचा गुन्हा नसून टीकेचा गुन्हा होय. दाढी करावयाला वस्तऱ्याच्या ऐवजीं कुणी तरवार घेतली तर त्या तरवारीला शिव्या देण्यांत काय अर्थ आहे ? विनोदसिद्धीचें शास्त्रीय-

स्वरूप माहीत नसल्यामुळें अडाणी टीकाकार विनोदावर निष्कारण आग पाखडतात. त्यांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, ग्राम्यतेचा आणि अश्लीलतेचा बभ्रा करून विनोदाला विनाकारण धोपटूं नका. कारण विनोदामुळें मराठी साहित्याचें तेज निःसंशय वाढलें आहे आणि समाजाच्या प्रगतीला उपयोगी पडणारें एक परिणामकारक शस्त्र पुरोगामी ललित लेखकांच्या हातीं आज पडलेलें आहे. विनोदाला विरोध करणें हें प्रगतीला विरोध करण्यासारखें आहे.

समाजाच्या प्रगतीला चालना देणारें वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकाला समाजाच्या विविध स्वरूपांचें आणि लेखनकलेचें ज्ञान असून केवळ भागत नाहीं. तर त्याच्या लेखनामागें तत्त्वज्ञानाची स्पष्ट भूमिका असावी लागते. त्याच्या जीवनाला आणि लेखनाला सुसंगत विचारसरणी असणें जरूर असतें. अशी विचारसरणी असेल तरच त्याला आपल्या लेखनाबद्दल आत्मविश्वास वाटूं लागेल आणि त्याच्या हातून प्रभावी लेखन होत जाईल. साहित्याचा पक्ष हा जनतेचा पक्ष असल्यानें सर्व जनतेला सुखी करण्याचें तत्त्वज्ञान हेंच त्याच्या जीविताचें तत्त्वज्ञान असावें. जनतेच्या आकांक्षा ह्या त्याच्या आकांक्षा असाव्यात. जनतेच्या चळवळी आणि धडपडी ह्या त्याच्या चळवळी आणि धडपडी असाव्यात. जनतेच्या झगड्यांत त्यानें आत्मीयत्वानें शिरावें. जीवनाचें रहस्य कळवून घ्यावयाचें असेल तर त्यानें त्या जीवनाच्या प्रवाहांत उडी घ्यावयाला पाहिजे. कांठावर बसून दुरून गंमत बघूं नये. जनतेच्या जीवनाशीं आजपर्यंत लेखकवर्ग समरस होऊं शकला नाहीं. कारण मध्यमवर्गाचें प्रतिनिधित्व त्यांनीं पत्करिलें. त्यामुळे त्यांच्या लेखनाबद्दल जनतेचा जिव्हाळा वाढूं शकला नाहीं, आणि जनतेच्या भावनांच्या ताराहि त्यांच्या लिखाणानें कधीं कंपित होऊं शकल्या नाहींत. लेखकांनीं ही वर्गीय दृष्टि सोडून जीवनकलहांत प्रत्यक्ष झगडणाऱ्या जनतेच्या निशाणाखालीं सामील व्हावें, आणि क्रांतिकारक नेतृत्वाचीं सूत्रें हातीं घ्यावींत.

आज महाराष्ट्रांतील जनतेची स्थिति बावरल्यासारखी झाली आहे. ब्राह्मण–ब्राह्मणेतर, स्पृश्य–अस्पृश्य, हिंदु–मुसलमान असलीं खोटीं भांडणें मध्यमवर्गानें निर्माण करून जीवनाच्या मुख्य झगड्याबाबत जनतेची

दिशाभूल केलेली आहे. जनतेची राष्ट्रीय एकजूट विसकटून टाकलेली आहे आणि स्वातंत्र्याच्या लढ्यापासून जनतेचें लक्ष चळविलें आहे. अशा तऱ्हेचें जनतेचें विस्कळित झालेलें सामर्थ्य संघटित करून त्याला राष्ट्रीय झगड्याशीं समरस करावयाचें हें कार्य लेखकांनीं आपल्या अंगावर घेतलें पाहिजे, तरच मध्यम वर्गाच्या प्रतिगामी, जातीय आणि धार्मिक राजकारणाचें सामर्थ्य या देशांतून कमी होईल.

अद्यापि देशांत जनतेची संघटना प्रभावी झालेली नाहीं. तशी ती प्रभावी झाली असती तर धर्माच्या आणि संस्कृतीच्या भिन्नतेच्या सबबीखालीं देशाची फाळणी करून जनतेला परकीयांच्या दास्यांत चिरकाल ठेवण्याचा कट करण्याची कोणाची छातीच झाली नसती. जनतेचें ऐक्य साधण्याचे कामीं धर्म आणि संस्कृतिपेक्षां भाषेचें सामर्थ्य जास्त प्रभावी आहे. भिन्न भाषा असलेल्या एक धर्माच्या लोकांपेक्षां एक भाषा असलेल्या भिन्न धर्माच्या लोकांना एकमेकांबद्दल जास्त आपलेपणा वाटतो. तामीळ भाषा बोलणाऱ्या मद्रासी ब्राह्मणापेक्षां मराठी भाषा बोलणारा मुसलमान, ज्यू किंवा ख्रिस्ती आम्हांला जवळचा वाटतो. एकाच देशांत हजारों वर्षे शेजारीं शेजारी राहणाऱ्या आणि तीच भाषा बोलणाऱ्या लोकांचा पूजेचा धर्म आणि पोषाखाची संस्कृति एकमेकांपासून थोडीशी निराळी असली, तरी स्वातंत्र्य वृक्षाच्या एकाच शीतल छायेंत त्यांना निवांतपणें विसांवा घेतां येणें शक्य नाहीं असें म्हणणें हें निव्वळ लुच्चेगिरीचें आहे. (भाषा हाच जनतेचा धर्म आहे आणि साहित्य हीच जनतेची संस्कृति आहे.) आजच्या राष्ट्रीय लढ्यांत याच धर्माच्या आणि संस्कृतीच्या संघटित सामर्थ्याचा उपयोग करून घेतां येईल. एक भाषा बोलणारे निरनिराळे प्रांत हेच हिंदी स्वातंत्र्याचे घटक म्हणून समजावयाला हवेत. म्हणून (भाषेच्या निशाणाखालीं जनतेचें ऐक्य संघटित करणें हें त्या त्या भाषेंतील आणि प्रांतांतील साहित्यिकांचें कर्तव्य आहे.)

महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास महाराष्ट्राच्या आजच्या भौगोलिक सीमा भाषेच्या दृष्टीनें आंखलेल्या नाहींत. या सीमेपलीकडे राहणारी यच्चयावत् महाराष्ट्रीय जनता मराठी भाषेच्या छत्राखालीं एकत्रित झाली तरच मराठीचें सामर्थ्य आणि वैभव वाढणार आहे. महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्याच्या योजनेचा आज विचार चाललेला आहे. मुंबई

विद्यापीठाप्रमाणें हें विद्यापीठ केवळ परीक्षा घेऊन पदव्या देणारें, इंग्रजी भाषेचें आणि पंडिती विद्येचें स्तोम माजविणारें असें होतां कामा नये. महाराष्ट्र विद्यापीठ हें प्रामुख्यानें मराठी भाषेचें आणि मराठी जनतेचें विद्यापीठ झालें तरच त्याला 'महाराष्ट्र' विद्यापीठ म्हणणें योग्य होईल. आजच्या जगांतील सर्व आधुनिक ज्ञान, विज्ञान, विद्यासंशोधन ह्याचा लाभ आणि प्रसार शुद्ध मराठी भाषेमधून यच्चयावत् समाजाला मिळेल अशी व्यवस्था ह्या विद्यापीठानें करावयाला पाहिजे देशी भाषेचें आदर्श विद्यापीठ म्हणून हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठाच्या कामगिरीचें ह्या दृष्टीनें अभिनंदन करावयाला पाहिजे. मुंबई विद्यापीठांत सरकारनें इंग्रजीचें आणि पंडितांनीं संस्कृताचें घोडें दामटून मराठी भाषेची आजपर्यंत गळचेपी केलेली आहे. आज मराठी भाषेच्या अभ्यासाचा विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत जो कष्टानें प्रवेश झालेला आहे तो सावत्र आईच्या घरांत माहेरपणाला आलेल्या मुलीच्या मुक्कामासारखा आहे. आजपर्यंत मराठी भाषेला न मिळालेलें हें सर्व सुख आणि ऐश्वर्य, संपूर्ण मानपानासह महाराष्ट्र विद्यापीठांत मिळावयाला हवें. अखिल महाराष्ट्रांतील प्राथमिक आणि दुय्यम शिक्षणाचें धोरण सरकारच्या ताब्यांत न राहतां, त्यावर महाराष्ट्र विद्यापीठाची हुकमत राहवयाला पाहिजे, तरच आरंभापासून अखेरपर्यंतच्या शिक्षणामध्यें मराठी भाषेला योग्य तें महत्त्व राहील. गेल्या अडुसष्ट वर्षांत मराठी भाषेची आणि साहित्याची जी वाढ झाली तिच्या शतपट वाढ महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झालें तर दोन तपांच्या आंत होईल यांत बिलकूल संशय नाहीं. म्हणून महाराष्ट्रांतील सर्व पुरोगामी साहित्यिकांनीं महाराष्ट्र विद्यापीठाची योजना लवकर फलद्रूप करण्यासाठीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करावयाला हवी.

जनतेच्या प्रगतीचीं आणि मराठी भाषेच्या भविष्यकालीन वैभवाचीं हीं सुखस्वप्नें खरीं होण्याआधीं प्रस्तुत युद्धाच्या महासंकटांतून मानवजात सुरक्षितपणें पार पडली पाहिजे.

गेलें महायुद्ध हें आधुनिक जगांतील शेवटचें युद्ध समजलें जात होतें, तथापि युद्धानें युद्ध थांबत नाहीं हेंच सिद्ध झालें. गेल्या महायुद्धापेक्षांहि घातक असें हें रुद्रयुद्ध पुन्हां सुरू झालें आहे. किंबहुना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात त्याप्रमाणें १९१४ सालीं जगांत युद्ध सुरू झालें आहे तें अद्यापि थांबलेंच नाहीं.

हृया युद्धांमधून अखिल मानवजातीच्या शाश्वत सुखाची कांहीं योजना प्रकट होईल अशीं चिन्हें अद्यापि तरी कांहीं दिसून येत नाहीत. सध्याचें युद्ध हें मानवजातीच्या स्वातंत्र्यासाठीं आणि जगांतील लोकशाहीच्या संरक्षणा-साठीं आहे असें म्हणतात. तसें हृया युद्धाचें पर्यवसान अखेर तरी व्हावें असेंच आम्हां स्वातंत्र्यप्रेमी मंडळीचें म्हणणें आहे. युद्धाचा आरंभ ज्या स्वरूपांत झाला तो कांहीं भिन्न विचारसरणीमधील झगडा नव्हता. जित जगावर कोणीं राज्य करावें हृया महत्त्वाकांक्षेच्या पोटीं दोन प्रबळ जेत्यांमध्यें सुरू झालेलें हें भांडण आहे. हुकूमशाही आणि साम्राज्यशाही हृयांमधील हा प्राणघातक तंटा आहे. दोघांचीं नांवें भिन्न असलीं तरी आमच्या दृष्टीनें विचारसरणी एकच आहे. चालू युद्ध हें भिन्न सैन्यांमधलें युद्ध आहे. भिन्न विचारसरणीमधील याहीपेक्षां भीषण युद्ध अद्यापि जगामध्यें व्हावयाचें आहे. मानवतेच्या स्वातंत्र्यासाठीं जर हें युद्ध खरोखरच असेल, तर अटलांटिक महासागराच्या मध्यभागीं मानवजातीच्या स्वातंत्र्याची जी सनद लिहिली गेली, तिच्यामध्यें दीडशें वर्षें गुलामगिरींत पिचत पडलेल्या हृया अभागी देशाचा उल्लेख कां करण्यांत आला नाहीं? तथापि जर्मन लोकांनीं ज्या ज्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य हरण केलें त्या राष्ट्रांच्या मुक्ततेसाठींच ती सनद लिहिली गेली असल्यानें इंग्रजांनीं ज्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य घेतलें त्या राष्ट्रांच्या मुक्ततेचा प्रश्न त्या वेळीं उद्भवणें शक्य नव्हतें असे म्हणतात. ज्याचे हात कोंपरापर्यंत बरबटले आहेत त्यानें न्यायाच्या गोष्टी करूं नयेत असें वचन आहे. दुसऱ्याचें पारतंत्र्य कायम ठेवणाऱ्या राष्ट्राला मानवजातीच्या स्वातंत्र्याविषयीं वल्गना करतां यावयाच्या नाहींत. जोंपर्यंत एक राष्ट्र हृया पृथ्वीतलावर गुलाम म्हणून राहील तोंपर्यंत जगांत खरी लोकशाही प्रस्थापित होणें शक्य नाहीं. चाळीस कोटी लोकांचें हें बलाढ्य राष्ट्र निःशस्त्र करून शेळ्यांमेंढ्यांप्रमाणें ठेवणाऱ्या साम्राज्यशाहीला एक दिवस भयंकर पश्चात्तापाची पाळी आल्याशिवाय राहणार नाहीं असें फिरोजशहा मेथा हृयांनीं मागें तळतळून सांगितलेलें आहे! साम्राज्य-शाहीची आज जी धुळधाण उडालेली दिसत आहे, तो हा चाळीस कोटी जिवांचा तळतळाट तिला भोंवतो आहे हें तिनें लक्षांत ठेवावें. चाळीस कोटी जीव आज स्वतंत्र झाले तर शूर वीर रशियन लोकांप्रमाणें ते देशाच्याच काय

पण जगाच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या छातीचें 'स्टॅलिनग्राड' केल्यावाचून राहणार नाहींत. जगांत खरी लोकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय देश स्वतंत्र होणार नाहीं आणि देश स्वतंत्र झाल्याशिवाय शास्त्रें, कला, भाषा, साहित्यिक इत्यादि मानवी जीवनाच्या सुखसाधनांचा उत्कर्ष होणार नाहीं.

साहित्यिक हे स्वातंत्र्याचे भाट आहेत. जगाच्या आरंभापासून स्वातंत्र्याचीं जयगीतें गाऊन मानवी स्वातंत्र्याच्या ध्येयाची ज्योत आजपर्यंत त्यांनींच जिवंत ठेवलेली आहे. तथापि, भांडवलशाही राष्ट्रांत आज साहित्यिक स्वतंत्र नाहींत. जुलमी कायद्याखालीं त्यांची प्रतिभा चिरडली गेली आहे. रावणाच्या राज्यांत तेतीस कोटी देव गुलाम झाले आणि ब्रह्मदेवाला गाढवें हांकण्याची पाळी आली. तशी भांडवलशाहीच्या जुलुमाखालीं जातिवंत साहित्यिकांना गाढवें हाकण्याखेरीज दुसरें कांहींहि करण्याची परवानगी मिळत नाहीं. नुसतें खरें बोलावयाची देखील आज साहित्यिकांना बंदी झालेली आहे. जे जुलुमी राक्षस मानवतेला शतकानुशतकें दास्यांत ठेवूं पाहतात, त्या राक्षसांच्या विरुद्ध एक अक्षरहि उच्चारण्याची त्या देशांतल्या साहित्यिकांना मुभा नाहीं. भाषणस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य हा नागरिकस्वातंत्र्याचा पाया आहे. ह्या पायावरच राजकीय स्वातंत्र्याचें जीवन उभारलेलें असतें. हें भाषण आणि लेखनस्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लेखकांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें पाहिजे.

*For this did God contrive the human brain,*
*For this our sailors face the awful sea,*
*For this boys perish on the Libyan plain,*
*That thought be sacred and that speech be free!*

भाषणस्वातंत्र्याच्या एका आंग्ल पुरस्कर्त्याचे हे ताजे उद्गार सर्वांना मार्गदर्शक होण्यासारखे आहेत.

स्वार्थ, सत्तालोभ, वर्णवर्चस्व, जुलूम, दास्य ह्या मानवजातीच्या शत्रूंचा ह्या युद्धांत निःपात झाला तर समतेच्या, शांततेच्या आणि स्वातंत्र्याच्या भूमिकेवर उद्याच्या जगाची पुनर्घटना करतांना जी 'मानवतेची सनद' लिहावी लागेल ती लिहिण्यासाठीं मुत्सद्दी, सेनापति किंवा व्यापारी यांना

न बोलावतां जगांतील साहित्यिक महात्म्यांनाच पाचारण करावें लागेल. बंदुकीनें युद्धें होत असलीं तरी तीं लेखणीनेंच निस्तारावीं लागतात. ही मानवतेची सनद अटलांटिक महासागरांतल्या सनदेपेक्षां अधिक उदात्त पातळीवर लिहिली जाईल. ह्या सनदेंत गोरा आणि काळा, आर्य आणि अनार्य, जेता आणि जित, मालक आणि गुलाम, श्रीमंत आणि गरीब अशा अन्यायमूलक भेदांवर जगाची आणि समाजाची झालेली घटना रद्द करण्यांत येईल आणि मानवजातीच्या शाश्वत स्वातंत्र्याची द्वाही पुकारण्यांत येईल.

आज महाराष्ट्राचे प्रमुख साहित्यिक येथें जमलेले आहेत. उद्यां लिहिल्या जाणाऱ्या या मानवतेच्या सनदेचा पुरस्कार करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. हिंदी जनतेच्या वतीनें गर्जना करून त्यांनीं जगाला सांगितलें पाहिजे कीं, "चाळीस कोटी लोकांचा हा प्रचंड देश ह्यापुढें एक क्षणभरहि पारतंत्र्यांत राहण्यास तयार नाहीं. आमचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आणि राखण्यासाठीं आम्हीं आमचें सर्वस्व धुळीला मिळवूं ! आणि आम्ही स्वतंत्र झालों तरच बाकीचें जग स्वतंत्र होईल हें पक्कें लक्षांत ठेवा ! "

महाराष्ट्र नाट्य संमेलन,

अधिवेशन ३२ वें

मुंबई

बंधुभगिनी,

महाराष्ट्र नाट्यसंमेलनाच्या ह्या बत्तिसाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष-स्थानीं माझी योजना करून, आजपर्यंत मराठी रंगभूमीची मी जी थोडीबहुत सेवा केली तिजविषयीं आपण जो आदर व्यक्त केलात, त्याबद्दल मी आपला ऋणी आहें. नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानीं सामान्यतः नट किंवा नाटककार ह्या वर्गांमधील माणसाची निवड करण्यांत येते. मी नट नाहीं हें आपल्याला सांगण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. अर्थात् तोंडाला रंग लावून मी रंगभूमीवर कधीं आलों नाहीं असा ह्याचा अर्थ नव्हे. शाळेंत असतांना संमेलनाच्या प्रसंगीं होणाऱ्या अनेक नाटकांतून पुष्कळ तऱ्हेच्या भूमिका म्हणजे, 'झुंझारराव' मधील सारजेपासून तों 'तोतयाचें बंडा'तील बगंभटापर्यंत सगळीं सोंगें मी केलेलीं आहेत. स्वतःच्या खेडेगांवांत जाहीर नाट्यप्रयोग करून दाखविले आहेत. एवढेंच नव्हे तर हौशी नटांचीं तोंडें रंगविण्यापासून तो गांवठी नाटकामधील पडदे रंगविण्या-पर्यंतची सगळी रंगभूमिविषयक कामगिरी मीं लहानपणीं करून दाखविलेली

आहेत. इतकेंच काय पण ' चित्ताकर्षक नाटक मंडळी 'चें मॅनेजर कै. वामनराव जोशी हे माझ्या अभिनय कौशल्यावर खूष होऊन मला आपल्या नाटक मंडळींत 'स्त्रीपार्टी' म्हणून पळवून न्यावयाला तयार झाले होते. तथापि ऐन मोक्याच्या वेळीं वडिलांनीं माझें तोंड रंगविलें नसतें तर, रंगभूमीवर स्वतःचें तोंड रंगवून अवतीर्ण होण्याचें काम कदाचित् मी पुष्कळ वर्षें केलें असतें. आणि कुणी सांगावें, आज कदाचित् नट म्हणूनच ह्या संमेलनाचा अध्यक्ष होण्याचें भाग्यहि मला लाभूं शकलें असतें. बालपणांत नाटकांची आवड माझ्या मनामध्ये खोल रुजविण्यास माझे सासवड येथील एक शिक्षक कारणीभूत झाले. पुण्याच्या ' सोशल क्लब 'चे एक प्रमुख सभासद आणि ' सार्वजनिक काकां 'चे पुतणे कै. रावसाहेब जोशी हे ते होत.

* * *

रावसाहेब जोशी ह्यांना नाटकाबद्दल विलक्षण वेड होतें असें म्हटलें तरी चालेल. ह्यांनीं आम्हांला अभिनयाचें शिक्षण देऊन नाटकांत प्रत्यक्ष काम करण्याला प्रथम उत्तेजन दिलें. आणि त्यांच्यामुळेंच ' सोशल क्लब 'च्या उत्कृष्ट नटमंडळीची व त्यांनीं केलेल्या उत्तमोत्तम नाटकांची ओळख करून घेण्याची मला संधि मिळाली. त्यानंतर नाट्यविषयक स्फूर्ति मला ज्यांच्याकडून मिळाली तेहि माझे शाळेमधील शिक्षकच होते. ते म्हणजे ' पानपतचा मुकाबला ', ' राणा भीमदेव ', ' पन्ना ' इत्यादि सुप्रसिद्ध ऐतिहासिक नाटकांचे कर्ते कै. वासुदेव रंगनाथ शिरवळकर हे होत. शिरवळकर आम्हांला कोणता विषय शिकवीत होते हें आतां मला आठवत नाहीं. कारण अभ्यासाच्या विषयाऐवजीं आम्ही त्यांना त्यांच्या नाटकाबद्दलच अधिक बोलावयाला भाग पाडीत असू. ' पानपतचा मुकाबला ' किंवा ' राणा भीमदेव ' ह्या दोन नाटकांतील तीं भयंकर वीरश्रीचीं आत्मगत भाषणें, भसाड्या आवाजांत डुरकाळ्या मारीत ओरडत सुटणें, हा त्या वेळचा फावल्या वेळेचा माझा उद्योग होता. " हे स्वर्गस्थ पितरांनो " हें राणा भीमदेवाचें भाषण एक आचारी म्हणतो आहे, असें त्याचें विडंबन करून आणि तें त्या वेळी एका संमेलनांत म्हणून दाखवून मी खूपच हंशा पिकवला होता, असें मला अजूनहि आठवतें. शाळेंतील अभ्यासक्रम संपतांसंपतां माझा कै. राम गणेश

गडकरी ह्यांच्याशीं परिचय झाला. त्यांच्या मार्गदर्शनामुळें पाश्चात्य नाटकें वाचावयास मी शिकलों; कोल्हटकरांनीं मराठी रंगभूमीवर सुरू केलेल्या सांप्रदायाशीं समरस होऊन मी त्यांच्या नाटकांचा अभ्यास करूं लागलों. गडकऱ्यांनीं दिलेल्या स्फूर्तीमुळें रंगभूमीकडे आणि नाटकाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोण आमूलाग्र बदलला आणि नाट्यलेखन करण्याची इच्छा माझ्या मनामध्यें जागृत झाली. नाटक कंपनीच्या फिरत्या आणि बकाली वातावरणांत गडकरी ह्यांचा आयुष्यक्रम प्रत्यक्ष गेला असल्यानें रंगभूमीच्या अंतःपुरांतील सर्व रहस्यें त्यांना अवगत झालेलीं होतीं. त्यांच्या नाट्यविषयक व्यासंगाला नि अभ्यासाला ह्या 'उडाणटप्पू अनुभवाची' विलक्षण जोड मिळाल्यामुळें रंगभूमीवरील प्रयोगाच्या यशस्वितेच्या दृष्टीनें नाट्यलेखन कसें करावें ही अंतर्भेदी दृष्टि गडकऱ्यांना प्राप्त झालेली होती. गडकऱ्यांचा प्रत्यक्ष सहवास मला लाभला नसता तर त्यांच्या प्रभावी लेखन-तंत्राची ओळख होण्याची मला संधि मिळाली नसती. मराठी रंगभूमीबद्दल मनांत बलवत्तर आवड उत्पन्न करण्यास जसे गुरुवर्य कै. जोशी व कै. शिरवळकर हे कारणीभूत झाले, तसें नाट्यलेखन करण्याची स्फूर्ति मला गुरुवर्य कै. गडकरी ह्यांच्यापासून मिळाली. म्हणून ह्या गुरुत्रयीनें मजवर केलेल्या उपकारांची आठवण आज ह्या प्रसंगीं होऊन त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या 'कृतज्ञतेचे अश्रू' साहजिकच माझ्या डोळ्यांत प्रकट होत आहेत.

* * *

आज ह्या घटकेला जगाच्या रंगभूमीवर महायुद्धाचा भीषण नाट्य-प्रयोग चाललेला आहे. इतकें भयंकर वास्तववादी नाटक आजपर्यंत क्वचित्च कोणीं करून दाखविलेलें असेल. ह्या नाट्यप्रयोगांतील सर्व पात्रें रक्ताच्या रंगानें आपाद रंगलेलीं आहेत. तीन चतुर्थांश जग ह्या नाटकांत प्रत्यक्ष भूमिका करण्यांत गुंतलेलें आहे. आपण हिंदुस्थानांतील लोक सुदैवानें ह्या क्षणापर्यंत तरी प्रेक्षकांची भूमिका करीत आहोंत. अर्थात् घरांतल्या घरांत खुर्चीवर आरामशीरपणें बसून युद्धाचें हें रम्य नाटक एक आणा खर्च करून (म्हणजे एक आण्याचें वर्तमानपत्र वाचून) पाहात बसलेल्या आपणा प्रेक्ष-कांची युद्धाच्या रंगभूमीवर केव्हां हकालपट्टी होईल हें सांगतां येत नाही.

तथापि आज ना उद्यां तुम्हांआम्हां सर्वांकडे ही कामगिरी येणार आहे हें सांगावयाला कोणत्याहि ज्योतिषाची जरूरी नाहीं. एका महत्त्वाकांक्षी राक्षसाच्या अमानुष क्रूरतेमुळें 'राक्षसी महत्त्वाकांक्षें'त झालेल्या खुनाच्या लक्षावधिपट प्राणहानि जगांत ह्या क्षणाला होत असतांना, स्थितप्रज्ञ वृत्ति धारण करून, नाताळाच्या सुटींत आपण नाट्यसंमेलनाचा उत्सव शांतपणें साजरा करीत बसावें ही गोष्ट सकृद्दर्शनीं कोणाला अमानुष वाटण्याचा संभव आहे. किंबहुना रोमला आग लागली असतांना सारंगी वाजवीत बसणाऱ्या नेरो राजाप्रमाणें 'काळीज' नांवाचा एक शरीरांतील महत्त्वाचा भाग तुम्हां आम्हांला नसल्याचा आरोपहि कोणीं केल्यास मला आश्चर्य वाटणार नाहीं. महायुद्धाचा वणवा जगभर पेटला असतांना, आम्ही करमणुकीच्या शास्त्राची चर्चा करावयाला उजळ माथ्यांनीं येथें जमलों आहोंत, हें आमच्या अमानुषतेचें किंवा अदूरदृष्टि मूर्खपणाचें गमक नाहीं. पण जर्मन विमानें आभाळांत घिरट्या घालीत असतांना आणि प्रत्येक क्षणीं बॉंबचा वर्षाव वरून होण्याची भीति असतांनाहि इंग्लंडमधील शूर लोक क्रिकेटचा खेळ खेळत किंवा पाहात असल्याचें वृत्त आमच्या कानांवर आलें आहे. त्याच शूर लोकांचे तेजस्वी अनुकरण आम्ही महाराष्ट्रांतले मर्द लोक ह्या ठिकाणीं करीत आहोंत, एवढें सांगितलें म्हणजे ह्या बाबतींत अधिक खुलासा करण्याची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं.

* * *

महाराष्ट्र नाट्यसंमेलन येथें भरविण्याऱ्या तुम्हां आम्हां लोकांकडे उपहासानें पाहण्याची दुसरी एक दृष्टि आहे. ह्या दृष्टीनें लोक आपणांला असें विचारतील कीं, ज्या महाराष्ट्र नाट्याचा 'उरूस' तुम्ही आज येथें उत्साहानें भरवीत आहांत, तें 'महाराष्ट्र नाट्य' आज जिवंत आहे काय? महाराष्ट्रांत आज किती नाटक मंडळ्या उरलेल्या आहेत? जेथें नाट्यप्रयोग करतां येतील अशीं कितीशीं नाटकगृहें महाराष्ट्रांत आज शिल्लक आहेत? कोणकोणते प्रथितयश नट किंवा नाटककार आज पूर्वीच्या उत्साहानें वा प्रभावानें मराठी रंगभूमीची सेवा करीत आहेत, किंवा कोणते नवनवीन नट, नाटककार आज मराठी रंगभूमीवर आपल्या सामर्थ्यानें उदयाला येत आहेत? ह्यापैकीं एकाहि प्रश्नाला समाधानकारक उत्तर देतां यावयाचें

नाहीं, अशी परिस्थिति असतांना महाराष्ट्र नाट्यसंमेलन भरविण्याची आज आवश्यकता काय? मराठी रंगभूमीचा एकहि घटक सध्यां शाबूत किंवा धड अवस्थेंत शिल्लक राहिला नसतांना, संमेलन कशाचें भरवावयाचें? जें नाहींच त्याचें संमेलन कसें भरवतां येईल? 'पोलंडच्या पार्लमेंटची बैठक' भरविण्याइतकाच आपला प्रस्तुतचा हा उद्योग हास्यास्पद आहे असें वाटण्याचा संभव आहे. तथापि एकट्या महाराष्ट्रांतील लोकांना मराठी रंगभूमीच्या विपन्नावस्थेबद्दल रडत बसण्याचें कारण नाहीं. मराठी रंगभूमीवर आजकाल जें संकट आलेलें आहे तेंच संकट, ज्या पाश्चात्य देशांतलें नाटक श्रेष्ठ दर्जाला जाऊन पोहोंचलेलें होतें, त्या त्या देशांतील नाटकांवर नि रंगभूमीवर आलेलें आहे. उत्तम नाटकें, नाटककार, नट आणि नाट्यप्रयोग ह्यांचा तुटवडा सबंध जगांतच आज पडलेला आहे, हें कोणालाही मान्य करावें लागेल.

* * *

रंगभूमीचें सामर्थ्य आणि यश हें सर्वस्वीं उत्तम नाटककार आणि नट ह्यांच्यावर अवलंबून असतें. नाट्यकलेचा आजपर्यंतचा सर्व इतिहास लक्षांत घेतला तर आपणांला असें आढळून येईल कीं, उत्कृष्ट नाटककार किंवा जातिवंत नट हे 'जन्मावे' लागतात. आणि ह्या प्राण्यांची पैदास जगामध्यें आजपर्यंत सढळ हातांनीं कधींच झालेली नाहीं. शतकामध्यें एकादा दुसराच प्रतिभाशाली नाटककार वा नट जन्माला येतो व त्यांच्या लेखनाचा वा अभिनयाचा प्रकाश अनेक वर्षेपर्यंत मागें रेंगाळत राहतो. खुद्द इंग्रजी वाङमयांत शेक्सपिअरपासून तों बर्नार्ड शॉपर्यंतच्या चारपांचशें वर्षांपर्यंतच्या काळांत उत्तम नाटककार आणि नट कितीसे निर्माण झाले आहेत? शेक्सपिअरच्या नाटकांची आपल्या डोळ्यावरची निशा अद्यापिहि उतरलेली नाहीं! गॅरिक हा जणुं काय कालपरवा होऊन गेलेला नट आहे, अशा आविर्भावानें आपण त्याच्या अभिनयाचें पवाडे अद्यापिहि गात असतो. आणि गॅरिकनंतर इतकीं वर्षें लोटलीं तरी हेन्री आर्व्हिंग, हर्बर्ट ट्री, एलेन टेरी ह्या हाताच्या बोटांवर मोजतां येणाऱ्या नटनटींपेक्षां अधिक श्रेष्ठतेचे कोणते नट इंग्लंडमध्यें उत्पन्न होऊं शकले? नाटककारांच्या बाबतींतहि तीच अवस्था! शेक्सपिअरनंतर बेन जॉन्सन, गोल्डस्मिथ,

शेरिडन, जोन्स, ऑस्कर वाइल्ड, पिन्हेरो, शॉ, गॉल्सवर्दी, मोहॅम आणि कॉवर्ड एवढ्या दहा नाटककारांचीं नांवें घेतलीं कीं, तीनशें वर्षांचीं सबंध इंग्रजी नाट्य वाङ्मयाची क्रांति आणि इतिहास त्यामध्यें समाविष्ट झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. एवढें असूनहि इंग्लंड त्या मानानें अधिक भाग्यशाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. इतर देशाच्या वांट्याला त्या मानानें कितीसे नट आणि नाटककार आले आहेत? फरान्स म्हटला कीं, मोलीयर आणि ब्रियो ह्याच 'युगप्रवर्तक मूर्ति' डोळ्यांपुढें उभ्या राहतात! यूरोप म्हटला कीं, इप्ससेन, ब्यर्नसन, पिरॅन्डोलो, चेकोव्ह आणि अमेरिका म्हटली कीं, यूजेन, ऑनेल एवढेंच थोडकेसे नाटककार प्रामुख्यानें आठवतात! आणि खुद्द हिंदुस्थानाकडे नजर वळविली तर? बिचाऱ्या भरतमुनींनीं नाट्यशास्त्र लिहून इतकीं शतकें होऊन गेलीं तरी, अखिल भारतवर्षाला मोहिनी घालण्याचें सामर्थ्य ज्यांच्या प्रतिभेंत आढळून येईल, असे कितीसे नाटककार ह्या देशांत होऊन गेले बरें? कालिदास, भवभूति, भास आणि शूद्रक ह्यांच्यासाठीं चार बोटें खर्च केलीं तरी 'आंगठा' मोकळाच राहतो आहे! संस्कृत साहित्याची ही दशा मग देशी भाषेबद्दल तर बोलावयालाच नको! हिंदुस्थानांतील लोक प्राकृत भाषा बोलूं लागल्यापासून तों इंग्रजी अंमल सुरू होईपर्यंतच्या प्रदीर्घ काळांत, एकहि नाटककार, नाटक वा नट निर्माण झाल्याचा ऐतिहासिक पुरावा नाहीं. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचे झाल्यास गेल्या एक शतकाच्या रंगभूमीच्या इतिहासांत स्वतंत्र बुद्धीचे नाटककार किंवा नट किती होऊन गेले? किर्लोस्करांचें 'सौभद्र' हें एकच स्वतंत्र आणि पूर्ण नाटक तर देवलांचें 'शारदा' हें एकुलतें एकच स्वतंत्र असें नाटक! खाडीलकर, कोल्हटकर, गडकरी, वरेरकर ह्यांनींच काय ती पुष्कळशा स्वतंत्र प्रतिभेनें विपुल अशी नाट्यरचना केली! आणि त्यांच्याच कृतीमुळें मराठी भाषेंत ज्याला नाट्य-वाङ्मय म्हणतां येईल, असें संभावित स्वरूपाचें नाट्य–वाङ्मय निर्माण झालें.

* * *

आतां नटांबद्दल म्हणावयाचें झाल्यास गणपतराव जोशी आणि गणपतराव भागवत हे दोन गद्य नट आणि भाऊराव कोल्हटकर अन् बालगंधर्व हे दोन

संगीत नट ह्यांच्यावर मात करील असला एकहि नट गेल्या पन्नास वर्षांत निर्माण झालेला नाहीं. 'जगावें कां मरावें' हें गणपतराव जोशांचें स्वगत भाषण आणि भाऊराव कोल्हटकरांची खडी सुरेल तान, अद्यापहि आमच्या कानामध्यें घोळत आहे. एवंच, प्रतिभाशाली नट वा नाटककार जगामध्यें कोणत्याहि समाजांत किंवा वाङमयांत वैपुल्यानें निर्माण होत नाहींत, हा आजपर्यंतच्या इतिहासानें स्पष्टपणें दाखला दिलेला आहे. साधु, कवि, वीर, मुत्सद्दी, शास्त्रज्ञ ह्यांचा जन्म दर शतकामध्यें जितक्या मर्यादित प्रमाणानें होत असतो, तितक्याच नियमित संख्येनें जगांत नट आणि नाटककारहि निर्माण होत असतात. अर्थात् सामान्य नट आणि नाटककार ह्यांना हा नियम—किंवा तसें म्हटलें तर कोणताहि 'नियम' लागू नाहीं हें उघडच आहे. एक मोठा नट किंवा नाटककार होऊन गेला म्हणजे त्याच्या सावलींत पुष्कळसे बूद्रुक नट आणि नाट्यलेखक पुष्कळ काळपर्यंत निर्माण होत राहतात. पण अशा परप्रकाशी नि परावलंबी उत्पत्तीपासून नाट्यवाङमयाचें सामर्थ्य वाढण्याचा किंवा रंगभूमीच्या स्वरूपांत क्रांति होण्याचा सुतराम् संभव नसतो हें उघड आहे.

* * *

उत्तम नाटककार किंवा नट अमुकच एका शतकांत किंवा काळांत निर्माण होण्याला किंवा करण्याला कांहीं नियम नाहींत. हें सर्वसामान्य तत्त्व जर खरें तर, गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत रंगभूमीची हळुहळू पीछेहाट होत गेली ह्याला विशेष कारणें कोणतीं घडलीं असावीत, ह्याचा विचार करणें जरूर आहे. नाटक हा करमणुकीचा प्रकार सुसंस्कृत, बुद्धिमान आणि सुशिक्षित वर्गामध्यें आजपर्यंत प्रचलित होता. नाटकानें बुद्धिजीवी लोकांचेंच मनोविनोदन होतें ही गोष्ट खरी आहे. कोणत्याहि समाजांत बुद्धिजीवी आणि विद्यावान वर्ग हा मर्यादितच असतो. त्यामुळें नाटकांचें वर्चस्व हें केवळ ह्याच मर्यादित क्षेत्रापुरतें होतें. रंगभूमीबद्दल बहुजनसमाजाला तिच्या वैचित्र्यामुळें कुतूहल वाटत असले तरी रंगभूमीची हाक अडाणी आणि असंस्कृत जनतेच्या हृदयापर्यंत कधींच पोहोंचू शकली नाहीं. बहुजनसमाजामध्यें वावरणाऱ्या निरनिराळ्या सामान्य व्यक्तींचीं चित्रें, त्यांच्या धडपडी

नि चळवळी, त्यांचे स्वभाव, त्यांच्या आकांक्षा यांचीं चित्रें म्हणूनच नाटकामध्यें किंवा रंगभूमीवर होणाऱ्या नाट्यप्रयोगांत कधींच उमटूं शकलीं नाहींत. राजे लोकांचे पराक्रम, त्यांच्या लढाया, त्यांचे सद्‌गुण, राजपुत्र आणि राजकन्या ह्यांचे प्रणयप्रसंग आणि विलास, श्रीमंत आणि धनिक अशा वर्गामधील व्यक्तींचे कनक आणि कांता ह्यांच्या लाभासाठीं चाललेले प्रयत्न, तीं न मिळाल्यामुळें प्रक्षुब्ध झालेल्या त्यांच्या भावनांचे उद्रेक, त्यांच्या हातून घडलेले अत्याचार आणि प्राणघात हे सामान्यतः पूर्वीच्या नाटकांचे ठरलेले विषय असत. भरतमुनींच्या नाट्यशास्त्राप्रमाणें तर नायक आणि नायिका ह्या ब्राह्मण वा क्षत्रिय कुलोत्पन्न असाव्या लागत. केवळ मदन आणि रति ह्यांच्याशी सौंदर्यांत चढाओढ करण्याजोगें त्यांना स्वरूप असावें लागे. वर्णानें ही मंडळी तर एकदम 'गोरीपान' दिसावयाला हवीत. नाटकांतला गडी देखील जेथें गौरवर्ण असे, तेथें नायक-नायिकेबद्दल विचारावयाला नको. काळचा लोकांच्या नाटकांत ही स्थिति, मग गोऱ्या लोकांच्या नाटकाविषयीं काय बोलावें ? ऑथेल्लो हा एकच काळा कुळकुळीत अपवाद केवळ अपघातानें निर्माण झाला असेंच समजावयाला पाहिजे. नायक-नायिका हीं चौदा विद्या आणि चौसष्ट कला ह्यांमध्यें पारंगत असावयाला लागत. रंगभूमि म्हणजे सर्वगुणालंकार, श्रीमंत आणि सुस्वरूप माणसांची मिरासदारी म्हणून मानण्यांत येत होती. त्यामुळें सामान्य, गरीब, अनेक शारीरिक नि मानसिक दुर्गुण असलेल्या, पदोपदीं चुकणाऱ्या, सत्ताधाऱ्यांकडून नाडल्या गेलेल्या, अशा अडाणी बहुजनसमाजाला नाटकाविषयीं आणि रंगभूमिविषयीं आपलेपणा वाटणें शक्य नव्हतें.

* * *

बहुजनसमाजाचे करमणुकीचे मार्ग नि प्रकार अगदीं स्वतंत्र होते. अर्थात् नाटकाइतके ते सुसंस्कृत नि कलात्मक असणें शक्यच नव्हतें. सांघिक नृत्यें, संगीत जलसे, तमाशे, ललितें इत्यादि बहुजनसमाजाचे करमणुकीचे मार्ग सुप्रसिद्धच आहेत. तथापि नाटकाइतका प्रभावी, आकर्षक पण नाटकापेक्षां कमी खर्चाच्या अशा एकाद्या करमणुकीच्या प्रकाराची बहुजनसमाज मार्गप्रतिक्षा करीत बसलेला होता. वैज्ञानिक शोधामुळें आणि यंत्राच्या निर्मितीमुळें

समाजाचें जीवन कालांतरानें बदललें. मोठमोठे उद्योगधंदे सुरू झाले. उत्पादन करण्याचीं साधनें बदललीं. यंत्रप्रधान समाजव्यवस्था अस्तित्वांत आली. शिक्षणाचा प्रसार वाढला व ज्ञानाचें लोण बहुजनसमाजापर्यंत पोहोंचल्यानें ह्या समाजांत वैचारिक जागृति निर्माण झाली. न्यायाची, समतेची आणि स्वातंत्र्याची भाषा सुरू झाली. ज्या वर्गाच्या बाबतींत समाजानें आजपर्यंत अन्याय केलेला होता, त्या वर्गाला योग्य ते हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचें प्रयत्न सुरू झाले. गुलाम, स्त्रिया, मजूर, अस्पृश्य, अडाणी ह्यांच्या उद्धाराच्या चळवळी निघाल्या. त्यामुळें संस्कृतीच्या आणि संपत्तीच्या मिरासदारीवर जगणाऱ्या वतनदार वर्गाच्या जीवनाला धक्का बसला. त्यांचीं ध्येयें, त्यांचीं मूल्यें, त्यांचे संकेत, त्यांचें वाङ्मय आणि त्यांची कला आणि करमणूक त्यांना आमूलाग्र बदलणें भाग पडलें. केवळ यांत्रिक युगामुळें हें एवढें स्थित्यंतर घडून आलें आणि त्याचा परिणाम रंगभूमीवर आणि नाटकावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. जुन्या जगांतील सर्वच कलांना नव्या युगांतील यंत्राची ही उपाधि बाधल्याशिवाय राहिलेली नाहीं. मुद्रणकलेचा शोध लागल्यामुळें हस्तलेखनकला जवळजवळ नामशेष झाली. कापड तयार करण्याच्या गिरण्या सुरू झाल्यामुळें हातमाग जमीनदोस्त झाले व हातांनीं विणलेलीं सुंदर वस्त्रें दुर्मिळ झालीं. ग्रामोफोन, रेडिओ आणि सिनेमा ह्या करमणुकीच्या यांत्रिक कला निर्माण झाल्याबरोबर साहजिकच रंगभूमि मागें पडली. 'अधिकांचें अधिक सुख' हें यंत्रयुगाचें ध्येय असल्यानें, मानवी कौशल्यावर अवलंबून असलेल्या कांहीं कला ह्या युगांत मागें पडल्या, तरी बहुजनसमाजाला सुखी करणाऱ्या अनेक नवनवीन कला उदयाला आल्या, हा कांहीं कमी फायदा झाला नाहीं.

✻ ✻ ✻

पूर्वी करमणुकीची सर्व मिरासदारी एकट्या नाटकाकडेच होती. त्यामध्यें रेडिओ, ग्रामोफोन आणि बोलपट हे आतां नवीन हक्कदार निर्माण झाले. अर्थात् बोलपटांनीं इतर सर्वच करमणुकीच्या प्रकारावर मात केली. सर्व समाजाच्या जीवितावर जबरदस्त परिणाम करणारा बोलपटाएवढा 'प्रचंड शोध' गेल्या शतकांत दुसरा निघालेला नसेल. ह्याचें कारण

नि चळवळी, त्यांचे स्वभाव, त्यांच्या आकांक्षा यांचीं चित्रें म्हणूनच नाटकामध्यें किंवा रंगभूमीवर होणाऱ्या नाट्यप्रयोगांत कधींच उमटूं शकलीं नाहींत. राजे लोकांचे पराक्रम, त्यांच्या लढाया, त्यांचे सद्‌गुण, राजपुत्र आणि राजकन्या ह्यांचे प्रणयप्रसंग आणि विलास, श्रीमंत आणि धनिक अशा वर्गामधील व्यक्तींचे कनक आणि कांता ह्यांच्या लाभासाठीं चाललेले प्रयत्न, तीं न मिळाल्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या त्यांच्या भावनांचे उद्रेक, त्यांच्या हातून घडलेले अत्याचार आणि प्राणघात हे सामान्यतः पूर्वींच्या नाटकांचे ठरलेले विषय असत. भरतमुनींच्या नाट्यशास्त्राप्रमाणें तर नायक आणि नायिका ह्या ब्राह्मण वा क्षत्रिय कुलोत्पन्न असाव्या लागत. केवळ मदन आणि रति ह्यांच्याशीं सौंदर्यांत चढाओढ करण्याजोगें त्यांना स्वरूप असावें लागे. वर्णानें ही मंडळी तर एकदम 'गोरोपान' दिसावयाला हवीत. नाटकांतला गडी देखील जेथें गौरवर्ण असे, तेथें नायक-नायिकेबद्दल विचारावयाला नको. काळ्या लोकांच्या नाटकांत ही स्थिति, मग गोऱ्या लोकांच्या नाटकाविषयीं काय बोलावें? ऑथेल्लो हा एकच काळा कुळकुळीत अपवाद केवळ अपघातानें निर्माण झाला असेंच समजावयाला पाहिजे. नायक-नायिका हीं चौदा विद्या आणि चौसष्ट कला ह्यांमध्यें पारंगत असावयाला लागत. रंगभूमि म्हणजे सर्वगुणालंकार, श्रीमंत आणि सुस्वरूप माणसांची मिरासदारी म्हणून मानण्यांत येत होती. त्यामुळें सामान्य, गरीब, अनेक शारीरिक नि मानसिक दुर्गुण असलेल्या, पदोपदीं चुकणाऱ्या, सत्ताधाऱ्यांकडून नाडल्या गेलेल्या, अशा अडाणी बहुजनसमाजाला नाटकाविषयीं आणि रंगभूमिविषयीं आपलेपणा वाटणें शक्य नव्हतें.

* * *

बहुजनसमाजाचे करमणुकीचे मार्ग नि प्रकार अगदीं स्वतंत्र होते. अर्थात् नाटकाइतके ते सुसंस्कृत नि कलात्मक असणें शक्यच नव्हतें. सांघिक नृत्यें, संगीत जलसे, तमाशे, लळितें इत्यादि बहुजनसमाजाचे करमणुकीचे मार्ग सुप्रसिद्धच आहेत. तथापि नाटकाइतका प्रभावी, आकर्षक पण नाटकापेक्षां कमी खर्चाच्या अशा एकाद्या करमणुकीच्या प्रकाराची बहुजनसमाज मार्गप्रतिक्षा करीत बसलेला होता. वैज्ञानिक शोधामुळें आणि यंत्राच्या निर्मितीमुळें

समाजाचें जीवन कालांतरानें बदललें. मोठमोठे उद्योगधंदे सुरू झाले. उत्पादन करण्याचीं साधनें बदललीं. यंत्रप्रधान समाजव्यवस्था अस्तित्वांत आली. शिक्षणाचा प्रसार वाढला व ज्ञानाचें लोण बहुजनसमाजापर्यंत पोहोंचल्यानें ह्या समाजांत वैचारिक जागृति निर्माण झाली. न्यायाची, समतेची आणि स्वातंत्र्याची भाषा सुरू झाली. ज्या वर्गाच्या बाबतींत समाजानें आजपर्यंत अन्याय केलेला होता, त्या वर्गाला योग्य ते हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचें प्रयत्न सुरू झाले . गुलाम, स्त्रिया, मजूर, अस्पृश्य, अडाणी ह्यांच्या उद्धाराच्या चळवळी निघाल्या. त्यामुळें संस्कृतीच्या आणि संपत्तीच्या मिरासदारीवर जगणाऱ्या वतनदार वर्गाच्या जीवनाला धक्का बसला. त्यांचीं ध्येयें, त्यांचीं मूल्यें, त्यांचे संकेत, त्यांचें वाङ्मय आणि त्यांची कला आणि करमणूक त्यांना आमूलाग्र बदलणें भाग पडलें. केवळ यांत्रिक युगामुळें हें एवढें स्थित्यंतर घडून आलें आणि त्याचा परिणाम रंगभूमीवर आणि नाटकावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. जुन्या जगांतील सर्वच कलांना नव्या युगांतील यंत्राची ही उपाधि बाधल्याशिवाय राहिलेली नाहीं. मुद्रणकलेचा शोध लागल्यामुळें हस्तलेखनकला जवळजवळ नामशेष झाली. कापड तयार करण्याच्या गिरण्या सुरू झाल्यामुळें हातमाग जमीन-दोस्त झाले व हातांनीं विणलेलीं सुंदर वस्त्रें दुर्मिळ झालीं. ग्रामोफोन, रेडिओ आणि सिनेमा ह्या करमणुकीच्या यांत्रिक कला निर्माण झाल्याबरोबर साहजिकच रंगभूमि मागें पडली. 'अधिकांचें अधिक सुख' हें यंत्रयुगाचें ध्येय असल्यानें, मानवी कौशल्यावर अवलंबून असलेल्या कांहीं कला ह्या युगांत मागें पडल्या, तरी बहुजनसमाजाला सुखी करणाऱ्या अनेक नवनवीन कला उदयाला आल्या, हा कांहीं कमी फायदा झाला नाहीं.

पूर्वीं करमणुकीची सर्व मिरासदारी एकट्या नाटकाकडेच होती. त्यामध्यें रेडिओ, ग्रामोफोन आणि बोलपट हे आतां नवीन हक्कदार निर्माण झाले. अर्थात् बोलपटांनीं इतर सर्वच करमणुकीच्या प्रकारावर मात केली. सर्व समाजाच्या जीवितावर जबरदस्त परिणाम करणारा बोलपटाएवढा 'प्रचंड शोध' गेल्या शतकांत दुसरा निघालेला नसेल. ह्याचें कारण

बोलपटाची कला ही नाट्य, चित्र, लेखन, संगीत, शिल्प, छाया-चित्रण, ध्वनिमुद्रण इत्यादि सर्व नव्याजुन्या कलांच्या संमिश्रणावर उभारलेली असल्यानें, त्या सर्व कलांमधील आनंद एकाच वेळीं आणि एकाच ठिकाणीं अनुभवायला प्रेक्षकांना मिळत असल्यानें, ही कला इतर सर्व कलांपेक्षां जास्त प्रभावी आणि आकर्षक झालेली आहे. आणि एवढें असून कलेच्या आनंदाचा आस्वाद गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत, अडाण्यापासून पंडितापर्यंत, आणि मुलापासून मोठ्यापर्यंत, सर्वांना अत्यंत थोड्या अशा खर्चांत मिळूं शकतो म्हणून बोलपटाचा पगडा बहुजनसमाजाच्या मनावर तावडतोब बसला. जोंपर्यंत चित्रपट 'मुके' होते तोंपर्यंत नाटकाशीं ते स्पर्धा करूं शकले नाहींत. पण त्यांना 'वाचा' फुटून पुरतीं बारा वर्षें झालीं नाहींत, तोंच दोन हजार वर्षांचें आयुष्य असलेल्या रंगभूमीचें व्यासपीठ ह्या 'बोलक्या बाळानें' डळमळावयाला लाविलें. रंगभूमि आणि नाट्यकला आतां सर्वस्वीं नाहींशी होतात किंवा काय, अशा तऱ्हेचें संशयग्रस्त आणि भीतिग्रस्त वातावरण बोलपटांनीं खचित निर्माण केलेलें आहे. रंगभूमीला स्वाहा करण्याचें सामर्थ्य किंवा आकांक्षा रुपेरी पड्याची नाहीं. पण रुपेरी पड्याच्या प्रचंड लोकप्रियतेमुळें आणि त्याच्या झगझगाटामुळें डोळे दिपून जाऊन, रंगभूमीला क्षणैक मूर्च्छा मात्र सध्यां खास आलेली आहे ह्यांत शंका नाहीं.

* * *

मराठी रंगभूमीला पुढील वर्षीं शंभर वर्षें पूर्ण होण्याआधींच दहा पांच वर्षें तिची 'शंभर वर्षें' भरल्यासारखीं व्हावींत ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. मराठी रंगभूमीची तेजस्वी सेवा करणाऱ्या शाहू नगरवासी, महाराष्ट्र चित्ताकर्षक, भारत ह्या नाटकमंडळ्या आतां कोठें आहेत बरें? संगीताचें 'नवयुग' निर्माण करणाऱ्या किर्लोस्कर, ललितकला आणि गंधर्व नाटक मंडळ्यांचें आतां काय झालें असेल बरें? गंधर्व मंडळी अद्यापि कोठें तरी आहे म्हणतात! तिचा मुद्दाम शोध केल्याशिवाय पत्ता लागणें मुष्कील आहे, अशी दारुण परिस्थिति येऊन ठेपलेली आहे. तुम्ही आम्ही गणपत-राव जोशांचीं तीं हॅम्लेट, तुकाराम नाटकें पाहिलेलीं आहेत!' हें चित्र पहा आणि तें चित्र पहा असें आपल्या आईला रुद्ध कंठानें म्हणणाऱ्या

हॅम्लेटचा तो आवाज अद्यापिहि तुमच्या आमच्या शरीरावरील रोमन्‌रोम जागा करीत आहे. गणपतराव भागवतांची ती कीचकाची पिळदार भूमिका अद्यापिहि तुमच्या आमच्या डोळ्यासमोरून नाहींशी झालेली नाहीं! 'देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरें प्रायश्चित्तच नाहीं!' ही त्र्यंबकराव प्रधानांची 'भाऊबंदकी' मधील गंभीर गर्जना अद्यापि आमच्या अंतःकरणामध्यें निनादत आहे! "बाईसाहेब हा नाना इतका कृतघ्न आहे असें तुम्हांला वाटतें तरी कसें?" हें 'तोतयाच्या बंडांतील' नानबा गोखले ह्यांचें भाषण आठवतांच अजूनहि डोळ्यांमधें अश्रू उभे राहतात! 'मीं त्यांना पाहिलं, मीं त्यांना पाहिलं!' अशा नाजुक नि लाजऱ्या शृंगारानें रंगभूमीवर नाचणारी बालगंधर्वांची ती लाडकी लावण्यमूर्ति अजूनहि आम्ही मनाच्या मंहिरापीमध्यें टांगून ठेविलेली आहे!' "ही श्रावणशेटाची चिठी माझ्या बायकोकडे कां?" हें फाल्गुनरावाचें स्वगत भाषण म्हणतांना गणपतराव बोडसांचा तो विशिष्ट आवाज आणि अभिनय आम्ही अजूनहि विसरूं शकत नाहीं! महाराष्ट्र नाटक मंडळीमधील टिपणीस बंधू, केशवराव दाते, 'बळवंत मंडळी'चे चितामणराव कोल्हटकर आणि कामण्णा ह्यांनीं मराठी रंगभूमीवर अमर करून ठेवलेल्या भूमिका अद्यापिहि आमच्या स्मृतिपटलामधून नाहींशा झालेल्या नाहींत. मराठी रंगभूमीचें हें 'बादशाही वैभव' तुम्ही आम्ही डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे असें वाटतें. किर्लोस्कर नाटक मंडळीचा तो संस्थानी रुबाब, शंकरराव मुजुमदारांचा तो दरारा, गंधर्व मंडळीचा मखमालीचा भव्य पडदा, त्या सारंग्या, बालगंधर्वांच्या अंगाला फासलेल्या अत्तराचा पहिल्या दोन रांगांमधून दरवळणारा तो घमघमाट, खाडिलकरांच्या नाटकाचे ते वैभवशाली पहिले प्रयोग, विद्युल्लतेच्या लोळाप्रमाणें प्रेक्षकांना क्षणांत दिपवून टाकणारा केशवराव भोसल्यांच्या संगीताचा तो विलक्षण झपाटा, महाराष्ट्र नाटक मंडळीच्या नटांच्या त्या विचित्र स्वरांच्या वीरश्रीयुक्त गर्जना, किंबहुना तीनचार तपेंपर्यंत अखिल महाराष्ट्राला रंगभूमीवरील ज्या ज्या व्यक्तींनीं आणि ज्या ज्या गोष्टींनीं वेड लावलेलें होतें, त्या त्या सर्व व्यक्ति आणि सर्व गोष्टी तुमच्या आमच्या स्मरणांत अगदीं ताज्या आहेत. असें असतां मराठी रंगभूमीचें हें वैभव नाहींसें होऊन तिला अचानक दारिद्र्याची अवकळा प्राप्त व्हावी ही अत्यंत

दुःखाची गोष्ट आहे. काल स्वतंत्र असलेलें राष्ट्र आज गुलाम व्हावें हा देखावा जसा चालू युद्धांत पाहावयास मिळत आहे, तद्वत काल वैभवाच्या शिखरावर चढू पाहणारी मराठी रंगभूमि आज विपन्नावस्थेमध्यें कसाबसा काळ कंठीत असल्याचें दृश्य पाहण्याची तुमच्या आमच्यावर पाळी आलेली आहे.

मराठी रंगभूमीच्या जन्मापासून तिची एकसारखी झालेली वाढ आणि प्रगति लक्षांत घेतली असतां ह्या तात्कालिक संकटानें वास्तविक निराश होण्याचें किंवा भिऊन जाण्याचें कांहींच कारण नाहीं. ह्या देशांतील इतर प्रांतांतील देशी भाषांच्या साहित्यामधील नाट्यवाङ्मयाशीं तुलना करतां मराठी नाट्यवाङ्मय हें त्यांच्यापेक्षां किती तरी पटीनें सुसंपन्न आहे हें लक्षांत येईल. गुजराथी, तामीळ आणि कानडी भाषेंतील नाट्यवाङ्मय आणि रंगभूमि अद्यापिहि मागासलेल्या अवस्थेमध्येंच रेंगाळत आहे. उर्दू रंगभूमीनें कावसजी खटाव, बेंजामिनसारखे उत्कृष्ट नट निर्माण करून, आपल्या झगझगाटानें, सीनसीनरीनें आणि संगीतानें कांहीं काळ मराठी रंगभूमीला दिपविलें असलें आणि मराठी नाट्यवाङ्मयावर एका वेळेस परिणाम केलेला असला तरी, त्या अवस्थेमधून मराठी रंगभूमि आतां केव्हांच बाहेर पडलेली आहे. बंगाली भाषेंत उत्तम नाटकें आणि नट ह्यांची अधूनमधून निपज होत असली तरी, बंगाली लोकांच्या काव्यमय आणि स्वप्नाळू स्वभावामुळें सामाजिक जीवनाशी बंगाली नाटककार मराठी नाटककाराइतके समरस न होऊं शकल्यानें, त्यांची नाटकें कांहींशा अद्भुतरम्यतेच्या अवस्थेमध्येंच अद्यापिही घोटाळत आहेत. पाश्चात्य रंगभूमीचा, नाट्यवाङ्मयाचा आणि नाट्यतंत्राचा मराठी रंगभूमीवर आणि नाटकावर जितका परिणाम झाला, तितका तो इतर प्रांतांमध्यें झाला नाहीं, म्हणून त्या त्या प्रांतांतील नाटकांमध्यें मराठी नाटकाइतके आधुनिकत्व नि वास्तवता अद्यापिहि आलेली दिसत नाहीं.

संस्कृत भाषा ही मराठी भाषेची जननी असली आणि ह्या देशात इंग्रजांची सद्दी सुरू होण्यापूर्वी येथील विद्वान् पंडितांना नाट्यशास्त्राची नि शाकुंतल, मृच्छकटिक नाटकांची माहिती असली तरी, देशी भाषेंत नाटकें लिहिण्याची

वा तीं करून दाखविण्याची बुद्धि, आमच्यामधील लेखकांना वर्षांनुवर्षे कधींहि झाली नाहीं हें आश्चर्यच नव्हे काय? शाहीर, गोंधळी लोक पोवाडे म्हणून दाखवीत. लावण्या, छकडी गाऊन आणि नाच्या पोरांना आणि सोंगाड्यांना नाचवून तमासगीर लोक तमाशे करीत. बहुरूपी लोक स्त्रियांचीं आणि इतर सोंगें घेऊन दारोदार हिंडून लोकांची करमणूक करीत. अशी तोंपर्यंत महाराष्ट्रांत परिस्थिति होती. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी मुंबई येथें ललितें करण्याची सुरुवात झाली. ह्या ललितांचें थोड्या फार अंशानें नाटकांशीं साम्य असे. ह्या ललितांत भालदार, चोपदार, ह्यांची सोंगें, एकाद्या भटजीबुवांची विनोदी नक्कल आणि दशावताराचीं वीरश्रीपूर्ण वर्णनें करून दाखविण्यांत येत असत. पुष्कळदां ह्या ललितांत मराठीपेक्षां हिंदीच भाषा वापरण्यांत येत असे. त्या वेळच्या स्त्रीपुरुषांना हीं ललितें अतिशय आवडत. ललितांच्या लोकप्रियतेची ही लाट एकोणिसाव्या शतकामध्यें पुणें, बडोदा आणि महाराष्ट्रांतील इतर शहरें ह्यामध्यें एकसारखी पसरतच गेली. माझ्या लहानपणीं देवादिकांच्या वार्षिक उत्सवप्रसंगीं अशा तऱ्हेचीं ललितें करून दाखविलेलीं मी स्वतः पाहिलेलीं आहेत. तथापि मराठी नाटकाला प्रत्यक्ष अशी सुरुवात सन १८४३ सालीं सांगली येथें श्री. विष्णुदास भावे ह्यांनीं केली. सांगलीकरांच्या आज्ञेवरून एका कानडी नाटकाच्या धर्तीवर 'सीता स्वयंवर' हें आख्यान भावे ह्यांनीं नाटकाच्या स्वरूपांत लिहून तें प्रयोगरूपानेंहि करून दाखविलें. म्हणून *विष्णुदास भावे हे मराठी नाटकांचे आणि रंगभूमीचे आद्यजनक, सांगली ही महाराष्ट्रीय नाट्यकलेची गंगोत्री, आणि १८४३ हें वर्ष मराठी रंगभूमीच्या प्राणप्रतिष्ठेचें वर्ष, म्हणून समजावयाला आपणास हरकत नाहीं.* १८४३ सालापासून तों १८८० सालापर्यंतच्या सदतीस वर्षांच्या काळामध्ये विशेष असें कांहीं घडलें नाहीं. तरी मराठी रंगभूमीची एकसारखी सिद्धता होत होती. भावे ह्यांच्या मागोमाग पौराणिक नाटकें आणि आख्यानें करून दाखविणाऱ्या किती तरी नाटक मंडळ्या स्थापन झाल्या. १८५६ सालीं मुंबई विश्वविद्यालय स्थापन झाल्यानंतर संस्कृत आणि इंग्रजी नाटकांचा कॉलेजांमधून अभ्यास सुरू झाला; त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणूनच कीं काय, सन १८६० ते १८७५ पर्यंत मराठी भाषेंत वेणीसंहार, उत्तर रामचरित्रादि सुप्रसिद्ध

संस्कृत नाटकांचीं आणि शेक्सपिअरच्या कांहीं उत्तमोत्तम नाटकांचीं, त्या वेळच्या विद्वान् पंडितांनीं मराठींत भाषांतरें केलीं. एवढेंच नव्हे तर, कॉलेज-मधील प्रौढ विद्यार्थ्यांनीं ह्या नाटकाचे प्रयोगहि करून दाखविण्यास सुरुवात केली. विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं आणि प्राध्यापकांनीं मराठी रंग-भूमीची प्रतिष्ठापना करण्याच्या कामीं त्यावेळीं प्रामुख्यानें भाग घेतला होता, ही गोष्ट आजच्या विश्वविद्यालयीन मंडळींनीं विशेष लक्षांत घेण्यासारखीं आहे. आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रो. केरूनाना छत्रे, प्रो. वासुदेवराव केळकर या मंडळींनीं ह्या कामीं विशेष पुढाकार घेतला होता. म्हणूनच सुशिक्षित व सभ्य महाराष्ट्रीय समाजांत नाटकें पाहण्याची आवड निर्माण झाली.

तथापि मराठी रंगभूमीला स्वतंत्र, पण स्पष्ट आणि लोकप्रिय स्वरूप प्राप्त करून देणारी विभूति १८८० मध्यें अवतीर्ण झाली. ती विभूति म्हणजे सुप्रसिद्ध नट आणि नाटककार कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ही होय. शाकुंतल आणि सौभद्र हीं संगीत नाटकें लिहून, सदतीस वर्षें असहायपणें रांगणाऱ्या मराठी रंगभूमीला अण्णासाहेबांनीं तिच्या पायावर उभें केलें व तिला चाला-वयाला शिकविलें. ‘ सौभद्र ’ हें त्यांचे पहिलें स्वतंत्र नाटक किती प्रभावशाली आहे हें सांगावयाला नको. वाटेल त्या नटांनीं आणि नाटकमंडळ्यांनीं गेलीं पन्नास वर्षें ह्या नाटकाच्या ‘ हालअपेष्टा ’ केल्या असल्या, तरी ह्या नाटकाची गोडी अद्यापि यत्किंचितहि कमी झाली नाहीं. ‘ सौभद्र ’ नाटकानें केवळ सगीतच नव्हे तर, एकंदर मराठी नाटकांचा पाया घातला. ह्या नाटकांतील संवाद, संगीत, आणि कथारचना ह्यांची त्यानंतर निर्माण झालेल्या बहुतेक सर्व मराठी नाटकांवर छाया पडलेली आहे असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. अण्णासाहेबांची परंपरा त्यांचे शिष्य गोविंद-रावजी देवल ह्यांनीं पुढें चालविली. देवल ह्यांचीं बहुतेक सर्व नाटकें भाषांतरित असलीं तरी, त्यांच्या बाळबोध भाषेमुळें आणि रसाळ पद्यरचने-मुळें मराठी रंगभूमीला फारच सोज्वळ असें स्वरूप प्राप्त झालें. ‘ शारदा ’ हें एकच स्वतंत्र सामाजिक नाटक लिहून, देवल ह्यांनीं वास्तववादी नाटकांची मराठी रंगभूमीवर मुहूर्तमेढ रोवली. ‘ शारदा ’ नाटकानें त्या वेळच्या समाजावर जेवढा परिणाम केला त्याच्या एकशतांशहि परिणाम ‘ शारदा ’

नामक विवाहविषयक सरकारी कायद्यानें केलेला नाहीं. ' सौभद्रा 'प्रमाणेंच ' शारदा ' हें नाटकहि मराठी रंगभूमीवरील एक अमर नाटक आहे. शारदा नाटकाइतकी गोड आणि सोपीं पदें अद्यापपर्यंत एकाहि नाटककारानें रचिलेलीं नाहींत. ' फाल्गुनराव ' किंवा ' संशयकल्लोळ ' हें त्यांचें नाटक भाषांतरित असलें तरी, तें लिहून, देवल ह्यांनीं हास्य-प्रधान नाटकाचें नवें दालन खुलें केलें. ही मराठी रंगभूमीची त्यांनीं केलेली सेवा विसरतां येण्यासारखी नाहीं. नाटककार ह्या नात्यापेक्षां नट ह्या नात्यानें देवल ह्यांनीं जी कामगिरी केली आहे, त्याची दाद मराठी रंगभूमीच्या इतिहासकारांनीं अद्यापर्यंत घेतली असल्याचें मला आढळलेलें नाहीं. देवल हे स्वतः उत्तम नट असून नवीन नटांना अभिनयाचें शिक्षण देण्याचे कामीं त्यांचा हातखंडा असे. मराठी रंगभूमीवरील कित्येक नामांकित नट हे देवल मास्तरांच्या तालमींत तयार झालेले होते.

卐 卐 卐

सन १८८० ते १९०० हे किर्लोस्कर-देवलांचें युग असें मानलें तर १९०० ते १९२० हे खाडिलकर-कोल्हटकर ह्यांचें युग होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. विश्वविद्यालयांत घडलेल्या शेक्सपिअरच्या अभ्यासाचा परिणाम ह्या दोन्हीहि तरुण पदवीधर नाटककारांवर झाला. तथापि खाडिलकर आणि कोल्हटकर ह्यांच्या सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोणांत स्वभावपरत्वें आणि परिस्थितिपरत्वें फारच मोठा भेद होता. खाडिलकर हे चिपळूणकर आणि टिळक ह्यांच्या राजकीय विचाराच्या आखाड्यांत तयार झालेले तर, कोल्हटकर हे लोकहितवादी आणि आगरकर ह्यांच्या भूतदया-वादी विचारावर वाढलेले ! हिंदुस्थानाला आधीं राजकीय सुधारणा पाहिजे अशा जहाल राजकारणाचे खाडिलकर हे पुरस्कर्ते तर, शिक्षणाच्या व काय-द्याच्या जोरावर समाजांतील अन्यायमूलक रूढीचा नायनाट करून समाज सुधारल्याशिवाय देशाचा खरा उद्धार होणार नाहीं, अशा मताचे कोल्हटकर होते. तसेंच स्वभावानें खाडिलकर जितके गंभीर आणि रुक्ष तितके कोल्हटकर हे विनोदी आणि रंगेल ! म्हणून एकाच शेक्सपिअरचा ह्या दोन नाटक-कारांच्या मनावर सकृद्दर्शनीं अगदीं विरोधी भासणारा असा परिणाम झाला. ऑथेल्लो, मॅकबेथ ह्या गंभीर ऐतिहासिक नाटकांचा, त्या नाटकांतील विशिष्ट

स्वभावाच्या पात्रांचा आणि घटनेचा खाडिलकरांच्या लेखनावर किती परिणाम झाला आहे हें त्यांचीं 'सवाई माधवरावांचा मृत्यु,' 'कीचक वध' आणि 'भाऊबंदकी हीं नाटकें वाचलीं म्हणजे कळून येईल. त्यांच्याविरुद्ध 'मर्चंट ऑफ व्हेनिस,' 'कॉमेडी ऑफ एरर्स' अशा तऱ्हेचीं चमत्कृतिप्रधान, गुंतागुंतीचीं कथानकें असलेल्या विनोदी आणि आनंदपर्यवसायी नाटकांना आदर्श मानून कोल्हटकरांनीं आपली नाट्यरचना केलेली आहे. पात्रांच्या स्वभावपरिपोषाकडे खाडिलकरांनीं जितकें लक्ष दिलें तितकें कोल्हटकरांनीं संविधानक–रचना–कौशल्यपूर्ण करण्याकडे दिलें. कोल्हटकर–खाडिलकरांचा काळ हा मराठी रंगभूमीच्या आणि नाट्याच्या विकासाचा आणि वैभवाचा काळ म्हटला पाहिजे. दोघांच्याहि नाटकांमुळें मराठी रंगभूमीवर उत्तमोत्तम नट निर्माण झाले. खाडिलकरांच्या नाटकांची बैठक सर्वस्वीं राजकीय असे. त्यांचें नाटक ऐतिहासिक असो वा पौराणिक असो, त्याचा संदर्भ देशाच्या चालू राजकीय परिस्थितीशीं जोडल्याशिवाय खाडिलकर कधींहि राहत नसत. टिळकांचें राष्ट्रीय राजकारण नाटकांच्याद्वारें समाजाच्या गळीं उतरविण्याचें अवघड कार्य खाडिलकरांनीं करून दाखविलें. कोल्हटकरांचीं पुष्कळशीं नाटकें बाह्यतः अद्भूतरम्य वाटलीं तरी, त्यांमध्यें सामाजिक सुधारणेच्या कल्पनांचीं बीजें सहेतुकपणें पेरलेलीं दिसून आल्याशिवाय राहणार नाहींत. आगरकरांच्या 'सुधारक' पत्राचें कार्य कोल्हटकरांच्या नाटकांनीं करून, त्या वेळच्या सनातनी आणि प्रतिगामी समाजाचा क्वचित् रोष पत्करला तरी, सामाजिक अन्यायाकडे सहानुभूतीच्या नजरेनें पाहण्यास समाजाला शिकविलें ह्यांत संशय नाहीं. समाजाच्या विचाराला चालना देण्यासाठीं ध्येयप्रधान व सहेतुक नाटकें लिहिण्याची परंपरा ह्या दोन प्रतिभाशाली नाटककारांनीं घालून मराठी रंगभूमीवर अलोट उपकार केलेले आहेत हें कोणालाहि मान्यच करावें लागेल.

✤ ✤ ✤

कोल्हटकरांना दोन बुद्धिमान् शिष्य मिळाले. एक गडकरी आणि दुसरे वरेरकर! गुरु हे स्वतः विश्वविद्यालयांत संपूर्ण शिक्षण घेतलेले असे पदवीधर तर, त्यांचे दोघेहि शिष्य बिनपदवीचे आणि अर्धवट शिक्षण घेतलेले होते. एक माजी शाळामास्तर तर दुसरे माजी पोष्टमास्तर. दोन्हीहि

पैशाच्या दृष्टीनें सारखेच दरिद्री. तथापि कोल्हटकरांच्या ह्या दोन्ही शिष्यांनीं गुरूची परंपरा कांकणभर अधिकच उज्ज्वलतेनें आणि जास्त धडाडीनें चालवून, ती गुरूंच्यापेक्षांहि समाजांत अधिक लोकप्रिय केली. गडकरी जरी १९१९ सालीं वारले तरी त्यांच्या मरणोत्तरच त्यांच्या काहीं नाटकांचे प्रयोग झाले व त्यांची लोकप्रियता वाढली. म्हणून १९२० ते १९३० हे गडकरी-वरेरकरांचें युग असें म्हणावयाला हरकत नाहीं. कोल्हटकरांच्य काव्याचें आणि विनोदाचें वरदान गडकऱ्यांना मिळालें तर, सामाजिक अन्यायाबद्दल त्यांना वाटणारी चीड आणि तळमळ वरेरकरांच्या वांटयाला आली. 'प्रेमसंन्यास' आणि 'एकच प्याला' ह्या दोन नाटकांतील विषय सामाजिक महत्त्वाचे असले तरी, गडकऱ्यांच्या प्रतिभेची बैठक ही कांहीं एकाद्या द्रष्टया समाजसुधारकाची खास नव्हती. सामाजिक परिस्थितीचें विश्लेषण सूक्ष्म दृष्टीनें करून, त्यांतील निष्कर्ष नेमका शोधून काढण्याइतका समाजशास्त्राचा गडकऱ्यांनीं अभ्यास केलेला नव्हता व त्या भेदक दृष्टीनें समाजामध्यें ते कधीहि वावरले नव्हते. गडकऱ्यांची प्रतिभा ही केवळ प्रतिभाशाली कवीची आणि विनोदपंडिताची होती. नाटकमंडळींत त्यांचें आयुष्य गेल्यानें प्रयोग-दृष्टया यशस्वी नाट्य-लेखन करण्याच्या सर्व खुब्या त्यांना आत्मसात् करतां आल्या. म्हणूनच अनवश्यक शब्दांनीं, उत्प्रेक्षांनीं आणि लांबलचक भाषणांनी त्यांचीं नाटकें खचलेलीं असूनहि तीं रंगभूमीवर कमालीचीं यशस्वी होऊं शकलीं.

✱ ✱ ✱

कोल्हटकरांचें तालबद्ध आणि अलंकारिक गद्य गडकऱ्यांनी अधिक काव्य-मय आणि प्रासादिक केलें आणि कोल्हटकरांच्या क्लिष्ट आणि क्लृप्तिपूर्ण कोटिबाजपणाला माणसाळून, त्याला जास्त भावनापूर्ण आणि विनोदी बनविलें. कोल्हटकरापेक्षां रसनिष्पत्तीच्या दृष्टीनें गडकऱ्यांचे नाट्यप्रसंग अधिक सामर्थ्यवान् आहेत. किंबहुना *नाट्यदृटया परिणामकारक भाषा आणि संवाद लिहून प्रेक्षकांच्या भावना एका क्षणांत पिळवटून प्रक्षुब्ध करणारा गडकऱ्यासारखा एकहि नाटककार मराठी भाषेमध्यें होऊन गेलेला नाहीं. "स्त्री ही केवळ पायाची दासी आहे" असें कालिंदीला तिरस्कारानें म्हण-णाऱ्या वृंदावनचे पाय ती त्या क्षणीं पकडून "मग मी हें पाऊल वांकडें पडूं*

*देणार नाहीं !" असें जेव्हां म्हणते, तेव्हां वृंदावनासह सारा प्रेक्षकवर्ग विजेचा धक्का बसल्यासारखा चारीमुंडें चीत पडतो.* हा पराक्रम केवळ गडकऱ्यांच्याच लोकोत्तर प्रतिभेला शक्य झाला ! कारुण्य आणि हास्य हे रस गडकऱ्यांच्या पुढें हात जोडून सेवकाप्रमाणें सिद्ध असत. 'एकच प्याला' ह्या गडकऱ्यांच्या नाटकानें महाराष्ट्रांत अश्रूंचा जेवढा पूर वाहवला असेल, तेवढें हास्याचे धबधबे त्यांच्या 'भावबंधना'नेंहि खेळविले. पाश्चात्य नाटककारांचीं नाटकें गडकरी काळजीपूर्वक अभ्यासीत असत हे मला माहीत आहे. तथापि त्यांच्या वास्तववादी नाट्यतंत्राचा गडकऱ्यांनीं आपल्या नाटकांत फारसा उपयोग करून घेतलेला नाहीं. विषयाच्या आणि तंत्राच्या दृष्टीनें ते पुष्कळसे सनातनीच होते असें म्हटलें पाहिजे. तथापि मानवी स्वभावाचा त्यांचा अभ्यास फारच सूक्ष्म आणि वेंचक असल्यामुळें गोकुळ, कालिंदी, नुपूर, सिंधू, गीता, धुंडीराज, कामण्णा आणि सावाजी अशा मानवी स्वभाव-वैशिष्ट्याचे जिवंत आणि अमर नमुने ते आपल्या नाट्यसृष्टींत निर्माण करूं शकले. मराठी रंगभूमीच्या सुदैवानें गडकरी अधिक काळ जर जगले असते, आणि शेक्सपिअरनें लिहिलेल्या नाट्यसंख्येच्या निमपटीनें, म्हणजे १८ नाटकें लिहिण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली असती, तर मराठी रंगभूमीला अखिल भारतीय नव्हे पण, आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें असतें, ह्याविषयीं मला स्वतःला तरी मुळींच शंका वाटत नाहीं.

❀ ❀ ❀

कोल्हटकरांचा भूतदयावाद आणि समाजसुधारणेची तळमळ ही वरेरकरांच्या वांट्याला आली असें थोड्या वेळापूर्वी मी आपणांला सांगितलें. खाडिलकर, कोल्हटकर आणि गडकरी ह्यांच्या इतक्या शिक्षणाचा नि संस्काराचा लाभ वरेरकरांना मिळाला नसतांहि ह्या नाटककारांना जें एक अवघड कार्य साधतां आलें नाहीं, तें वरेरकरांनीं यशस्वितेनें साधलें; आणि तें म्हणजे मराठी रंगभूमीला अद्‌भुतरम्यतेच्या कृत्रिम वातावरणांतून खेंचून काढून, तिला रक्तामासाच्या माणसांच्या खऱ्याखुऱ्या आणि जिवंत जगांत आणून सोडलें. आणि ह्या दृष्टीनें वरेरकर हे *पूर्वींच्या सर्व नाटककारांपेक्षां अधिक यथार्थत्वानें मराठीचे युगप्रवर्तक नाटककार म्हणून संबोधितां येतील.* देवलांनीं 'शारदा' नाटक लिहून वास्तववादी सामाजिक नाटकांची जी

तेजस्वी सुरुवात केली होती, ती परंपरा कोल्हटकर-गडकरी ह्यांच्यापेक्षां अधिक तत्त्वनिष्ठेनें वरेरकर ह्यानींच पुढें चालविली. 'कुंजविहारी,' 'लयाचा लय,' 'करीन ती पूर्व' इत्यादि पौराणिक ऐतिहासिक नाटकें जरी वरेरकरांनीं लिहिली असलीं तरी, त्यांच्या मनाचा आणि भावनेचा मूळचा कल भूतकालापेक्षां वर्तमानकालाकडेच जास्त झुकलेला आहे. देवादिकांच्या आणि राजेलोकांच्या काल्पनिक स्वप्नसृष्टींत रममाण झालेल्या रंगभूमीला सामाजिक अन्यायानें आणि आर्थिक विषमतेनें गांजलेल्या कष्टाळू गरिबांच्या दुनियेमधून वरेरकरांनीं हिंडवून आणलें. सध्यांच्या मध्यम आणि मजूर वर्गापुढचे बहुतेक सर्व प्रश्न ह्या नाहीं त्या नाटकांत वरेरकरांनीं चितारण्याचा प्रयत्न केला. हुंडा, धर्मांतर, आणि शुद्धिकरण, गिरणीमालक, मजूर आणि संप, असहकार आणि कोर्ट बहिष्कार, आंकडे आणि सट्टे खेळण्याचें नवें व्यसन, जुगार, अस्पृश्योद्धार आणि खादी प्रसार, करमणुकीवरील कर, मद्यपानबंदी, किंबहुना गेल्या दीड तपांत ज्या ज्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय चळवळी महाराष्ट्रांत होऊन गेल्या त्यांची नाट्यात्मक नोंद अगदीं चिकाटीनें आणि क्वचित् अपयशाचा कडू वांटा पदरीं पत्करूनहि वरेरकरांनीं केली. टिळकांच्या राजकारणाचे पडसाद जसे खाडिलकरांच्या नाटकांत उमटले, तसे गांधींच्या नेतृत्वाखालीं जिवंत झालेल्या कॉंग्रेसच्या राजकारणाचें प्रतिबिंब वरेरकरांच्या नाटकांत चित्रित झालें. वरेरकरांच्या लेखनांत सहजता आणि विपुलता हे गुण असल्यानें पूर्वींच्या नाटककारांवर नाटकांच्या संख्येच्या दृष्टीनेंहि वरेरकरांनीं मात केली. किंबहुना ह्या नाटककारानें कादंबरीच्या मुलुखावर स्वारी करून तेथेंहि नाट्यसृष्टींतल्याप्रमाणेंच त्यांनीं आपली स्वतंत्र गादी स्थापन केली. फडके–खांडेकरादि यशस्वी कादंबरीकारांना रंगभूमीवरून पराभूत होऊन परत जावे लागले, ही गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे वरेरकरांच्या ह्या सव्यसाची यशाबद्दल खरोखरच कौतुक वाटूं लागतें. वरेरकरांचे नाट्यविषय जितके वास्तववादी, त्याहीपेक्षां त्यांचें नाट्यतंत्र अधिक वास्तववादी आहे. किंबहुना आधुनिक नाट्यतंत्र हेतुपुरःस्सर उपयोगांत आणून रंगभूमि जास्त वास्तववादी आणि सजीव करावयाची हें ध्येय वरेरकरांच्या इतक्या निष्ठेनें पूर्वींच्या कोणत्याहि नाटककारांनीं समोर ठेवलेलें नाहीं. व्यवहारांतली सोपी भाषा, आटोपशीर

खटकेबाज संवाद, स्वगत भाषणांचा अभाव, एकप्रवेशी नाट्यरचना, दोन तासांचीं नाटकें किंवा नाटिका ह्या सर्व तांत्रिक सुधारणा वरेरकरांच्या नाटकांत आढळतात. त्या व्यतिरिक्त रंगभूमीवर पडद्यांची हकालपट्टी करून त्याऐवजीं निश्चल भिंतींच्या खोल्या आणि दिवाणखाने दाखविण्याची सुधारणा त्यांच्याच नेतृत्वाखालीं ललितकलादर्श नाटक मंडळीनें केली. स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारणेचें कार्य विलक्षण चिकाटीनें महाराष्ट्रांत महर्षि धोंडोपंत कर्वे यांनीं जसें केलें, तसें मराठी रंगभूमि सर्व बाजूनें सुधारून तिला सामाजिक जीवनांत परिणामकारक स्थान देण्याचें अवघड कार्य तितक्याच चिकाटीनें वरेरकर ह्यांनीं केलें म्हणून मराठी नाटकांच्या इतिहासांत "आधुनिक रंगभूमीचे सुधारक" असा वरेरकरांचा उल्लेख केल्यावाचून गत्यंतर नाहीं.

* * *

किर्लोस्करांपासून तो वरेरकरांपर्यंत नाटककारांनीं जशी नाट्यसृष्टींत क्रांति घडवून आणली, तशी मराठी रंगभूमि लोकप्रिय करून तिला तुम्हां-आम्हां महाराष्ट्रीयांच्या दैनंदिन जीवनांत मोठ्या मानाचें स्थान देण्याला ज्यांची कला कारणीभूत झाली, त्या नटांच्या कामगिरीचें महत्त्वहि आपणांला मान्य करावयाला पाहिजे. गॅरिकशीं ज्यांची तुलना केली जाते, त्या गणपतराव जोशांची आठवण झाली कीं, सर्व नाट्यप्रेमी महाराष्ट्रीयांचीं शिरें अद्यापिहि आदरानें खालीं लवतात. गणपतरावांनीं विविध अभिनयाच्या क्षेत्रांत जे उच्चांक गांठून ठेवले आहेत, त्यांच्या आसपास पोहोंचण्याइतकें सामर्थ्यसुद्धां ज्यांच्या अंगीं आहे असे नट महाराष्ट्रांतच काय, पण अखिल भारतांत निर्माण होण्याला अजूनहि पुष्कळ वर्षे लोटावीं लागतील. गणपतरावांच्या मागोमाग नांव घेण्याच्या योग्यतेचे दोनच गणपतराव रंगभूमीवर येऊन गेले. एक भागवत गणपतराव अन् दुसरे बोडस गणपतराव! एकानें थोरल्या गणपतरावांचें भेदक गांभीर्य उचललें तर, दुसऱ्यानें त्यांची सहजस्फूर्त विनोदकुशलता वठवून दाखविली. त्यानंतर आपल्या अभिनयवैशिष्ट्याच्या जोरावर गद्य नट म्हणून ज्यांनीं मराठी रंगभूमीवर स्वतंत्र स्थान मिळविलें अशा नटांत कै. नानबा गोखले, कै. पोतनीस, केशवराव दाते, टिपणीस बंधू, चिंतामणराव कोल्हटकर, नाना फाटक आणि दिनकर ढेरे

ह्यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. संगीत नटांमध्यें सौंदर्य, अभिनय आणि गायन ह्यांच्या सामर्थ्यावर ज्यांनीं रंगभूमीवर एकाद्या सम्राटाप्रमाणें (किंवा सम्राज्ञीप्रमाणें) राज्य केलें अशामध्यें कै. भाऊराव कोल्हटकर आणि बालगंधर्व ह्या दोनच नटश्रेष्ठांचा उल्लेख केला पाहिजे. भाऊरावांचें कर्तृत्व मला स्वतःला पाहावयाला मिळालें नाहीं. कारण त्या वेळीं मी जन्मलोंच नव्हतों; पण बालगंधर्वांचें रंगभूमीवरील सर्व वैभव आरंभापासून अखेरपर्यंत मला पाहावयाला मिळालें. आणि माझें अंतःकरण त्या बाबतीत तृप्त झालें आहे. बालगंधर्वांचें ह्यापुढचें आतां कांहीं पाहण्याची म्हणून इच्छाच राहिलेली नाहीं. बालगंधर्वांनीं रंगभूमीला जें बादशाही वैभव मिळवून दिलें, तसें वैभव मिळवून देणारा नटश्रेष्ठ शतकामध्यें एकादाच निर्माण होतो, ह्यांत संशय नाहीं. ह्या दोन संगीत नटांव्यतिरिक्त कै. नानासाहेब जोगळेकर, कै. कृष्णराव गोरे, कै. केशवराव भोसले, सरनाईक, कै. पेंढारकर आणि कै. दीनानाथ ह्यांनीहि संगीत नाटकांना आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वानें पुष्कळच मान्यता मिळवून दिली.

एवंच १८८० ते १९३० पर्यंतचा पन्नास वर्षांचा काळ एवढाच काय तो मराठी रंगभूमीच्या वृद्धीचा, विकासाचा, वैभवाचा आणि सुधारणेचा काळ आहे असें मी समजतों. ह्या पन्नास वर्षांच्या काळांत मराठी नाट्याला आणि रंगभूमीला ज्यांची कला आणि ज्यांची लेखनकृति उपकारक झाली, असे पुष्कळसे नट आणि नाटककार होऊन गेले. त्यांचा निवडून नामनिर्देश करणें कठिण असलें तरी त्यांच्या कर्तृत्वाची मला जाणीव आहे.

* * *

मराठी रंगभूमीचा हा भाग्यशाली भूतकाल लक्षांत घेतला म्हणजे वर्तमानकाळांतली तिची दैन्यावस्था बघूनहि तिच्या तेजस्वी भविष्यकालाबद्दल मन निराश होण्याचें यत्किंचितहि कारण उरत नाहीं. नाट्यविषयाच्या, तंत्राच्या, अभिनयाच्या, संगीताच्या, वेषभूषेच्या, नेपथ्याच्या, रंगभूमीवरील सजावटीच्या, नाटकगृह रचनेच्या कोणत्याहि दृष्टीनें मराठी नाटकांकडे किंवा रंगभूमीकडे पाहिलें तरी, त्या त्या बाबतींत प्रगतीचा केवढा तरी टप्पा महाराष्ट्रानें गांठला आहे हें कळून येऊन, आपल्या अंतःकरणांतील अभिमान आणि आत्मविश्वास वृद्धिगत होईल ह्यांत संशय नाहीं.

अशी परिस्थिति असतां आणि गेल्या दहा वर्षांत रंगभूमीचें पुनरुज्जीवन करण्याचा भगीरथ प्रयत्न, आजचे स्वागताध्यक्ष वर्तक आणि त्यांचे नाटच-मन्वंतरी मित्र, स्वतः मी आणि बालमोहन नाटक मंडळी किंवा अनंतराव गद्रे, पार्श्वनाथ आळतेकर, नंदू खोटे इत्यादि नाटिका-सांप्रदायाचे उत्साही पुरस्कर्ते करीत असतांहि मराठी रंगभूमीचें दैन्य अद्यापि कां दूर होत नाहीं ह्याची ह्या ठिकाणीं कारणमीमांसा करणें आवश्यक आहे.

* * *

सन १९३० सालीं बोलपटांचा जमाना सुरू झाल्यापासून रंगभूमीच्या भगतगणांची संख्या एकसारखी घटूं लागली. आणि नाटकें पाहणारा बहुतांशीं सुशिक्षित वर्ग आणि बोलपट पाहणारा बहुतांशीं श्रमजीवी बहुजनसमाज अशी समाजांतील प्रेक्षकामध्यें स्पष्ट विभागणी पडली. ही विभागणी दिवसेंदिवस अधिक रुंद होत गेली हें खरें आहे. रंगभूमि आणि नाटचकला ह्यांचें सामर्थ्य यत्किंचित् हिरावून घेण्याची शक्ति बोलपटांत नसतांनाहि यांत्रिक नाविन्याच्या प्रभावामुळें आणि व्यापक धंद्याचें स्वरूप त्याला असल्यामुळें, बोलपटांनीं नाटचसृष्टीवर अगदीं 'ब्लिटझ्क्रीग' पद्धतीनें आक्रमण केलें आणि रंगभूमीची भयंकर नासधूस करून टाकली. बोलपटांनीं नाटकांचा प्रेक्षकवर्ग पळवला, नटवर्ग फितवून आपल्या गोटांत नेला, नाटक-गृहें कबजांत घेतलीं आणि पुणें—मुंबईसारख्या शहरीं नाटकें कधीं न फिरकतील असा कायमचा बंदोबस्त करवून, नाटचकलेला ह्या खेडेगांवांतून त्या खेडे-गांवांत, कुठें पत्र्यांच्या मांडवांत तर कुठें मारुतीच्या देवळांत, एकाद्या भुके-कंगालाप्रमाणें भटकत फिरावयाला लावलें. नाटचकलेच्या नशिबीं हा जो वनवास आला त्याचें खापर सर्वस्वीं बोलपटाच्या माथ्यावर फोडणें योग्य होणार नाहीं हें मी पुन्हां सांगत आहे. गेल्या महायुद्धानंतर आमूलाग्र बदलून गेलेल्या जगाशीं आणि जीवनाशीं आमची रंगभूमि समरस होऊन गेली नाही, म्हणूनच तिच्या कपाळीं ह्या हालअपेष्टा आल्या असें माझें स्पष्ट मत आहे. युद्धोत्तर जगामध्यें जीवनांत जास्त गतिमानता आली आणि जीवनकलह जास्त तीव्र झाला. जीवनांतला पूर्वीचा ऐदीपणा आणि ऐसपैसपणा जाऊन, पोटा-साठीं प्रत्येकाला अधिक काळपर्यंत झगडण्याची आवश्यकता वाटूं लागली आणि रिकामपणाची व विसांव्याची वेळ अधिकाधिक मर्यादित होत गेली.

त्यामुळें थोडक्या पैशांत आणि थोडक्या काळांत अगदीं भरपूर—पण प्रत्येक वेळीं नवीन नवीन करमणूक मिळविण्याकडे माणसाचें साहजिकच लक्ष लागलें. समाजाच्या ह्या बदललेल्या प्रवृत्तीची दखलगिरी आमच्या रंग-भूमीनें त्या वेळीं घेतलेली नाहीं. पांच पांच अंकीं, पांच अन् सहा तास टिक-णारीं आणि फिरून फिरून तींच तींच नाटकें दळून दाखविण्याच्या आपल्या पूर्वींच्या शिरस्त्यामध्यें नाटकमंडळयांनीं यत्किंचितहि बदल केलेला नाहीं. तेंच सौभद्र, तेंच शारदा, तेंच मृच्छकटिक, तेंच संशयकल्लोळ, आणि तेंच भावबंधन ! आणि सर्वांवर ताण म्हणजे तेच नट आणि त्याच नाटकमंडळया ! त्यामुळें महाराष्ट्रांतील प्रेक्षकवर्ग अगदीं पिसाळून गेला असल्यास नवल नाहीं. प्रेक्षकहि किती झालें तरी माणसेंच होत ! त्यांच्याहि सहनशीलतेला कांहीं मर्यादा आहेत कीं नाहींत ! १९१२ सालीं जो नट वीस वर्षांच्या अल्लड तरुणीचें सोंग घेऊन जनतेसमोर नाचत होता, तोच नट १९४१ सालीं डोक्याला टक्कल पडून दातांला खिडारें पडलीं तरीसुद्धां तेंच सोंग त्याच अल्लडपणानें करण्याचा प्रयत्न करूं लागला तर प्रेक्षकांनीं पोबारा करूं नये तर काय त्वंपुरा करावा ? एवंच, रंगभूमीचें नावीन्य आणि तारुण्य अखंडपणें टिक-विण्याचा आमच्या नाटकमंडळयांकडून प्रयत्न झाला नाहीं म्हणून त्यांना ही दशा प्राप्त झाली. महाराष्ट्रांतील ग्रंथ-प्रकाशक ज्याप्रमाणें नवीन नवीन कादंबरीकार किंवा ग्रंथलेखक शोधीत होते असे नवीन नवीन नाटककार शोधून काढण्याचा नाटक मंडळयांनीं कसोशीनें प्रयत्न केलेला नाहीं. बहुतेक नाटक मंडळयांचे चालक अशिक्षित असल्यानें विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या विद्वान् मंडळींशीं त्यांचें संघटन होऊं शकलें नाहीं. उलट ह्या आधुनिक विद्वान् मंडळींना यशस्वी नाटकें लिहितां येणें शक्य नाहीं असा बलवत्तर पूर्वग्रह ह्या नाटकी मंडळींच्या मनामध्यें असे हा भाग तर निराळाच !

* * *

रंगभूमीला आधुनिक आणि वास्तववादी स्वरूप देण्यासाठीं स्त्रियांच्या भूमिका स्त्री नटींनीं करणें अत्यंत अवश्यक होतें. काळ पुष्कळच बदललेला होता. समाज पूर्वींइतका प्रतिगामी राहिलेला नव्हता. अशा वेळीं रंग-भूमीनें ही महत्त्वाची सुधारणा घडवून आणण्याचें कामीं जागरूकता

दाखवावयाला पाहिजे होती, ती दाखविली नाहीं हेंहि रंगभूमीच्या अध:पाताचें एक प्रमुख कारण म्हणून समजावयाला पाहिजे. नाटकांपेक्षां तमाशे ह्या बाबतींत फारच पुरोगामी म्हटले पाहिजेत. कारण तमाशांत बायकांचा प्रवेश कित्येक वर्षांआधीं झालेला होता. रंगभूमीच्या अगदीं सुरुवातीच्या काळांत कांहीं स्त्रिया नाटकांत कामें करीत असत. पण पुढें पुरुषच स्त्रियांचीं कामें करूं लागले. आणि कालांतरानें 'स्त्रीपार्टी नट' हा भयंकर प्राणी मराठी रंगभूमीवर अवतीर्ण होऊन तेथें कायमचें ठाणें देऊन बसला. महाराष्ट्रांतला प्रेक्षकवर्ग केवळ आंबटशोकी म्हणूनच त्यांनीं ह्या 'अर्धनारी-नटेश्वरां'च्या लीला मिटक्या मारीत इतकीं वर्षें पाहिल्या. 'स्त्रीपार्टी नट' ही जगांतील एक अत्यंत अनैसर्गिक वस्तु असून कोणत्याहि आरोग्यपूर्ण मर्दाला स्त्रीपार्टी नट बघून ओकारीच यावयाला पाहिजे. इंडिअन पीनल कोडाखालीं अनैसर्गिक गुन्ह्याला जशी जबर शिक्षा ठोठावण्यांत येते, तशी रंगभूमीवर स्त्रीचें काम करणाऱ्या पुरुषोत्तमाला देण्याचा जर कायदा कोणीं काढला असतां तर रंगभूमीचा केव्हांच उद्धार झाला असता ! स्त्रियांचीं कामें पुरुष करीत म्हणूनच मराठी रंगभूमीवरील वातावरण अत्यंत अनैसर्गिक, कृत्रिम आणि रोगट राहिलें आणि ठराविक कालानंतर तिची वाढ होण्याची क्रिया अजिबात थांबली.

* * *

संगीताची अतिरिक्तता हेंहि मराठी रंगभूमि क्षीण होण्याचें एक कारण आहे. संगीत नाटकाची सद्दी अण्णा किर्लोस्करांनीं सुरू करून, मराठी रंगभूमि लोकप्रिय केली ह्यांत संशय नाहीं. संगीताची ही गोडी दिवसेंदिवस वाढत गेली. बालगंधर्वांनीं तर संगीत नाटकांचें महाराष्ट्राला वेड लावलें. श्री. भास्करराव बखले व त्यांचे शिष्योत्तम गोविंदराव टेंभे आणि कृष्णराव फुलंब्रीकर ह्यांनीं संगीत पदांच्या नवीन नवीन चाली रंगभूमीवर आणून नाटकी संगीताला लोकप्रियतेबरोबर शास्त्रीयत्वाचीहि जोड दिली. त्यामुळें महाराष्ट्रामध्यें गायनाची अभिरुचि उत्पन्न होऊन जनतेंत गाण्याच्या कलेचा अधिक प्रसार झाला, हा एक मोठा फायदा झाला ह्यांत शंका नाहीं. तथापि नाटक म्हणजे कांहीं गायनाची बैठक नव्हे कीं, जलसा नव्हे ! पाश्चात्य रंगभूमीवर *Play* (गद्य नाटक) आणि *Opera* (संगीत नाटक) असा

स्पष्ट भेद आहे. आणि तिकडे 'ऑपेरा'पेक्षां 'प्लेज्'च अधिक लोकप्रिय झालेले आहेत. गद्य नाटकांत शुद्ध नाट्याला आणि अभिनयाला जितका वाव असतो, तितका तो संगीत नाटकांत असूं शकत नाहीं. शिवाय वास्तववादी नाटकांत कृत्रिम गायनाला स्थानच उरत नाहीं. किर्लोस्करांच्या नाटकांत सामान्यत्वेंकरून शेंदीडशें पदें असत. जेवतांना कांहीं माणसें प्रत्येक घांसाबरोबर जसा पाण्याचा घोट घेतात, तसें त्यांच्या नाटकांतील पात्रें प्रत्येक वाक्याला 'तथापि' किंवा 'अथवा' असें म्हणून झटका आल्यासारखें गाण्याला सुरुवात करतात. सबंध रात्रीच्या रात्रीं पूर्वींच्या नाटकांचें प्रयोग जे चालत असत ते केवळ ह्या गाण्याचाच आधारावर! पुण्याला कांहीं गवयांनीं 'सौभद्र' नाटक मागें केलें होतें असें म्हणतात. सूत्रधारापासून तों थेट गर्गमुनींपर्यंत सर्व पात्रांच्या जागीं पट्टीच्या गवयांची योजना झाली होती. सूत्रधारानें 'तुम्हां तो शंकर सुखकर होवो!' हें मंगलाचरण म्हणावयास तब्बल दोन तास घेतले, आणि नारदाचे 'पावना वामना' संपेपर्यंत पहिली रात्र खलास झाली. हें नाटक तीनचार रात्रीं हप्त्याहप्त्यांनीं चाललें होतें असें म्हणतात. असें नाटक करून दाखविणाऱ्या नटांच्या धैर्यापेक्षां ते पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या सहनशीलतेचें अधिक कौतुक करावयाला पाहिजे. खाडिलकर-कोल्हटकरांच्या नाटकांत ही पदांची संख्या पन्नासीपर्यंत येऊन पोहोंचली. कोल्हटकरांचा 'वीरतनय' पहिल्या अंकांत एका दमछाकींत सात पदें म्हणून पडद्याआड जातो. खराच बेटा वीरतनय! पदांना पूर्ण वाव देण्यासाठीं खाडिलकरांना आपला गद्यसंवादाचा मजकूर ऐंशी नव्वद पानांत आणून बसवावा लागला. अशा तऱ्हेनें पन्नास वर्षेपर्यंत संगीतानें रंगभूमीवर भयंकर धुडगूस घालून नाट्यकलेचा गळा दाबला. त्यामुळें प्रेक्षकवर्ग अक्षरशः आतां या बाबतीत इतका बिघडून गेला आहे कीं, आधुनिक तंत्राचें वास्तववादी पुरोगामी नाटक करण्याचें कोणी मनांत आणलें तरी प्रेक्षकांना चार दोन भावगीतांची लांच दिल्याशिवाय काम भागत नाहीं. बोलपटामधील सोप्या संगीतामुळें लोकांची गायनाबद्दलची अभिरुचि पूर्णपणें बदललेली असली तरी गायनावाचून करमणुकींचा कोणताहि प्रकार पाहण्याची त्याच्या मनाची अजूनहि तयारी झालेली दिसत नाही.

उत्तम नाट्यविषयक टीकाकारांचा अभाव हें देखील माझ्या मतें रंगभूमीच्या अवनतीचें एक प्रभावी कारण आहे. टीकाकार ह्या शब्दाला आपल्या साहित्यांत अत्यंत विपरीत अर्थ आलेला आहे. टीका म्हणजे निंदा आणि टीकाकार म्हणजे दोष दाखवून ताशेरा झाडणारा असें समीकरण झालेलें आहे. नाटकाचा प्रयोग कसा पाहावा, नाटकांचें गुणदोषपरीक्षण कसें करावें हें सामान्य प्रेक्षकांना समजावून सांगणारे टीकाकार आपल्यामध्यें निर्माण झालेले नाहींत. प्रेक्षकांच्या अभिरुचीला वळण देऊन रंगभूमीवरील नवीन नवीन सुधारणा पाहण्यास त्यांच्या मनाची आधींपासून तयारी करणें हें टीकाकारांचें काम आहे. इंग्रजी वाङ्मयांत अशा टीकाकारांना स्वतंत्र स्थान दिलेलें आहे. बर्नार्ड शॉ नाटककार होण्याआधीं एक उत्कृष्ट नाट्यटीकाकार म्हणून पुढें आलेला होता. मराठी वाङ्मयांत 'तोतयाचें बंड' ह्या नाटकावर कोल्हटकर ह्यांनीं जी अत्यंत रसग्राही आणि मर्मदर्शी टीका केली आहे, ती मराठी वाङ्मयांतील नाट्यात्मक टीकेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून दाखवितां येईल. फडके आणि खांडेकर ह्यांनींहि नाटकावर टीकात्मक लेख लिहिलेले आहेत. फडके ह्यांची टीका पुष्कळच मार्मिक असे. पण नाटकामधले बारीक सारीक दोष मुद्दाम दाखवून स्वतःच्या कोटिबाजपणाचें आणि शहाणपणाचें प्रदर्शन दाखविण्याच्या एकसारख्या हव्यासामुळें खांडेकरांची टीका रंगभूमीला फारशी उपकारक ठरली नाहीं. माझे शाळेमधले एकवेळचे शिक्षक श्री. पु. रा. लेले हे नाटकांचे उत्तम टीकाकार आहेत, पण त्यांच्याजवळ पूर्वग्रह आहेत आणि हे पूर्वग्रह विसरावयाला ते तयार नसतात. त्यांना आवडलेल्या नाट्यकृतींचा मात्र ते उत्कृष्टपणें परामर्ष घेऊं शकतात. नाटकावर टीका करण्याची वर्तमानपत्रामधली जी उडाणटप्पू पद्धत मध्यंतरीं निघाली होती ती रंगभूमीच्या दृष्टीनें अत्यंत घातुक होती. ह्या पद्धतीप्रमाणें एकाद नाटक अत्युत्तम तरी असावयाचें, नाहीतर अत्यंत भिकारडें तरी असावयाचें ! भिकार नाटकांची चिकार स्तुति आणि उत्तम नाटकांची खच्चून निंदा हा ह्या पद्धतीचा बाणा असे. नाट्यप्रयोग होण्याच्या आधींच तो 'पडल्या' बद्दलची खातरजमाहि हे टीकाकार देत असत. त्याशिवाय अमुक नाटक हें अमक्याचें भाषांतर वा रूपांतर असून, त्यांमधील तमुक पात्र त्या 'ह्या' नाटकांतील पात्राची चोरी आहे, ह्या गोष्टी चव्हाट्यावर

आणण्यांत ह्या टवाळ टीकाकारांना खूपच मौज वाटत असे. अमुक एक मनुष्य हा त्याच्या बापाचा मुलगा नसून त्याच्या जन्मस्थानीं कांहीं तरी भानगड झालेली आहे अशा तऱ्हेची कुटाळकी करतांना समाजांतील 'नुपूर' वृत्तीच्या सामान्य टवाळांना मनांतून जशा गुदगुल्या होत असतात, तशा आनंदाच्या उकळ्या नाटकामधील वाङ्मयचौर्य हुडकून काढतांना पुष्कळशा मत्सरी वृत्तीच्या फडतूस टीकाकारांना फुटत असतात. खोट्या टीकेनें चांगल्या नाटकांना अपाय होत नाहीं हें जरी खरें असलें तरी, असल्या हलकट आणि मत्सरी टीकेमुळें अनेक होतकरू नाटककारांचा मनोभंग होत आहे व नवीन नाटककारांना समाजापुढें एकदम येण्याचें धैर्य होत नसे.

मराठी रंगभूमि आणि नाटकें ह्यांच्या शरीरांत उद्भवलेल्या रोगाचें थोडक्यांत हें असें निदान करतां येईल. त्यावरून हा रोग कांहीं दुर्धर नाहीं, ह्याच्यावर अचूक उपाययोजना करून रोग्याची प्रकृति सुधारणें हें काम कांहीं फारसें अवघड नाहीं हें आपणांला कळून येईल.

* * *

साहित्यांत आणि जीवनांत नाट्याचें स्थान अत्यंत श्रेष्ठ आहे ह्या गोष्टीवर आपला विश्वास पाहिजे. कवि, कादंबरीकार, निबंधकार किंवा टीकाकार ह्यांपेक्षां वाङ्मयांत नाटककाराचें स्थान श्रेष्ठ आहे. ह्याचें कारण *नाट्य-लेखन ही कलावंताच्या निर्माणशक्तीची पराकाष्ठा आहे. कलावंताच्या बुद्धीला जर एखाद्या वृक्षाची उपमा दिली तर, कथाकादंबरी ही त्या वृक्षाला आच्छादणारी पालवी, काव्य हा त्या वृक्षाला आलेला सुगंधी फुलोरा आणि नाटक हें त्या मोहरांतून निर्माण होणारें परिपक्व फळ असें मानावयास पाहिजे.* आंग्ल साहित्यामध्यें सर्वांत श्रेष्ठ स्थान जसें शेक्सपिअरचें आहे तसेंच भारतीय साहित्यामध्यें शाकुंतलकर्त्या कालिदासाचें आहे हें आपल्याला माहीत आहे. नाटक हें दृश्य आणि श्राव्य वाङ्मय असल्यानें प्रेक्षकांच्या मनावर त्याचा ताबडतोब परिणाम होतो. म्हणून समाजाला जागृत करण्याचे किंवा त्याच्या विचारामध्यें क्रांति घडवून आणण्याचे कामीं इतर प्रकारच्या ललित-वाङ्मयापेक्षां नाटकामध्यें जास्त सामर्थ्य आहे. रंगभूमि हें केवळ करमणुकीचें विश्रांतिस्थान नसून तें लोकशिक्षणाचें आणि लोकजागृतीचें

प्रभावी व्यासपीठ आहे. नाटक हें जगांत समाजसुधारणेला अनेक वेळां कारणीभूत झालेलें आहे. गॉल्सवर्दीच्या '*Justice*' ह्या नाटकामुळें इंग्लंडमधील तुरुंगाच्या पद्धतींत सुधारणा झाली आणि शॉच्या नाटकामुळें समाजसत्तावादाचा इंग्लंडमध्यें पाया रोंवला गेला आणि आजचा मजूरपक्ष तेथें अस्तित्वांत आला. इब्सेनच्या ***Doll's House*** मधील नोरानें यूरोपमधील स्त्रीवर्ग आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र केला, तर शेंकडों डॉक्टरांच्या उपदेशानें तरुण पिढीला लैंगिक व्याधीच्या भीषणतेचें जें ज्ञान मिळालें नसतें तें ब्रियोच्या '*Damaged Goods*' पाहून मिळालें. आधुनिक तंत्राप्रमाणें कलात्मक नाटकें हीं प्रचारात्मक असूं शकत नाहीत. कारण प्रचार हा कलेचा शत्रू आहे असें मानलेलें आहे. बर्नार्ड शॉप्रमाणें एकादा दुसराच लोकोत्तर बुद्धीचा कलावंत नाटककार हा आपल्या कलासामर्थ्याच्या जोरावर प्रचाराचें विष पचवूं शकतो ! केवळ प्रचारासाठीं नाटकें लिहिल्यानें रंगभूमीची कशी 'उत्तरक्रिया' होते ह्याचें उत्तम उदाहरण म्हणजे सावरकरांचीं नाटकें होत. हिंदुत्वाच्या अतिरिक्त अभिनिवेशामुळें 'उःशाप' नाटकाचा त्यांतील पात्रांप्रमाणेंच मुडदा पडलेला आहे; तर अहिंसेच्या आंधळ्या द्वेषामुळें त्यांच्या 'संन्यस्त खड्गाला' एका अत्यंत कंटाळवाण्या संवादात्मक निबंधाचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. नाटक हें प्रचारात्मक नसावें; ह्याचा असा अर्थ नाहीं कीं, त्यामध्यें सामाजिक विचारसरणी आग्रहानें प्रतिपादिलेली असूं नये.

* * *

आजचें युग हें जुनें जग, जुन्या रूढी, जुन्या समाजपद्धति बदलण्याचें युग आहे. नव्या परंपरा सुरू करण्याचें, नवीन मार्ग दाखविण्याचें, नव्या जीवनाला आरंभ करण्याचें हें नवयुग आहे. जुनें आणि नवें ह्यांचा प्रचंड झगडा हा आजच्या नाट्याचा विषय होऊन बसलेला आहे. जेथें जेथें विरोध आहे, भेद आहे, युद्ध आहे, कलह आहे, खटका आहे, झगडा आहे, तेथें तेथें नाट्य निर्माण होतें. ह्या झगड्यांमध्यें जगूं पाहणाऱ्या समाजांतील व्यक्तीला त्या झगड्यांतील यथार्थ ज्ञान करून देणें, हें आजच्या नाटकाचें काम आहे. समाजानें बाहेर निर्माण केलेल्या प्रतिकूल परिस्थितीशीं किंवा त्यामुळें अंतःकरणांत प्रक्षुब्ध झालेल्या परस्परविरोधी भावनांशीं प्रत्येकाला कसें झगडावें

लागतें हें दाखविणें हें आजच्या नाटकाचें प्रधान कार्य आहे. ह्या दृष्टीनें ह्या काळांतलें प्रत्येक पुरोगामी नाटक हें सामाजिकच असावयाला पाहिजे. इब्सेन किंवा शॉ ह्यांचें धैर्य प्रत्येक नाटककाराच्या अंगीं असणें शक्य नाहीं. त्यामुळें समाजांतील जुन्या परंपरेच्या ढोंगी पुजाऱ्यावर त्या दोघांनीं जितक्या निर्दयतेनें कोरडे उडविलें आणि खऱ्या जीवनाचें नागडें उघडें स्वरूप जितक्या छातीठोकपणें जनतेला दाखवून दिलें, तितकें इतर नाटककारांना दाखवितां यावयाचें नाहीं हें खरें. पण प्रत्येक सामाजिक झगड्याला दोन बाजू असतात. त्यांत अमुक एक बाजू चांगली कां वाईट हें प्रेक्षकांनीं स्वतः विचार करून ठरविण्यासाठीं, त्यांच्या बुद्धीला चालना देण्याचें काम प्रत्येक नाटककाराला यशस्वी तऱ्हेनें करतां येईल. मानवजातीच्या आणि समाजाच्या हितासाठीं ज्यांचीं अंतःकरणें तळमळत आहेत, अशा विचारवंतांना आणि कलावंतांना नाटकापेक्षां अधिक आकर्षक, कलात्मक आणि प्रभावी वाङ्मय-प्रकार दुसरा कोणताहि आढळणार नाहीं.

नाटक हें जीवनाचें चित्र आहे किंवा आयुष्याचा तो आरसा आहे किंवा संसाराचें तें प्रतिबिंब आहे, असें त्याचें कधीं कधीं वर्णन करण्यांत येतें. ही नाटकाच्या खऱ्याखुऱ्या स्वरूपाची आणि सामर्थ्याची निव्वळ बदनामी आहे. नाटक हा आरसा नसून तें एक बृहद्दर्शक भिंग आहे. नाटक ही निर्जीव चित्रांची तसबीर नसून तें एक जिवंत व्यक्तींचें जग आहे. समाजांत प्रत्यहीं घडणाऱ्या हजारों निरर्थक घटनांमधून जीवनकलहाला कारणीभूत होणाऱ्या अर्थपूर्ण गोष्टी तेवढ्या उचलून आणि त्यांची एक स्वतंत्र सृष्टी रचून ती मूर्तिमंत प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर उभी करणें हें नाटककारांचें काम आहे. समाजांत समोर दिसणाऱ्या गोष्टी जशा घडतात तशा त्या वर्णन करणें हें कादंबरी-काराचें काम असलें तर, त्या गोष्टी तशा का घडतात ह्यांचा शोध लावणें नाटककाराचें काम आहे. कादंबरीकारांचा संबंध कार्याशीं असतो तर, नाटककारांचा संबंध कारणाशीं असतो. ह्या दृष्टीनें विचार करतां कादंबरी-कारापेक्षां नाटककाराचें काम किती तरी अवघड आणि सूक्ष्म असतें हें आपणांस कळून येईल.

प्रेक्षकांच्या मनावर परिणाम होण्याच्या दृष्टीनें बोलपटापेक्षां नाटक हें किती प्रभावी आहे हें या ठिकाणीं आपल्या नजरेला आणावयास हरकत नाहीं. बोलपटामध्यें एका निमिषांत अनेक चित्रांची घोडदौड डोळ्यापुढून चाललेली असते. तितक्याच वेगानें शब्दांचे आघातहि कानावर होत असतात. कोठल्याहि एका गोष्टीवर एकाग्र चित्तानें विचार करावयास आपणांला क्षणाचाहि अवकाश मिळत नाहीं. अनेक वर्षांत घडलेल्या किंवा अनेक निरनिराळ्या स्थळीं घडणाऱ्या गोष्टी, नाटकांपेक्षां बोलपटांमध्यें अधिक सुलभतेनें दाखवितां येतात, ही बोलपटांनीं नाटकावर केलेली एक कुरघोडी आहे हें खरें असलें तरी, प्रेक्षकांच्या मनावर दीर्घकालपर्यंत टिकून राहणाऱ्या परिणामाच्या दृष्टीनें बोलपटांना नाटकांपुढें सर्वस्वीं शरणागतीच पत्करावयाला पाहिजे. यांत्रिक छायाचित्रणाच्या साहाय्यानें वाटेल तीं दृश्यें नाटकापेक्षां रुपेरी पडद्यावर अगदीं हुबेहूब दाखवितां येतात हें खरें आहे. रंगभूमीवरील जंगल किंवा आभाळ आणि रुपेरी पडद्यावरील जंगल आणि आभाळ ह्यांत जमीन-अस्मानाचा फरक पडतो. रंगभूमीवरील दिवाणखान्यांत बसण्याची इच्छा पिटांत बसलेल्या चार आणेवाल्या प्रेक्षकांना देखील व्हावयाची नाहीं. शेक्सपिअरच्या काळीं नायकनायिकेच्या एकाद्या प्रणयाराधनाच्या प्रवेशांत चंद्र दाखवावयाचा असेल तर 'हा चंद्र आहे' अशी गळ्यांत पाटी अडकवून आणि एका हातांत कंदील देऊन एका माणसाला स्टुलावर उभे करीत असत. ह्या चंद्रलोकींच्या माणसाला सध्यांच्या रंगभूमीवर जरी अर्धचंद्र मिळालेला असला तरी, वास्तववादी देखाव्याच्या बाबतींत रंगभूमीची बोलपटांच्या इतकी प्रगति होणें कालत्रयींहि शक्य नाहीं. नाटक पाहावयाला जाणारा प्रेक्षक नाटकगृहांत शिरतांना तेथें पुढें दिसणाऱ्या खोट्या गोष्टीबद्दल अविश्वास दाखविण्याची आपली नैसर्गिक वृत्ति आपखुषीनें बाहेर ठेवूनच मग आंत जातो. एवढेंच काय, पण रंगभूमीवरील नाटक हें खरें आहे असें वाटावें म्हणून तो आपल्या कल्पनेचें वाटेल तेवढें सहकार्य नाटक मंडळीशीं करावयाला तयार असतो. बोलपट पाहावयाला जाणारा प्रेक्षक अशा वृत्तीनें पटगृहांत शिरत नाहीं. त्याला असें वाटतें कीं, आपल्याला ह्या रुपेरी पडद्यावरील अगदीं सर्व गोष्टी जशा घडतात तशा प्रत्यक्षच पाहावयाला मिळणार. तो आपल्या कल्पनाशक्तीचा काडीमात्र उपयोग करावयाला कबूल नसतो. 'हरिश्चंद्र'

नाटकांत रोहिदास रानांत लांकडें आणावयाला गेला असतांना विंगमधून त्याला रबराचा साप डसतांना आपल्याला दिसत असला तरी, त्या सर्पदंशामुळें झालेल्या रोहिदासाच्या मरणासाठीं सारा प्रेक्षकवर्ग ढळढळा रडूं लागतो. तारामती त्याचें प्रेत स्मशानांत नेते व त्याच्या पोटांतली आंतडीं खाणारी ती लावशी आहे असा विश्वामित्र तिच्यावर जेव्हां आरोप करतो व रोहिदासाच्या पोटांत लपविलेल्या रंगीत चिंध्या भराभर जेव्हां बाहेर ओढूं लागतो, तेव्हां त्या चिंध्यांचीं लक्तरें डोळयांसमोर दिसत असूनहि प्रेक्षकांचीं आंतडीं पिळवटल्याशिवाय राहात नाहींत.

'घांस घे रे तान्ह्या बाळा!' हें गाणें म्हणत असतांना सिंवू जपानमध्यें तयार झालेल्या एका कचकड्याच्या बाळाला दूध पाजीत आहे हें साऱ्या प्रेक्षकांना दिसत असतांनाहि नाटकगृहांत वात्सल्यरसाला आणि करुणरसाला महापूर आल्याशिवाय राहात नाहीं. ह्याहीपेक्षां अधिक पुढें जाऊन म्हणावयाचें झाल्यास 'सुभद्रे'ची संध्याकाळीं तासलेली हिरवी दाढी समक्ष दिसत असतांना आणि विड्या ओढून तिचे ओंठ काळेकुळकुळीत पडलेले आपण पाहात असतांना 'सुवर्णकेतकी परी वर्ण नव्हे जो दुसरीचा!' असे जेव्हां तिच्या सौंदर्याचें वर्णन दोन हाताच्या अंतरावरून आंबटशोकी अर्जुन करीत सुटतो तेव्हां सारे प्रेक्षकवर्ग हर्षानें मिटक्या मारतात, आणि पुढें दुसऱ्या अंकांत कृष्ण रुक्मिणीच्या दिवाणखान्यांत शिरून तिच्याशी शृंगारक्रीडा करतांना 'कुचभल्ली वक्षाला। टोचुनि दुखवी मजला' असें जेव्हां आव्हान करतो तेव्हां त्याच्या प्रियेची ती 'कुचभल्ली' चिंध्यांच्या चेंडूची आहे असें वयांत आलेल्या सर्व प्रेक्षकांना माहीत असतांनाहि त्यांचे आपापल्या खुर्च्यांवर मुडदे पडल्याशिवाय राहात नाहींत!

* * *

ह्यावरून काय दिसून येतें? बोलपटाची सृष्टि वस्तुतः कितीहि सत्यास धरून असली आणि रंगभूमीवरची सृष्टि कितीहि खोटी भासत असली आणि तिच्यांत कितीहि उणेपणा राहूं शकला तरी बोलपटाच्या सृष्टीपेक्षां रंगभूमीवरची सृष्टि प्रेक्षकांना अधिक जिवंत आणि अधिक खरी वाटते. रंगभूमीबद्दल प्रेक्षकांना जितका मानवी जिव्हाळा आणि आपलेपणा वाटतो तितका रुपेरी पडद्याबद्दल तो वाटूं शकत नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. रंगभूमीवर

घडत असलेली गोष्ट ही हजार वर्षांपूर्वी घडलेली गोष्ट असली तरी ती आतां ह्या क्षणीं फिरून माझ्या डोळ्यासमोर घडत आहे असें प्रेक्षकांना वाटतें, तर रुपेरी पडद्यावरील गोष्ट ही केव्हां तरी मागें घडलेली गोष्ट आहे ही जाणीव प्रेक्षकांच्या मनांत डांचत असते. नाटकांचा संदर्भ वर्तमानकाळाशीं असतो तर रुपेरी पडद्याचा संबंध भूतकाळाशीं असतो. ह्यामुळें रंगभूमीवर घडणाऱ्या गोष्टींचा आणि घटनांचा प्रेक्षकांच्या मनावर अधिक परिणाम होतो. हॅम्लेट नाटकांत शेवटच्या प्रवेशांत राजानें विषानें माखून ठेवलेली तरवार अजाणता जेव्हां लेर्टीस हातांत घेतो तेव्हां "अरे सावध, ती तरवार विषारी आहे!" अशी सावधगिरीची सूचना हॅम्लेटला पिटामधून ओरडून देणारे प्रेक्षक कांहीं कमी नसतात. 'तुकाराम' नाटकांत विमानांत बसून तुकाराम जेव्हां वैकुंठाला जातो तेव्हां त्या विमानाच्या दोऱ्या समोर दिसत असतांहि भक्तिभावानें "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल!" असा एक स्वरांत गजर करणारे प्रेक्षक शेकडोंनीं मोजतां येण्यासारखे आहेत. बोलपटांचा प्रेक्षकांवर एवढा प्रक्षोभक परिणाम झालेला पाहावयास मिळत नाहीं.

पुरोगामी विचारसरणी प्रेक्षकांच्या पुढें मांडण्याच्या बाबतींत तर रंगभूमि रुपेरी पडद्याला केव्हांहि हार जाणार नाहीं. ह्या दृष्टीनें रंगभूमीचा भक्तगण मर्यादित आहे, हा रंगभूमीचा फायदा असून रुपेरी पडद्याचे शोकीन अमर्यादित आहेत हें त्याजवरील एक मोठें संकट आहे. 'गर्दीचें मानसशास्त्र' ज्यांना माहीत आहे त्यांना हें सांगावयाला नको कीं गर्दीचें क्षेत्रफळ जेवढें जेवढें मोठें होत जातें तेवढें तेवढें त्याचें बौद्धिक बळ कमी होत जातें. नाटकगृहांतील प्रेक्षकांच्या सामुदायिक बुद्धीची पातळी ही पटगृहांतील प्रेक्षकांच्या बौद्धिक पातळीपेक्षां केव्हांहि अधिकच उंच असते. बोलपट पाहावयाला येणाऱ्या प्रेक्षकाचें सरासरी बौद्धिक वय तेरा ते चौदा वर्षांचें असतें असें अमेरिकेमधील पटनिर्माते मानीत असतात. आणि म्हणून एकादें चित्र तयार करतांना ह्या वयाच्या माणसाचें मानसशास्त्र लक्षांत घेऊन त्या चित्राची रचना करीत असतात. चालतांना दहा ठिकाणीं ठेंचाळणें, खुर्चीवरून कोलमडणें, कांचेचीं भांडीं फोडणें, कारण नसतांना कपडे फाडणें हा रुपेरी पडद्यावरचा अत्यंत

परिणामकारक विनोद म्हणून समजला जातो. असा विनोद रंगभूमीवर दाखविणाऱ्या नाटकमंडळीची काय संभावना होईल याची कल्पनाच करणें बरें. हिंदी चित्रपटांत कासोटा फिटणें आणि शौचाला घाईघाईनें धांवणें हे विनोदाचे अद्‌भुत नमुने अनेक वेळां पाहावयाला सांपडतात. विनोदाचा हा प्रकार कोणत्या वयाच्या प्रेक्षकावर परिणाम करण्यासाठीं योजलेला असतो ह्याची आपण कल्पना करूं शकाल. चार्ली चॅप्लीन किंवा लॉरेल-हार्डी हे बोलपटसृष्टीचे अनभिषिक्त राजे म्हणून समजले जातात. रुपेरी पडद्यावरचा त्यांचा अभिनय रंगभूमीवर करून दाखविण्यासाठीं ते अवतीर्ण होतील तर प्रेक्षकांच्या हातून बेदम मार खाण्याची पाळी त्यांना आल्याशिवाय राहणार नाहीं. रंगभूमि ज्याप्रमाणें प्रेक्षकांच्या बुद्धीला पौष्टिक आहार देऊं शकते, तसा रुपेरी पडद्याला देतां येत नाहीं. अगदीं लहान मुलाला अन्न देतांना त्याचा कसदारपणा जसा अतिशय सौम्य करतात, तसें बोलपटांच्या प्रेक्षकांच्या बुद्धीला सहन होईल आणि सहज पचेल अशाच बेतानें आणि काळजीनें चित्रपट तयार करावे लागतात. सामाजिक किंवा धार्मिक भावना दुखल्याची आरडाओरड बोलपटांचे प्रेक्षक जितक्या तांतडीनें करतात तितके रंगभूमीचे प्रेक्षक करीत नाहींत. एवढ्याचसाठीं नाटकापेक्षां बोलपटावर 'सेन्सॉर' चें नियंत्रण अधिक असतें. हिंदुमुसलमानांचा बेटीव्यवहार आज रंगभूमीवर दाखवतां येईल, पण रुपेरी पडद्यावर दाखविण्याचा तो कोणी प्रयत्न केल्यास हिंदुमुसलमानांचा दंगा झाल्याशिवाय राहणार नाहीं. पार्शी लोक इतके शांत वृत्तीचे, सुशिक्षित, कायद्याला अत्यंत मानणारे आणि भिणारे, पण रुपेरी पडद्यावर एक पार्शी नटी येते आहे असें कळतांच त्यांनीं देखील मागें मुंबई शहरांत दंगा केला; ह्यावरून बोलपटाचा प्रेक्षकवर्ग किती अडाणी, अप्रबुद्ध, प्रतिगामी आणि मागसलेला असतो हें आपल्या लक्षांत येईल. सामाजिक सुधारणेचे बंडखोर विचार रुपेरी पडद्यावर चित्रित करणें जवळ जवळ अशक्यच आहे. ह्या दृष्टीनें रुपेरी पडदा हा रंगभूमीच्या दोनशें वर्षे मागें आहे आणि म्हणून रंगभूमीपेक्षां अतिशय सनातनी आणि प्रतिगामी राहिलेला आहे. बाल।वृद्ध विवाहावर लिहिलेलें 'शारदा' हें नाटक १९०० सालीं लोकप्रिय झालेलें होतें. त्यानंतर समाज किती तरी पुढें गेला. शारदा नाटकांत उपस्थित केलेला प्रश्न समाजांत उरला देखील नाहीं. पण तीन

तपांनंतर तोच विषय 'कुंकू' ह्या बोलपटामध्यें मोठ्या आवडीनें पाहण्यास प्रेक्षकवर्गाच्या झुंडीच्या झुंडी जात होत्या. सासूसुनेच्या झगड्याची अनेक वर्षांमागें शिळी झालेली कढी 'पायाची दासी' ह्या बोलपटाच्या ओगराळयांतून मी आज प्रेक्षकांना पाजतों आहे आणि प्रेक्षकहि ती कढी गटागट पीत आहेत त्यांतलें रहस्य हेंच आहे.

तेव्हां रंगभूमि आणि रुपेरी पडदा ह्यामध्यें महदंतर आहे. नाटक ही एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण कला आहे. बोलपट ही निर्भेळ कला नसून, अनेक कलांच्या यंत्रीकरणाच्या आधारावर उभा असलेला तो धंदा आहे. त्या दृष्टीनें नाटक हा धंदा नव्हे. म्हणून नाटकाला बोलपटापासून भिण्याचें खरोखर यत्किंचितहि कारण नाहीं; बोलपटांचें निर्मितीमध्यें यांत्रिक निर्दोषता भरपूर असली तरी माणसाची बौद्धिक आणि आत्मिक तहान भागविण्याची ताकद त्यांच्यांत अद्यापि तरी आली नाहीं. आणि नाट्याला साहित्यांत जें श्रेष्ठ स्थान आहे तें स्थान बोलपटाला यावज्जन्म मिळणें शक्य नाहीं हें ब्रह्मवाक्य आहे.

* * *

इतकें सांगितल्यानंतर मराठी रंगभूमीला नवचैतन्य मिळून तिला आपल्या सामाजिक जीवनांत मानाचें आणि महत्त्वाचें स्थान कसें प्राप्त होईल ह्याबद्दल विचार करणें जरूर आहे. पुढील वर्षी आपल्या रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव आहे. तो साजरा करण्याचे तुम्ही आम्ही ठरविलें आहे. तो उत्सव खरोखरच आनंदानें साजरा करतां यावा म्हणून तत्पूर्वी रंगभूमीच्या पुनर्घटनेची योजना आपल्याला तयार करून ठेवतां आली तर सोन्याहून पिवळें होणार आहे. ह्याबाबत ज्या कांहीं माझ्या कल्पना आहेत त्या स्पष्टपणें मी आपल्यापुढें मांडतों.

आज महाराष्ट्रांत धंदेवाईक नाटकमंडळ्या परागंदा झालेल्या आहेत. नटनटी बेकार होऊन अन्नान्न करीत हिंडत आहेत. तेव्हां पुष्कळांच्या मतें ह्या दैन्यावस्थेंत असलेल्या नाटकमंडळ्यांना आर्थिक मदत देण्यासाठीं एखादा फंड किंवा एखादी सहकारी पतपेढी काढावी किंवा ह्या दुष्काळी नटांसाठी एकादें बोर्डिंग किंवा एकादें अन्नछत्र काढावें. आपन्नावस्थेंत आलेल्या माणसाला साहाय्य करण्याची इच्छा होणें ही गोष्ट मनुष्याच्या भूतदयेच्या वृत्तीला

धरून आहे. पण माझ्या मतें सध्यांच्या परिस्थितींत ह्या असल्या भूत-दयेवर अभ्रा चढवून तिला फडताळांतच ठेवून द्यावयाला पाहिजे. धंदेवाईक नाटकमंडळ्या ह्या जगभर बंद झालेल्या आहेत, आणि त्या महाराष्ट्रांत बंद पडल्या आहेत किंवा पडत चालल्या आहेत ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. हें आजच्या काळाचें चिन्ह आहे आणि तें आपण ओळखायलाच पाहिजे. महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास धंदेवाईक मंडळ्या बंद पडल्या ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. ह्या मंडळ्यांना टाळीं लागल्याशिवाय रंग-भूमीचा उद्धार होणें शक्य नाहीं अशी माझी खात्री आहे. कोणाला माझें हें बोलणें अमानुष वाटेल, पण गेल्या पन्नास वर्षांचा रंगभूमीचा इतिहास हा माझा पाठीराखा आहे! गेल्या पन्नास वर्षांत कोणत्या नाटकमंडळीनें किंवा नटानें रंगभूमीच्या उद्धारासाठीं म्हणून मुद्दाम विशेष असें काय केलेलें आहे ह्याचा आपण शांत चित्तानें विचार करा! रंगभूमीची प्रत्यक्ष सेवा अशी ह्या मंडळींच्या हातून काय घडली? मराठी रंगभूमि चिरायु व्हावी, मराठी रंगभूमीचा यशोध्वज एकसारखा डौलानें फडकत राहावा म्हणून ह्या मंडळींनीं असा कोणता पराक्रम करून ठेवला आहे? 'आम्ही इतक्या नाटकांचे प्रयोग केले, इतकीं नाटकें पुढें आणलीं, इतक्या नटांना मान्यता दिली, इतके नाटककार निर्माण केले' असें म्हणून भागावयाचें नाहीं. ही रंगभूमीची सेवा नव्हे. घरोघर संतति निर्माण होते ही कांहीं ब्रह्मदेवाची सेवा नव्हे. प्रेक्षकवर्ग हजारों रुपयांनीं तुम्हांला पैसे देत होता म्हणून नाटक-मंडळ्या नाटकें करीत होत्या. मराठी रंगभूमि जर आजपर्यंत कोणी जिवंत ठेवली असेल तर ती महाराष्ट्रांतल्या प्रेक्षकांनीं जिवंत ठेवली, नाटकमंड-ळ्यांनी नव्हे–नव्हे–नव्हे! आणि उद्यां ह्या रंगभूमीचा उद्धारहि करण्याचें सामर्थ्य कोणामध्यें असेल तर ते प्रेक्षकांमध्येंच आहे, पोट भरण्यासाठीं नाटकें करणाऱ्या नाटकमंडळ्यामध्यें नव्हे! खरोखर, महाराष्ट्रीय प्रेक्षकांचें रंगभूमीवर जें अलोट प्रेम आहे त्याला तुलना नाहीं. या प्रेमासाठीं कुबेराच्या औदार्यानें महाराष्ट्रानें आजपर्यंत पाण्यासारखा पैसा खर्च केलेला आहे आणि यापुढें तसा खर्च करण्याची त्याची तयारी आहे; मात्र नालायक आणि कृतघ्न नाटकमंडळ्यांना जगविण्यासाठीं ह्यापुढें महाराष्ट्राची एक कपर्दिकहि खर्च होतां कामा नये!

गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रानें नाटकमंडळयांना अक्षरशः लाखो रुपयांची मदत केली ! ह्या लाखो रुपयांचें ह्या नाटकमंडळयांनीं काय केलें असावें बरें ? ज्या रंगभूमीच्या कृपेमुळें त्यांनीं एवढी अलोट संपत्ति मिळविली त्यांतली एक पै ह्या रंगभूमीच्या कारणीं खर्च करणारा एकादा तरी 'मायेचा पूत' आजपर्यंत निर्माण झाला काय ? सांगा, कोणत्या नाटकमंडळीनें पुढाकार घेऊन नाट्यसाहित्य निर्माण करण्यास, तें छापण्यास किंवा प्रकाशित करण्यास मदत केली ? नाट्यशास्त्राचा आणि नाटकांचा तरुण पिढीनें अभ्यास करावा म्हणून कोणत्या नाटकमंडळीनें एकादें नाट्यग्रंथालय वा वाचनालय उघडून तें सतत चालविण्याचा प्रयत्न केला, किंवा विश्वविद्यालया-मध्यें किंवा एकाद्या शाळेमध्यें शिष्यवृत्त्या किंवा बक्षिसें ठेवलीं ? होतकरू नटांना अभिनयाचें शिक्षण देण्यासाठीं कोणत्या नाटकमंडळीनें एकादें अभिनय-विद्यालय उघडलें ? कोणत्या नाटकमंडळीनें एकादें नाट्यविषयक नियत-कालिक वा वृत्तपत्र चालविण्याचा प्रयत्न केला ? आज पुणें-मुंबई येथें निर्धोकपणें नाटक करावयाला एक नाटकगृह देखील उरलेलें नाहीं. कोणत्या नाटकमंडळीनें कोठल्या गांवीं आजपर्यंत एकादें सार्वजनिक नाटकगृह बांध-ण्याचा कधीं प्रयत्न केला आहे काय ' पुण्यास जें एकुलतें एक नाट्यवस्तु-संग्रहालय आणि नाट्यसंशोधनमंदिर आहे तें नाटकमंडळीच्या मदतीवर निघालेलें नाहीं. आमचे मित्र भाऊसाहेब दातार ह्यांनीं स्वतःच्या पदराला शेंकडों रुपयांची खार लावून या संस्था चालविलेल्या आहेत म्हणून नाट्य-विषयक संशोधनाची महाराष्ट्रांत कांहीं तरी सोय झालेली आहे. स्वतःचें पोट भरण्यापलीकडे कोणत्याहि नाटकमंडळीनें आपल्या कलेचा किंवा धंद्याचा अधिक विचार केलेला नाही. लाखो रुपये ह्यांना मिळाले ते वैयक्तिक इस्टेटी करण्यांत, चैनीत, विलासांत, किंवा बेअकलीपणाच्या उपद्व्यापांत चक्काचूर होऊन गेले. मिळालेल्या संपत्तीचा विनियोग रंगभूमीच्या कल्याणा-साठीं करण्याची तर गोष्ट दूरच राहो पण उलट रंगभूमीची, नाट्यकलेची आणि नाटकधंद्याची आपल्या उडाणटप्पू व्यसनांनीं जर कोणी अधिक बदनामी केली असेल तर ती ह्याच नाटकमंडळयांनीं ! जनतेच्या मनांत नटांसंबंधीं आणि नाट्यासंबंधीं जर कोणी जास्त तिरस्कार उत्पन्न केला असेल तर तो ह्याच नाटकमंडळयांनीं !

* * *

अशा नाटकमंडळ्या आज बंद पडल्या म्हणून शोकानें किंवा दुःखानें कोणालाहि गळा काढण्याचें कारण नाहीं. ज्यांनीं हात राखून पैसे जतन केले आणि आपापलीं घरें बांधलीं असे कांहीं नट मला माहीत आहेत. त्यांनीं रंगभूमीसाठीं किती छदाम खर्ची टाकले ह्याचा स्वतःच्या मनाशीं पडताळा घ्यावा ! एकट्या बालगंधर्वाला महाराष्ट्रानें पस्तीस लाख रुपये दिले—अजूनहि देत आहेत ! ह्या पस्तीस लाखांचें तुम्ही काय केलें त्याचा हिशेब द्या, असें जाहीरपणें महाराष्ट्र बालगंधर्वाला विचारूं शकतो ! कलावंत कलावंत म्हणून जनतेला कुठपर्यंत लुबाडायची तुमची इच्छा आहे ! आणि एवढेंहि करून तुम्ही दिवाळें वाजवून मोकळेच ? व्यक्तिशः बालगंधर्वांना उद्देशून मी हें बोलत आहे असें समजूं नका. एका प्रतिष्ठित नाटकमंडळीचा मालक म्हणूनच केवळ मी त्यांचा उल्लेख करीत आहे. बालगंधर्वांना महाराष्ट्रानें दिलेल्या पस्तीस लाखांपैकीं एकहि रुपया मराठी रंगभूमि चिरस्थायी करण्यासाठीं खर्च झालेला नाहीं. नाटकमंडळ्यांच्या कृतघ्नतेचें ह्यापेक्षां अधिक भीषण उदाहरण मला आपल्याला सांगतां यायचें नाहीं. ह्यामुळें त्या धंदेवाईक नाटकमंडळ्यांच्या आठवणीनें माझें रक्त इतकें जळतें कीं, जुन्या नाटकमंडळ्यांच्या जीर्णोद्धारासाठीं, जुन्या नटाच्या गौरवार्थ निघालेल्या 'थैली'साठीं, किंवा जुन्या नटाच्या शेवटच्या विधीप्रीत्यर्थ वर्गणीसाठीं मी स्वतः तरी एक पै खर्चावयाला तयार नाहीं !

धंदेवाईक नाटकमंडळ्यासारखेंच दुसरें एक संकट महाराष्ट्रांत उद्भवूं पाहात आहे. नाटकमंडळ्या आजकाल चालत नाहींत म्हणून कांहीं पोटभरू लोक 'नाटकमंडळी' हें बदनाम झालेलें नांव टाकून देऊन आणि निराळेंच आधुनिक सोंग घेऊन जनतेच्या डोळ्यांत धूळ टाकूं लागले आहेत. 'मराठी रंगभूमि मेलेली आहे, आम्ही नाट्यसृष्टींत नवीन तंत्र, नवीन मंत्र आणि नवीन यंत्र सुरू करणार आहोंत' अशा भुलथापा मारून ही मंडळी भोळ्या नाट्यप्रेमी प्रेक्षकांची धडधडीत लुबाडणूक करीत आहेत. धंदेवाईक नाटकमंडळ्यांपेक्षां ही ढोंगी बुवाबाजी रंगभूमीच्या हिताला अधिक घातक आहे. कारण लोकांची एकदां फसवणूक झाली कीं प्रामाणिक कार्यकर्त्यांवर त्यांचा पुढें विश्वास बसणें कठिण जाईल. म्हणून रंगभूमीवर उपकार करण्याच्या गर्जना करीत जी मंडळी पुढें येतील त्यांना गचांडी मारून "पुढें चालायला लागा !"

असें जनतेनें निक्षून सांगावें. असल्या लफंग्या दांभिकांना रंगभूमीचें पावित्र्य कळणें शक्य नाहीं.

❀ ❀ ❀

नाटकमंडळ्यांच्या आयुष्याचें 'भरतवाक्य' वाजलें त्याबद्दल मला बिलकूल वाईट वाटत नाहीं. उलट तुम्ही आम्ही हें भरतवाक्य गाण्यांत सामील व्हावयाला पाहिजे. नाटकमंडळ्या जर बंद झाल्या तर मग नाटकें कोण करणार आणि नाट्यकला कशी जिवंत राहणार असें आपण विचाराल! ह्याला उत्तर देण्यापूर्वी 'नाटक' ह्या विषयाकडे पाहण्याची साऱ्या समाजाची दृष्टि बदलावयाला पाहिजे, हें मला आग्रहानें सांगावयाचें आहे. नाटक धंद्यावर एकाद्याला उपजीविका करतां येणें शक्य असलें तरी नाटक हा धंदा मानावयाला मी तयार नाहीं. विद्या फुकट दिली पाहिजे असें जगन्मान्य तत्त्व असतांना विद्या विकून पोट भरणाऱ्या शाळा गल्लोगल्लीं आढळून येत नाहींत काय? म्हणून मानवी जीवनांतील विद्येचें महत्त्व किंवा पावित्र्य थोडेंच कमी झालें आहे? तद्वत् 'नाटक' हा आतांपर्यंत धंदा म्हणून चालविला गेला असला तरी वस्तुतः नाट्य किंवा नाटक हा धंदा नव्हे. नाट्य ही मनुष्याच्या अंगीं उपजत असलेली एक स्वाभाविक प्रवृत्ति आहे. नाट्य हें मनुष्याच्या भावनात्मक आणि बौद्धिक विकासाचें एक साधन आहे. नाट्य ही आधुनिक शिक्षणशास्त्रानें मान्य केलेली एक महत्त्वाची पद्धति आहे. नाट्यप्रवृत्ति ही मनुष्यांत मूलतःच असल्यानें, सामाजिक जीवनांत नाटकाला आपोआपच स्थान मिळालेलें आहे. जेव्हां जेव्हां एकाद्या मानवी समाजाला सामुदायिक आनंद, दुःख किंवा अशाच दुसऱ्या आपल्या भावना सार्वजनिक रीत्या व्यक्त करावयाच्याच असतात त्या वेळीं अशा भावनाविष्काराला नाटका-इतके सामर्थ्यवान् माध्यम दुसरें कोणतेंहि आढळणार नाहीं. नाटकामुळें भावनांचें शुद्धीकरण आणि पवित्रीकरण होतें अशी ॲरिस्टॉटलची उपपत्ति आहे. ग्रीक राष्ट्रांत नाटकाला यासाठींच अतिशय महत्त्वाचें स्थान होतें. जेव्हां जेव्हां म्हणून त्या राष्ट्रांतील लोकांनीं एकादा पराक्रम गाजविलेला असे किंवा एकादा विजय मिळविलेला असे किंवा त्या राष्ट्रांतील लोकांना कांहीं कारणामुळें हर्ष झालेला असे, अथवा एकादा राष्ट्रीय सण त्यांना साजरा करावयाचा असे त्या त्या वेळीं हा सामाजिक सोहळा ते नाटकांचे

प्रयोग करून आणि बघून साजरा करीत असत. सबंध राष्ट्राच्या भावना सामुदायिक रीत्या जागृत करण्याचें सामर्थ्य केवळ नाटकांतच आहे असा ग्रीक लोकांचा विश्वास होता. ग्रीक राष्ट्रांत नाटकांचें जें स्थान होतें तेंच स्थान आपल्या राष्ट्रांत आणि आपल्या समाजांत नाटकाला मिळाल्याशिवाय नाट्यकलेचा उद्धार होणें शक्य नाहीं.

✽ ✽ ✽

नाटक हें राष्ट्रीय भावनांचा सोहळा साजरा करण्याचें सामर्थ्यवान् साधन आहे, ह्या दृष्टीनें आपण नाटकाकडे पाहिलें पाहिजे, म्हणजे धंदेवाईक नाटकमंडळ्या बंद पडण्याचा आणि नाट्यकलेचें नुकसान होण्याचा कांहींच कार्यकारणभाव नाहीं हें आपल्या लक्षांत येईल. आपल्या समाजांत आपण अनेक धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय उत्सव आणि सण साजरे करतों. हे सण साजरे करण्याच्या कामीं यापुढें नाटकांचा सर्रास उपयोग व्हावयाला पाहिजे. एकादी यात्रा असली, एकाद्या देवीचा किंवा देवाचा उत्सव असला, दिवाळी, दसरा, शिमगा असले सण असले, एकादा सप्ताह किंवा संमेलन असलें कीं त्या त्या ठिकाणीं आणि त्या त्या वेळीं निरनिराळ्या नाटकांचे प्रयोग करून आपण आपल्या हर्ष, आनंद, उत्साहादि भावना प्रकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शूर, वीर, पराक्रमी असे जे महापुरुष आपल्या देशांत पूर्वी होऊन गेले असतील, त्यांच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करावयाच्या असतील तर ह्या वीरांच्या चरित्रावर लिहिलेलीं नाटकें करून त्या आपण साजऱ्या केल्या पाहिजेत. प्रत्येक खेड्यांतून, प्रत्येक गांवांतून, शहरांतील प्रत्येक मोहल्यांतून, मोहल्यामधल्या प्रत्येक चाळीतून, प्रत्येक देवळांतून, आखाड्यांतून, शाळेंतून, कारखान्यांतून, शेतांतून नाटकें करणाऱ्या हौशी तरुणांचे संघ निर्माण व्हावयाला पाहिजेत. नाटकगृह असो अगर नसो, पडदे असोत अगर नसोत, तोंडाला लावायला रंग किंवा चिकटावयाला मिशा असोत अगर नसोत, गॅसचे आणि बिजलीचे दिवे असोत अगर नसोत, ह्यांपैकीं एकाहि गोष्टीची परवा न करतां केवळ नाटक करण्याची जबरदस्त हौस ज्यांच्यामध्यें आहे अशी मंडळी समाजांत निर्माण झाली तर एका निमिषार्धांत नाट्यकलेचा उद्धार होईल. नाटक हें राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनाचा एक अपरिहार्य भाग होऊन बसलें पाहिजे ही मुख्य महत्त्वाची गोष्ट

आहे. समाजाचा बौद्धिक विकास आणि जागृति करण्यास, समाजामध्ये मनमोकळेपणाचा आणि खेळाडूपणाचा प्रसार करण्यास, समाजाला हर्ष, आनंद आणि समाधान देण्यास आणि समाजाचें सामर्थ्य, पराक्रम आणि तेज उद्दीपित करण्यास नाटक हें एकच प्रभावी साधन आहे. ही जाणीव ज्या दिवशीं समाजाला होईल त्या दिवशीं रंगभूमीच्या उद्धाराची योजना करण्यासाठीं आपणाला असें निराळें जमण्याचें कारण पडणार आहे. मी म्हणतों असें जर नाटकाचें महत्त्व आपल्या समाजाला पटलें तर प्रत्येक गांवांत जशी चावडी असते, धर्मशाळा असते, विहीर असते, शाळा असते, दवाखाना असतो किंवा देऊळ असतें, तसें एक सार्वजनिक नाटकगृह असण्याची जरूरी लोकांना भासल्याशिवाय राहणार नाहीं. हें सार्वजनिक नाटकगृह गांव-कऱ्यांनीं आपापसांत वर्गणी जमा करून बांधलेलें असावें. त्यावर मालकी साऱ्या गांवाची असून त्याची व्यवस्था पंचांनीं पहावी. म्हणजे धार्मिक भावनेनें ठराविक वेळीं गांव जसें देवळांत जमतें, तसें एकाद्या ठराविक वारीं तें ह्या नाटकगृहांतहि जमत जाईल. मात्र सदर नाटकगृहाचें पावित्र्य देवळाच्या पावित्र्याप्रमाणें राखलें गेलें पाहिजे. देवळांत जसा तमाशा होऊं शकत नाहीं तसें ह्या सार्वजनिक नाटकगृहांचा उपयोग नाटकाव्यतिरिक्त इतर कोणत्याहि कामासाठीं होतां कामा नये. सार्वजनिक नाटकगृहें जर गांवोगांव आपल्या देशांत होतील तर नाट्यप्रयोग करण्यास आज नाटकगृहाची जी आपणाला वाण पडलेली आहे तशी पडणार नाहीं. कारण एका काळीं नाटकगृहें असलेल्या ज्या गृहांचें रूपांतर आज सिनेमागृहांत झालेलें आहे तीं नाटकगृहें व्यक्तीच्या मालकीचीं होतीं म्हणून स्वतःच्या फायद्यासाठीं नाट्यकलेचा गळा कापावयाला ह्या कृतघ्न मालक लोकांना कांहींच दिक्कत वाटली नाहीं. हीं नाटकगृहें जर सार्वजनिक मालकीचीं असतीं तर त्यांचें सिनेमागृहांत रूपांतर करण्याची कोणाची छाती झाली असती काय ?

* * *

आज पाश्चात्य देशात हौशी नटांनी केलेल्या नाट्यप्रयोगांचा जमाना सुरू झालेला आहे. हे हौशी नट तिकडच्या विद्यालयांमधून तयार होतात. कारण त्या देशांतील विश्वविद्यालयांत आणि शाळांत नाट्यशास्त्राचा आणि नाटकांचा अभ्यास करण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आलेला आहे. तेथें

तरुण लेखकांना नवीन नवीन नाटकें लिहिण्यास उत्तेजन देण्यांत येतें. आणि अशा नाटकांच्या प्रयोगाच्या सार्वजनिक चढाओढी वेळोवेळीं ठेवण्यांत येतात. आपल्या इकडील विद्यालयीन जीवनांत आणि अभ्यासक्रमांत असा उपक्रम सुरू व्हावयाला पाहिजे. प्रत्येक शाळेला आणि कॉलेजाला खेळावयाचें क्रीडांगण असणें आवश्यक आहे हें जसें समजतात, तसें त्या शाळेला आणि कॉलेजला एक स्वतंत्र नाटकगृह असलें पाहिजे ही आधुनिक शिक्षणशास्त्राची दृष्टि आहे. इतिहासाचा आणि वाङ्मयाचा अभ्यास करण्याच्या कामी अशा नाटकगृहांचा अतिशय उपयोग होईल. शाळाकॉलेजांतील विद्यार्थी आधींच बिघडले आहेत. त्यांत प्रत्येक शाळाकॉलेजांत एक एक नाटकगृह उघडलें म्हणजे शिक्षणाचा निकालच लागला अशी कांहीं 'संस्कृति संरक्षक' ओरड करतील तिकडे आपण संपूर्ण दुर्लक्ष करावयाला पाहिजे.

* * *

समाजजीवनांत अशा तऱ्हेनें नाटकाला महत्त्वाचें स्थान मिळालें म्हणजे आपल्या रंगभूमीच्या सुधारणेच्या मार्गांत आज जे आगंतुक अडथळे आलेले दिसतात ते आपोआप नाहीसे होतील. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीं कराव्यात काय हा प्रश्न आज आपल्याकडे निष्कारण वादाचा होऊन बसलेला आहे. वास्तविक ह्या प्रश्नावर मतभेद असण्याचें कांहींच कारण नाहीं इतकी ती गोष्ट स्वयंसिद्ध आहे. म्हणे कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावींत काय ? स्त्रिया रंगभूमीवर गेल्या तर त्यांची नीति बिघडेल काय ? खरें पाहतां, रंगभूमीच्या दृष्टीनें हे प्रश्न अगदीं अनवश्यक आहेत. नाटकांतील स्त्रीचें काम स्त्रीनें केलें पाहिजे, पुरुषानें करतां कामा नये ही एकच गोष्ट रंगभूमीच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. मग ती स्त्री कुलीन असो अगर कुलीन नसो, त्याच्याशी प्रेक्षकांना कांहीं एक कर्तव्य नाहीं. स्त्रीभूमिका करणारा पुरुष नट हा कुलीन आहे, लेकावळा आहे, कां अक्करमाशा आहे ह्याची समाजानें जर कधीं पर्वा केली नाहीं तर तीच स्त्रीभूमिका करावयास स्त्री पुढें आल्याबरोबर तिच्या कुलीनत्वाबद्दल नसत्या चांभारचौकशा करण्याचा प्रेक्षकांना काय अधिकार आहे ? वंशशास्त्राच्या नियमानुसार ज्याला लग्न करावयाचें असेल त्यानें बायको निवडतांना हवें तर तिच्या कुलीनत्वाची चौकशी करावी आणि मिळालेली माहिती खात्रीपूर्वक आहे असें स्वतःचें समाधान करून घेऊन

तिच्याशीं पाहिजे तर लग्न करावें. नाटक पाहवयाला जाणाऱ्या माणसानें ती अभिनय उत्तम करते आहे किंवा काय ह्याच्या पलीकडे नसत्या चावट-चौकशा करण्याचें कांहींच कारण नाहीं. रंगभूमीवर स्त्रीपुरुष एकत्र आल्यानें स्त्रिया बिघडतात (पुरुष हे दुर्गुण–*Proof* असल्यानें त्यांचा विचार करण्याचें कारणच उरत नाहीं) अशी जी हाकाटी उठवण्यांत येते ती लुच्चेगिरीची आहे. स्त्रीपुरुष एकत्र ज्या ज्या ठिकाणीं येतात तेथें ते बिघडण्याचा जितका संभव असतो, तितका ते सुधारण्याचाहि संभव असतो. म्हणजे एकत्र आल्यानें स्त्रीपुरुषांचा परस्परांशीं परिचय होतो, आणि ह्या परिचयाचें रूपांतर, प्रेमांत आणि विवाहांत होतें आणि त्यायोगें समाज पर्यायानें सुखीच होतो. हें जर स्त्रीपुरुषांचें बिघडणें असेल तर समाज यापुढें अशा अर्थी जास्तच बिघडत गेला पाहिजे. संमिश्र शिक्षणसंस्था, इस्पितळें, गिरण्या येथें स्त्री-पुरुष एकत्र आल्यानें जें कांहीं होतें, त्यापेक्षां जास्त भयंकर असें रंगभूमीवर कांहीं एक घडत नाहीं. अर्थात् नाटकांना सामाजिक सोहळ्याचें स्वरूप प्राप्त झाल्यानंतर स्त्रीपुरुष निःसंकोचपणें नाट्यप्रयोगांत कामें करूं लागतील आणि त्यामुळें रंगभूमीला आहे त्यापेक्षां अधिक पवित्र आणि सोज्वल स्वरूप येईल ह्यांत संशय नाहीं. पुण्यामध्यें मागें निव्वळ मुलींनीं एक नाट्यप्रयोग केला होता. त्या वेळीं ह्या मुली नाटकांत आणि सिनेमांत पळून जातील असा गिल्ला पुण्याच्या जरोपुराण्या सनातन्यांनीं केला होता. वास्तविक तसें अनिष्ट कांहीं एक झालें नाहीं. शाळा कॉलेजांत हल्लीं संमिश्र प्रयोग होतात म्हणून ही मंडळी दरवर्षी पुण्यांतल्या एका आहिताग्नीच्या होळीसमोर जमून सार्वजनिक शंखध्वनि करीत असतात. ह्या मंडळींनीं शंकडों शिमग्यांचें बळ एकत्र करून जरी ह्यापुढें पांचजन्य केला तरी त्यांनीं पक्कें समजून असावें कीं उद्यांच्या नवीन मराठी रंगभूमीवर स्त्रीपुरुष एकत्र आल्याशिवाय कधींहि राहणार नाहींत !

* * *

मराठी रंगभूमि आणि नाट्य ह्यांना सद्यःपरिस्थितींत झालेल्या रोगाचे निदान करून त्यावर औषधयोजना कोणती करावी ह्याबद्दलचे मी माझे विचार एकाद्या वैद्याच्या निष्ठुर निर्भिडतेनें आपल्यापुढें मांडले. मराठी रंगभूमीचें भवितव्य अत्यंत उज्ज्वल आहे ह्याविषयीं व्यक्तिशः माझी पूर्ण

खात्री आहे. महाराष्ट्रांत नाट्य केव्हांहि मरणार नाहीं ह्यावर माझा दृढ विश्वास आहे. कारण तुम्हां आम्हां महाराष्ट्रीयांच्या स्वभावांत जन्मतःच मुळीं नाट्य भरलेलें आहे. जो मनुष्य परिस्थितीला शरण जातो त्याच्या आयुष्यांत नाट्य असूं शकत नाहीं. महाराष्ट्रीय हा आपल्या परिस्थितीला आजपर्यंत केव्हांहि शरण गेला नाहीं असा पूर्वीचा इतिहासाचा दाखला आहे. महाराष्ट्रावर परकीयांचे एवढे जबरदस्त हल्ले झाले, महाराष्ट्र परकी सत्तेचा अनेक वेळां अंकित झाला—आजहि तो दास्यांतच आहे; तथापि दुसऱ्याचा तो ताबेदार असला, तरी तो मनानें, वृत्तीनें आणि भावनेनें दुसऱ्याला केव्हांहि शरण गेलेला नाहीं. महाराष्ट्राचा कुर्रा आणि स्वाभिमान हे गुण अजिंक्य आहेत. वाटेल त्या परिस्थितींत असलों तरी स्वतःचें वैशिष्टय राखण्यासाठीं तुम्ही आम्ही महाराष्ट्रीय लोक झगडत राहतों, म्हणूनच तुमच्या आमच्या जीवनांत नाट्याला स्थान आहे, वाव आहे आणि महत्त्व आहे. कारण नाट्य म्हणजे झगडा, खटक, झोंबाझोंबी अन् युद्ध! कादंबरींतलीं पात्रें प्रवाहपतिताप्रमाणें परिस्थितीच्या ओघांत वहात जातात. नाटकांतलीं पात्रें आपल्या परिस्थितीशीं झगडत राहतात हा नाटक आणि कादंबरींतील फरक आहे. जोंपर्यंत महाराष्ट्राची झगडण्याची वृत्ति शाबूत आहे, तोंपर्यंत महाराष्ट्रांत नाट्यकला अमर आहे!

मात्र रंगभूमीला आणि नाटकांना राष्ट्रीय आणि सामाजिक महत्त्व येईल तेव्हांच नाट्यकलेचा उत्कर्ष होईल! आज आपल्या समाजाला स्वतःच्या संस्कृतीचा, साहित्याचा, कलांचा आपल्या आवडीप्रमाणें अभ्यास किंवा पुरस्कार करण्याला मोकळीक नाहीं. उद्यांच्या बदलणाऱ्या नव्या जगामध्यें स्वतःच्या समाजाची आणि जीवनाची अंतिम मानवी ध्येयानुसार पुनर्घटना करण्याचा अधिकार जगांतील इतर स्वतंत्र राष्ट्राप्रमाणें तुम्हां आम्हांला नाहीं. कारण आपला देश पारतंत्र्यांत आहे. परकी सत्तेनें आपली भाषा, आपली विद्या, आपली संस्कृति, आपली कला आमच्यावर जबरदस्तीनें लादून राष्ट्राच्या नैसर्गिक विकासाची मुस्कटदाबी केलेली आहे. पारतंत्र्यांत असेपर्यंत आपल्या कोणत्याहि विद्येला किंवा कलेला राष्ट्रीय महत्त्व येणें शक्य नाहीं. म्हणून स्वातंत्र्यसंपादनाचा झगडा आज देशांत चाललेला आहे! हें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आपणाला सर्वस्वाचें दान द्यावें लागेल,

मोठमोठे त्याग करावे लागतील ! राष्ट्र स्वतंत्र होईल तेव्हांच न्यायाच्या, माणुसकीच्या आणि समानतेच्या पायावर उद्यांच्या भारतवर्षांतील समाजाची पुनर्घटना होईल. प्रत्येक समाजाला आणि प्रांताला आपल्या भाषेचा, साहित्याचा, संस्कृतीचा आणि कलेचा आपापल्या इच्छेप्रमाणें विकास आणि उत्कर्ष करून घेण्यास त्याच वेळीं खरा वाव मिळेल ! म्हणून आजच्या घटकेला मराठी रंगभूमीच्या भक्तांनीं त्याच भाग्यशाली ' उद्यां 'ला खेंचून जवळ आणण्यासाठीं आपलें सर्वस्व खर्च करायला पाहिजे, ह्यापेक्षां आपल्याला शेवटीं मी दुसरें काय सांगणार !

ललित वाङ्मयाची कैफियत

वाङ्मय परिषद, बडोदें

१९४४

*स्वागताध्यक्ष देशपांडे, ज्येष्ठ साहि-
त्यिक आणि साहित्यप्रेमी बंधुभगिनी,*

वाङ्मय परिषदेच्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान फिरून आपण मला दिलेंत याबद्दल मी तुमचा आभारी आहें. आपल्या परिषदेच्या चवथ्या संमेलनाचा मी अध्यक्ष होतों हें आपण विसरलां नसालच. नाटकामध्यें नटाचें काम उत्तम झालें म्हणजे त्याला 'आणखी एकदा'चा आग्रह श्रोत्यांकडून होतो. माझें या परिषदेमधलें पूर्वीचें काम फारच उत्तम वठलें म्हणून मात्र तुम्ही मला या वेळीं पाचारण केलेलें नाहीं. या वेळीं मी येथें आपल्याला दिसतों आहे तो केवळ योगायोगानें. आपण या अधिवेशनासाठीं खांडेकर यांची निवड केली होती. पण ऐन वेळीं त्यांच्या प्रकृतीनें त्यांना दगा दिला. त्यामुळें धीर सुटून तुम्ही हवालदील झालांत आणि माझ्याकडे धांवत आलांत. आणि मला सांगितलेंत कीं, काम असें असें ढांसळते आहे. मी म्हणालों, काळजी करूं नका; आपण येतों. माझा हा आपला स्वभावच आहे. कोणाचें काम

अडते आहे असें कोणी मला सांगितलें कीं खांदा द्यायला मी नेहमीं सज्ज असतो. त्यांतून आपलें हें काम तर बोलून चालून साहित्याचें. मागें मीं एकदां केलेलें. मग मी अशा वेळीं तें कसें अडून देईन बरें! माझी प्रकृति बहुधा चांगली असते. ही गोष्ट फायद्याची आहे का तोटयाची आहे हें मला सांगतां येत नाहीं. पण खांडेकरांप्रमाणें मला प्रकृतीची सबब कांहीं सांगतां येत नाहीं. कारण सांगितली तरी तिच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. उत्तम प्रकृतीमुळें अशी पंचाईत होते हें मला माहीत नव्हतें.

* * *

मी मागें आलों त्या गोष्टीला सात वर्षें होऊन गेलीं. सात वर्षांत जगांत केवढा तरी फरक झालेला आहे. बडोद्यापुरतेंच बोलावयाचें झाल्यास गेल्या वेळी माझ्या आवतीं भोंवतीं उत्साहानें वावरणारे तरुण आणि तरुणी आतां आपले 'सुखाचे संसार' थाटून बसलेले आहेत. त्या वेळच्या उत्साही साहित्यिकांचा लेखन-उत्साह पूर्वींपेक्षां अधिक वाढलेला मला दिसत आहे. ज्येष्ठ साहित्यिकांची कीर्ति अद्यापिही आपापल्या लेखनक्षेत्रांत पूर्वीच्याच तेजानें तळपत आहे. माझ्यामध्यें गेल्या सात वर्षांत काय फेरबदल झालेला आहे हा आपण डोळ्यानें पाहात आहांच! भौगोलिक बदल नजरेला सहज दिसूं शकतो. आतां माझ्या अंगांतील गुणावगुणांत काय बदल झाला आहे तो माझ्याच तोंडानें मी काय सांगू? मी स्वभावानें जरा लाजरा असल्यानें स्वतःविषयीं सांगणें मला जड जातें!

* * *

गेल्या वेळी मी जेव्हां येथें आलों होतों तेव्हां आपले महाराज सर सयाजीराव होते. ते आज हयात नाहींत ही आठवण मला विशेष जाचते आहे. प्रगतीचा आणि विद्येचा एवढा पुरस्कर्ता राजा या भारतांत फिरून लौकर होणें मुष्कील. गेल्या पांच वर्षांत जग महायुद्धाच्या वणव्यांत अगदीं होरपळून निघालेलें आहे. मानवजात ही आज एका भयंकर दिव्यामधून जात आहे. उद्यांचें जग कसें उगवणार हें कळत नाहीं. हें कोणाला सांगतां येणार नाहीं. अशा भीषण वातावरणांत साहित्याची परिषद भरविणें बरोबर आहे काय? मघांशीं कोणी त्याबद्दल शंका व्यक्त केली. पण त्याबद्दल ओशाळे होण्याचें कांहींच

कारण नाहीं. साहित्य हें एक जीवनांतलें सामर्थ्य आहे असें मानणारी आपण सारी मंडळी आहोंत. उद्यां जगाची जी पुनर्घटना होणार आहे त्या पुनर्घटनेला साहित्याचें आणि साहित्यिकांचें साहाय्य लागणार आहे, या गोष्टीवर आपणा सर्वांचा विश्वास आहे, साहित्य परिषद ही कांहीं रिकामटेकड्या मंडळींच्या मोजेची मजलस नाहीं. हें एक कर्तव्य आहे. आणि विनोदानेंच म्हणावयाचें झाल्यास महायुद्धानें जगांतल्या इतर भानगडी थोड्याच थांबल्या आहेत? सगळ्यांचें जें कांहीं आहे तें अगदी व्यवस्थित चाललें आहे. कोणाचें कांहीं एक अडलेलें नाहीं! मग साहित्यानेंच तेवढें काय घोडें मारलें आहे? कवि हार्डी म्हणतो की, जगावर केवढीहि संकटें आलीं तरी माणसें दोन गोष्टी आपल्या करीतच असतात. एक कृषिकर्म आणि दुसरें प्रियाराधन! हें अगदीं खरें आहे. 'न भूतो न भविष्यति' अशा स्वरूपाचें महायुद्ध आज जगांत चाललेलें आहे. तरी जगांतलें कृषिकर्म आणि प्रियाराधन कांहीं थांबलेलें नाहीं. साहित्यामध्यें कृषिकर्म आणि प्रियाराधन या दोन्ही क्रिये-मधलें गोड समाधान माणसाला मिळतें. म्हणून महायुद्धानें साहित्यामध्येंहि खंड पडूं नये!

* * *

मी ललितलेखक आहें. मी ललितलेखन करतों एवढेंच नव्हे तर मी ललितलेखनाचा पुरस्कार आणि प्रचार करतों. ललितवाङ्मय हें खरें राष्ट्रीय वाङ्मय आहे आणि ललितलेखक हा जीवनाचा भाष्यकार आहे असें मी साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून अनेक वेळां सांगितलेलें आहे. जीवनाच्या युद्धांत झगडण्याचें समाजाच्या हातामधलें साहित्य, एक सामर्थ्य-वान् शस्त्र आहे असें मी ओरडून सांगत आलेलों आहें. आजच्या प्रसंगीं तरी मी ललितवाङ्मयाखेरीज दुसरें काय बोलणार? 'चांभाराला आपल्या कातड्याचें कौतुक' अशी इंग्रजी भाषेंत म्हण आहे. बोलतां बोलतां मला एका चांभाराची आठवण झाली. एक चांभार माझ्या घरासमोर आला होता. त्याला दुरुस्तीसाठीं मी माझा बूट दिला. तो म्हणाला, 'याला नवीन कातडें लागेल!' मी म्हणालों, 'घेऊन ये!' जायच्या वेळीं रस्त्यावर पडलेल्या सामानाकडे बोट दाखवून तो मला म्हणाला, 'साहेब, मी आतां जाऊन येतों. माझ्या या सामानाकडे जरा बघा!' त्याचें सामान तें काय? फाटक्या

कातड्याची ती कंथा ! पण ती देखील दुसऱ्यानें सांभाळण्याइतकी मोलाची त्याला वाटली. स्वतःच्या जिनसांकडे आपलेपणानें बघण्याची चांभाराची जर ही दृष्टि, तर माझ्यासारख्या ललितलेखकाची ललितवाङ्मयाकडे बघण्याची दृष्टि केवढी जपणुकीची असेल ! मला आवडणारें ललितवाङ्मय माझ्या परीनें मला सांभाळण्यासाठीं प्रयत्न करायलाच पाहिजे. आणि तशी पाळी आली आहे म्हणूनच मी म्हणतों. मुंबईला साहित्यसंमेलन भरलेलें होतें तीन महिन्यांपूर्वीं. आमचे विद्वान् मित्र प्रा. जोग होते त्याचे अध्यक्ष. त्यांनीं आपल्या भाषणांत ललितवाङ्मय हाच विषय घेतला होता. त्यांनीं ललितवाङ्मयाचें जें वर्णन केलें तें ऐकून पुष्कळशा ललित-लेखकांना चांगलाच धक्का बसला. मला देखील बसला ना ! ते म्हणाले. "तुम्ही ललितलेखकांनीं स्वतःच्या धंद्याविषयीं आणि स्वतःविषयीं भलत्याच कांहींतरी कल्पना करून घेतल्या आहेत; त्या अगोदर तुम्ही आपल्या डोक्यांतून काढून टाका. 'दिक्कालांतून आरपार आमुची दृष्टि पहाया शके ! ' अशी तुमच्या 'केशवसुतां'नीं कितीही घमेंड मारली, किंवा हीं 'निःश्वसितें, कोण सोडितें, विचारुनी–भिऊनी त्याला, पुढें करा हा कर आपुला ! ' असे रे. टिळकांनीं स्वतःचें नातें खुद्द परमेश्वरापर्यंत जरी नेऊन भिडविलें असलें, तरी हा तुम्हा ललितलेखकांचा सारा कांगावा आहे. तुमच्या धंद्याची तुम्ही फाजील पब्लिसिटी करूं नका ! देशाला आग लागली आहे, समाजांत वणवा पेटलेला आहे, जनता झोंपलेली आहे तेव्हां ही आग किंवा हा वणवा आम्हांला विझवावयाचा आहे, जनतेला आम्हांला खडबडून जागें करायचें आहे, आम्हांला केशवसुताप्रमाणें एक 'तुतारी' फुंकावयाची आहे,—अशी फुंकावयाची आहे कीं ती ऐकून स्मशानांतील प्रेतें देखील खडबडून जागीं होतील, हीं नाटकी भाषणें बडबडत तुम्हीं जे इतकीं वर्षें सैरावैरा नाचत आहांत आणि जनतेच्या डोळ्यांत धूळ टाकीत आहांत, तें ढोंग आतां बंद करा. मेहेरबान ललित लेखक मंडळी, म्हटलें हीं कामें किंवा हे धंदे तुमचे नाहींत ! तें करण्याचें सामर्थ्य तुमच्यांत नाहीं. तें तुमच्या लेखनाचें ध्येय नव्हे. इकडे या. नीट इथें बसा. तुम्ही कोण आहांत हें मी तुम्हांला सांगतों. तुमच्या लिहिण्याचा हेतु काय असतो हें मी तुम्हांला सुनावितों." असा दम देऊन प्रा. जोग यांनी 'आम्ही कोण' तें आम्हांला नीट बजावून सांगितलें ! ते म्हणाले, एकादा

पेटीवाला, पखवाज्या, सतारवाला, सारंगीवाला, गवई किंवा कथ्थक नाच्या जसा असतो आणि तो जसा पेटी, पखवाज, सतार वाजवून किंवा गाऊन नाचून श्रोत्याला आनंद देत असतो तसे तुम्ही ललितलेखक आहांत! तुमचें काम वाचकांना नुसता आनंद द्यायचा आणि त्यांचें मनोरंजन करावयाचें. नीट कान उघडून आणि बुबळे स्थिर ठेवून ऐका. ऐकतां ऐकतां बेशुद्ध पडूं नका! समजलें ना तुम्हांला? तुमचा धंदा लोकांचें नुसतें मनोरंजन करावयाचें. मग आतां यापुढें ध्येयाची आणि तत्त्वज्ञानाची फाजील भाषा करूं नका बघूं! तें काम प्रत्यक्षपणें तुमचें नव्हे! तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, निबंधकार, इतिहासकार यांच्यासारख्या विद्वान् पंडितांचीं कामें आहेत समाजाचें मार्गदर्शन करण्याचीं! तें त्यांचें प्रत्यक्ष कार्य आहे! तें त्यांचें सामर्थ्य आहे! त्यांच्या रांगेला आणि त्यांच्या मांडीला मांडी लावून स्वतःचा भाव निष्कारण वाढवून घेतां काय रे लुच्चांनो! उठा येथून आणि पेटाड्यांच्या आणि तबलजींच्या ओळीला नीट जाऊन बसा बघूं! असा चेहेरा वाईट करूं नका. तुमचें म्हणणें काय कीं, या नाटकी, नाचणाऱ्या आणि गाणाऱ्या मंडळींत बसावयाला तुम्हांला लाज वाटते! त्यामुळें तुमचा अपमान होतो. पण लक्षांत ठेवा हल्लींचें युग आहे समतावादाचें! आतां महाराज काय किंवा मजूर काय! सगळ्यांचा एकच दर्जा! तेव्हां हा सारा शिष्टपणा सोडा आणि तुमच्या दर्जाला शोभणाऱ्या जागेवर जाऊन बसा!

अशा तऱ्हेनें आम्हा ललितलेखकांची प्रा. जोगांनीं चांगलीच संभावना केली! आम्ही महाराष्ट्रांतले ललितलेखक अलीकडे स्वतःला काय वाटेल तें समजूं लागलों होतों! वाङ्मयामध्यें कांहीं पुरोगामी भाग असतो, कांहीं प्रतिगामी भाग असतो, याची चर्चा करावयाला देखील आम्ही सुरुवात केली होती. पण प्रा. जोग यांनीं आमच्या चांगलीच कानशिलांत लगावली! आणि आम्हांला 'झडझडून' बजावलें कीं, लेकहो, हें पुरोगामी–पुरोगामी काय रे बडबडता! काय प्यालातबिलांत काय रे! संगीत पुरोगामी असतें काय रे? नाचणें पुरोगामी असतें काय? मग तुमचें ललितवाङ्मय पुरोगामी कुठून असणार! गेल्या दहापांच वर्षांत ललितलेखकांनीं स्वतःच्या अंगावर पुरोगामित्वाच्या ज्या 'टिळे टोपी माळा' घालून घेतल्या होत्या त्या हिसकावून घेऊन त्यांच्या गळ्यांत सतार, सारंग्या आणि बाजाच्या पेट्या

अडकविण्याचा प्रयत्न प्रा. जोगांनीं मुंबई येथें केला. ढोंगी माणसाचा बुरखा हिसकावून त्याचें स्वरूप समाजाला दाखविणें हें मोठें पुण्यकृत्य समजलें जातें. ललित लेखकांचें वर्णन करतांना आपण असेंच एकादें पुण्यकृत्य करीत आहोंत अशी प्रा. जोगांची समजूत झाल्यास आश्चर्य नाहीं. प्रा. जोग हे माझे मित्र आहेत. ते मोठे सालस आणि सज्जन आहेत. ते सहसा बोलत नाहींत. असें असूनहि शेवटीं बोलायची पाळीच जेव्हां त्यांना आली तेव्हां ते हें 'असें' बोलले! फार दिवस मुलगा बोलत नाहीं म्हणून त्याची आई हिरमुष्टी होती. शेवटी चिरंजीव एकदांचे बोलले. ते काय बोलले ही गोष्ट प्रसिद्धच आहे. जोगांचें बोलणें देखील मला असेंच वाटतें. जोगांसारखा हंसतमुख आणि सालस माणूस कोणाबद्दल वाईट बोलणें तरी शक्य आहे काय? पण ललितलेखकांबद्दल मात्र जोग फारच वाईट बोलले! त्यांनीं ललितवाङ्मयाचें खरेंखुरें वर्णन केलें नाहीं--पण ललितवाङ्मयाची खरीखुरी बदनामी केली! म्हणून आम्ही कोण आहोंत आणि आमचा धंदा काय आहे हें ललितलेखकांच्या वतीनें जोगाना समजावून सांगणें हें मी माझें कर्तव्य समजतो आणि तेंच मी या प्रसंगीं करणार आहें.

* * *

आम्हां ललितलेखकांना ही टीका कांहीं नवीन नाहीं. संस्कृतिसंरक्षक नांवाचा जो एक प्राणी अलीकडे जिराफाप्रमाणें मान उंच करून किलकिल्या डोळ्यांनीं आमच्याकडे पाहूं लागला आहे तो देखील पुष्कळ दिवस असेंच म्हणतो आहे. वाङ्मयांत पुष्कळ प्रकार असले तरी सामान्यपणें शास्त्रीय वाङ्मय आणि ललितवाङ्मय असे वाङ्मयाचे दोन भाग कल्पिले जातात. ज्ञान आणि विज्ञान हें शास्त्रीय वाङ्मयांत जमा होतें तर काव्य, नाट्य, कथा या गोष्टी ललितवाङ्मयांत समाविष्ट होतात. ज्ञानाबद्दल मनुष्यजातीला एकंदरींत आदर फार! ज्ञानी माणूस तर ज्ञानाचे पवाडे गातोच गातो, पण अडाणी माणूस देखील ज्ञानाचे गोडवे मिटक्या मारीत गातो! पंडित मंडळींनीं अशा तऱ्हेचें वातावरण समाजांत निर्माण करून ठेविलेलें आहे. ज्ञान हें गहन असतें, तें कठिण असतें, तें कर्कश असतें, तें रुक्ष असतें. त्यासाठीं तपश्चर्या करावी लागते, त्यासाठीं रात्रीचे दिवस करावे लागतात, त्यासाठीं हाडांचीं काडें करावीं लागतात, त्याकरितां वेदाभ्यासजडता अंगीं आणावी

लागते---याही गप्पागोष्टी समाजाच्या कानींकपाळीं आजपर्यंत पडत आलेल्या आहेत. त्यामुळें जें गहन नाहीं, जें कठिण नाहीं, जें कर्कश नाहीं, किंबहुना जें मनोरंजक आहे, जें आल्हादकारक आहे, ज्यानें मनोविनोदन होतें, ज्यानें करमणूक होते, त्याबद्दल साहजिकच गैरसमज वाढत गेला. निदान पंडिती परंपरेनें तो एकसारखा वाढवीत नेला. मोठी गंमतीची गोष्ट आहे की, ज्या गोष्टी सामान्य समाजाला कळूं शकत नव्हत्या त्याबद्दल समाजाला आदर वाटूं लागला आणि ज्या गोष्टींमुळें समाजाचें मनोविनोदन होत असे, समाजाचे श्रम हलके होत असत त्याबद्दल मात्र समाजाला अनादर वाटूं लागला. जें कळत नाहीं तें उच्च आणि जें सहज कळतें तें नीच अशी वाङ्मयाची फारकत करण्यांत आली. महाराष्ट्रांत आतांपर्यंत ज्या साहित्यपरिषदा भरत होत्या, त्यामध्यें केवळ ललितवाङ्मयाची थोडीच चर्चा होत होती? गंभीर वाङ्मयासंबंधीं विचारहि त्यामध्यें पुष्कळ होत होता. पण ललित-वाङ्मय हें साहजिकच जनसमाजाला आवडणारें असल्यानें, साहित्यसंमे-लनाच्या अध्यक्षस्थानी ललितलेखकच बहुधा निवडले जात. आणि त्यामुळें ललितवाङ्मयामधले प्रश्न प्रामुख्यानें त्यांत चर्चिले जात. पारंपरिक ज्ञानाचें पुजारी यामुळें चिडून गेले. आणि त्यांनीं अलीकडे अलीकडे 'उच्च वाङ्मय परिषदा' भरविण्यास सुरुवात केलेली आहे! पण गंमतीची गोष्ट अशी कीं, ललितवाङ्मयाला शिव्या देण्यापलीकडे अधिक उच्च दर्जाचें कार्य या उच्च वाङ्मय परिषदांमधून होत नाहीं. या उच्च वाङ्मयवाल्यांच्या दृष्टीनें आज तुम्ही या ठिकाणीं भरवीत असलेली ही वाङ्मय परिषद 'नीच वाङ्मय परिषद'च आहे हें लक्षांत ठेवा! एवढे तुम्ही थोर थोर साहित्यिक आणि सभ्य स्त्री-पुरुष या ठिकाणीं जमून वाङ्मयाची चर्चा करणार आहांत! तुमच्या चर्चेचे विषयहि 'ललित' असतील! आणि त्यांतून माझ्यासारखा एक ललित लेखक तुम्ही या अधिवेशनासाठीं अध्यक्ष म्हणून निवडलेला आहे! मग काय विचारू नका! मी तुम्हांला नक्की सांगतों कीं, संस्कृति संरक्षकवाले तुमच्या या परिषदेला 'नीच वाङ्मय परिषद' समजल्याविना राहणार नाहींत! तुमची परिषद ही नीच वाङ्मय परिषद आहे कां? याचा विचार तुम्हीच करा! ललितवाङ्मयाचें खरें स्वरूप काय आहे, ललित-

लेखकाचें सामर्थ्य केवढें मोठें आहे हें आपण समजावून आणि बजावून सांगितल्यावांचून हें ' उच्च वाङ्मयवाले ' आतां ताळयावर येणार नाहींत !

ललितवाङ्मयाकडे पाहण्याचा वेदाभ्यासजड पंडितांचा दृष्टिकोण किती मूर्खपणाचा आहे हें दाखविण्यासाठीं गडकऱ्यांनीं जें एक अत्यंत विनोदी असें ' दीडपानी नाटक ' लिहिलेलें आहे त्याची मला या ठिकाणीं आठवण होते. सध्यांच्या ' संस्कृति संरक्षक मंडळा 'चे अध्यक्ष होण्यास लायक असे कोणी एक तर्कालंकारचूडामणी प्रोफेसर कोटिबुद्धे म्हणून होते. सहस्रबुद्धे नव्हे--- कोटिबुद्धे ! त्यांचा आठ दहा महिन्यांच्या वयाचा चिरंजीव बाबू रात्रींच्या वेळीं भोकाड पसरून रडत असतांना प्रो. कोटिबुद्धे हे आपल्या गंभीर वाणीनें त्याची समजूत घालूं लागले. ' आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनें दीर्घक्रंदन प्रकृतीला कसें अपायकारक असतें ' हें त्यांनीं बाबूला समजावून सांगितलें. शरीरशास्त्राच्याच नव्हे तर तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें देखील रूदनक्रिया किती दोषपूर्ण आहे याचाही त्यांनीं खुलासा केला. पण बाबू उलट अधिकच जोरानें केंकाटूं लागला. तेव्हां आकाशाकडे त्याचें लक्ष वेधण्यासाठीं त्यांनीं ' सिंहराशींतील जोडताऱ्यां 'चे ग्रहगणितशास्त्राच्या आधारानें सांगोपांग वर्णन केलें, पण ताकास तूर नाहीं ! बाबूच्या रडण्याचें सप्तक आपलें आणखीच चढलें ! प्रो. कोटिबुद्धे अगदीं कुंठितमति झाले. तेवढयांत बाबूची दहाबारा वर्षांची थोरली वहिण तेथें आली आणि तिनें ' चांदोबा चांदोबा भागलास का ! ' हें गाणें म्हणून बाबूचें रडें एकदम थांबविलें व ' *चाल चाल बाळा । सोन्याचा बाळा* ' करीत करीत ती त्याला इकडून तिकडे चालवूं लागली. हें दृश्य पाहून ' संस्कृति संरक्षकां 'च्या संतापानें प्रोफेसरसाहेब ओरडले कीं " आमच्या स्त्रीवर्गाच्या तोंडीं बसलेलीं अर्थशून्य, विसंगत व वेडीवांकडीं गाणीं ऐकलीं म्हणजे मानस व्यग्र झाल्यावांचून राहत नाहीं ? गीता व उपनिषदें यांचे पाठ या केव्हां म्हणणार ? वाङ्मयांतहि हेंच ! गंभीर तत्त्वज्ञानाचीं शास्त्रीय साहित्याचीं पुस्तकें फार तयार न होतां दर वर्षी नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी यांनीं भरलेल्या पुस्तकांचाच वाढता भरणा होत आहे ! लोकांना उच्च ज्ञानाची प्राप्ति कशी होणार हा प्रत्येक विद्वानापुढें मोठा प्रश्न आहे ! ' बहुजनसमाज हा या ' दीडपानी नाटकां 'तील रडणाऱ्या चिमुकल्या बाबूसारखा आहे हें समाजांतील प्रो. कोटिबुद्धे छापाच्या विद्वानांच्या लक्षांत

येत नाहीं! किरकिरणाऱ्या वृत्तीच्या अजाण बहुजनसमाजाचें समाधान करून आणि त्याला बाबूप्रमाणें आपल्या पावलावर उभें राहून जर चालावयाला शिकवावयाचें असेल तर त्या कामीं गंभीर शास्त्रीय वा तात्त्विक वाङ्मयापेक्षां काव्य, कथा, नाट्य अशा ललितवाङ्मयाचाच अधिक उपयोग होणार आहे हेंच गडकरी यांनीं या नाटकांत परिणामकारक रीतीनें सांगितलेलें आहे.

* * *

ललितवाङ्मयानें मनाचें रंजन होतें. त्यामुळें मनाला अतिशय आल्हाद वाटतो. हें प्रा. जोग यांचें म्हणणें अगदीं खरें आहे. रंजकता आणि आल्हाद-दायित्व हें तर ललितवाङ्मयाचें सामर्थ्य आहे. आणि त्यामुळेंच ललित-वाङ्मयाकडे बघणाऱ्या लोकांची प्रा. जोगाप्रमाणें पुष्कळ वेळां दिशाभूल होते. रंजकता हें ललितवाङ्मयाचें साध्य नसून साधन आहे. आनंद देणें हें ललितवाङ्मयाचें कार्य नसून ती त्याची क्रिया आहे. तसें पाहिलें तर शास्त्रीय वाङ्मयानेंहि 'तज्ज्ञा'ला काय कमी आनंद होतो? झाडावरून पडलेल्या फळांत न्यूटनच्या दिव्यदृष्टीपुढें जो गुरुत्वाकर्षणाचा प्रभावी नियम चकाकला, त्यामुळें त्याला कांहीं कमी आनंद झाला असेल? आंघोळीच्या भांड्यांत शिरतांच पाणी बाहेर सांडलेलें बघून 'यूरेका', यूरेका ( मला दिसलें! मला दिसलें! ) असें ओरडत नागव्यानें आर्किमिडीस बाहेर पडला त्याला कांहीं कमी ब्रह्मानंद झालेला होता? शास्त्रीय असो वा ललितवाङ्मय असो, त्यानें मनाला आनंद हा होणारच होणार! पण शास्त्रीय वाङ्मयांतील आनंद हा बुद्धिगम्य असल्यानें तो थोड्यांनाच प्राप्त होतो. तर ललित-वाङ्मयांतील आनंद हा भावनानिष्ठ असल्यानें तो कोणत्याहि सामान्य मानवी मनाला सहज मिळण्यासारखा असतो. हें जरी खरें तरी आनंद मिळविणें हा कांहीं दोन्हीहि प्रकारच्या वाङ्मयाचा हेतु होऊं शकत नाहीं. ललितवाङ्मयाकडे केवळ वरवरच्या दृष्टीनें पाहणाराला त्याच्यांतील रंजकतेचें प्राधान्य वाटावें हें साहजिकच आहे. प्रा. जोगांचें तसेंच झालें. त्यांनीं 'रंजन' आणि 'आल्हाद' हे दोन शब्द अगदीं लौकिक दृष्टीनें आणि ऐसपैस अर्थानें वापरले. गाण्यानें मनोरंजन होतें. नाचण्यानें होतें. चित्र पाहिल्यानें होतें. तसें ललितवाङ्मय वाचल्यानें होतें. झालें. मग आणखी काय पाहिजे? म्हणून गाणें, नाचणें, चित्रकला आणि ललितवाङ्मय यांचा

हेतु एकच. म्हणजे मनोरंजन करणें किंवा मनाला आल्हाद देणें हा ! असा जोगांनीं तावडतोब सिद्धांत बांधून टाकला ! थोड्या वेळानें त्यांचें मनच त्यांना खाऊं लागलें. त्यांना वाटलें हें आपण काय केलें ? ' ' श्वा, युवा आणि मघवा ' यांना आपण एकाच दावणींत बांधून तर टाकलें नाहीं ना ! त्याबरोबर ललितलेखकांच्या दुखावलेल्या मनावर थोडीशी फुंकर टाकण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्यांनीं असा खुलासा केला कीं गाणें, नाचणें या इतर कलेपेक्षां साहित्यवाचनानें होणारा आल्हाद हा बऱ्याच प्रमाणांत बुद्धिगम्य असतो. तथापि, ही केवळ जोगांची शाब्दिक मखलाशी होय. ' ललित साहित्याचा हेतु केवळ रंजन करणें हा होय ' हा त्यांचा जो मूळ सिद्धांत तो या त्यांच्या खुलाशानें मुळींच बदलूं शकत नाहीं.

* * *

बहुजनसमाजाचें मन हें लहान मुलाच्या मनासारखें आहे. मोठ्या माणसाच्या मनांत आणि लहान मुलाच्या मनांत जो फरक आहे तो फरक अंशाचा नसून अवस्थेचा आहे. मुलाचें मन हें उपजत प्रवृत्तींच्या आधीन असतें. त्याच्यांत तर्कबुद्धीचा उदय झालेला नसतो. म्हणून लहान मुलाला शिक्षण देतांना तें त्याच्या प्रकृतीच्या अनुषंगानें द्यावें लागतें. एवढ्याचसाठीं मुलांच्या अभ्यासक्रमांत कथा, काव्य, नाट्य इत्यादि ललित विषयांना आणि पद्धतींना आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञ प्राधान्य देत असतात. त्यामुळें हंसत खेळत मुलें शिकतात. लोकशिक्षणांत ललितवाङ्मयाचें अगदीं हेंच कार्य आहे. लोकांचें केवळ मनोरंजन करणें हा ललितवाङ्मयाचा हेतु नसून संसारांतील अनेक प्रश्नांची हंसत खेळत लोकांना जाणीव करून देणें आणि जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण अधिक वैचारिक करणें हा होय. लोकांना निव्वळ आनंद देऊन त्यांचें मनोरंजन करणाऱ्या अनेक कला आणि विषय जगांत आहेत ! मग ललित साहित्याचें वैशिष्ट्य तें काय ?

ललित वाङ्मय हें केवळ अज्ञान अशा बहुजनसमाजावर परिणाम करतें असें नाहीं ! प्रगल्भ मनावरहि त्याचा प्रभाव पडतोच पडतो. कोणत्याहि नीतिशास्त्राच्या विद्वत्तापूर्ण ग्रंथापेक्षां ' इसापनीति ', ' पंचतंत्र ', ' हितोपदेश ' यांची शिकवणूक कांहीं कमी परिणामकारक नाहीं ? ख्रिस्तानेंहि आपलें तत्त्वज्ञान सांगतांना ललितवाङ्मयाचाच उपयोग केला कीं नाहीं ? व्यासांनीं

एवढ्या मोठ्या 'महाभारता'ची रचना केली ! त्यांत धर्मशास्त्र, नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानापेक्षां ललितवाङ्मयच अधिक आहे किंवा नाहीं ? आणि 'महाभारतां'तील हें ललितवाङ्मय केवळ वाचकांचें मनोरंजन करून त्यांना निरागस आनंद देण्यासाठीं व्यासांनीं रचलें आहे असें प्रा. जोग तरी म्हणूं शकतील काय ?

ललितवाङ्मयाचें आरंभींचें स्वरूप हें केवळ मनोरंजक होतें हें मलाहि मान्य आहे. पण त्या वाङ्मयाची जशी जशी उत्क्रांति होत गेली तसा तसा त्याच्या तंत्रांत आणि हेतूंतहि बदल होत गेला ! इकडे आपण दुर्लक्ष करतां कामा नये. ज्ञान आणि विज्ञान हें नवीन शोधामुळें जसें बदलत आणि वाढत गेलें तसेंच ललितवाङ्मयाचें झालें. कोणताहि विषय हा तीन अवस्थेमधून जात असतो. कौतुक, उपयोग आणि शास्त्र अशा त्या तीन अवस्था होत. विजेचें शास्त्र आज केवढें गहन झालेलें आपल्याला दिसतें ! पण आरंभीं तो गंमतीचा असा एक 'ठिणग्यांचा खेळ'च होता कीं नाहीं ! रेशमाचा वुतलेला मुकटा हसडून त्यांतून विजेचा 'कडकड' आवाज आम्ही लहानपणीं काढीतच होतों ! या 'ठिणग्यांचा'च आयुष्यांत उपयोग करून घेतां येईल ही दृष्टि आल्यावर मग त्याचें केवढें स्थित्यंतर झालें ! शेंकडों तऱ्हेनें विजेचा उपयोग करून घेण्यांत येऊं लागला ! आणि अशा तऱ्हेनें शेवटीं त्यांतून विद्युत्शास्त्र निर्माण झालें. ललितवाङ्मयहि या तीन अवस्थांमधून गेलेलें आहे. 'अरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' हें ललितवाङ्मयाच्या कौतुकावस्थेंतलें अत्यंत तेजस्वी आणि प्रचंड असें एक स्मारकच होय ! केवळ वाचकाचें मनोरंजन करून त्याला आल्हाद देण्याच्या बाबतींत या 'ग्रंथां'चा हात धरण्याचें सामर्थ्य जगांतील एकाहि ललितकृतीमध्यें तरी आहे काय ? या अरबी गोष्टी कोणत्याहि वयाच्या माणसांनीं कितीहि वेळां वाचल्या तरी त्यांचा कंटाळा का कोणाला येईल ? अल्लिबाबाच्या बरोबर चोरांच्या गुहेंत फिरून फिरून शिरायला किंवा अल्लाउद्दीनाचा दिवा पुन्हां पुन्हां घासून बघायला कोण लेकाचा तयार होणार नाहीं ! केवळ मनोरंजन हेंच ललितवाङ्मयाचें ध्येय आहे असें म्हणावयाचें झालें तर 'अरबी भाषेंतील गोष्टी' हें एक आदर्श ललित साहित्य म्हणूनच आपणाला

मान्य करावें लागेल ! मग या संकटाला तोंड द्यावयाची जोगांची तयारी आहे काय ? 'अरबी भाषेंतील सुरस गोष्टी' छापाच्या स्वरूपानंतर ललित वाङ्मयामध्यें कांहीं उत्क्रांति झाली नाहीं असें कोणाला म्हणतां येईल काय ? कोणत्याहि भाषेंतील आरंभीचें ललितवाङ्मय याच अद्भुतावस्थेमधून गेलेलें आहे ! कालांतरानें देवादिकांच्या, अप्सरांच्या, पऱ्यांच्या आणि यक्षगंधर्वांच्या काल्पनिक वातावरणामधून ललित वाङ्मय पृथ्वीवर उतरलें आणि माणसांमधून फिरूं लागलें. तथापि त्याचें लक्ष सुरुवातीला राजे, महाराजे, श्रीमंत सरदार, लक्ष्मीपुत्र यांच्याकडेच गेलें. हळुहळू या माणसांचाहि त्याला कंटाळा येऊं लागला आणि मग समाजाच्या निरनिराळ्या विभागांमधून ते फेरफटका मारूं लागलें, तसें समाजाचें व्यापक जीवन त्याला समजून येऊं लागलें. त्याबरोबर त्याच्या स्वरूपांत अंतर्बाह्य बदल झाला. असें होणें हें अगदीं अपरिहार्य होतें. ललितवाङ्मयाचा दृष्टिकोण जसा अधिक विस्तृत आणि व्यापक होऊं लागला तसें तसें सामाजिक जीवनांत त्याला अधिक महत्त्व आणि सामर्थ्य प्राप्त होऊं लागलें. आजच्या घटकेस ललितवाङ्मयाचें एक निराळें 'शास्त्र' च होऊन बसलेलें आहे ! त्याचे प्रकार, त्याच्या पद्धति, त्याचें तंत्र त्याचे नियम, त्याची वैचारिका, त्याची चर्चा, त्याची टीका या सगळ्यांना आज एक शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालेलें आहे. ललितवाङ्मय ही आतां समाजांतील एक मनोरंजनाची आणि केवळ आनंद देणारी अशी बाब राहिलेली नसून, समाजाच्या जीवनकलहांतलें एक प्रभावी शस्त्र म्हणून आज आपण त्याच्याकडे पाहवयाला शिकलों आहोंत ! याचा असा अर्थ मात्र नव्हे कीं त्यामुळें ललितवाङ्मयाची मनोरंजकता कोणत्याहि तऱ्हेनें कमी झालेली आहे. उलट ही मनोरंजकता अधिकच वाढलेली आहे. तथापि मनोरंजकता हें कांहीं ललितवाङ्मयाचें ध्येय नव्हे ! ललितवाङ्मयाच्या प्राथमिक अवस्थेंत तें त्याचें ध्येय होतें हें मात्र खरें !

* * *

आधुनिक ललित वाङ्मयाच्या हेतूकडे पाहण्याचा प्रा. जोगांचा दृष्टिकोण अशा तऱ्हेनें प्राथमिक म्हणून अपक्व असल्यानें ललितवाङ्मयावर पुढें त्यांनीं केलेली सारीच मल्लीनाथी चुकीची ठरते. ललितसाहित्यानें मनाचें रंजन

कसें होतें याबद्दल त्यांची मीमांसा अशी आहे. मनुष्य आणि त्याचें जीवन अत्यंत गुंतागुंतीचें आहे. त्याचा अंत कोणालाहि लागणें कठिण आहे. या अथांग मानवी जीवनांत अनंत गुण आणि अनंत दोष यांच्या मिश्रणानें मानवी स्वभावाचे अनंत प्रकार निर्माण झालेले आहेत. हे अनंत प्रकार, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या आशानिराशा, इच्छा आकांक्षा, सुखें दुःखें यांचीं कोणत्याहि प्रकारचा आग्रह वा अभिनिवेश न धरतां खरीखुरी चित्रें काढून रसिकांचें रंजन करणें हेंच प्रा. जोगांच्या मनानें ललित लेखकांचें कर्तव्य आहे. मानवी जीवनांतील रहस्यें जाणून घेण्याची माणसांना बलवत्तर जिज्ञासा असते. ही वाचकांची जिज्ञासा ललितलेखकानें पुरविली कीं त्यांचें मनोरंजन आपोआप होतें; इतक्या सोप्या तऱ्हेनें प्रा. जोगांनीं हें प्रकरण स्पष्ट करून सांगितलेलें आहे. ललितवाङ्मयाकडे पाहण्याचा जोगांचा हा दृष्टिकोण इतका अज्ञानमूलक आहे कीं सांगतां सोय नाहीं ! वाङ्मयाबद्दल त्यांचीं मतें अगदीं चारचौघांसारखीं आहेत. जीवन हें गहन आहे हें मान्य. तें समजून घेण्याची माणसामध्यें जिज्ञासा असते हेंही मान्य. तथापि या गहन आणि अनंतरूपी जीवनाचीं खरीखुरीं चित्रें काढणें (आणि तींही तिऱ्हाइतासारखें थंड डोकें ठेवून !) म्हणजे झालें 'ललितवाङ्मय' हें जोगांचें म्हणणें अशास्त्रीय आहे. 'खरीखुरीं चित्रें काढणें' या कल्पनेला आणि विशेषतः 'खरीखुरी' या शब्दाला कांहीं एक अर्थ नाही ! खरीखुरीं चित्रें काढणें म्हणजे लेखकाच्या डोळ्याला आणि मनाला गोष्टी जशा दिसतात तशा त्या वर्णन करून सांगणें असें असेल तर ही कल्पना मुळांतच चुकीची आहे. 'वाङ्मय हा एक जीवनाचा आरसा आहे' ही वाङ्मयाची व्याख्या जितक्या किंमतीची तितक्याच लायकीचें 'हें खरीखुरी चित्रें रंगविण्याचें' प्रकरण आहे ! वाङ्मय हा जीवनाचा नुसता आरसा नव्हे किंवा ललित लेखन हें जीवनाची खरीखुरीं चित्रेंहि रंगविणें नव्हे. असलें काम करावयाला कलावंताची हो काय जरूर आहे ? वाटेल त्या अलवत्या गलबत्याला हें करतां येईल ? आहे काय त्याच्यांत ! पाहयचें अन् बोलायचें, ऐकायचें अन् सांगायचें, किंवा वाचायचें अन् लिहायचें ! म्हणजे झालें ललितलिखाण ! खरीखुरी' हा शब्द अत्यंत भ्रामक आणि फसवा आहे. जीवन जसें दिसतें तसें मुळीं नसतेंच ! मग जसें दिसतें तसें तें रंगविणें म्हणजे तें त्याचें खरेखुरें चित्र

कांहीं होऊं शकत नाहीं ! जीवन जसें घडतें तसें वर्णन करण्यानें त्यांतला कांहीं एक अर्थ वर्णन करणाराला किंवा ऐकणाराला कळणें शक्यच नाहीं, निरर्थक प्रसंगांच्या राशीच्या राशी रोज डोळ्यांसमोर घडत असतात ! त्यांच्या डायऱ्या लिहून का ललितवाङ्मय निर्माण होणार ! ललितवाङ्मय या अवस्थेंतून आतां किती तरी पुढें गेलेलें आहे ! मानवी जीवनाचा अर्थ समजावा म्हणून आयुष्यांतील कांहीं निवडक प्रसंग वेंचून काढून त्यांचा अचूक अन्वय लावणें हेंच ललित लेखकाचें खरें काम आहे. हे प्रसंग प्रत्यक्ष घडलेले असोत, किंवा पुढें कधीं तरी घडणारे असोत किंवा मानवी जीवनांत निदान घडणें तरी शक्य असोत ! साऱ्या गोष्टी अगदीं समोरच घडावयाला पाहिजेत असें नाहीं ! आयुष्याचा अन्वय लावणें हें ललित लेखकाचें मुख्य काम आहे. म्हणूनच त्याला जीवनाचा भाष्यकार किंवा टीकाकार असें म्हटलें जातें. वाचकांचें मनोरंजन करणें एवढेंच ललित लेखकाचें ध्येय मान्य केलें म्हणजे 'जगाकडे पाहयचें अन् सांगायचें' किंवा त्याचीं खरीखुरीं चित्रें रंगवायचीं हें ललित लेखकाचें' काम अपोआपच ठरतें. पण मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावून दाखविणें हें ललित लेखकाचें कर्तव्य आहे असें सिद्ध झालें म्हणजे मात्र ललित लेखनाचें ध्येय केवळ मनोरंजन आहे हें म्हणणें आपोआपच तोंडांतल्या तोंडांत विरघळून जातें !

* * *

ललित लेखकानें आपलें कार्य 'आग्रह न धरतां' आणि 'अभिनिवेश न बाळगतां' करावें हें जोगांचें म्हणणेंहि सर्वस्वीं भ्रामक आहे. या म्हणण्याचा त्यांनीं पुढें अधिक विस्तार केलेला आहे. ते म्हणतात, "आज काल 'टोटॅलिटेरिअन' विचारसरणीचा प्रभाव फार झालेला आहे. श्रेष्ठ साहित्यिकांस कांहीं तरी जीवनविषयक दृष्टिकोण हवा असें सांगण्यांत येतें. तथापि लेखकानें कोणत्याहि एका दृष्टिकोणाचें गुलाम असूं नये. त्यामुळें वस्तुस्थितीचें यथार्थ दर्शन होण्यास अडचण पडते. तेव्हां लेखकांनीं कोणत्याहि पक्षाचा 'गणवेष' अंगावर न चढवितां आपले विचारस्वातंत्र्य गमावूं नये !" जोगांच्या या म्हणण्यांत अनेक वादग्रस्त विचारांची अशास्त्रीय गल्लत झालेली आहे. वाचकाचे निव्वळ मनोरंजन करावयाचें एवढाच हेतु डोळ्यासमोर ठेवला म्हणजे जोगांचे हे अशास्त्रीय विचार समर्थनीय ठरतात ! दुसऱ्यांना

नुसता आल्हाद द्यायचा तेथें मतांचा आग्रह किंवा विशिष्ट भावनांचा अभिनिवेश काय कामाचा? सर्कशींतला विदूषक जसा असतो तसा जोगांच्या मतें ललित लेखक आहे! विदूषक चार उड्या मारून प्रेक्षकांचें मनोरंजन करीत नाहीं का? तो कशाचाच आग्रह धरीत नाहीं! किंवा दुसऱ्या कोणाचाहि गणवेष तो अंगावर धारण करीत नाहीं. केवळ मनोरंजकतेचाच गणवेष अंगावर चढवून तो आपलें ' विचारस्वातंत्र्य ' कायम राखीत असतो!

लेखकानें कशाचाहि आग्रह धरूं नये. त्याला एक दृष्टिकोण असण्यापेक्षां विविध दृष्टिकोण असावेत हे जोगांचें म्हणणें चुकीचें आहे. लेखक हा कांहीं वकील नाहीं. जो पक्षकार येईल तो वकिलाचा पक्ष. स्वतःचा असा त्याला कांहींच पक्ष नसतो. असें लेखकाचें थोडेंच असतें? त्याचा जीवनाचा अनुभव विविध असला तरी जीविताकडे पाहण्याचा त्याचा स्वतःचा असा एक विवक्षित दृष्टिकोण असतोच असतो! दुसऱ्यांच्या दृष्टिकोणांनीं पाहण्याचें सामर्थ्य त्याच्यामध्यें असलें तरी स्वतःच्या दृष्टिकोणाचा त्यानें कांहीं लिलांव केलेला नसतो! ललित वाङ्मयांत आणि शास्त्रीय वाङ्मयांत हाच मौलिक फरक आहे. शास्त्रीय वाङ्मय हें सिद्धांतस्वरूप आहे. तेथें वैयक्तिक मतांचा प्रश्नच उद्भवत नाहीं. तसें ललितवाङ्मयाचें नाहीं. जीविताकडे पाहण्याच्या लेखकांच्या विशिष्ट दृष्टिकोणामुळें ललितवाङ्मयांत एवढी विविधता आणि सुंदरता आलेली आहे! ललितवाङ्मयाचें हेंच प्रभावी वैशिष्टय आहे. गणितामध्यें प्रत्येक उदाहरणाला एकच उत्तर असतें. चार दुणे आठच होतात. नऊ नाहीं. तसें जीवितांत नाहीं. जीवितांत प्रत्येक प्रश्नाला एकच ठराविक उत्तर नसतें. चार दुणें नऊ होतात व नव्वदहि होऊं शकतात! हीच तर आयुष्याची गंमत आहे. अशा आयुष्याकडे लेखक आपल्या वैशिष्टयपूर्ण दृष्टीनें पाहूं शकतो म्हणून तर ललितवाङ्मयामध्यें अधिक गंमत असते! जीवन जरी विविध स्वरूप असलें तरी त्याच्याकडे लेखकाला आपल्या स्वतःच्याच दृष्टीनें पाहणें जरूर असतें. तेव्हां लेखकाला एकच असा दृष्टिकोण असू नये हें जोगांचें म्हणणें मुळांतच चुकीचें आहे. ललित लेखकाला आयुष्याचा अन्वयार्थ लावून दाखवावयाचा आहे ही त्याची शास्त्रीय भूमिका एकदां मान्य केली, म्हणजे जीविताकडे पाहण्याचा त्याचा स्वतःचा असा दृष्टिकोण असावयालाच पाहिजे हें मानणें क्रमप्राप्तच होतें.

या वैयक्तिक दृष्टिकोणाबद्दल लेखकानें अभिनिवेश धरावयाचा नाहीं हें म्हणणें कसें योग्य होईल ? ललित लेखकानें प्रचार करूं नये असें सामान्यपणें मान्य केलें जाते. पण प्रत्येक बोलणें आणि लिहिणें हा एक प्रकारचा प्रचारच नव्हे तर काय ? ललितवाङ्मय हा तर एक अत्यंत सामर्थ्यवान् प्रचार आहे ! कारण बहुजन समाजाच्या भावनांची तो पहिल्याप्रथम पकड घेतो आणि त्यांना गदगदून हलवितो. ललितवाङ्मय अशा तऱ्हेनें प्रचार करतें म्हणूनच त्याचा अधिक प्रसार होतो. प्रचार जितका आकुंचित तितका तो अधिक स्वार्थी आणि 'पक्ष'पाती दिसतो. प्रचाराचें क्षेत्र जितकें अधिक व्यापक होत जाईल तितकें त्याचें स्वरूप अधिक उदात्त होईल आणि त्याचा वाङ्मयांत अंतर्भाव होईल ! ५०१ नंबरच्या साबणावर किंवा 'डालडा वनस्पति' वर निर्माण केलेला एकादा जाहिरातपट कितीहि मनोरंजक असला तरी त्याच्या प्रचाराचें स्वरूप मर्यादित असल्यानें त्याला वाङ्मयांत स्थान मिळूं शकणार नाहीं. त्याच्या उलट बर्नार्ड शॉचीं नाटकें ! शॉ हा जगांतला सर्वांत सामर्थ्यवान् प्रचारक आहे ! त्याला ज्या ज्या गोष्टी पटल्या त्यांचा त्यानें अत्यंत आग्रहानें आणि अभिनिवेशानें आपल्या नाटकांमधून प्रचारच केलेला आहे. पण या प्रचाराचें स्वरूप अत्यंत व्यापक आणि मानवी असल्यानें त्याचीं नाटकें श्रेष्ठ दर्जाचें ललितवाङ्मय ठरतात ! कोणत्याहि एका विशिष्ट राजकीय पक्षाचा युनिफॉर्म ललित लेखकानें घालूं नये हें सर्वसामान्यपणें म्हणणें ठीक आहे. ललित लेखकावर कोणत्याहि राजकारणाची जबरदस्ती अथवा जुलूम असूं नये असा त्याचा अर्थ असेल तर तो मला अधिक मान्य आहे. पण त्याचा अर्थ जर असा असेल कीं जीवनाकडे (यांत राजकारणाचा समावेश होतो !) पाहण्याची एक अढळ वैचारिका लेखकाजवळ मुळीं असूच नये, तर तें जोगांचें म्हणणें मला सुतरामहि मान्य नाहीं !

* * *

ललितवाङ्मय शास्त्रीय अवस्थेंत आज प्रविष्ट झालेलें आहे याचें हें एक स्पष्ट गमकच आहे कीं प्रत्येक ललित लेखकाला वैचारिकेची किंवा तत्त्वज्ञानाची आज आवश्यकता भासूं लागलेली आहे. अशी वैचारिका डोक्यांत स्पष्ट असल्याशिवाय जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचें जें ललितलेखकाचें काम तें त्याला उत्तम प्रकारें करतां येणें शक्यच नाहीं. ज्याला वाचकाचे

केवळ मनोरंजन करावयाचें आहे त्याला वैचारिकेची मुळींच जरूर नाहीं. थोड्याशा कौशल्याच्या भांडवलावर कोणालाहि कोणाचें मनोरंजन करतां येतें. पण ललितलेखकाचें तें ध्येय मुळींच नव्हे. ललितलेखकाचें हें तत्त्वज्ञान किंवा वैचारिका कशी असावी याबद्दल जाणत्यांचें आतां एकमत झालेलें आहे. मानवतेच्या कल्याणाची थोर विचारवंतांनीं आणि विभूतींनीं आजपर्यंत जी दिशा दाखवून दिलेली आहे त्याच दिशेकडे ललितलेखकांनीं आपलीं तोंडें फिरवून पुढें जावयाला पाहिजे, हें आतां सर्वांना मान्य झालेलें आहे. प्रत्येक राष्ट्र आणि समाज हा स्वतंत्र असला पाहिजे. व्यक्तीच्या संपूर्ण विकासासाठीं प्रत्येक समाजांत भरपूर अवकाश असला पाहिजे. कोणत्याहि एका राष्ट्राला, वर्गाला किंवा व्यक्तीला सत्तेच्या जोरावर दुसऱ्या राष्ट्राची, वर्गाची किंवा व्यक्तीची राजकीय, आर्थिक व सामाजिक पिळणक करण्याचा अधिकार नाहीं. आर्थिक आणि नागरिक समानतेच्या पायावर सर्व समाजांची रचना व्हावयाला पाहिजे. म्हणजे दारिद्र्य, दुष्काळ, आर्थिक चढाओढी, आणि युद्धें ही मानवतेवरचीं सद्यःकालीन संकटें नाहींशी होतील. हा श्रेष्ठ समाजशास्त्रज्ञांच्या विचारसरणीचा थोडक्यांत सारांश आहे. तो कोणत्याहि ललितलेखकाला मान्य होण्यासारखा आहे. तो ज्यांना मान्य होणार नाहीं, किंबहुना त्याला ज्यांचा विरोध असेल अशा ललितलेखकांना निवडून बाजूला काढण्यासाठीं म्हणून 'पुरोगामी' आणि 'प्रतिगामी' अशी वर्गवारी करणें भाग पडलें. नाहींतर या शब्दांची वास्तविक कांहीच आवश्यकता नाहीं.

'पुरोगामी वाङ्मय' या शब्दप्रयोगानें प्रा. जोगांना भयंकर धक्का बसल्यासारखें होतें म्हणूनच हें सांगावें लागतें. जोग म्हणतात; "आजकाल 'वाङ्मया'पेक्षां 'पुरोगामित्वा'वरच जास्त चर्चा होते. 'पुरोगामी' या 'विशेषणा'नें विशेष्य जें 'वाङ्मय' त्याचें जणूं काय वैरच स्वीकारल्यासारखें झालें आहे!" खरें सांगावयाचें म्हणजे माझ्या मतें 'पुरोगामी वाङ्मय' ही द्विरुक्ति आहे! सर्वभक्षक काळाच्या परीक्षेंतून वाचलेलें जें जें उत्तमोत्तम ललितवाङ्मय आहे, तें तें निःसंशय पुरोगामीच असलें पाहिजे, हें अगदीं वज्रलेप आहे. 'अंकल टॉम्स केबिन' ही मिसेस स्टोची कादंबरी घ्या! जगाच्या अंतापर्यंत ही कादंबरी वाचली जाईल. याचें कारण त्या कादंबरींतील वैचारिका ही पुरोगामी आहे. गोऱ्या वर्गानें गुलामगिरींत ठेवलेल्या दलित जातींतील

व्यक्तींच्या हालअपेष्टांची ती एक करुण कहाणी आहे. त्या कादंबरींतील हेतु केवळ मनोरंजन करणें आहे असें कोण म्हणेल ? वाचकांचें चित्त वेधलें जातेंच ! पण तें नीग्रो जातिविषयीं सहानुभूति वाटते आणि गोऱ्या वर्गाबद्दल चीड उत्पन्न होते म्हणून ! आपल्या मराठी भाषेंतील ' शारदा ' नाटक घ्या ! तें लोकप्रिय होण्याचें **कारण** त्यांतील पुरोगामी दृष्टिकोण हेंच होय ! वास्तविक त्या वेळीं ' पुरोगामी ' हा शब्द देखील कोणाला माहीत नव्हता ! पण त्या नाटकाच्या लोकप्रियतेची चिकित्सा आज आपण केली म्हणजे ही गोष्ट ध्यानांत येते.

या ठिकाणीं प्रा. जोगांचें म्हणणें असें कीं, कोणत्याहि साहित्याचें पुरोगामित्व ठरविण्याची कसोटी बाहेरची असूं नये. म्हणजे एकाद्या साहित्य कृतींत जातिभेदाचा निषेध केला आहे का पुरस्कार केला आहे, स्त्रीचें ध्येय स्वातंत्र्य आणि समान हक्क हें सांगितलें आहे, का ' चूल नि मूल ' हें आहे असें प्रतिपादलेलें आहे, या गोष्टी विचारांत घेऊन ती पुरोगामी किंवा प्रतिगामी आहे हें ठरविण्यांत येऊं नये. तर त्या कृतिमधील अंगभूत गुण म्हणजे (विवेचन शैली , पद्धति, तिच्यांतील अपूर्वता इत्यादि,) लक्षात घेऊन मग तिच्याबद्दल निर्णय देत जावा ! प्रा. जोगांचें हें म्हणणें चुकीचें आहे. शास्त्रीय वा वैचारिक जीवनाचीं जीं मूल्यें आज जगांतील विचारवंतांनीं मुक्रर केलेलीं आहेत, त्या मूल्यांच्या मापानेंच कोणत्याहि साहित्यांतील गुणावगुण हे मोजावयाला हवेत. जोग पुन्हां पुन्हां जी चूक करतात ती ही. ललितवाङ्मयाच्या ' वैचारिक ' आत्म्यापेक्षां त्याच्या लालित्यपूर्ण शरीरावरच ते अधिक भुलतात ! साहित्य हा सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे, हें जोग यांनीं विसरूं नये. म्हणून समाजानें मान्य केलेल्या मूल्याशीं किंवा ध्येयाशीं सुसंगत अशीच साहित्याची रचना व्हावयाला हवी. म्हणूनच ललितकृतीच्या गुणावगुणांची मीमांसा करतांना सामाजिक परिस्थितीचा विचार करणें ही गोष्ट अगदीं अपरिहार्य आहे. हार्डीच्या ' जूड द ऑबस्क्युअर ' या कादंबरीचे उदाहरण पुढें टाकून जोग विचारतात कीं, ही कादंबरी पुरोगामी आहे किंवा प्रतिगामी ! त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें ती कादंबरी पुरोगामित्वाच्या आणि प्रतिगामित्वाच्या पलीकडची आहे ! ललितकृतीचें शास्त्रीय परीक्षण जोगांना करतां येत नाहीं, हा त्यांचा दोष आहे ! हार्डीची ही कादंबरी

निःसंशय पुरोगामी आहे. समाजांतील रूढ विवाहपद्धति किती अन्याय-मूलक आहे, विषम विवाहानें एकत्रित आलेल्या व्यक्ति घटस्फोटाच्या अभावा-मुळें कशा असहाय होतात आणि शेवटीं त्यांना रूढ परंपरेला कसें शरण जावें लागतें, हें अत्यंत हृदयविदारक पद्धतीनें हार्डीनें आपल्या कादंबरींत चित्रित केलेलें आहे. 'प्रभात' कंपनीचा 'माणूस' हा बोलपट घ्या! हा बोलपट अभिनयाच्या आणि तंत्राच्या दृष्टीनें अत्यंत उत्तम आहे. पण त्यांतली विचारसरणी निःसंशय प्रतिगामी आहे. लग्नाचें अभिवचन देऊन एक पोलीस एका वेश्येला आपल्या मलीन जीवनांतून बाहेर काढतो. येथपर्यंत ठीक आहे. पण शेवटीं त्या वेश्येला फांसावर लटकवून तो स्वतः मात्र एका कुमारिकेशीं लग्न लावून आपल्या 'माणूस'कीचें प्रदर्शन करतो! या कथेंतील विचारसरणी प्रतिगामी आहे हें ठरवितांना समाजशास्त्राच्याच दृष्टीनें विचार करावयाला पाहिजे, म्हणजे तिची परिस्थितिनिष्ठ मीमांसाच करावयाला हवी! ललितकृतींतील मूलभूत विचारसरणी बाहेरच्या साधनांनीं मोजून बघूं नये हा जोगांचा आग्रह अगदीं अडाणी आहे. समजा उद्यां 'शारदा' नाटकासारखेंच एकाद्यानें नाटक लिहिलें. मात्र त्यांत असें दाखविलें कीं एक म्हातारा एका गुडघ्याएवढ्या पोरीशीं लग्न करतो आणि त्या दोघांचा संसार सुखाचा होतो. त्या म्हाताऱ्याला त्या 'नाती'एवढ्या पोरीपासून एक मुलगा होतो (किंवा समजा दोन तीन मुलें होतात!) पुढें म्हातारा आपली गडगंज संपत्ति बायकोच्या ताब्यांत देऊन सुखानें मरतो. अशा नाटकाची रचना कितीहि सुंदर असली किंवा त्याचे संवाद कितीहि लालित्यपूर्ण असले, तरी त्या नाटकाला वाङ्मयांत केव्हांहि स्थान मिळावयाचें नाहीं. कारण त्याची वैचारिका सामाजिकहिताला अपाय करणारी आहे. 'एकच प्याला'च्या अगदी विरुद्ध प्रकारचें असें कोणी नाटक लिहिलें आणि दाखविलें कीं कोणी एक सुधाकर रोज सायंकाळीं दारूचा माफक असा 'एकच प्याला' घेतो (किंवा सिंधूच्याच हातानें तो घेतो असें म्हणा ना!) आणि आपली प्रकृति उत्तम राखतो. त्याचा संसार शेवटपर्यंत अगदीं सुखाचा होतो. तर असें नाटक त्यांतील इतर अंगभूत गुण कितीहि प्रशंसनीय असले तरी समाजाला केव्हांहि मान्य होणारें नाहीं! ललितकृतीमध्यें प्रकट होणारा लेखकाचा दृष्टिकोण किंवा त्याची विचारसरणी ही विचारांत घेतल्यावांचून

त्या ललितकृतीची समीक्षा करतां येणें शक्य नाहीं. माडखोलकर यांच्या-सारखी सुंदर आणि प्रगल्भ भाषा लिहिणारा एकहि लेखक माझ्या डोळ्यासमोर आज दिसत नाहीं. त्यांची लेखनशैली फारच मार्मिक आणि मोहक आहे. पण तेवढ्यामुळें त्यांच्या कादंबऱ्या उत्कृष्ट ललितकृति ठरत नाहींत. माड-खोलकरांची विचारसरणी ही समाजाच्या आणि राष्ट्राच्या हिताला विघातक आहे म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्या या प्रतिगामी आहेत असेंच म्हणणें भाग पडतें. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या महात्मा गांधीं-सारख्या लोकोत्तर विभूतीची आणि कॉंग्रेसपक्षीयांची त्यांनीं आपल्या ललित कृतीमधून पदोपदीं कुत्सित अवहेलना करण्याचा प्रयत्न केलेला आहे हें लक्षांत आल्यावांचून कसें राहील ? वामनराव जोशी यांनीं आपल्या कादंबऱ्यां-मधून 'नवीन स्त्री' निर्माण करून महाराष्ट्रापुढें मांडली ! एवढेंच काय पण अशा तऱ्हेची स्त्री 'कर्वे विद्यापीठांतून' निर्माण करण्याचा देखील त्यांनीं प्रत्यक्ष प्रयत्न केला ! समाजहिताची विचारसरणी वामनरावांच्या काद-बऱ्यामध्ये काठोकांट भरून वाहते आहे म्हणून मराठी भाषेमधलें ते एक श्रेष्ठ ललित लेखन ठरलें ! वामनरावांच्या ललितकृति या केवळ मनोरंजनासाठीं आहेत असें कोण म्हणेल ! त्यांच्या उलट फडके-खांडेकरांच्या आजच्या कादंबऱ्या पहा ! भाषा आणि शैली या दोन्ही दृष्टींनीं फडके-खांडेकरांच्या लेखनामध्यें दोष काढण्यासारखें असें फारच थोडें निघेल ! पण तेवढ्यामुळें ते उत्तम ललित लेखक ठरत नाहींत. आजकाल त्यांनीं एक 'उन्मत्त स्त्री' (किंवा तिला आपण 'आधुनिक द्रौपदी' म्हणू) निर्माण करण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. या उन्मत्त स्त्रीचें प्रेम बहुश: एकाद्या जहाल देशभक्तावर असतें. आणि ती लग्न मात्र करते राजकीय दृष्ट्या प्रतिगामी असणाऱ्या एकाद्या तरुणाशी ! अखेर नवऱ्याच्या संमतीनें किंवा त्यानें पांघरलेल्या औदासिन्यामुळें ही स्त्री आपल्या प्रणयलीला निर्वेधपणें चालू ठेवू शकेल, अशा परिस्थितींत गोष्ट संपते. ही या कादंबरीकारांनीं चालविलेली 'उन्मत्त स्त्री' ची निर्मिति कितीहि काव्यमय आणि लालित्यपूर्ण भाषेमध्यें होत असली तरी ती सामाजिक जीवनाच्या मूल्याशीं संपूर्णतया विसंगत आहे ! अशा विचारसरणीचें लेखन ललितवाङमयांत फार काळ टिकूं शकणार नाहीं ! सांगण्याचा मुद्दा असा कीं, ललितकृतीचें पुरोगामित्व ठरवितांना

तिच्यांतली विचारसरणी लक्षांत घेण्यांत येऊं नये हें जोगांचें म्हणणें सर्वस्वीं चूक आहे !

✠ ✠ ✠

शेक्सपिअरचें उदाहरण जोगांनीं मोठ्या आवडीनें दिलेलें आहे. ते म्हणतात शेक्सपिअर हा कोणत्याच एका दृष्टिकोणाचा गुलाम नव्हता. म्हणून त्याच्या वाङ्मयांत जीवनाचें अधिक यथार्थ दर्शन होतें. शेक्सपिअरनें आपलीं सारीं नाटकें केवळ रसिकांच्या रंजनासाठीं लिहिलीं किंवा मानवी जीवनांतील विविध प्रसंगाचीं शेक्सपिअरनें खरीखुरीं चित्रें रंगविलीं असें जें जोगांना सुचवावयाचें आहे तें बरोबर नाहीं. 'हॅम्लेट' नाटक काय शेक्सपिअरनें मनोरंजनासाठीं लिहिलें ? 'हॅम्लेट' ही केवळ एक भूमिका नसून ती जीवनांतली एक अवस्था आहे ! —कीं ज्या अवस्थेंत मनुष्याला 'जगावें का मरावें, हें करावें कां तें करावें, कां कांहींच करूं नये' असा संभ्रम उत्पन्न होतो ! आणि अशा स्थितींतच शेवटीं त्याचा नाश होतो ! राजसत्तेच्या अमर्याद महत्त्वाकांक्षेमुळें माणसाची वृत्ति किती राक्षसी बनते हें 'मॅक्बेथ' मध्यें पाहावयास मिळतें. भाऊबंदकीच्या कलहाग्निमध्यें प्रणयी जीवन कसें भस्मसात होतें हें 'रोमिओ अँड जूलिएट' मध्यें दिसून येतें.

शेक्सपिअरची जीवनाकडे बघण्याची ठाम अशी वैचारिका होतीच होती. ती त्याच्या नाटकांतच काय पण प्रत्येक शब्दाशब्दांत व्यक्त झालेली आहे. शेक्सपिअरच्या काळीं 'समाजशास्त्र' निर्माण झालेलें नव्हतें. मनुष्य हा सामाजिक परिस्थितीमधून निर्माण होत असतो, ही दृष्टि त्यावेळीं कोणालाहि नव्हती. काम, क्रोध, मद, मत्सर या विकारांच्या आधीन असलेला मनुष्य हा एक प्राणी आहे आणि हे विचार जिंकून त्यानें आपल्या ताब्यांत ठेवलें कीं, तो सुखी झाला अशी मानवी जीविताकडे बघण्याची त्या वेळच्या विचारी माणसांची दृष्टि होती. शेक्सपिअरच्या लेखनांत ही विचारसरणी स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली आहे. आज मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टि समूळपणें बदललेली आहे. सामाजिक परिस्थिति लक्षांत घेऊन आज आपल्याला व्यक्तीच्या जीवनाकडे बघावें लागतें. ललितकृतीमध्यें ज्या व्यक्तींचें चित्रण केलें जातें, त्या त्या व्यक्तींना सामाजिक दृष्टया महत्त्व असावें लागतें. एकादी व्यक्ति विलक्षण आणि चमत्कारिक आहे म्हणून

तिचें चित्रण आज वाङ्मयांत कोणी करीत नाहीं. अमुक अमुक दरवडेखोराचे रोमांचकारक पराक्रम किंवा तमुक वेश्येच्या जीवनांतली रंगेल रहस्यें कितीहि 'मनोरंजक' असलीं तरी तेवढ्यासाठीं तीं ललितवाङ्मयाचा विषय होऊं शकत नाहींत. व्यक्ति आणि समाज यांची एकमेकांवर एकसारखी जी प्रक्रिया होत असते, ती आजच्या ललितवाङ्मयाचा विषय असल्यानें समाज-जीवनांत आज ललितवाङ्मयाला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे.

मनोरंजन हेंच ललितलेखनाचें कार्य असल्यानें प्रत्यक्ष सामाजिक जीवनांत ललितलेखनाला दुसरें कोणतेंहि महत्त्वाचें स्थान नाहीं असें प्रा. जोग मोठ्या दिमाखानें बजावून सांगतात! ते म्हणतात, "देशाला आग लागली असेल तर कवीनें हातांतला तंबोरा फेकून द्यावा आणि पाण्याची बादली घेऊन पुढें यावें: पण ती आग तंबोऱ्यानें विझविण्याचा प्रयत्न करूं नये!" याचा अर्थ असा कीं, समाजाला आग लागली असेल तर ती नुसत्या साहित्यनिर्मितीनें विझणें कधींहि शक्य नाहीं! या कल्पनेचा जोगांनीं पुढें आणखी विस्तार केलेला आहे. ते म्हणतात, "सामाजिक पुनर्घटनेमध्यें साहित्यिकांना कोणतेंहि स्थान दिलें जात नाहीं. पाश्चात्य देशांत युद्धोत्तर जी पुनर्घटना होणार आहे, त्यांतील कोणत्याहि समितीवर साहित्यिकांची योजना झालेली नाहीं!" जोगांचे हे विचार दिशाभूल करणारे आहेत. देशाला आग लागली तर ती ललितलेखक विझवूं शकत नाहींत, असें जोग म्हणतात! ठीक आहे. मग मी त्यांना उलट विचारतों कीं, ती आग कोण विझवूं शकतो बरें? वीर विझवूं शकतात? मुत्सद्दी विझवूं शकतात? वैज्ञानिक विझवूं शकतात? सत्ताधारी विझवूं शकतात? आज जगाला जी आग लागलेली आहे ती कोणी लावली आहे? आणि ती विझविण्याचें सामर्थ्य तरी आज कोणाच्यांत आहे! या प्रश्नांला जोगांनाच काय, पण कोणालाहि उत्तर देतां यावयाचें नाहीं! समाजाला अनेक तऱ्हेनें अनेक आगी लागलेल्या असतात! त्या विझविण्याचा प्रत्येक समाजसुधारक आपापल्या मगदुराप्रमाणें आणि साधनाप्रमाणें प्रयत्न करीत असतो. वीर बंदूक घेऊन पुढें येतो, डॉक्टर आपला स्टेथॉस्कोप घेऊन धांवत सुटतो, कवि आपली तंबोरी छेडावयाला लागतो, आणि चित्रकार आपली कुंचली परजूं लागतो! ज्याच्याजवळ जें सामर्थ्य आहे त्याचाच त्यानें समाजकारणांत उपयोग

करावयाला पाहिजे. ‘ लेखण्या टाकून हातांत बंदुका घ्या ’ असें सांगणें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच ‘ तंबोऱ्या टाकून हातांत वादल्या घ्या ’ हें म्हणणेंहि गाढवपणाचें आहे. ज्याला बंदुका वापरतां येतात, त्यांनीं बंदुकाच वापराव्यात. ज्याला तंबोऱ्या वापरतां येतात, त्यांनीं तंबोऱ्याच वापरल्या पाहिजेत ! आणि ज्यांना केवळ वादल्याच वापरतां येणें शक्य आहे, त्यांनीं वादल्याच हातीं घ्याव्यात ! ललितलेखकांनीं हातांत वादल्या घेऊन पळत सुटावें, असें म्हणणाऱ्या माणसाला वाङ्मयहि कळलें नाहीं आणि आयुष्यहि कळलें नाही, असेंच म्हणावें लागेल ! देशाला आग लागलेली असली तरी ती कोण विझवूं शकेल हें कोणी सांगावें ! पण देशाला लागलेली ही आग आहे, ही कांहीं दिवाळीची आरास नव्हे, असें साऱ्या जनतेला ओरडून सांगून, तिला जागें करण्याचें कार्य केवळ साहित्यिकच करूं शकेल ! याविषयीं मात्र कोणालाहि शंका आहे काय ? ललितलेखक हा एक मनोरंजन करणारा विदूषक आहे, असें जोग मानीत असले तरी जनता मानीत नाहीं आणि सरकारहि मानीत नाहीं ! कारण ललितलेखनाचा जनतेच्या मनावर परिणाम होतो याची ग्वाही जनता जशी वेळोवेळीं देत असते, तशी ती सरकारी कायदाहि देत असतो. जनतेच्या भावनांचा प्रक्षोभ करण्याचें प्रचंड सामर्थ्य ललितवाङ्मयांत आहे. नसतें तर नाटकासाठीं आणि बोलपटासाठीं प्रत्येक देशांतील सरकारनें निरीक्षकांचीं नियंत्रणें ठेवलींच नसतीं ! गणित, ज्योतिषशास्त्र, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, या विषयांच्या ग्रंथावर ‘ सेन्सॉरबोर्डे ’ नेमली जात नाहींत. ती ललितकृती बाबत नेमली जातात. याचा अर्थ स्पष्ट आहे कीं जनमनावर परिणाम करण्याचें ललितवाङ्मयाचें सामर्थ्य फारच मोठें आहे. ‘ पानपतच्या मुकाबल्या ’ला किंवा ‘ कीचकवधा ’ला सरकारनें कां बंदी केली ? सावरकरांचे आणि गोविंदकवीचे पोवाडे सरकारनें कां जप्त केले ? अर्न्स्ट टोलरसारख्या नाटककाराची हकालपट्टी जर्मनीमधून हिटलरनें कां केली ? आणि आज हिंदुस्थान सरकारच्या युद्धप्रयत्नाला आम्ही बोलपट निर्मात्यांनीं साहाय्य केलें पाहिजे असा निर्बंध तरी सरकारनें आमच्या बोकांडीं कां बसविला ? बोलपटानें युद्धप्रयत्नाला मदत होते ही गोष्ट सरकारनें मान्य केली आहे याकडे जोगांनी मुद्दाम लक्ष द्यावें. या सर्व गोष्टींचा अर्थ हाच की ललितसाहित्याचा मनोरंजनाखेरीज असा कांहींतरी गंभीर

प्रकाराचा परिणाम समाजाच्या मनावर होतोच होतो ! आतां युद्धोत्तर जगाच्या पुनर्घटनासमितींत साहित्यिकाला स्थान नाहीं याबद्दल जोगांनीं साहित्यिकांना हिणवण्यांत कांहींच अर्थ नाहीं ! अशी परिस्थिति आहे म्हणून तर या जगाचें हें 'असें' झालें आहे ! आणि युद्धोत्तर जगाची घडी बसविण्याच्या मसलतीमधून जोंपर्यंत साहित्यिकाला वगळण्यांत येईल तोंपर्यंत ती कधींहि चांगल्या रीतीनें बसणें शक्य नाही ! 'अटलांटिक सनदे' सारखा गाढवपणा केवळ मुत्सद्दीच करूं जाणे ! त्यामध्यें एकादा शॉ, टागोर किंवा रोमा रोलाँ असता तर त्या सनदेचा असा विचका कधींच झाला नसता !

समाजाच्या घटनेंत ललितलेखकाला कांहीं एक स्थान नाहीं असें आग्रहानें सांगून झाल्यानंतर जोगांना काय वाटलें कोणास ठाऊक ! आपलें चुकलें अशी त्यांची समजूत झाली आणि त्याबरोबर त्यांनीं घाईघाईनें ताबडतोब एक खुलासा करून टाकला. ते म्हणाले, "साहित्यिकाला करण्यासारखें असें समाजोपयोगी कार्य एकच आहे, आणि तें म्हणजे समाजसंघटनेंतील दोष दाखवावयाचे ! साहित्यिक हा सामाजिक विधिमंडळांमधील कायमचा विरोधी पक्ष होय !" हा खुलासा करीत असतांना आपण काय बोलत आहोंत याचें जोगांना मुळीच भान राहिलें नाहीं ? नक्कल नीट पाठ नसली म्हणजे भलतेंच कांहीं तरी बोलून एकादा नट सबंध नाटकाचा जसा विचका करून टाकतो तसें हा खुलासा करून जोगांनीं केलें आहे ! साहित्याचा हेतु केवळ मनोरंजन करणें हा होय, समाजांत जें घडतें त्याचें तिऱ्हाइतांसारखें लांब बसून खरेंखुरें चित्र काढावयाचें यापेक्षां समाजाशीं साहित्यिकाचा कांहीं एक संबंध नाहीं, साहित्यिकाला कोणीतीहि एक सामाजिक विचारसरणी असतां कामा नये. एवढी सगळी आरडाओरड करून शेवटीं जोगांनीं आपल्या मुख्य सिद्धांताच्या पायावरच कुऱ्हाड घातली आणि सारा व्यूह कोसळून खालीं पाडला ! सामाजिक विधिमंडळांत दोषदर्शकाचें का होईना पण साहित्यिकाचें कांहींतरी महत्त्वाचें कार्य आहे असें मान्य करून जोगांनीं आपल्या केवलानंदाच्या उपपत्तीच्या नरड्याला चांगलेंच नख लावलें आहे ! सामाजिक विधिमंडळांत साहित्यिक हा कायमचाच विरोधी पक्ष आहे हें जोगांचें म्हणणें एकांगी असूनसुद्धां मी तें मान्य करतों. कां तर त्यामुळें त्यांचा पूर्वपक्ष सपशेल उताणा पडतो ! कारण विधिमंडळात त्या विरोधी पक्षाचें ध्येय

कोणत्याहि अर्थी मनोरंजन करण्याचें किंवा निरागस आल्हाद देण्याचें नाहीं, हें स्वत: जोगच मान्य करतील ! नुसत्या मनोरंजनापेक्षां अधिक जबाबदारीचें आणि जोखमीचें काम विरोधीपक्षाला करावें लागतें हेंहि त्यानंतर मान्य करणें क्रमप्राप्तच आहे. असें झालें म्हणजे गवई, पेटीवाला, कथ्थक किंवा तबलजी यांच्या पंक्तीमध्यें साहित्यिकाला जें सुरुवातीपासून जोगांनीं बसवून ठेवले होतें ती त्यांची योजना त्यांना बदलणें भागच पडतें ! आतां अधिकारारूढ समाजसंघटनेमधील दोष किंवा उणीवा दाखविण्याचे कामीं साहित्यिकाची लायकी जोग ज्या अर्थीं मान्य करतात, त्या अर्थीं त्याबरोबर त्यांना हेंही मान्यच करावें लागेल कीं, दोषरहित समाजरचना काय आहे किंवा काय असू शकेल, याची प्रत्येक साहित्यिकाला स्पष्ट अशी कल्पना असलीच पाहिजे ! ती जर नसेल तर समाजसंघटनेंतील दोष त्याला कसें दाखवितां येतील ? ही कल्पना जोगांनीं मान्य केली म्हणजे ते अल्लादपणें आमच्याच पक्षांत येऊन कोसळतात ! आणि मग त्यांचें आमचें भांडणच उरत नाहीं ! चिरकालीन मानवी कल्याणाच्या दृष्टीनें समाजाची आदर्श रचना काय असावी याबद्दल प्रत्येक ललितलेखकाची विचारसरणी ठाम असली पाहिजे. अशी विचारसरणी ज्या लेखकांची असते त्यांना आम्ही ' पुरोगामी लेखक ' म्हणतो आणि अशी विचारसरणी ज्या ज्या ललित कृतींमधून प्रकट होत असते, त्या त्या कृतींना आम्ही ' पुरोगामी वाङ्मय ' म्हणतों ! केवलानंदाची तरफदारी करण्याचा आव आणून ' पुरोगामी साहित्यावर हल्ला करावयास निघालेल्या जोगांना आपलें सोंग शेवटपर्यंत टिकवितां आलें नाहीं यांतच त्यांच्या हल्ल्याचा पोकळ वरपांगीपणा दिसून येतो ! यापेक्षां त्यांचे अधिक हाल ते काय करावयाचे ?

तेव्हां जोग म्हणतात त्याप्रमाणें ललितलेखक हा समाजाचें केवळ मनोरंजन करणारा एक विदूषकहि नाहीं किंवा ललितलेखन हें केवळ समाजजीवनाचीं चित्रें रंगविण्याचें कामहि नाहीं ! समाजाच्या भावना प्रक्षुब्ध करून त्या मार्गानें समाजाची विचारशक्ति जागृत करणें हें ललितवाङ्मयाचें कार्य आहे. ललितवाङ्मय ही जीवनाचा अन्वय लावण्याची धडपड आहे किंवा जीवनाचा अर्थ समजावून सांगण्याचा प्रयत्न करणारें तें एक मनोहर भाष्यच आहे असें म्हणा ना ! ललितवाङ्मयानें मनोरंजन होतेंच होतें, पण तें कांहीं

त्याचें ध्येय नव्हे. प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या समाजाचें मार्ग-दर्शन करणें—कदाचित् दोषदर्शन करणें आणि कदाचित् प्रगतीच्या अंतिम स्वरूपाचीं स्वप्नेंहि तिखटमीठ लावून त्याला सुनाविणें हेंच ललित-लेखकाचें मुख्य कर्तव्य आहे.

मुंबई साहित्य संमेलनांत अध्यक्षपदावरून प्रा. जोगांनीं ललितवाङ्मयावर प्रकट आक्षेप घेतले म्हणूनच या बडोदें साहित्य संमेलनांत त्या आक्षेपांना उत्तर देऊन ललितवाङ्मयाची ही कैफियत आपल्यापुढें मांडण्यास मी प्रवृत्त झालों; ती आपण मान्य कराल अशी आशा आहे. या माझ्या कैफियतींत तात्त्विक चर्चेपेक्षां दुसरा, कोणताहि अभिनिवेश नाहीं हें आपणांस दिसून आलें असेलच ! संपलें माझें बोलणें !

THE IDEAL BOOK CO.
CHABILDAS ROAD.
BOMBAY 14.

*"प्रथम महाराष्ट्र कविसंमेलन साजरें करावयास जमलेल्या सन्मान्य कवि–कवयित्रींनो,*

काव्यप्रेमी विद्वान् रसिक बंधुभगिनींनो, या संमेलनाच्या स्वागतमंडळाचें आमंत्रण स्वीकारून आज आपण या ठिकाणीं हजर राहात आहांत याबद्दल मंडळातर्फे मी आपलें अत्यंत प्रेमपूर्वक स्वागत करतों. निमंत्रित पाहुणे-मंडळी जमली म्हणजे त्याचें सत्कारपूर्वक स्वागत करणें हें शिष्टाचारास व शिरस्त्यास धरून आहे म्हणूनच केवळ मी आपलें स्वागत करतों असें नाहीं. संमेलनाच्या पूर्वतयारीस फारसा अवकाश नसतां गडबडीच्या व घाईघाईच्या आमंत्रणाचा स्वीकार करून कार्याच्या कळकळीनें आपण या ठिकाणीं आलेले आहांत याची आम्हांला जाणीव आहे; म्हणून कृतज्ञतापूर्वक व आरंभीं म्हटल्याप्रमाणें प्रेमपूर्वक मी आपलें स्वागत करतों. किती कृतज्ञतापूर्वक किंवा किती प्रेमपूर्वक मीं हें स्वागत करतों हें विशेषणांच्या साहाय्यानें व्यक्त करणें शक्य नाहीं.

"भावनेचा विचार व्यक्त करण्यास भाषा असमर्थ असते. गणित-शास्त्रांत या बाबतींत चांगली सोय आहे. एकाद्या संख्येची पट दाखवितांना तिच्या डोक्यावर हवा तो आंकडा चढविला म्हणजे पटीची कल्पना बिनचूक सुचवितां येते. आम्ही कवि जरी 'शब्दसृष्टीचे ईश्वर' असलों तरी यथार्थ भावना व्यक्त करतील असल्या ताकतीचे शब्द निर्माण करण्यास आम्ही असमर्थ आहोंत. म्हणून आंकड्याच्या अंगीं नसणारी जी एक सूचक शक्ति शब्दांत असते तिच्यावरच अवलंबून आपणास रहावें लागतें. वास्तविक पहातां, कवींच्या संमेलनास जमलेल्या प्रतिनिधींचें व रसिकांचें समर्पक स्वागत करावयाचें म्हटलें तर "स्वागताध्यक्षानें काव्यबद्धच भाषण करावयास हवें."

सुप्रभात झालेली आहे; उषासुंदरी भालप्रदेशीं कुंकुम चर्चून व हातांत उन्मीलित पुष्पांच्या माला घेऊन पूर्व मंदिरीं आपलें स्वागत करण्यास सज्ज झालेली आहे. पाचूंच्या हिरव्या साड्या नेसून लतावेली स्वागतासाठीं सुसज्ज झालेल्या आहेत. दंव-बिंदूचे शिरपेंच डोक्यांत घालून यःकश्चित् तृणें देखील सजलीं आहेत. आकाशांतून विहंग-वृंद—निसर्गाचे भाट—ललकाऱ्या मारीत फिरत आहेत. झऱ्यांना तर इतकी घाई झालेली आहे कीं, डोंगरावरून धाडधाड उड्या मारीत आपल्या स्वागतार्थ धांवून येत आहेत. अशा निरनिराळ्या कल्पनांनीं व उत्प्रेक्षांनीं सजविलेलें स्वागतपर काव्य मला स्वतः रचतां आलें नसतें असें नाहीं. तथापि, "संगमनेरकर कवीप्रमाणें मी शीघ्र कवि नसल्यानें" आयत्या वेळच्या स्फूर्तीवर अवलंबून रहाणें मला शक्य नव्हतें. आधीपासूनच काव्य रचून ठेवावें तर वेळ थोडा असल्यानें तें शक्य नव्हतें. म्हणून मी शेवटीं ठरविलें कीं, गद्यांतच स्वागत करावें. त्याबरोबर मनांत असा विश्वास होता कीं, या ठिकाणीं सारे कवीच जमणार असल्यानें माझें गद्य भाषण ते मनांतल्या मनांत पद्यमय व वृत्तबद्ध करून घेतील. (हंशा)

सुरुवातीसच, असा कोणी प्रश्न विचारील कीं, हें जें संमेलन आज येथें भरत आहे हें कोणाच्या विद्यमानें? कुणीं कोणाला हें भरविण्याचा अधिकार दिला? साहित्यामध्यें हल्लीं कायदेशीर भाषा फार ऐकूं येऊं लागली आहे. ज्या शब्दांनीं 'प्रेमसंन्यासां'तील गोकुळाला अवसान भरत होतें त्या 'फैसल्ला' 'मुकदमा', 'लवाद', *Locus Standi* इ. जोरदार शब्दांचे स्फोट सरस्वतीच्या मंदिरांत आतां ऐकूं येऊं लागले आहेत. कायदे बाजीच्या

संघाची बाधा आमच्या महाराष्ट्र परिषदेला देखील झालेली आहे. (हंशा). व या बाधेंतून कोणता पंचाक्षरी आमच्या परिषदेला मुक्त करील तें भुतांचा दुर्दैवी देव श्रीदत्तच जाणू शकेल. असो. तर या संमेलनाच्या बाबतींत जर असा कायदेशीरपणाचा प्रश्न उपस्थित केला तर त्याला तसल्याच भाषेंत उत्तर देणें आम्हांला शक्य नाहीं. अगदींच देतां येणार नाहीं असें मात्र नाहीं. आमच्या पुण्याला इतक्या साहित्यविषयक संस्था आहेत कीं, कोठल्या तरी संस्थेच्या प्रशस्त पंखाखालीं बसून आम्हांला उत्तर देतां येणें शक्य आहे, कीं अमुक अमुक संस्थेच्या विद्यमानें आम्ही हें संमेलन भरवीत आहोंत. पण बादरायण स्वरूपाचा उपद्व्याप करून स्वतःच्या कृतीचें कायदेशीर समर्थन करण्याची आम्हांला आवश्यकता वाटत नाहीं. (हंशा)

"मी स्पष्टपणें सांगतों, टिचून नव्हे" (हंशा) हें कवींचें संमेलन कोणत्याही १८६६ सालीं कायद्यानें रजिष्टर झालेल्या संस्थेमार्फत भरत नाहीं. आम्हाला कोणाच्याही आज्ञापत्रकाचा, फर्मानाचा किंवा फतव्याचा आधार नाहीं. चांगली गोष्ट करावयास कोणाच्याही परवानगीची जरूरी लागत नाहीं. ज्या गोष्टी करावयाच्या कीं नाही याबद्दल करणाराच्या मनांत शंका असते त्यांनीं पाहिजे तर ठरावाचा आणि परवानगीचा आधार घेऊन ठेवावा.

हें संमेलन भरविण्याच्या कल्पनेची हकीकत अगदीं थोडकी आहे. पुण्यांतील कांहीं कवींना व काव्यप्रेमी रसिकांना वाटलें कीं, अशा तऱ्हेचें एक संमेलन भरवावें. काव्याचीच भाषा वापरावयाची म्हटलें तर असें म्हणतां येईल कीं, या मंडळींना संमेलन भरविण्याची 'स्फूर्ति' झाली; आतां एकदां स्फूर्ति झाल्यावर ती कशी दाबून ठेवतां येईल ? कोणीसें म्हटलें आहे कीं "प्रेम, खोकला व स्फूर्ति," या तीन गोष्टी कधींही दाबून ठेवतां येत नाहींत. (हंशा) उलट त्या जितक्या दाबाव्यात तितक्या अधिक जोरानें उसळून प्रकट होतात. तेव्हां संमेलन भरविण्याची जी स्फूर्ति आमच्या कांहीं मंडळींना झाली तिचें अपत्य म्हणजे प्रस्तुत संमेलन ! स्वयंस्फूर्तीनें मनाच्या मुहूर्तावर भरलेलें हें संमेलन आहे. आणि म्हणूनच कवींना हें विशेष पसंत पडेल अशी मला आशा आहे.

बाकीच्या कायदेबाज मंडळींनीं आपलीं कलमाचीं बोटें आमच्यावर मोडलीं तरी त्याची मला फारशी परवा नाहीं.

आतां आज ज्या अर्थी हें संमेलन येथें भरत आहे त्या अर्थी हें भरावें कीं न भरावें याचा जो एक वाद कांहीं दिवसांपूर्वी सुरू झालेला होता त्याची येथें चर्चा करण्याची वास्तविक जरूरी नाहीं. महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या येत्या "कोल्हापूरच्या अधिवेशनाच्या सुमारास कवींचें एक पोटसंमेलन भरणार असल्याचें जाहीर झालें आहे. त्या संमेलनाच्या चालकांची अशी इच्छा होती कीं, हें आमचें संमेलन न भरलें तर बरें. कां तर, अशा प्रकारचें संमेलन भरविण्याची कल्पना त्यांना आधीं सुचली होती. कविसंमेलन भरविण्याची कल्पना ही कांहीं बिजलीच्या बत्तीच्या शोधासारखी अपूर्व कल्पना नव्हे कीं तिच्या पेटंटासाठीं एकाद्यानें भांडत बसावें. येथें कविसंमेलन भरलें म्हणजे तें कोल्हापूरला भरूं नये असेंही कांहीं नाहीं किंवा तेथें भरणार असलें म्हणजे येथें भरूं नये असेंही कांहीं नाहीं. अशा तऱ्हेचीं संमेलनें जितकीं भरतील तितकीं हवींच आहेत. एवढेंच काय पण दर गांवीं आणि दररोज जरी कविसंमेलनें भरलीं तर तीं नको कोणाला आहेत? कवि प्रतिनिधींचा तुटवडा खास कधीं पडणार नाहीं. हा ज्याचा त्याचा स्फूर्तीचा प्रश्न आहे. हा प्रेरणेचा प्रश्न आहे. ज्या ईश्वरी प्रेरणेनें महात्माजींना उपवास करायला लावलें "त्याच ईश्वरी प्रेरणेनें" कवडेशास्त्र्यांना उपवास करण्याची बुद्धि झाली. ज्या प्रेरणेनें आम्ही हें संमेलन भरवीत आहोंत त्याच प्रेरणेनें कोल्हापूरचें काव्यसंमेलन भरेल? आतां ही खरी स्फूर्ति आहे कां काकड्या व चिंचा खाऊन मुद्दाम अंगावर ओढून आणलेलें हिंव आहे. याच्या चर्चेच्या भानगडीत कोणी पडूं नये. (हंशा व टाळ्या).

खरें पहातां समेलनें, सभा, परिषदा, स्वागतमंडळें, उपाध्यक्ष, अध्यक्ष, ठराव, आणि ते पसार करणें हा गद्य जगानें आपल्या व्यवहारासाठीं निर्माण केलेला प्रपंच कवींच्या सृष्टीत चमत्कारिक दिसतो. हे शब्दच कसे कानाला कर्कश लागतात. माझ्या मतें कविसंमेलनास असल्या नियमबद्धतेच्या कृत्रिम उपाधी मुळींच असतां कामा नयेत. काव्यामध्यें जगाचे व बाह्योपचाराचे बंध तोडण्याच्या वल्गना करणाऱ्या आम्ही कवींनीं संमेलन भरवितांना मात्र जगाच्या मळलेल्या वाटेनें कां जावें हें मला कळत नाहीं.

"कवींच्या संमेलनाची माझी कल्पना अगदीं काव्यमय आहे" (टाळ्या) मला जर शक्य असतें, तर मी अशा तऱ्हेनें संमेलन भरविलें असतें. वसंत-

ऋतुमध्यें मी अशा संमेलनाची योजना केली असती कीं, ज्या वेळीं सृष्टि अगदीं उत्फुल्लवदन झालेली आहे, फुलांची चोहींकडे लयलूट झालेली आहे, आम्र-वृक्षावर मोहोर बहरलेला आहे व त्या "मोहोराच्या रसाळ मंजिऱ्या चाखल्या-मुळें मत्त झालेल्या कोकिळा" आपलें कुहू-संगीत गात बसलेल्या आहेत. एकाद्या आमराईच्या मध्यभागीं असलेल्या हिरव्यागार गवताच्या गालीच्यावर कवी जमलेले आहेत. जागोजाग कविकवयित्रींचे निरनिराळे संघ पडलेले आहेत. कुणी काव्यगायन करीत आहे तर कुणी काव्यचर्चा करीत आहे, कोणी ब्रह्मानंदीं टाळी लावून बसलेले आहेत. जिकडून तिकडून गायनाच्या ललकाऱ्या व हास्याचे तुषार ऐकूं येत आहेत. त्या ठिकाणीं अशा प्रकारच्या खुर्च्या किंवा उच्चासनें किंवा 'सुस्वागतम्' च्या बेगडी पाट्या वगैरे कांहीं गोष्टी नाहींत, भाषणें नाहींत, चर्चा नाहींत कीं ठराव नाहींत! असें संमेलन भरलें "तरच तें कवींचें खरें संमेलन!" तथापि, असल्या काव्यमय संमेलनाची कल्पना कोणालाही किंबहुना कवींनाही पटणार नाहीं. ठराविक चाकारीचें संमेलन झाल्याशिवाय त्यांना हायसें वाटणार नाहीं आणि म्हणूनच कीं काय आपणाला या चार भिंतींच्या आंत आज जमावें लागलें आहे. प्रस्तुत संमेलन ज्या भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या या मंदिरांत भरत आहे त्या इमारतीवर टीका करण्याचा अर्थात् माझा हेतु नाहीं. उलट एका अर्थीं हें संमेलन या इतिहास-संशोधक-मंदिरांत भरत आहे तें युक्तच आहे. कारण १००—२०० वर्षांनीं कदाचित् येथें जमलेल्या "बऱ्याच कवींची कविता या इमारतीमधील दप्तरांत येऊन बसण्याचा संभव आहे." आणि मग कदाचित् त्या पिढीचें पोतदार मंडळाच्या एकाद्या पाक्षिक सभेंत याच ठिकाणीं वाद करीत बसावयाचे कीं 'केशवसुत' एक होते का दोन? किंवा 'जननीजनकज' एकच कीं, सगळे?

प्रस्तुत संमेलन भरविण्याचा हेतु काय असा कदाचित् कोणी प्रश्न करील. इतर जीं ज्ञातिसंमेलनें भरतात त्यांच्या आणि अशा काव्यसंमेलनाच्या हेतूमध्यें मोठा फरक आहे. आम्ही येथें कोठल्याही हितसंरक्षणाच्या कामासाठीं किंवा स्वतःची गाऱ्हाणी वेशीवर टांगण्यासाठीं जमलेले नाहींत. मुख्य प्रधानांनीं "जातवार निर्णयांत कवी लोकांचा समावेश केला नाहीं म्हणून आम्हांला तक्रार करावयाची नाहीं किंवा सरकारी नोकरींत एकदशांश नोकरांचा भरणा कविवर्यांतून करावा अशी सरकारकडे आम्हांला शिफारसही पाठवावयाची

नाहीं. मासिकाच्या संपादकांनी इत:पर कवितांना मोबदला द्यावा किंवा निदान नापसंत कविता परत पाठविण्याच्या बाबतींत कवींना जादा पोष्टेजचा भुर्दंड तरी पाडूं नये असेंही आम्हाला येथें ठरवावयाचें नाहीं. (हंशा)

"बाल कवींना निम्म्या दरानें प्रवास" करूं द्यावा अशी आम्हाला रेल्वे कंपन्यांना विनंतिही करावयाची नाहीं किंवा वृद्ध कवींसाठीं आम्हाला एकादी प्रॉव्हिडंट फंडाची योजनाही करावयाची नाहीं. डेक्कन जिमखाना कॉलनी-सारखी आम्हांला "कवींची स्वतंत्र कॉलनी" स्थापावयाची नाहीं. किंवा पशु-पक्ष्यांनीं गजबजलेली एक "स्पेशल बाग कवींसाठीं" म्युनिसिपालिटीनें नदीच्या पलीकडे काढावी असाही आम्हाला म्युनिसिपालिटीला विनंतिअर्ज करावयाचा नाहीं.

आम्ही जे येथें जमलों ते स्वत:च्या समाधानासाठीं व आनंदासाठीं एकमेकांच्या भेटीसाठीं आणि काव्यगायन श्रवणाचा आनंद उपभोगण्यासाठीं. फार झालें तर कांहीं जिव्हाळ्याच्या विषयाची खेळीमेळीनें चर्चा करण्यासाठीं. आम्ही सारे कवितेचे वेडे आहोंत, "कवितेसाठीं सर्वस्वाची होळी" करावयास तयार झालेले आम्ही वेडे फकीर आहोंत. तेव्हां आमच्या स्वार्थाचा विचार करण्याचा येथें प्रश्नच नाहीं. काव्यासाठीं कवी जो स्वार्थत्याग करतात त्याशी तुलना करावयाला क्वचितच एकादें उदाहरण सांपडेल.

"कवि कविता कां करतो" या धंद्यापासून त्याला एक पैचीही प्राप्ति नाहीं. प्राप्ति नाहीं तर नसो. फुकटच्या कविता वाचायला किंवा ऐकायलाही कोणाची तयारी नाहीं. चार मंडळी 'बरें' म्हणतील तर त्याचीही आशा नाहीं. उलट काय जी अब्रू पूर्वीची कमावलेली असेल ती देखील या नादामुळें नाहींशी व्हावयाची. केशवसुतांना देखील असाच अनुभव आला होता.

*आप्तवर्ग म्हणती यातें । कुठली ही जडली व्याद ॥*

इतकी प्रतिकूल परिस्थिति असताना देखील कवीचा कविता लिहि-ण्याचा उद्योग अव्याहत चाललेला असतो. एवढें काव्याचें कवीला काय आकर्षण आहे ? व्यवहारी जगाचा जरी काव्यावर विश्वास नसला तरी खुद्द कवीचा काव्याच्या प्रभावशालित्वावर पूर्ण विश्वास आहे.

"हल्लींच्या मराठी कवितेसंबंधीं बोलावयाचें" तर असें म्हणतां येईल

कीं, गेल्या १३ वर्षांत आधुनिक कवितेची निर्मिति झपाट्यानें होऊं लागली आहे.

पूर्वी मासिकांतून महिन्याला एकदां दर्शनास येणारी कविता आतां दर आठवड्याला साप्ताहिकांतून प्रकट होऊं लागली आहे. एवढेंच काय पण "सिद्धधूप की जय", अशा काव्यमयगर्जना देखील कांहीं जाहिरातवाले करूं लागले आहेत. एकदम लोकांचे डोळे दिपतील अशा अपूर्व प्रतिभेचा गोविंदाग्रजासारखा किंवा बालकवीसारखा कवि जरी आजकाल आढळांत येत नसला तरी बऱ्याच चांगल्या दर्जाची कविता लिहिणारे आज पुष्कळ कवि आहेत.

"विषयाची व वृत्तांची विविधता" हा आजच्या काव्याचा विशेष आहे. काव्यगायन हेंही आजच्या आधुनिक कवितेचे वैशिष्टच आहे. आणि त्यामुळेंच आधुनिक कविता अधिक लोकप्रिय झालेली आहे. या बाबतींत कवींचे कांहीं दोष लक्षांत घ्यावयाला पाहिजेत.

अनुकरणप्रियता ही मनुष्यप्राण्याची जरी नैसर्गिक प्रवृत्ति असली तरी ही प्रवृत्ति कवींमध्यें फारच मोठ्या प्रमाणानें आढळून येते. (हंशा) एका कवीनें एकहि गोष्ट केली कीं, तशी गोष्ट इतरांनीं करावयालाच पाहिजे अशी पुष्कळ कवींची समजूत झालेली दिसते. एकानें कवितेच्या डोक्यावर एकादें गूढ ब्रह्मवाक्य घातलें कीं, बाकीच्यांनीं आपापल्या कवितेच्या डोक्यावर निरर्थक अनुप्रासात्मक वाक्यांचें ओझें दिलेंच समजा. एकानें कवितेचा शेवट अनुष्टुपानें केला कीं, बाकी साऱ्यांच्या कविता अनुष्टुप वृत्तांत प्राण सोडणार असें नक्की समजावें. एकानें कवितेंत 'अन्' शब्द वापरला कीं, बाकीच्यांनीं "कवितेची *अन्नान्नस्थिती* करून टाकलीच समजा. मधें, ऐतिहासिक कवितांचें असेंच खूळ माजलें होतें. आपल्या दुर्दैवानें व कवींच्या सुदैवानें आमच्या पूर्वजांनीं मुबलक कत्तल करून ठेवली आहे. तेव्हां असलाच एकादा रक्तानें रंगलेला प्रसंग घ्यावयाचा "उद्धवा, शांतवन कर जा!" ही बिनवारशी चाल घ्यावयाची.

"उद्गार चिन्हांचें डांव" जागोजाग पुरावयाचे व बखरीतल्या शब्दांची अधून मधून राळ उडवावयाची. असलें आमच्या ऐतिहासिक कवितेचें स्वरूप होतें.

तशाच या सणासुदीच्या कविता. चंद्राला गिऱ्हाण लागला म्हणजे दान

मागण्यासाठीं जशी कांहीं लोकांची धांदल उडते तसे एकादा सण आला म्हणजे आमचे कवी लोक सैरावैरा धांवू लागतात. संक्रांत आली की यांचा शिमगा सुरू झालाच; दसरा आला कीं हे घोड्यावर बसून शिलंगणाला निघालेच ? प्रेमाचा तीळ घ्या, भक्तीचा पाक घ्या, हृदयाची कढई करा. अन् अशा तऱ्हेनें हलवा करा. "या हलव्याच्या कविता वाचल्या कीं, माझ्या अंगावर कांटा उभा राहतो" (हंशा) होळीच्या कविता वाचून कोणाच्याही अंगाचा भडका झाल्याशिवाय रहाणार नाहीं. होळीवरच्या एकून एक कविता होळींत टाकण्याच्या लायकीच्या असतात अशी माझी समजूत आहे. शिवाय या पंचांगांच्या भांडणांमुळें "सणांची संख्या दुप्पट" झाली असल्यामुळें सणा-वाराच्य कवितांची ही वाढ दुपटीनें होऊं लागली आहे. (हंशा व टाळ्या) तशा त्या मुरलीच्या कविता ! गोकुळांत कृष्णानें जेवढा धुमाकूळ घातला नसेल तेवढा धुमाकूळ त्याच्या या मुरलीनें मराठी साहित्यांत माजविलेला आहे. जो कवि उठतो तो वीतभर लांबीचा लांकडाचा तुकडा कृष्णाच्या तोंडांत अडकवितो, आणि सांगतो "वाजिव वाजिव कान्ह्या मुरली" आतां हा 'कान्ह्या' मुरली वाजविणार तरी किती !

"मुरली वाजवून वाजवून त्याचे ओंठ अद्यापि कसे हुळहुळे झाले नाहींत." किंवा त्याला '*Facial Paralysis*' कसा होत नाहीं ! आधींच बिचाऱ्याचा पाय अधू; त्यांत आणखी तोंड वांकडें झालें म्हणजे संपलेंच मग. सोळा हजार एकशें आठ गोपींपैकीं एक गोपी देखील त्याला दारांत उभी करणार नाहीं. या मुरलीच्या कवितेच्या जोडीला कधीं कधीं चित्रें देण्यांत येतात ती या कवितेसारखींच दिव्य असतात ! त्यांत "कृष्ण मुरली वाजवितो आहे कां ऊंसांचें कांडें सोलून खातो आहे" हेंच कळत नाहीं ! (हंशाच हंशा) तेव्हां कवींनीं ही आपली अनुकरणप्रियता कमी करावयाला हवी. स्वतंत्र दृष्टीनें व्यासंगपूर्वक काव्याचा विचार करावयाला हवा. त्याचप्रमाणें चार उपऱ्या कविता लिहिल्यानें आपण 'कवि' झालोंत ही कल्पना कवींनीं सोडून द्यावयास पाहिजे.

"काव्य लिहिण्यापेक्षां काव्य जगविण्याकडे" कवींनीं अधिक लक्ष द्यावयास पाहिजे. कवि हा सौंदर्याचा प्रचारक व उपासक आहे. तेव्हां कवींनीं स्वतःचें आयुष्य सौंदर्यपूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तर सौंदर्याचा काव्यद्वारा

प्रचार करण्याची पात्रता व अधिकार कवीच्या अंगीं येईल. नाहीं तर पुष्कळ वेळां असें होतें कीं, "फुलावर पुडेच्या पुडे कविता लिहिणारा कवि" चुकून पैशाचें देखील फूल विकत घेतांना आढळत नाहीं. समाजांत फार चिखल माजला आहे, म्हणून केविलवाणा हंबरडा फोडणाऱ्या कवीच्या अंगणांत गुडघाभर चिखल सांचला तरी तें त्याच्या गांवीं देखील नसतें. रस्त्यावर एकादा दगड पडला तर तो बाजूला फेंकण्याची तो तसदी घेत नाहीं. उलट तो दगड कोणाच्या तरी कोमल चरणतळाला लागावा म्हणजे तो चरण रक्तबंबाळ झाल्यावर आपल्याला कविता करावयाला संधि मिळेल अशी त्याची कल्पना असते. तुंगगिरीची उशी करून "इंद्रधनुष्याची तुतारी फुंकण्याच्या गप्पा मारणारा हा कवि त्याच्या घरीं गेलों तर, विड्या फुंकीत पडलेला असतो." तुतारी फुंकणें म्हणजे काय चेष्टा आहे ? त्याला छातींत जोर लागतो. तुतारी फुंकणें आणि विड्या फुंकणें या कांहीं एकसारख्या गोष्टी नाहींत. (हंशा).

तरी केवळ शाब्दिक काव्य लिहिण्याच्या निव्वळ भरीस न पडतां जर सौंदर्यपूर्ण आयुष्य जगण्याची प्रवृत्ति आमच्या कविवर्गांत वाढेल तर या महाराष्ट्रांत रविंद्रनाथ टागोरांसारखा खरा कवि निर्माण होईल ! यापेक्षां या विषयावर अधिक बोलून मी आपला वेळ घेऊं इच्छित नाहीं.

आजच्या कवि-संमेलनाला ज्यांची आपण योजना करून ठेवलेली आहे त्यांच्या आयुष्याकडे व कृतीकडे पाहिलें तर आपणांस अनुरूप अध्यक्ष मिळाला असेंच म्हणावयास पाहिजे. साहित्याच्या कोणत्याही शाखेंत ते यशस्वीपणें संचार करतात. ते निव्वळ काव्य लिहिणारे कवि नाहींत तर काव्य जाणणारे कवि आहेत. उच्च ध्येयासाठीं सर्वस्वाची आहुति देणारे ते कवि आहेत. 'कवितेच्या पायीं आयुष्याचें मातेरें होतें' असे उद्‍गार व्यवहारी लोकांच्या तोंडून कधीं कधीं ऐकू येतात. केशवसुत तर कवितेला वीज म्हणत असत. ती ज्याच्या डोक्यावर पडेल, त्याचा चक्काचूर व्हावयाचा. तथापि "कवितेमुळें आणि केवळ एकाच कवितेमुळे"–प्रो. वेहेरे यांच्या आयुष्याचें जितकें नुकसान झालें आहे तितकें एकाद्या कवीचें क्वचितच नुकसान झालें असेल. कदाचित् वेहेरे आपल्या आयुष्याचें नुकसान झालें नसून सार्थक झालें असें म्हणतील. तो त्यांचा बाणेदारपणा आहे, तें त्यांचें धैर्य आहे. या एकाच गोष्टीसाठीं ते कविसंमेलनाचे अध्यक्ष होण्यास लायक आहेत असें मी समजतों.

आतां माझ्या स्वतःसंबंधीं बोलायचें म्हटलें तर स्वागतमंडळानें ही स्वागताध्यक्षत्वाची जबाबदारी मजवर कां टाकली हें मला कळत नाहीं. कवि लोकांचें स्वागत करण्याच्या कामांत मी फार कुशल आहे असा कांहीं प्रकार नाहीं. उलट ज्या तऱ्हेचा स्वागतसमारंभ मी आजपर्यंत कांहीं कवींचा केलेला आहे त्यावरून "माझी स्वागत करण्याची तऱ्हा" फारशी कोणास आवडणार नाहीं. (हंशा) मला वाटतें याचाच वचपा काढण्यासाठीं म्हणून माझ्यावर ही कामगिरी सोंपविलेली असावी. निवडलेल्या माणसानें स्वतःच्या नालायकीसंबंधीं दोन शब्द तरी बोलणें हा शिष्टाचार आहे. तथापि तो शिष्टाचार न पाळतां मी म्हणतों कीं, "मी या कामाला कांहीं अगदींच नालायक नाहीं." कारण माझें काम केवळ स्वागताचेंच असल्यानें अत्यंत आनंददायक व सुलभ असें आहे आणि एवढेंदेखील काम मला साधणार नाहीं असें वाटत नाहीं. तरी फिरून एकवार आपणा सर्वांचें प्रेमपूर्वक स्वागत करून हें संमेलन यशस्वी करण्यांत आपण सक्रिय भाग घ्याल अशी मी आपणास नम्र विनंति करतों.

REFBK-0006495

देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार, पुणें २

पुढील प्रकाशन :—
बुद्ध आणि हिटलर
वि. स. खांडेकर